## प्रकल्पाची प्रगती



प्लॅटफॉर्म स्क्रीन दरवाजा MIDC



विज्ञान संग्रहालय



सहार क्रॉसओवर काम सुरू आहे



आरे कार डेपोमध्ये काम सुरू आहे



विज्ञान संग्रहालय



एससीपी एंट्री 3 कैनोपी

## प्रकल्पाची प्रगती


आरे कार डेपोमध्ये काम सुरू आहे


संपुष्टात आणण्याचे काम SAC NATM


ट्रेन संच ऑपरेशनसाठी सज्ज


सांताक्रूज

## प्रकल्पाची प्रगती



SCP हवाई दृश्य



SCP केबल ट्रे आणि डक्ट काम



SHC MEP NATM वर काम आयोजित करत आहे

## प्रकल्पाची प्रगती



सहार क्रॉस ओवर



ट्रेनसेट वाहतूक




विधान भवन स्टेशन

## प्रकल्पाची प्रगती



हुतात्मा चौक



सीएसटी स्टेशन



NATM क्रॉसओवर आचार्य अत्रेय आणि विज्ञान संग्रहालय

## एनसीपीए येथे बांधकामाचे पेंटिंग







NCPA मुंबईत mml 3 च्या चित्रांचे प्रदर्शन

## अनुक्रमणिका

१. संचालक मंडळ ...... 6
२. वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस ...... 8
३. अध्यक्षांचे भाषण ...... 15
४. संचालक मंडळाचा अहवाल ...... 19
५. सचिवीय लेखापरीक्षकाचा अहवाल व परिशिष्टे ...... 40
६. निगम शासनाचा अहवाल ...... 54
७. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या टिपण्या आणि त्यांना व्यवस्थापनाचे उत्तर ...... 62
८. स्वतंत्र लेखापरीक्षकांचा अहवाल ...... 66
९. 31 मार्च 2023 ला संपलेल्या वित्तीय वर्षाची टिपण्यांसह वित्तीय विवरणे व महत्वाची लेखा धोरणे ...... 82

## कंपनी सचिव

**कु. ऋतू देब**

### वैधानिक लेखापरीक्षक

**मे. चंन्दाभॉय अँड जस्सोभॉय**

FoF2, फिनिक्स हाऊस, “बी” विंग 4था मजला, 462, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल मुंबई – ४०० ०१३.

### सचिविक लेखापरीक्षक

**मे. पेससेटर कॉर्पोरेट सोल्युशन्स एलएलपी**

कंपनी सचिव
एल -३०, तळघर, कालकाजी
नवी दिल्ली - ११० ०१९.

## संचालक मंडळ

| | |
|---|---|
| **श्री मनोज जोशी** | अध्यक्ष, मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित आणि सचिव - गृहनिर्माण आणि नागरी कारभार मंत्रालय, भारत सरकार |
| **श्रीमती अश्विनी भिडे** (दि.१२.०७.२०२२ पासून) | व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित |
| **श्री जयदिप** | विशेष कार्याधिकारी (नागरी वाहतूक) आणि पदसिद्ध सहसचिव – गृहनिर्माण आणि कारभार मंत्रालय, भारत सरकारने नामनिर्देशित केलेले संचालक |
| **श्री श्याम सुंदर दुबे** (दि.०४.०८.२०२२ पर्यंत) | सहसचिव आणि वित्तीय सल्लागार, गृहनिर्माण आणि कारभार मंत्रालय, भारत सरकारने नामनिर्देशित केलेले संचालक |
| **श्रीमती नमिता मेहरोत्रा** (दि.२७.०४.२०२२ पासून) | संचालक वित्त NCRTC, गृहनिर्माण आणि कारभार मंत्रालय, भारत सरकार, भारत सरकारने नामनिर्देशित केलेले संचालक |
| **श्री राकेश चौधरी** (दि.२५.०५.२०२२ पासून) | ईडी/एसडी आणि ट्रान्सफॉर्मेशन, रेल्वे बोर्ड, भारत सरकारने नामनिर्देशित केलेले संचालक |
| **श्री दीपक अग्रवाल** (दि.२८.१२.२०२२ पासून) | सहसचिव (सीव्ही), भारत सरकारने नामनिर्देशित केलेले संचालक |
| **श्री मनोज सौनिक** | अतिरिक्त मुख्य सचिव वित्त, महाराष्ट्र शासनाचे नामनिर्देशित संचालक |
| **श्री इक्बाल सिंग चहल** | बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त, महाराष्ट्र शासनाचे नामनिर्देशित संचालक |
| **श्री एस व्ही आर श्रीनिवास** | महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण महाराष्ट्र शासनाचे नामनिर्देशित संचालक |
| **श्री भूषण गगराणी** | प्रधान सचिव नागरी – विकास महाराष्ट्र शासनाचे नामनिर्देशित संचालक |
| **श्री एस के गुप्ता** | संचालक (प्रकल्प), मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित |
| **श्री ए ए भट्ट** (दि.०५.०२.२०२३ पर्यंत) | संचालक (प्रणाली), मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित |
| **श्री अबोध खंडेलवाल** | संचालक (वित्त), आणि मुख्य वित्तीय अधिकारी, मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित |

बँका

१. भारतीय स्टेट बँक
२. एचडीएफसी बँक
३. आयडीबीआय
४. आयसीआयसीआय बँक
५. पंजाब नॅशनल बँक

## नोंदणीकृत कार्यालय

**मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित**
(भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकारचे संयुक्त उपक्रम)
ट्रान्झिट ऑफिस", ई-ब्लॉक, सिटी पार्कची उत्तर बाजू,
आयकर कार्यालयाच्या मागे, “ए”- विंग, वांद्रे ई, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स,
मुंबई - 400051

## नोटीस

**वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी सूचना**

याव्दारे सूचना देण्यात येत आहे की, मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादितच्या सदस्यांची स्थगित पंधरावी वार्षिक सर्वसाधारण सभा व्हीडीओ कॉन्फरसींग किंवा अन्य दृकश्राव्य (व्हीडीओ व्हिज्युयल मेथड) पद्धतीने बुधवार दिनांक 1 नोव्हेंबर, 2023 रोजी दुपारी 12.45 वाजता खालील व्यवसाय करण्यासाठी आयोजित केली आहे.

**सामान्य व्यवसाय –**

1. 31 मार्च, 2023 रोजी संपलेल्या वित्तीय वर्षासाठी सदर दिनांकास संपलेल्या वित्तीय वर्षातील कंपनीचे लेखापरीक्षण केलेले ताळेबंद, नफा आणि तोटा विवरणपत्रांसह, वित्तीय विवरणपत्रे, त्याच्या टिपण्या, सूची व त्यावरील वैधानिक लेखापरीक्षक यांचा अहवाल आणि भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (C&AG) यांनी केलेल्या टिपण्या, आणि संचालक मंडळाचा अहवाल प्राप्त करणे, विचारात घेणे आणि स्विकारणे.

**मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित**
यांच्यासाठी आणि त्यांच्या वतीने

**ठिकाण –** मुंबई
**दिनांक –** 10.10.2023

सही
**कंपनी सचिव**

**टिपण्यां –**

1. कोविड महामारीचा उद्रेक झाल्यामुळे कंपनी कामकाज मंत्रालयाने परिपत्रक क्रमांक 14/2020 दिनांक 8 एप्रिल, 2020, परिपत्रक क्रमांक 17/2020 दिनांक 13 एप्रिल, 2020, परिपत्रक क्रमांक 22/2020 दिनांक 15 जून, 2020, परिपत्रक क्रमांक 33/2020 दिनांक 28 सप्टेंबर, 2020, परिपत्रक क्रमांक 39/2020 दिनांक 31 डिसेंबर, 2020, परिपत्रक क्रमांक 02/2021 दिनांक 13 जानेवारी, 2021 आणि परिपत्रक क्रमांक 02/2022 दिनांक 5 मे, 2022 (एकत्रितरीत्या कंपनी कामकाज मंत्रालयाची परिपत्रके असे म्हटले आहे) याद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभा व्हीडीओ कॉन्फरसींग किंवा अन्य दृकश्राव्य पद्धतीने घेण्याची अनुमती दिली आहे. यामध्ये सभासदांनी एका ठिकाणी एकत्र येण्याची आवश्यकता नसेल. कंपनी कायदा, 2013 व कंपनी कामकाज मंत्रालयाच्या परिपत्रकांची पूर्तता करुन कंपनी आपली वार्षिक सर्वसाधारण सभा व्हीडीओ कॉन्फरसींग / दृकश्राव्य पद्धतीने घेत आहे.

2. कंपनी कायदा, 2013 च्या कलम 102 च्या अनुषंगाने, बैठकीत व्यवहार करावयाच्या विशेष व्यवसायाशी संबंधित विधान येथे संलग्न केले आहे.

3 सदर वार्षिक सर्वसाधारण सभा व्हीडीओ कॉन्फरसींग किंवा अन्य दृकश्राव्य पद्धतीने घेतली जात असल्याने या वार्षिक सर्वसाधारण सभेला सदस्यांना प्रॉक्सी नेमण्याची सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे प्रॉक्सी फॉर्म, उपस्थिती फॉर्म व रस्त्याचा नकाशा या सूचनेबरोबर जोडलेले नाही.

4 वार्षिक सर्वसाधारण सभेला जर सह-सभासद उपस्थित राहत असतील तर ज्या सदस्याचे नाव सभासदांच्या नोंदवहीत सदस्यांच्या नावाच्या यादीत सुरुवातीला येते त्या सदस्याला मतदान करण्याचा हक्क असेल.

5 ज्या सदस्यांना लेख्यांबाबत माहिती पाहिजे आहे, त्यांना कंपनीला आपल्याला काय माहिती हवी आहे ते लवकरात लवकर कळवावे (वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दिवसाच्या किमान सात दिवसाआधी) की ज्याद्वारे व्यवस्थापन सदर माहिती स्थगित वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी तयार ठेवेल.

## नोटिस

**वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी सूचना**

याव्दारे सूचना देण्यात येत आहे की, मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादितच्या सदस्यांची पंधरावी वार्षिक सर्वसाधारण सभा व्हीडीओ कॉन्फरसींग किंवा अन्य दृकश्राव्य (व्हीडीओ व्हिज्युयल मेथड) पद्धतीने शुक्रवार दिनांक 29 सप्टेंबर, 2023 रोजी दुपारी 12.45 वाजता खालील व्यवसाय करण्यासाठी आयोजित केली आहे.

**सामान्य व्यवसाय –**

1. 31 मार्च, 2023 रोजी संपलेल्या वित्तीय वर्षासाठी सदर दिनांकास संपलेल्या वित्तीय वर्षातील कंपनीचे लेखा-परीक्षण केलेले ताळेबंद, नफा आणि तोटा विवरणपत्रांसह, वित्तीय विवरणपत्रे, त्याच्या टिपण्या, सूची व त्यावरील वैधानिक लेखापरीक्षक यांचा अहवाल आणि भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (C&AG) यांनी केलेल्या टिपण्या, आणि संचालक मंडळाचा अहवाल प्राप्त करणे, विचारात घेणे आणि स्विकारणे.

2. 2023-24 या वित्तीय वर्षासाठी कंपनी कायदा, 2013 कलम 139 (5) सहपठित कलम 142 च्या प्रावधानानुसार भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (C&AG) यांच्या कार्यालयाने नियुक्त केलेले वैधानिक लेखापरीक्षक यांचे मानधन निश्चित करण्यासाठी संचालक मंडळाला प्राधिकृत करणे.

**विशेष व्यवसाय -**

3. **श्री. राजीव (डिन – 10260235) यांची (सिस्टीम अँड ओ अँड एम) कार्यकारी संचालक म्हणून संचालक मंडळावर नेमणूक करणे –**

पुढील ठरावाचा विचार करणे व योग्य वाटल्यास विशेष ठराव म्हणून पारित करणे –

**खालील ठराव पारित करण्यात येतो की**, निवड समितीच्या शिफारसीनुसार व संचालक मंडळाच्या मान्यतेनुसार कंपनी कायदा, 2013 च्या कलम 160, 161 आणि याबाबत अन्य लागू प्रावधाने आणि याबाबतच्या सर्व वैधानिक मान्यतांच्या अधिन राहून श्री. राजीव (डिन – 10260235) यांना कंपनीचे संचालक म्हणून 5 वर्षांच्या कालावधीसाठी किंवा ते 62 वर्षांचे होईपर्यंत (यापैकी जे आधी असेल ते) कराराने नेमण्यात येत आहे.

**पुढे असाही ठराव केला जातो की**, या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक त्या कृती करण्यासाठी महामंडळाचे कंपनी सचिव यांना प्राधिकृत (MCA) केले जात आहे.

**4. श्री. राचाप्रोलू डॉमिनिक रमणा (डिन – 10225071) यांची (प्लॅनिंग अँड रियल इस्टेट डेव्हलपमेंट / एनएफबी-आर) कार्यकारी संचालक म्हणून संचालक मंडळावर नेमणूक करणे–**

पुढील ठरावाचा विचार करणे व योग्य वाटल्यास विशेष ठराव म्हणून पारित करणे –

**खालील ठराव पारित करण्यात येतो की**, निवड समितीच्या शिफारसीनुसार व संचालक मंडळाच्या मान्यतेनुसार कंपनी कायदा, 2013 च्या कलम 160, 161 आणि याबाबत अन्य लागू प्रावधाने आणि याबाबतच्या सर्व वैधानिक मान्यतांच्या अधिन राहून श्री. राचाप्रोलू डॉमिनिक रमणा (डिन – 10225071) यांना कंपनीचे संचालक म्हणून 5 वर्षांच्या कालावधीसाठी किंवा ते 62 वर्षांचे होईपर्यंत (यापैकी जे आधी असेल ते) कराराने नेमण्यात येत आहे.

**पुढे असाही ठराव केला जातो की**, या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक त्या कृती करण्यासाठी महामंडळाचे कंपनी सचिव यांना प्राधिकृत(MCA) केले जात आहे.

**मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित**
यांच्यासाठी आणि त्यांच्या वतीने

**ठिकाण –** मुंबई
**दिनांक –** 06.09.2023

सही
**कंपनी सचिव**

**टिपण्यां –**

1. कोविड महामारीचा उद्रेक झाल्यामुळे कंपनी कामकाज मंत्रालयाने परिपत्रक क्रमांक 14/2020 दिनांक 8 एप्रिल, 2020, परिपत्रक क्रमांक 17/2020 दिनांक 13 एप्रिल, 2020, परिपत्रक क्रमांक 22/2020 दिनांक 15 जून, 2020, परिपत्रक क्रमांक 33/2020 दिनांक 28 सप्टेंबर, 2020, परिपत्रक क्रमांक 39/2020 दिनांक 31 डिसेंबर, 2020, परिपत्रक क्रमांक 02/2021 दिनांक 13 जानेवारी, 2021 आणि परिपत्रक क्रमांक 02/2022 दिनांक 5 मे, 2022 (एकत्रितरीत्या कंपनी कामकाज मंत्रालयाची परिपत्रके असे म्हटले आहे) याद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभा व्हीडीओ कॉन्फरसींग किंवा अन्य दृकश्राव्य पद्धतीने घेण्याची अनुमती दिली आहे. यामध्ये सभासदांनी एका ठिकाणी एकत्र येण्याची आवश्यकता नसेल. कंपनी कायदा, 2013 व कंपनी कामकाज मंत्रालयाच्या परिपत्रकांची पूर्तता करुन कंपनी आपली वार्षिक सर्वसाधारण सभा व्हीडीओ कॉन्फरसींग / दृकश्राव्य पद्धतीने घेत आहे.

2. कंपनी कायदा, 2013 च्या कलम 102 च्या अनुषंगाने, बैठकीत व्यवहार करावयाच्या विशेष व्यवसायाशी संबंधित विधान येथे संलग्न केले आहे.

3. सदर वार्षिक सर्वसाधारण सभा व्हीडीओ कॉन्फरसींग किंवा अन्य दृकश्राव्य पद्धतीने घेतली जात असल्याने या वार्षिक सर्वसाधारण सभेला सदस्यांना प्रॉक्सी नेमण्याची सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे प्रॉक्सी फॉर्म, उपस्थिती फॉर्म व रस्त्याचा नकाशा या सूचनेबरोबर जोडलेले नाही.

4. वार्षिक सर्वसाधारण सभेला जर सह-सभासद उपस्थित राहत असतील तर ज्या सदस्याचे नाव सभासदांच्या नोंदवहीत सदस्यांच्या नावाच्या यादीत सुरुवातीला येते त्या सदस्याला मतदान करण्याचा हक्क असेल.

5. ज्या सदस्यांना लेख्यांबाबत माहिती पाहिजे आहे, त्यांना कंपनीला आपल्याला काय माहिती हवी आहे ते लवकरात लवकर कळवावे (वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दिवसाच्या किमान सात दिवसाआधी) की ज्याद्वारे व्यवस्थापन सदर माहिती वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी तयार ठेवेल.

6. नोटीसमध्ये नमूद केलेल्या सर्व कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी सभासदांना शनिवार व रविवार वगळून कोणत्याही कामकाजाच्या दिवशी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात सदर कागदपत्रे सकाळी 11.00 ते दुपारी 1.00 पर्यंत खुली असेल.

**सूचने संबंधीचे स्पष्टीकरणात्मक विधान**
(कंपनी कायदा, 2013 च्या कलम 102 अंतर्गत)

**मुद्दा क्रमांक 3 –**

निवड समितीने या उमेद्वाराची मुलाखत घेतली आहे व या उमेद्वाराच्या मूल्यमापनाच्या आधारे निवड समितीने अशी शिफारस केली की, श्री. राजीव, अतिरिक्त संचालक (सिस्टीम्स आणि ओ अँड एम) यांना कार्यकारी संचालक म्हणून कंपनीच्या संचालक मंडळावर दि.29 जुलै, 2023 पासून नेमण्यात यावे अशी शिफारस केली आहे.

कंपनी कायदा, 2013 च्या कलम 160, 161 व अन्य लागू असलेल्या कलमांनुसार व अन्य सर्व वैधानिक मान्यतांच्या अधिन राहून श्री. राजीव यांनी कंपनी कारभार मंत्रालयाकडून डिन (DIN. 10260235) प्राप्त केला आहे. कंपनीच्या संचालक मंडळाने श्री. राजीव यांना अतिरिक्त संचालक (सिस्टीम्स आणि ओ अँड एम) या पदावर संचालक मंडळावर दि.2 जून, 2023 पासून नेमले आहे.

या नियुक्तीसाठी कंपनी कायदा, 2013 च्या कलम 152 मधील तरतुदींनुसार भागधारकांची मंजूरी आवश्यक आहे.

**श्री. राजीव (डिन 10260235)** यांनी कंपनीचे संचालक म्हणून आपली नेमणूक करण्यास लेखी संमती दिली आहे व असे घोषित केले आहे की, ते कंपनी कायदा, 2013 च्या तरतुदींनुसार संचालक म्हणून नेमणुकीस अपात्र नाहीत.

**श्री. राजीव** वगळता कोणीही संचालक, प्रमुख व्यवस्थापकीय व्यक्ती किंवा त्यांचे नातेवाईक यांना या ठरावात स्वारस्य नाही.

संचालक मंडळ विषय क्रमांक 3 मध्ये प्रस्तुत केलेल्या ठरावांना सामान्य ठराव म्हणून मान्यता देण्यात यावी अशी सभासदांना शिफारस करीत आहे.

**मुद्दा क्रमांक 4 –**

निवड समितीने या उमेदवाराची मुलाखत घेतली आहे व या उमेदवाराच्या मूल्यमापनाच्या आधारे निवड समितीने अशी शिफारस केली की, श्री. राचप्रोलू डॉमिनिक रमणा, अतिरिक्त संचालक (योजना व मालमत्ता विकास / एनबीए-फआर) यांना कार्यकारी संचालक म्हणून कंपनीच्या संचालक मंडळावर दि.4 जुलै, 2023 पासून नेमण्यात यावे अशी शिफारस केली आहे.

कंपनी कायदा, 2013 च्या कलम 160, 161 व अन्य लागू असलेल्या कलमांनुसार व अन्य सर्व वैधानिक मान्यतांच्या अधिन राहून श्री. राचप्रोलू डॉमिनिक रमणा यांनी कंपनी कारभार मंत्रालयाकडून डिन (डिन 10225071) प्राप्त केला आहे. कंपनीच्या संचालक मंडळाने श्री. राचप्रोलू डॉमिनिक रामन्ना यांना अतिरिक्त संचालक (योजना व मालमत्ता विकास / एनबीएफआर)या पदावर संचालक मंडळावर दि.6 जून, 2023 पासून नेमले आहे.

या नियुक्तीसाठी कंपनी कायदा, 2013 च्या कलम 152 मधील तरतुदींनुसार भागधारकांची मंजूरी आवश्यक आहे.

**श्री. राचप्रोलू डॉमिनिक रमणा (डिन 10225071)** यांनी कंपनीचे संचालक म्हणून आपली नेमणूक करण्यास लेखी संमती दिली आहे व असे घोषित केले आहे की, ते कंपनी कायदा, 2013 च्या तरतुदींनुसार संचालक म्हणून नेमणुकीस अपात्र नाहीत.

**श्री. राचप्रोलू डॉमिनिक रमणा** वगळता कोणीही संचालक, प्रमुख व्यवस्थापकीय कर्मचारी किंवा त्यांचे नातेवाईक यांना या ठरावात स्वारस्य नाही.

संचालक मंडळ विषय क्रमांक 4 मध्ये प्रस्तुत केलेल्या ठरावांना सामान्य ठराव म्हणून मान्यता देण्यात यावी अशी सभासदांना शिफारस करीत आहे.

**मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित**
यांच्यासाठी आणि त्यांच्या वतीने

**ठिकाण –** मुंबई
**दिनांक –** 06.09.2023

सही
**कंपनी सचिव**

## अध्यक्षांचे भाषण



प्रिय भागधारक,

तुमच्या महामंडळाच्या 15 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये तुमचे हार्दिक स्वागत करताना मला अत्यंत आनंद होत आहे. मी महामंडळाच्या या वर्षीच्या कामगिरीचे ठळक पैलू तसेच महामंडळाने गाठलेल्या महत्वाचे टप्पे तुमच्या नजरेला आणून देतो.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत महामंडळाने तिसऱ्या मार्गिकेवरील बांधकामाची दि.15 ऑगस्ट, 2023 रोजी पर्यंत सर्वसाधारणपणे 84% भौतिक प्रगती साध्य केली आहे. न्यायालयाने कामावरील स्थगिती उठविल्यानंतर कार डेपोचे काम अत्यंत वेगाने केले गेले व रीच 1 ची प्रगती कार डेपोसह 90% पेक्षा जास्त झाली आहे हे ध्यानात घेणे आवश्यक आहे. भारत सरकारने पायाभूत सुविधा क्षेत्रे बळकट करण्यासाठी व त्याचा विस्तार करण्यासाठी गतीमान निर्णय घेतल्यामुळे तसेच महाराष्ट्र सरकारनेही या क्षेत्रासाठी प्रगतीशील निर्णय घेतल्यामुळे , तसेच संचालक मंडळाने परिणामकारकरित्या व्यवस्थापकीय निर्णय घेतल्यामुळे विशेषत: आरे डेपो मामल्यामध्ये हे शक्य झाले. त्यामुळे सर्व उपलब्ध स्त्रोत एकत्रितरित्या वापरले गेले व अडचणी असून सुद्धा प्रकल्पांची प्रगती झाली.

### 1. वित्तीय कामगिरी –

वित्तीय वर्ष 2022-23 मधील तुमच्या महामंडळाच्या कामगिरीचा सविस्तर तपशिल संचालक मंडळाच्या अहवाला-मध्ये दिला आहे. त्यानुसार असे दिसून येईल की, प्रकल्पाची प्रगती योग्य रीतीने होत आहे. या वर्षात प्रकल्पांचा भांड-वली खर्च रु.3,299 कोटी झाला. गतवर्षी तो रु.3,611 कोटी (पुनर्गठित) झाला होता. चालू वर्षात स्थापत्य काम संपत आले असल्याने स्थापत्य कंत्राटदार कमी रकमेची देयके सादर केली. त्यामुळे चालू वर्षात कमी खर्च झाला.

संचालक मंडळाचा अहवाल, वित्तीय वर्ष 2022-23 चे लेखापरीक्षित वित्तीय विवरणे व त्यावरील भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या टिपण्या आपल्याला यापूर्वीच पाठवल्या आहेत व तुम्ही त्या वाचल्या आहेत असे तुमच्या परवानगीने मी समजतो.

## 2. बांधकामाची कामगिरी

### 2.1 स्थापत्य कार्य –

- बोगदा खणण्याच्या यंत्रांनी सर्व ठिकाणचे (पॅकेज) मधील बोगदे खणून झाले आहेत.

- सर्व भूगर्भातील आणि आरे अॅट-ग्रेड स्थानक येथिल भौतिक काम प्रगतीपथावर आहे. ती पूर्णत्वाच्या वेगवेगळया टप्प्यावर आहेत. सर्वसाधारण सरासरी स्थानकांची पूर्तता दि.15.07.2023 ला 91% होती.

- सर्व स्थानकांमध्ये ई अँड एम (इलेक्ट्रिकल अँड मेकॅनिकल आणि विद्युत अभियांत्रिकी) कार्य व वास्तुशास्त्रीय पूर्णत्व प्रगतीपथावर आहे.

- रस्त्यांच्या पुनर्स्थापनेचे कार्य टप्प्याटप्प्याने चालू आहे.

- गिरगाव स्थानक व आरे डेपोमधील काम वेगाने पूर्ण होण्यासाठी कंपनी सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे.

### 2.2 यंत्रणा कार्य –

- ओसीएस, पीएसएस, एसटीपीटी, टीव्हीई, उद्वाहक, चलित जिने व विद्युत आणि यांत्रिकी उपकरणे, साधने बसवणे हे काम सर्व स्थानकांत व बोगद्यात प्रगतीपथावर आहे. यंत्रणेच्या कार्याची एकूण भौतिक प्रगती 54.8% आहे व टप्पा – 1 (आरे ते वांद्रे कुर्ला संकुल) यामध्ये 68.8% यंत्रणा कार्य पूर्ण झाले आहे.

- टप्पा क्र. 1 चे कार्यचालन सुरु करण्यासाठी एकूण 9 रेल्वे गाड्यांची आवश्यकता आहे. आरे डेपोमध्ये दि.15.07.2023 पर्यंत 05 रेल्वे गाड्या आल्या आहेत. उरलेल्या 04 रेल्वे गाड्या सप्टेंबर, 2023 पर्यंत येतील.

- स्वयंचलित भाडे संकलन प्रणाली एनसीएमसी कार्ड, क्यूआर कोड (पेपर आणि मोबाईल) तिकीटासाठी वापरेल. व्यवहार प्रक्रिया, कार्ड जारी करणे आणि एएफसी एकत्रीकरण सेवांसाठी स्टेट बँक ऑफ इंडियाची बँकिंग भागीदार म्हणून निवड करण्यात आली आहे.

### 2.3 जनसंपर्क कृती –

मुंबई मेट्रो लाईन तीन प्रकल्पांच्या घडामोडी / प्रकल्पांची प्रगती / अन्य महत्वाची माहिती / महत्वाच्या उपलब्धी याबाबतची सविस्तर माहिती महामंडळाचे जनसंपर्क कार्यालय नियमितपणे सर्जनशील (creatives) फोटो, वार्तापत्रे आणि छोटे व्हिडीओ याद्वारे सामाजिक माध्यमांमध्ये व महामंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करीत असते.

प्रकल्पाबाबतच्या विविध घडामोडी, महत्वाच्या उपलब्धी याबाबतची प्रसिद्धी पत्रके जनसंपर्क विभाग माध्यमांना पुरवत असतो. जनसंपर्क विभाग माध्यमांना भेटी देतो तसेच याबाबतच्या माध्यमांच्या शंकांना उत्तर देत असतो व वरिष्ठ व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांच्या मुलाखतींची व्यवस्था करतो.



मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांनी एनसीपीए येथे 2 मार्च, 2023 रोजी एक चित्र प्रदर्शन भरवले होते त्यामध्ये प्रकल्पाच्या बांधकामाच्या वेळी आलेल्या आव्हानांबाबतची माहिती होती. तसेच प्रकल्पामध्ये वापरलेल्या यंत्रसामग्रीचे छोटे नमुने (मिनिएचर मॉडेल्स) तेथे प्रदर्शित केले होते.

मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित महत्वाचे दिवस साजरे करते जसे – सर्तकता जागरुकता दिवस, मराठी भाषा पंधरवडा, हिंदी पखवाडा, हिंदी सप्ताह इत्यादी. त्यावेळी महामंडळ आपल्या कार्यालयात कर्मचाऱ्यांसाठी कार्यक्रम आयोजित करते. या कार्यक्रमांचे फोटो सोशल मिडीया हँडलवर तसेच अधिकृत संकेतस्थळावर प्रदर्शित केले जातात.

मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाने सामाजिक माध्यमांतून जिंगल (लघुगीते) व मस्कॉट (mascot) यांच्या स्पर्धा आयोजित केल्या आहेत.

**3. कार्यस्थळावरील सुरक्षा उपाय योजना –**

स्थापत्य कंत्राटदार व यंत्रणा कंत्राटदारांबरोबर कार्यस्थळावर आयोजित केलेल्या सुरक्षा उपाय योजना प्रकल्पाला लागू असलेल्या सर्व कायदेशीर तरतुदींचे पालन करतात. तसेच कंत्राटामधील कठोर अटींचे पालन करतात. अशा कठोर नियमांमुळे, वेळोवेळी घेतलेल्याआढाव्यांमुळे व पूर्ततांमुळे प्रकल्पाने 260 दशलक्ष तास साध्य केले आहेत. त्या 0.33 लॉस टाईम फ्रिक्वेन्सी रेट होता. त्यावरुन महामंडळाच्या सुरक्षितेबाबतची कटिबद्धता दिसून येते.

सर्व शक्य असलेल्या आणीबाणीच्या स्थितींना तोंड देण्यासाठी योग्य अशी तयारी करण्यासाठी कंपनीने एक आपद् परिस्थिती नियंत्रण कक्ष तयार केले आहे व ते कार्यान्वित केले आहे.

**4. मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाच्या कठोर नियमावलीशी संबंधित कार्य -**

ज्या कंत्राटदारांनी मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाच्या कठोर नियमावलीच्या आवश्यकतांची पूर्तता केली नाही त्यांना दंड लावला गेला आहे. कंत्राटदारांनी भरलेल्या दंडाची रक्कम मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाच्या कामगार कल्याण निधीला दान केली आहे. आजपर्यंत कामगार किंवा त्यांच्या नजीकच्या नातेवाईकांना रु.20,63,250/- इतकी रक्कम देण्यात आली आहे. अंदाजे कॉर्पसमध्ये रु.1,41,87,280/- इतकी रक्कम आहे.

**5. औद्योगिक संबंध -**

तुमच्या महामंडळाचे कंत्राटदाराबरोबरचे कामगारांबरोबरचे अत्यंत सौहार्दपूर्ण आहेत. त्याद्वारे कामागारांच्या हक्कांच्या रक्षणाची हमी मिळाली आहे. राज्यातील कामगार कायद्यांनुसार महामंडळ सामाजिक व सुरक्षांच्या प्रावधानाचे संरक्षण करीत आहे.

**6. कॉर्पोरेट गव्हर्नन्स –**

कॉर्पोरेट गव्हर्नन्स धोरण हे महामंडळाच्या ध्येय दृष्टी धोरणाबरोबर जुळवून घेतली आहे. महामंडळ याबाबत सार्वजनिक उपक्रम विभागाने घालून दिलेल्या कॉर्पोरेट गव्हर्नन्सबाबतच्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करीत आहे.

**7. पारदर्शकता –**

पारदर्शकतेला उभारणी देणे व  ती प्रत्यक्षात आणण्यासाठी महामंडळात खालील उपाययोजना केली आहे.

अ) ई-ऑफिस स्थापणे
ब) कंत्राटाच्या ई-निविदा ई पद्धतीने केल्या.
क) अधिकारी व अन्य कर्मचाऱ्यांचे एपीएआर (APAR) यांचे ई-फायलिंग करणे.
ड) 100% विक्रेते, कंत्राटदार यांना पूर्ण प्रदान बँकेद्वारे करणे.
इ) रिक्त जागा संकेतस्थळावर सूचित करणे
फ) ई.आर.पी. (उद्योगांच्या स्त्रोतांची योजना) (ओरॅकल)

- मानव संसाधन वित्त आणि लेखा, प्रशासन मोड्यूल
- प्रगतीपथावरील कार्य, ई.आर.पी. चा दर्जा वाढवणे.

**8. ऋणनिर्देश**

गृहनिर्माण व नागरी कारभार मंत्रालय, भारत सरकार, महाराष्ट्र शासन, जपान आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेशन एजन्सी (जेआयसीए), भारत सरकारचे विविध विभाग, महाराष्ट्र शासनाचे विविध विभाग यांनी महामंडळाला वेळोवेळी मौलिक मार्गदर्शन केले, आधार दिला, पाठिंबा दिला.  याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.  तसेच सर्व कर्मचाऱ्यांनी केलेले कठोर परिश्रम व त्यांची निष्ठा, ज्यांचे देशातील पहिल्या पूर्णपणे जमिनीखालील मेट्रो रेल्वे जाळयाच्या बोगदे खणण्याच्या कामात महत्वाचे योगदान आहे.  त्यांचे त्याबद्दल मी आभार मानतो.   मी अशी आशा करतो की, अत्यंत प्रोत्साहीत झालेले कार्यक्षम कर्मचारी वर्ग, मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांना भविष्यातील कार्यात यशस्वी करेल.

सही
(मनोज जोशी)
**सचिव**

**अध्यक्ष, मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित**
आणि गृहनिर्माण  नागरी कारभार मंत्रालय, भारत सरकार

**स्थळ –** नवी दिल्ली
**दिनांक –** 01.09.2023

## संचालकांचा अहवाल

प्रति,
सदस्य,
**मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित**
मुंबई

आपल्या संचालक मंडळास 2022-23 या वित्तीय वर्षाच्या महामंडळाचा व्यवसाय, संचलन आणि वित्तीय स्थितीचा 15 वा वार्षिक अहवाल सादर करताना आनंद होत आहे.

### 1. वित्तीय परिणाम व कामगिरी

31 मार्च 2023 रोजी संपणाऱ्या वित्तीय वर्षासाठी कंपनीची वित्तीय स्थिती खालीलप्रमाणे आहे:

(रुपये लाखामध्ये)

| तपशील | 2022-23 | 2021-22 |
|---|---|---|
| **एकूण उत्पन्न** | 385.60 | 1,149.37 |
| **उणे – कार्यकारी खर्च** | 2451.96 | 2,295.14 |
| **उणे – घसारा** | 970.24 | 1,020.73 |
| **उणे – वित्तीय खर्च** | 26.38 | 32.75 |
| **उणे – अपवादात्मक बाबी** | 0 | 0 |
| **करपूर्व नफा / (तोटा)** | (3,062.98) | (2,199.25) |
| **उणे – कर खर्च** | (249.35) | (520.49) |
| **करपश्चात नफा / (तोटा)** | (2,813.63) | (1,678.76) |
| **अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (तोटा)** | (23.47) | (17.34) |
| **सामान्य निधीमध्ये अंतरण** | 0 | 0 |
| **वर्षाचा एकूण सर्वसमावेशक तोटा** | (2,837.10) | (1,696.10) |

### 2. राखीव निधीला हस्तांतरण

कंपनीच्या संचालक मंडळाने चालू आर्थिक वर्षात कोणतीही रक्कम राखीव निधींमध्ये हस्तांतरित केलेली नाही.

### 3. वित्तीय वर्ष 2022-23 साठीचा लाभांश

संचालक मंडळ कंपनीच्या समभागांवर कोणत्याही लाभांशाची शिफारस करत नाही.

**4. कंपनीची स्थिती**

कंपनीची स्थापना एप्रिल, 2008 मध्ये झाली. वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये कंपनी भारत सरकार व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) यांच्यामार्फत महाराष्ट्र सरकार यांचा हा 50:50 असा संयुक्त साहस प्रकल्प बनला.

**5. कंपनीचे भाग जारी करणे**

कंपनीचे अधिकृत भागभांडवल रु.50,00,00,00,000/- (रुपये पन्नास हजार कोटी) इतके आहे. हे भाग भांडवल प्रति समभाग रु.100/- च्या 50 कोटी समभागात विभागले आहे.

वित्तीय वर्ष 2022-23 मध्ये आणि आजपर्यंत कंपनीने कंपनी कायदा, 2013 च्या कलम 62 ची योग्य पूर्तता करीत भारत सरकारचे नामनिर्देशित व्यक्ती व महाराष्ट्र सरकारचा नामनिर्देशित व्यक्ती यांना प्रत्येकी रु.100/- च्या 3,98,20,000/- समभागांचे हक्क आबंटन (राईटस् इश्यू) केले आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | समभाग आबंटन समितीच्या बैठकीची तारीख | समभागांची संख्या | एकूण किंमत / मोबदला (रक्कम रुपयात) |
|---|---|---|---|
| 1 | 16/06/2022 | 2,00,00,000 | 2,00,00,00,000 |
| 2 | 22/08/2022 | 1,98,20,000 | 1,98,20,00,000 |

**6. कंपनीचे कार्यचालन**

**स्थापत्य कार्य –**

- बोगदा खणण्याच्या यंत्रांनी सर्व ठिकाणचे (पॅकेज) बोगदे खणून झाले आहेत.
- सर्व भूगर्भातील आणि आरे अॅट-ग्रेड स्थानक येथील भौतिक काम प्रगतीपथावर आहे. ती पूर्णत्वाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर आहेत. सर्वसाधारण सरासरी स्थानकांची पूर्तता दि.15.07.2023 रोजीला 91% आहे.
- सर्व स्थानकांमध्ये ई अँड एम (इलेक्ट्रिकल अँड मेकॅनिकल आणि विद्युत अभियांत्रिकी) कार्य व वास्तुशास्त्रीय पूर्णत्व प्रगतीपथावर आहे.
- रस्त्यांच्या पुनर्स्थापनेचे कार्य टप्प्याटप्प्याने चालू आहे.
- गिरगाव स्थानक व आरे डेपोमधील काम वेगाने पूर्ण होण्यासाठी कंपनी सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे.

**यंत्रणा कार्य –**

- ओसीएस, पीएसएस, एसटीपीटी, टीव्हीई, उदव्हारक, चलित जिने व विद्युत आणि यांत्रिकी उपकरणे, साधने बसवणे हे काम सर्व स्थानकांत व बोगद्यात प्रगतीपथावर आहे. यंत्रणेच्या कार्याची एकूण भौतिक प्रगती 54.8% आहे व टप्पा – 1 (आरे ते वांद्रे कुर्ला संकुल) यामध्ये 68.8% यंत्रणा कार्य पूर्ण झाले आहे.

- टप्पा क्र. 1 चे कार्यचालन सुरु करण्यासाठी एकूण 9 रेल्वे गाड्यांची आवश्यकता आहे. आरे डेपोमध्ये दि.15.07.2023 रोजी पर्यंत 05 रेल्वे गाड्या आल्या आहेत. उरलेल्या 04 रेल्वे गाड्या सप्टेंबर, 2023 पर्यंत येतील.

- स्वयंचलित भाडे संकलन प्रणाली एनसीएमसी कार्ड, क्यूआर कोड (पेपर आणि मोबाईल) तिकीटासाठी वापरेल. स्टेट बँक ऑफ इंडियाची व्यवहार प्रक्रिया, कार्ड जारी करणे आणि एएफसी एकत्रीकरण सेवांसाठी बँकिंग भागीदार म्हणून निवड करण्यात आली आहे.

**7. संचालक मंडळ आणि प्रमुख व्यवस्थापकीय कर्मचारी**

अहवालाच्या दिवशी संचालक मंडळ व प्रमुख व्यवस्थापकीय कर्मचारी खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | संचालक आणि प्रमुख व्यवस्थापकीय कर्मचाऱ्याचे नाव | डीन / पॅन | नेमणुकीची तारीख | पद |
|---|---|---|---|---|
| 1. | श्री. मनोज जोशी | 02103601 | 30/12/2021 | अध्यक्ष आणि नामनिर्देशित संचालक |
| 2. | सौ. अश्विनी भिडे | 02861008 | 12/07/2022 | व्यवस्थापकीय संचालक आणि नामनिर्देशित संचालक |
| 3. | श्री. जयदीप | 08558063 | 06/12/2019 | नामनिर्देशित संचालक |
| 4. | श्री. राकेश चौधरी | 09495362 | 24/05/2022 | नामनिर्देशित संचालक |
| 5. | सौ. नमिता मेहरोत्रा | 07916304 | 27/04/2022 | नामनिर्देशित संचालक |
| 6. | श्री. दीपक अग्रवाल | 07321522 | 28/12/2022 | नामनिर्देशित संचालक |
| 7. | श्री. इकबाल सिंग चहल | 08727394 | 12/01/2023 | नामनिर्देशित संचालक |
| 8. | डॉ. संजय मुखर्जी | 08863656 | 03/06/2023 | नामनिर्देशित संचालक |
| 9. | श्री. असीम कुमार गुप्ता | 02607016 | 08/06/2023 | नामनिर्देशित संचालक |
| 10. | डॉ. नितीन करीर | 01624863 | 02/05/2023 | नामनिर्देशित संचालक |
| 11. | श्री. सुबोध कुमार गुप्ता | 07114292 | 14/01/2015 | पूर्ण वेळ संचालक |
| 12. | श्री. अबोध खांडेलवाल | 07807394 | 28/04/2017 | पूर्ण वेळ संचालक |
| 13. | श्री. अबोध खांडेलवाल | ACYPK0309G | 29/03/2017 | मुख्य वित्त अधिकारी |
| 14. | श्री. राजीव | 10260235 | 02/06/2023 | पूर्ण वेळ संचालक |
| 15. | श्री. रमणा राचप्रोलू | 10225071 | 05/06/2023 | पूर्ण वेळ संचालक |
| 16. | कु. रितू देब | ADVPD0728L | 15/04/2015 | कंपनी सचिव |

या अहवालाच्या तारखेपर्यंत, कंपनीचे संचालक मंडळ आणि प्रमुख व्यवस्थापकीय व्यक्ती यांच्या रचनेत महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत.

**संचालक आणि प्रमुख व्यवस्थापकीय व्यक्ती यांची नियुक्ती -**

| अ. क्र. | संचालक आणि प्रमुख व्यवस्थापकीय व्यक्तींची नावे | डीन / पॅन | नेमणुकीची तारीख | पद |
|---|---|---|---|---|
| 1. | सौ.नमिता मेहरोत्रा | 07916304 | 27/04/2022 | नामनिर्देशित संचालक |
| 2. | श्री. राकेश चौधरी | 09495362 | 24/05/2022 | नामनिर्देशित संचालक |
| 3. | सौ. अश्विनी सतीश भिडे | 02861008 | 12/07/2022 | व्यवस्थापकीय संचालक |
| 4. | श्री. दीपक अग्रवाल | 07321522 | 28/12/2022 | नामनिर्देशित संचालक |
| 5. | श्री. इकबाल सिंग चहल | 08727394 | 12/01/2023 | नामनिर्देशित संचालक |
| 6. | डॉ. नितीन करीर | 02954463 | 02/05/2023 | नामनिर्देशित संचालक |
| 7. | डॉ. संजय मुखर्जी | 08863656 | 03/06/2023 | नामनिर्देशित संचालक |
| 8. | श्री. असीम कुमार गुप्ता | 02607016 | 08/06/2023 | नामनिर्देशित संचालक |
| 9. | श्री. राजीव | 10260235 | 02/06/2023 | कार्यकारी संचालक |
| 10. | श्री. रमणा राचप्रोलू | 10225071 | 05/06/2023 | कार्यकारी संचालक |

**संचालक आणि प्रमुख व्यवस्थापकीय व्यक्तींची (कार्यकाल) समाप्ती -**

| अ. क्र. | संचालक आणि प्रमुख व्यवस्थापकीय व्यक्तींची नावे | डीन / पॅन | समाप्तीची तारीख | पद |
|---|---|---|---|---|
| 1. | श्री. रणजित सिंग देओल | 06759002 | 15/03/2022 | व्यवस्थापकीय संचालक |
| 2. | श्री. श्याम सुंदर दुबे | 06601151 | 04/08/2022 | नामनिर्देशित संचालक |
| 3. | श्री. इकबाल सिंग चहल | 08727394 | 01/09/2022 | नामनिर्देशित संचालक |
| 4. | श्री. ए.ए. भट्ट | 07110097 | 05/02/2023 | कार्यकारी संचालक |
| 5. | श्री. मनोज सौनिक | 02954463 | 02/05/2023 | नामनिर्देशित संचालक |
| 6. | श्री. एस. व्ही. आर. श्रीनिवास | 02860903 | 03/06/2023 | नामनिर्देशित संचालक |
| 7. | श्री. भूषण गगराणी | 00204045 | 08/06/2023 | नामनिर्देशित संचालक |

## 8. संचालक मंडळाच्या बैठका आणि समितीच्या बैठका

### अ) संचालक मंडळाच्या बैठका

**2022-23 या वित्तीय वर्षात संचालक मंडळाच्या 5 वेळा बैठका झाल्या, त्याचा तपशील खालीलप्रमाणे होता.**

| सभेची संख्या | मंडळाच्या बैठकीची तारीख | उपस्थित संचालकांची संख्या |
|---|---|---|
| 65 वी संचालक मंडळाची बैठक | 25/05/2022 | 9 |
| 66 वी संचालक मंडळाची बैठक | 09/08/2022 | 9 |
| 67 वी संचालक मंडळाची बैठक | 29/09/2022 | 7 |
| 68 वी संचालक मंडळाची बैठक | 14/11/2022 | 8 |
| 69 वी संचालक मंडळाची बैठक | 03/03/2023 | 9 |

| अ. क्र. | संचालकांची नावे | वित्तीय वर्ष 2022-23 दरम्यान झालेल्या मंडळाच्या बैठकांची संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | आयोजित | उपस्थित राहण्यास पात्र | उपस्थित राहिले |
| 1. | श्री. मनोज जोशी | 5 | 5 | 5 |
| 2. | सौ. अश्विनी भिडे | 5 | 3 | 2 |
| 3. | श्री. जयदीप | 5 | 5 | 5 |
| 4. | श्री. राकेश चौधरी | 5 | 4 | 3 |
| 5. | सौ.नमिता मेहरोत्रा | 5 | 4 | 4 |
| 6. | श्री. इकबाल सिंग चहल | 5 | 5 | 0 |
| 7. | श्री. भूषण अशोक गगराणी | 5 | 5 | 1 |
| 8. | श्री. मनोज सौनिक | 5 | 5 | 2 |
| 9. | श्री. एस. व्ही. आर. श्रीनिवास | 5 | 5 | 2 |
| 10. | श्री. श्याम सुंदर दुबे | 5 | 1 | 1 |
| 11. | श्री.अबोध खांडेलवाल | 5 | 5 | 5 |
| 12. | श्री. सुबोध कुमार गुप्ता | 5 | 5 | 5 |
| 13. | श्री. अजयकुमार अमरनाथ भट्ट | 5 | 5 | 5 |

**ब) लेखापरीक्षण समिती**

कंपनी कायदा, 2013 च्या प्रावधानानुसार संचालक मंडळाने लेखापरीक्षा समिती गठीत केलली आहे.

दोन सदस्य प्रत्यक्ष उपस्थित असणे ही या समितीची गणपूर्ती आहे.

वित्तीय वर्ष 2023 मधील लेखापरीक्षण समितीची रचना व त्या सदस्यांची उपस्थिती खालीलप्रमाणे आहे–

| अ. क्र. | नाव | पद | वर्षभरात झालेल्या मंडळाच्या बैठकांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आयोजित | उपस्थित राहण्यास पात्र | उपस्थित राहिले |
| 1 | श्री. श्याम सुंदर दुबे * | नामनिर्देशित संचालक आणि अध्यक्ष | 1 | 1 | 1 |
| 2 | श्री. अजयकुमार अ. भट्ट | संचालक प्रणाली / सदस्य | 1 | 1 | 1 |
| 3 | श्री. भूषण गगराणी | नामनिर्देशित संचालक / सदस्य | 1 | 1 | 1 |
| 4 | श्री.अबोध खांडेलवाल | संचालक वित्त आणि मुख्य वित्त अधिकारी / स्थायी आमंत्रित | 1 | 1 | 1 |
| 5 | सौ. अश्विनी भिडे | व्यवस्थापकीय संचालक / स्थायी आमंत्रित | 1 | 1 | 1 |

* श्री. श्याम सुंदर दुबे दि.4 जुलै, 2022 पासून नामनिर्देशित संचालक राहिले नाहीत.

वित्तीय वर्ष 2022-23 मध्ये लेखापरीक्षण समितीची बैठक दि.22 जुलै, 2022 रोजी घेतली गेली.

**क) नामनिर्देशन व पारिश्रामिक समिती –**

वित्तीय वर्ष 2022-23 मध्ये नामनिर्देशन व पारिश्रामिक समितीची बैठक झाली नाही.
नामनिर्देशन व पारिश्रामिक धोरणाची प्रत सोबत जोडली आहे. (परिशिष्ट 1)

**ड) कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी समिती –**

2022-23 या वित्तीय वर्षासह मागील 3 आर्थिक वर्षात महामंडळाचे नुकसान झाले आहे त्यामुळे कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीच्या तरतुदी महामंडळाला लागू होत नाहीत.

**इ) समभाग वाटप समिती**

कंपनी कायदा, 2013 च्या तरतुदीनुसार, संचालक मंडळाने संचालक मंडळाच्या समभाग वाटप समितीची स्थापना केली. समिती ही संचालक मंडळाची अनिवार्य नसलेली समिती आहे.

दोन सदस्य प्रत्यक्ष उपस्थित असणे ही या समितीची गणपूर्ती आहे.

वित्तीय वर्ष 2022-23 मधील लेखापरीक्षण समितीची रचना व त्या सदस्यांची उपस्थिती खालीलप्रमाणे आहे–

| अ. क्र. | नाव | पद | वर्षभरात झालेल्या मंडळाच्या बैठकांची संख्या | |
|---|---|---|---|---|
| | | | आयोजित | उपस्थित राहिले |
| 1 | श्री. भूषण गगराणी | नामनिर्देशित संचालक आणि अध्यक्ष | 2 | 2 |
| 2 | श्री. श्याम सुंदर दुबे * | नामनिर्देशित संचालक आणि सदस्य | 2 | 2 |
| 3 | व्यवस्थापकीय संचालक ** | सदस्य | 2 | 2 |

* कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक समितीमध्ये सदस्य म्हणून समाविष्ट आहेत.
** श्री. श्याम सुंदर दुबे दि.4 जुलै, 2022 पासून नामनिर्देशित संचालक राहिले नाहीत.

वित्तीय वर्ष 2022-23 मध्ये या समितीच्या बैठका दि. 16 जून, 2022 व दि.22 ऑगस्ट, 2022 रोजी झाल्या.

**9. संचालक मंडळाचे वार्षिक मूल्यमापन**

कंपनी कायदा, 2013 च्या प्रावधानांनुसार संचालक मंडळाने आपल्या वार्षिक मूल्यमापनासाठी एक मूल्यमापन चौकट तयार केली आहे. तसेच संचालक मंडळ हे स्थापित मानकांवर संचालक, संचालम मंडळाच्या समित्या व संचालक मंडळ एक युनिट असल्याप्रमाणे यांचे मूल्यमापन करते.

**10. अहवालाधीन वित्तीय वर्षाच्या शेवटच्या दिवसापासून संचालक मंडळाच्या अहवालाच्या दिनांकापर्यंतच्या काळामध्ये कंपनीच्या वित्तीय स्थितीवर परिणाम करणारे महत्वाचे बदल व बद्धता यांचे विवरण**

1. मुंबई मेट्रो लाईन – 3 यांचे कार्यचालन करणे व देखरेखीच्या सेवा प्रदान करण्याच्या निविदांचे मूल्यमापन केल्यानंतर यशस्वी ठरलेले निविदाकार दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांना दिली. त्यांना स्वीकार पत्र दि.26.05.2023 रोजी देण्यात आले.

2. लेखापरीक्षण समितीने त्यांच्या दि.18.07.2023 च्या बैठकीत मानकांशी सुसंगत ठरेल अशा पद्धतीने लेखा मानकांमध्ये 2017-18 या वित्तीय वर्षापासून (पूर्वलक्षी प्रभावाने) बदल केले गेले.

3. मान्यता दिलेल्या प्रकल्प खर्चात वाढ झाल्यामुळे कर्ज काढण्याच्या खर्चामध्ये झालेली वाढ 10 जुलै 2023 रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर करण्यात आले. कर्ज काढण्याचा खर्च हा कर्ज : सामान्य भाग भांडवल या सध्याच्या 4.28:1 या गुणोत्तरापासून 4.5:1 इतका वाढवला गेला.

**11. नियामकांनी, न्यायालयांनी किंवा न्यायाधिकरणांनी (ट्रिब्यूनल यांनी) जारी केलेल्या महत्त्वपूर्ण आणि महत्वाच्या आदेशांचे तपशील, की जे भविष्यात कंपनीच्या चालू स्थितीवर आणि कंपनीच्या क्रियाकलापांवर परिणाम करतात.**

वित्तीय वर्ष 2022-23 मध्ये जेथे मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित पक्षकार आहे अशा ठिकाणी कायदेशीर खटल्यात नियामकांनी, न्यायालयांनी किंवा न्यायाधिकरणांनी (ट्रिब्यूनल) यांनी असे कोणतेही महत्त्वपूर्ण आणि ठळक आदेश पारित केलेले नाहीत.

**12. ठेवी**

अहवालाधीन कालावधीत कंपनीने कोणत्याही ठेवी स्वीकारलेल्या नाहीत तसेच कंपनी नियमावली, 2014 च्या तरतुदींनुसार कंपनीकडे कंपनी (ठेवी स्वीकारणे) नियमाप्रमाणे कोणत्याही ठेवी नाहीत.

**13. वैधानिक लेखापरीक्षक**

ही कंपनी सरकारी कंपनी असल्याने, कंपनी कायदा, 2013 च्या कलम 139(5) नुसार, वैधानिक लेखापरीक्ष-कांची नियुक्ती नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (सीएजी), भारत करतात. वित्तीय वर्ष 2022-23 वर्षासाठी त्यांनी आपले पत्र क्र. सीए.व्ही. / सीओवाय/सेंट्रल गव्हर्नमेंट, एममेट्रो (1) / 680 दि. 1 सप्टेंबर, 2022 द्वारे मे. चंन्दाभॉय आणि जस्सूभॉय, सनदी लेखापाल यांची कंपनीचे वैधानिक लेखा परीक्षक म्हणून नियुक्ती केली.

तसेच वैधानिक लेखापरीक्षकांद्वारे कंपनी कायदा, 2013 च्या 143(12) अंतर्गत कोणतीही फसवणूक नोंदवली गेली नाही, ज्यासाठी संचालकांच्या अहवालात खुलासा करणे किंवा केंद्र सरकारला अहवाल देणे आवश्यक आहे.

**14. वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालावर टिप्पण्या**

वैधानिक लेखापरीक्षक मे. चंन्दाभॉय आणि जस्सूभॉय, सनदी लेखापाल यांनी वित्तीय वर्ष 2022-23 चे लेखा-परीक्षण केले आहे. त्यांच्या अहवालावरील टिप्पण्या स्वयं-स्पष्ट आहेत आणि त्या योग्य आहेत.

**15. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (CAG) यांच्या टिपण्यांचा अहवाल**

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (CAG) यांच्या कार्यालयाकडून पुनरावलोकन / लेखापरीक्षण वित्तीय वर्ष 2022-23 करिता प्राप्त झाला आहे व तो सोबत जोडला आहे.

जो मजकूर संचालक मंडळाच्या अहवालात समाविष्ट केला जाईल असे आश्वासन दिले गेले होते त्या आश्वासनाच्या संदर्भात खालील मजकूर संचालक मंडळाच्या अहवालात समाविष्ट करण्याचा प्रस्ताव आहे.

**अतिरिक्त वित्तीय माहिती**

1. वित्तीय विवरणाच्या टिप्पणी 6 च्या तळटीपीच्या संदर्भात आहे. स्पष्टीकरण दिले जात आहे की, अशी सूट देणे किंवा माफी देणे याबाबत महामंडळाला बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून अद्याप कोणतेही औपचारिक पत्र प्राप्त झाले नाही. तथापि, महाराष्ट्र शासनाच्या इतिवृत्तामध्ये महामंडळाने कोविड इस्पितळासाठी खर्च केलेल्या रकमेची प्रतिपूर्ती महामंडळाला केली जाईल याची पुष्टी केली आहे.

2. महामंडळाच्या रु.37,275.82 कोटी रुपयांचा सुधारित सविस्तर प्रकल्प अहवालाला महाराष्ट्र शासनाने ऑगस्ट, 2022 मध्ये मान्यता दिली आहे व त्यानंतर तो भारत सरकारला मान्यतेसाठी सादर केला आहे. खालील तक्त्यामध्ये सुरुवातीचा प्रकल्प अहवाल व सुधारित प्रकल्प यांच्या अहवालातील बदलाचा सारांश स्त्रोतनिहाय दिला आहे.

| स्त्रोत | सविस्तर प्रकल्प अहवाल 2013 (रुपये कोटीत) | सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल 2018 (रुपये कोटीत) | सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल 2022 यामध्ये जोडलेल्या राशी / केलेले बदल (रुपये कोटीत) | दि. 31.03.2023 रोजी झालेली प्रत्यक्ष प्राप्ती (रुपये कोटीत) |
|---|---|---|---|---|
| भारत सरकारकडून प्राप्त झालेली समभाग राशी | 2402.70 | 3699.81 | 4106.81 | 2402.70 |
| महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेली समभाग राशी | 2402.70 | 3699.81 | 4106.81 | 2402.70 |
| भारत सरकारकडून प्राप्त झालेले उपकर्ज | 1024.50 | 1071.56 | 1404.89 | 1024.50 |
| महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेले उपकर्ज | 1615.10 | 2554.3 | 3920.97 | 2421.10 |
| मालमत्ता विकास + परिणाम शुल्क / सधारणा उन्नती कर | 1000.00 | 1000.00 | 1000.00 | 0.00 |
| मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ | 777.00 | 777.00 | 777.00 | 584.00 |
| एमएमआरडीए यांचे अनुदान | 679.00 | 679.00 | 679.00 | 0.00 |
| जपान आंतरराष्ट्रीय को-ऑपरेशन एजन्सी यांच्याकडून प्राप्त कर्ज | 13235.00 | 19924.34 | 21280.34 | 13235.00 |
| **एकूण** | **23,136.00** | **33405.80** | **37275.82** | **22070.00** |

एमएमएल-3 च्या टप्पा एकची सुधारित कालमर्यादा दि.31 डिसेंबर, 2023 आहे व टप्पा दोनची सुधारित कालमर्यादा दि.30 जून, 2024 आहे.

**16. सचिविय लेखापरीक्षक**

कंपनी कायदा, 2013 च्या कलम 204 नुसार संचालक मंडळाने 2022-23 या वित्तीय वर्षासाठी मे. पेससेटर कॉर्पोरेट सोल्यूशन एलएलपी, कंपनी सचिवांची सचिविक लेखापरीक्षक म्हणून नेमणूक केली आहे. त्यांचा अहवाल परिशिष्ट 2 म्हणून जोडला आहे.

**17. ऊर्जेचे संवर्धन, तंत्रज्ञानाचे अवशोषण आणि परकीय चलन कमाई आणि विनिमय**

वित्तिंय वर्ष 2022-23 मध्ये ऊर्जेचे संवर्धन, तंत्रज्ञानाचे अवशोषण आणि परकीय चलन कमाई आणि विनिमय याचा तपशील

| **अ) ऊर्जेचे संवर्धनः** | |
|---|---|
| i. उर्जेचा पर्यायी स्रोत वापरण्यासाठी कंपनीने उचललेले पाऊल | मुंबई मेट्रो लाईन – 3 साठी उर्जा जपून ठेवण्यासाठी पुढील पुढाकार घेतला आहे.<br>i. सर्व मेट्रो स्थानकांवर / डेपोमध्ये एलईडी तऱ्हेची उर्जा वाचवणारा चांगली प्रकाश यंत्रणा (त्यात खुणा दर्शकांचा समावेश आहे) वापरली जाईल.<br>ii. उर्जा वाचवण्यासाठी उद्वाहक व सरकत्या जिन्यामध्ये व्हेरिएबल व्होल्टेज व्हेरिएबल फ्रिक्वेन्सी वापरली जाईल.<br>iii. भूगर्भातील, जमिनीवरील व बोगद्यातील ईसीएस आणि टीव्हीए सिस्टममधील थ्री फेज एसी मोटर्सचा वेग नियंत्रित करण्यासाठी व्हेरि-एबल स्पीड ड्राईव्ह वापरणे<br>iv. जमिनीखालील स्टेशनामध्ये वातावरणावर नियंत्रण करणाऱ्या उष्णतेचा भार कमी करण्या-साठी पूर्ण उंचीच्या प्लॅटफॉर्म स्क्रीनचा वापर करणे. जेणेकरुन 35% इंधन बचत होणे अपेक्षित आहे.<br>v. रेल्वे गाड्यामध्ये जवळ जवळ 30% उर्जेचे नवनिर्माण करणे यासाठी आधुनिक व्हीव्हीव्ही-एफ कंट्रोल प्रॉपल्शन सिस्टीम वापरणे.<br>ज्या वेळी सरकत्या जिन्यावर भार नसते त्यावे-ळी जिन्यांचा वेग कमी करणे व थांबवणे यासाठी सेन्सर्सचा वापर करणे. जेणेकरुन 50% निर्णय अबाधित इंधन बचत होईल |

| | |
|---|---|
| ii. उर्जेचा पर्यायी स्त्रोत वापरण्यासाठी कंपनीने उचललेले पाऊल | उर्जेचा पर्यायी स्त्रोत वापरण्यासाठी मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांनी पुढील उपाय योजले आहेत / अंमलात आणले.<br>i. स्पर्धात्मक निविदेमार्फत 50 मेगावॅटचे सौर उर्जा यंत्र घेण्याची योजना आहे.<br>ii. सर्व 3 रिसिव्हींग सबस्टेशनच्या छपरांवर सौर उर्जा संयंत्र बसवण्याची योजना आहे की, ज्याद्वारे एकूण 60 किलोवॅट सौर उर्जेची निर्मिती होईल.<br>iii. मुंबई मेट्रो – 3 डेपोमधील स्टॅबलिंग लाईनमध्ये छप्पर घालणे व ओसीसी बिल्डींग यांची योजना आहे. त्याद्वारे 2165 किलावॅट सौर उर्जा निर्मितीची योजना आहे.<br>तसेच पर्यावरणाच्या बांधिलकीच्या पूर्ततेसाठी मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाने त्यांच्या संक्रमण कार्यालयाच्या छतावर 75 किलोवॅट सौर उर्जा केंद्र नोव्हेंबर 2018 स्थापन केले आहे. |
| iii. ऊर्जा संवर्धन उपकरणावरील भांडवली गुंतवणूक | 75 किलोवॅट क्षमतेच्या छतावर लावण्यासाठी पीव्हीसी सौर संयंत्रामध्ये आतापर्यंत रु.54,49,500/- इतकी भांडवली गुंतवणूक झाली आहे. |
| **ब) तंत्रज्ञान अवशोषण** | |
| i. तंत्रज्ञान आत्मसात करण्याच्या दिशेने केलेले प्रयत्न | i. मेट्रो स्थानकामध्ये अत्यंत गर्दी असलेल्या वेळेत / अत्यंत गर्दी नसलेल्या वेळेत / उत्पन्न मिळत नसलेल्या वेळेत एलईडी प्रकाश व्यवस्था (प्रकाशाच्या तीव्रतेचा स्तर आपोआप नियंत्रित करणे) हालचाल दर्शविणारी यंत्रे व योग्य प्रकाश व्यवस्था.<br>ii. विजेची बचत करण्यासाठी व चाके व ब्रेक यंत्रणेची झीज कमी करण्यासाठी रीजनरेटिव्ह ब्रेकिंग वापरणे.<br>iii. उर्जा कार्यक्षम व सहज परिरक्षा करण्यायोग्य व्हीव्हीव्हीएफ आधारित प्रॉपल्शन यंत्रणा वापरणे.<br>iv. डब्यांमध्ये एलईडी प्रकाशयोजना व व्हीव्हीव्हीएफ ड्राईव्ह इन्व्हर्टर आधारित वातानुकूलन यंत्रणा वापरणे. |

| | |
|---|---|
| | v. एमएमएल-3 रिसिव्हींग सबस्टेशन गॅस इन्सुलेटेड स्वीच गिअर वापरणे. या यंत्रणा आटोपशीर व सहज परीक्षेसाठी करण्यायोग्य आहेत.<br>vi. टीव्हीएस व इसीएस यांचा एकत्रित स्काडा कंट्रोलच्या माध्यमातून प्रवाशांना अधिक आराम मिळतो व बचत होते.<br>vii. एमएमएल-3 साठी अनअटेंडेड ट्रेन ऑपरेशनसह संपर्कावर आधारित नियंत्रण प्रस्तावित आहे. त्याद्वारे कार्यचालन अत्यंत कार्यक्षम होते.<br>viii. एमएमएल-3 यामध्ये एनसीएफसीसाठी उर्जेचे राष्ट्रीय सामान्य मोबिलिटी कार्ड सुरु केले आहे. या यंत्रणेमध्ये एकत्रित तिकीट यंत्रणेबरोबर एकत्रीकरणाची सुविधा आहे की त्यामुळे मुंबई महानगर क्षेत्रामध्ये वाहतुकीच्या अन्य साधनांबरोबर एनसीएफसी कार्ड व मोबाईल ॲपद्वारे परस्पर सहाय्य करता येईल.<br>दोन्ही मार्गाने दृकश्राव्य अंतरण क्षमतेची दृक पारेषण यंत्रणा |
| ii. उत्पादन सुधारणा, खर्चात कपात, उत्पादन विकास किंवा आयात प्रतिस्थापन यासारखे साधित फायदे. | i) रोलिंग स्टॅकची महत्वाची व बरीच उपकरणे / साधने ही स्वदेशातून प्राप्त केली जातील जसे – कन्व्हर्टर / इन्व्हर्टर युनिट, स्टॅटिक इन्व्हर्टर, व्हॅक्यूम सर्किट ब्रेकर (व्हीसीबी), डोअर सिस्टीम, पँटोग्राफ, व्हेंटिलेशन व वातानुकूलन यंत्रणा<br>ii) सिग्नलिंग व टेलिकॉम यंत्रणेची महत्वाची व बरीच उपकरणे जसे डेपोसाठी पॉईंट मशीन, केबल, सिग्नल युनिट, रिअर प्रोजेक्शन् स्क्रीन, पॉवर डिस्ट्रीब्युशन क्युबिक्स, पॅसेंजर इन्फॉर्मेशन डिस्प्ले सिस्टीम, फॉल्ट रिपोर्टिंग सिस्टीम, अनइंटरप्टेड पॉवर सप्लाय, व्हॉईस रेकॉर्डींग सिस्टीम इत्यादी स्वदेशातून प्राप्त केली जातील. |
| iii. आयात केलेल्या तंत्राबाबत (वित्तीय वर्षाच्या सुरुवातीपासून आधीच्या तीन वर्षामध्ये आयात केलेल्या तंत्राबाबत)- | एमएमएल-3 हा प्रकल्प पर्यावरण अनुकूल प्रकल्प म्हणून राबवला जात आहे. म्हणून लागू नाही. |

| | |
|---|---|
| (अ) आयात केलेल्या तंत्रज्ञानाचा तपशील; | |
| (ब) आयात केल्याचे वर्ष; | |
| (क) तंत्रज्ञान पूर्णपणे अवशोषले गेले काय; | |
| (ड) नसल्यास कोठे ते अवशोषले गेले नाही, ते क्षेत्र व त्याची कारणे. | |
| iv. संशोधन आणि विकासावर झालेला खर्च | लागू नाही |
| **क) परकीय चलन कमाई आणि विनिमय :** | |
| परकीय चलनाने वर्षभरात प्रत्यक्ष आवक आणि वर्षभरातील परकीय चलन जावक वास्तविक बाह्य प्रवाहाच्या संदर्भात कमावले | परकीय चलन कमाई – निरंक<br>परकीय चलन विनिमय - रु. 5,433,188,245.33/- |

**18. कंपनी कायदा 2013 च्या कलम 134(3) (G) च्या तरतुदीनुसार कर्ज, गुंतवणूक आणि हमी यांचे विशेष**

अहवालाधीन वर्षात, कंपनीने असे कोणतेही कर्ज दिलेले नाही, अशी कोणतीही गुंतवणूक केली नाही किंवा कोणत्याही कर्जावर हमी दिली नाही, की जी कंपनी कायदा, 2013 च्या कलम 134(3)(g) च्या तरतुदींच्या कक्षेत येते. कर्मचाऱ्यांना दिलेले कर्ज (चालू) रु.3,75,000/- व (चालू नसलेले) रु.4,58,000/-

**19. संबंधित पक्षकारांबरोबर व्यवहार**

कंपनी कायदा 2013 च्या कलम 188(1) मध्ये आर्थिक वर्ष 2022-23 साठी विहित नमुन्यात संदर्भित केलेल्या संबंधित पक्षांसोबतच्या कराराचे तपशील, एओसी-2 हे या अहवालात "परिशिष्ट-3" म्हणून संलग्न केले आहे.

**20. वार्षिक परताव्यासंबंधीची माहिती**

कंपनीच्या वर्ष 2022-23 च्या वार्षिक परताव्याचा सारांश कंपनीचे वेबसाइट www.mmrcl.com वर उपलब्ध असेल.

**21. (i) कर्मचारी**

i) रु.8,50,000 प्रति महिना किंवा रु. 1,02,00,000 प्रतिवर्ष पेक्षा जास्त मानधन घेणारे कोणतेही कर्मचारी महामंडळात नाहीत.

(ii) कंपनी कारभार मंत्रालयाने जारी केलेल्या दि. 5 जून, 2015 च्या अधिसूचनेनुसार कंपनी कायदा, 2013 च्या कलम 197 (खंड 13) ची पूर्तता करण्यापासून शासकीय कंपन्यांना सूट दिली आहे. म्हणून त्या खालील नियम म्हणजे नियम 5 कंपनी (व्यवस्थापकीय व्यक्तींची नेमणूक व मोबदला) नियम 2014 सरकारी कंपन्यांना लागू नाहीत.

(iii) कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, अटकाव आणि निवारण) कायदा, 2011 च्या कलम 22 अनुसार, तसेच नियम 14 अनुसार उपरोक्त कायद्यान्वये स्थापित केलेल्या अंतरिम समितीने सुनिश्चित केले आहे की या वर्षादरम्यान उपरोक्त कायद्यांतर्गत कोणतीही तक्रार / प्रकरण दाखल करण्यात आलेली नाही.

**22. जोखीम व्यवस्थापन धोरण**

कंपनीकडे एक सु-परिभाषित जोखीम रचनारेखा आहे. तिथे नियमितपणे पुनरावलोकन केले जाते. कंपनीच्या संचालक मंडळाच्या शिफाराशीवर सदर धोरण आधारित तयार केले जाते.

संचालक मंडळाने अशी कोणतीही जोखीम ओळखलेली नाही, जी मंडळाच्या मते कंपनीच्या अस्तित्वाला धोका निर्माण करु शकतात.

**23. अंतर्गत आर्थिक नियंत्रणे**

व्यवसायाचे सुव्यवस्थित आणि कार्यक्षम आचरण, फसवणूक आणि त्रुटी रोखणे आणि शोधणे याची खात्री करण्यासाठी संचालक मंडळ इतर गोष्टींबरोबरच संचलन आणि आर्थिक विधानाच्या संदर्भात कंपनीच्या अंतर्गत धोरणे आणि कार्यपद्धतींचे नियमित अंतराने पुनरावलोकन करते. तसेच कंपनीच्या अभिलेखांची अचूकता आणि पूर्णता निश्चित करण्यासाठी अंतर्गत धोरणे आणि कार्यपद्धती अस्तित्वात आहेत आणि कंपनीत विश्वसनीय आर्थिक माहिती तयार करण्यासाठी एक प्रणाली अस्तित्वात आहे.

**24. भारतीय सचिव संस्थेने जारी केलेल्या पुढील सचिविक मानकांची पूर्तता**

भारतीय सचिव संस्थेने जारी केलेल्या पुढील सचिविक मानकांची पूर्तता केली आहे असे संचालक मंडळ घोषित करते. सचिविक मानक - 1 (संचालक मंडळाच्या बैठका) सचिविक मानक - 2 (सर्वसाधारण सभा). ही मानके कंपनी कायदा, 2013 च्या कलम 118(10) च्या अंतर्गत कंपनी व्यवहार मंत्रालयाने सूचित केली आहेत. या मानकांची पूर्तता वित्तीय वर्ष 2022-23 मध्ये घेतलेल्या सर्व बैठकांबाबतीत केली गेली आहे.

**25. संचालकांच्या जबाबदारीचे विधान**

संचालक याद्वारे सांगतात की,

(अ) कंपनीने वार्षिक वित्तीय विवरणे तयार करताना, महत्वाच्या फरकांशी संबंधित योग्य स्पष्टीकरणासह लागू असलेल्या लेखा मानकांचे पालन केले गेले आहे;

(ब) संचालकांनी अशी लेखाविषयक धोरणे निवडली आहेत आणि ती सातत्याने लागू केली आहेत की, ज्यामुळे वाजवी आणि विवेकपूर्ण निर्णय आणि अंदाज केले जातात. की ज्यामुळे आर्थिक वर्षाच्या शेवटी आणि कंपनीच्या कारभाराचा खरा आणि न्याय्य दृष्टिकोन समोर ठेवता येईल व त्या काळातील नुकसान आणि गैरव्यवहार यांच्यापासून सुरक्षा मिळेल.

(क) संचालकांनी कंपनीच्या मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी आणि फसवणूक आणि इतर अनियमितता रोखण्यासाठी आणि शोधण्यासाठी या कायद्याच्या तरतुदींनुसार पुरेशा लेखा नोंदी ठेवण्यासाठी योग्य आणि पुरेशी काळजी घेतली आहे;

(ड) संचालकांनी वार्षिक हिशेब चालू कंपनी या तत्वावर तयार केले आहेत; आणि

(इ) संचालकांनी सर्व लागू कायद्यांच्या तरतुदींचे पालन सुनिश्चित करण्यासाठी आणि अशा प्रणाली पुरेशा आणि प्रभावीपणे कार्यरत आहेत याची खात्री करण्यासाठी योग्य प्रणाली तयार केली आहे.

**26. नादारी व दिवाळखोरी संहिता 2016 खाली सादर केलेल्या अर्जाचा किंवा प्रलंबित अशा कारवाईचा तपशील**

अहवालामधील कार्यामध्ये नादारी व दिवाळखोरी संहिता 2016 खाली कोणताही अर्ज केला नाही किंवा कारवाई प्रलंबित नाही.

**27. बँक किंवा वित्तीय संस्थांकडून कर्ज घेतले असल्यास जर एकदम एकावेळी कर्जाची परतफेड केली तर केलेले मूल्यमापन व कर्ज घेतानाचे मूल्यमापन यातील**

फरक अहवालाधीन वर्षात बँकांकडून वा वित्तीय संस्थांकडून न घेतलेल्या कर्जाची एकावेळी परतफेड केली नाही.

**28. ऋणनिर्देश**

गृहनिर्माण व नागरी कारभार मंत्रालय, भारत सरकार, महाराष्ट्र शासन, जपान आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेशन एजन्सी (जेआयसीए), भारत सरकारचे विविध विभाग, महाराष्ट्र शासनाचे विविध विभाग यांनी वेळोवेळी मौलिक मार्गदर्शन केले, आधार दिला, पाठिंबा दिला. याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. तसेच सर्व कर्मचाऱ्यांनी केलेले

कठार परिश्रम व त्यांची निष्ठा, ज्यांचे देशातील पहिल्या पूर्णपणे जमिनीखालील मेट्रो रेल्वे जाळयाच्या बोगदे खणण्याच्या कामात महत्वाचे योगदान आहे. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. मी अशी आशा करतो की, अत्यंत प्रोत्साहीत झालेले कार्यक्षम कर्मचारी वर्ग, मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांना भविष्यातील कार्यात यशस्वी करेल.

सही
**(मनोज जोशी)**
सचिव

संचालक मंडळाच्या वतीने व करिता
**मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित**

**दिनांक –** 29.09.2023
**स्थळ –** मुंबई

## नामनिर्देशन व मोबदला धोरण



| अ. क्र. | अनुक्रमणिका |
|---|---|
| 1 | प्रस्तावना |
| 2 | धोरणाची महत्वाची उद्दिष्टे |
| 3 | परिणामकारक तारीख |
| 4 | नामनिर्देशन आणि मोबदला समितीची रचना |
| 5 | व्याख्या |
| 6 | धोरण लागू असणे |
| 7 | संचालक मंडळ / व्यवस्थापकीय संचालक / पूर्णवेळ संचालकांना यांना धोरण लागू असणे |
| 8 | समितीचे सदस्य |
| 9 | समितीची गणपूर्ती |
| 10 | समितीच्या बैठका |
| 11 | महत्वाच्या व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांची आणि वरिष्ठ व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांची नेमणूक आणि काढून टाकणे |
| 12 | मुदत |
| 13 | मूल्यमापन |
| 14 | काढून टाकणे |
| 15 | निवृत्ती |
| 16 | संचालक / महत्वाच्या व्यवस्थापकीय कर्मचारी / वरिष्ठ व्यवस्थापकीय कर्मचारी यांना मोबदला देण्याचे धोरण |
| 17 | अंमलबजावणी |
| 18 | सुधारणा |

**1. प्रस्तावना -**

कंपनी कायदा, 2013 च्या कलम 178(3) सहपठित लागू असलेले कायदे, नियम यांच्या तरतुदींनुसार, कंपनीने सदर नामनिर्देशन आणि मोबदला धोरण ठरवले आहे. हे धोरण कंपनी - महत्वाच्या व्यवस्थापकीय कर्मचारी व वरिष्ठ व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांच्या नेमणुकींना ज्याप्रमाणात शासकीय कंपन्यांना लागू असेल त्याप्रमाणात लागू राहील.

**2. धोरणाची महत्वाची उद्दिष्टे -**

धोरणाची महत्वाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे असतील -

अ) महत्वाच्या व्यवस्थापकीय कर्मचारी व वरिष्ठ व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांच्या नेमणुकाआणि काढून टाकण्यासंदर्भात संचालक मंडळाला मार्गदर्शन करणे.

ब) महत्वाच्या व्यवस्थापकीय कर्मचारी व वरिष्ठ व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करणे आणि संचालक मंडळाला महत्वाचे अहवाल देणे.

क) महत्वाच्या व्यवस्थापकीय कर्मचारी व वरिष्ठ व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांना मोबदला देण्याबाबत संचालक मंडळाला शिफारस करणे

**3. महत्वाची तारीख :**

सदर धोरण संचालक मंडळाने मान्यता दिलेल्या दिवसापासून प्रभावी होईल.

**4. नामनिर्देशन आणि मोबदला समितीची रचना -**

संचालक मंडळाने दि. 5 मार्च, 2016 रोजी संपन्न झालेल्या 38 व्या बैठकीमध्ये आणि दि. 27 मे, 2016 रोजी संपन्न झालेल्या 39 व्या बैठकीमध्ये नामनिर्देशन आणि मोबदला समितीच्या संदर्भानुसार गठित केली.

**5. व्याख्या**

- “मंडळ” म्हणजे कंपनीचे संचालक मंडळ.
- संचालक म्हणजे कंपनीचे संचालक
- “समिती” म्हणजे कंपनीच्या संचालक मंडळाने गठित केलेली किंवा पुनर्गठित केलेली कंपनीची नामनिर्देशन आणि मोबदला समिती.
- “कंपनी” म्हणजे मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित.
- "महाराष्ट्र शासन" किंवा "सरकार" यामध्ये अन्यथा याबाबत निर्दिष्ट नसल्या यात महाराष्ट्र राज्याचे सरकार.
- "केंद्र सरकार" म्हणजे भारत सरकार. भारत सरकारमध्ये भारताचे राष्ट्रपती किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या व्यक्ती.
- “स्वतंत्र संचालक” म्हणजे कंपनी कायदा, 2013 च्या कलम 149 (6) मध्ये संदर्भित केलेले संचालक.
- “वरिष्ठ व्यवस्थापन कर्मचारी” म्हणजे कंपनीचा गाभा व्यवस्थापकीय संघाचा (टीम) वगळून असलेले सदस्य. यामध्ये कार्यकारी संचालकांच्या पातळीच्या खाली एक पातळी असलेले कर्मचारी. त्यामध्ये सर्व विभाग अध्यक्षांचा समावेश असतो, मग त्यांची पदनामे काहीही असेल.

संदर्भाची अन्य आवश्यकता नसल्यास, या धोरणामध्ये वापरलेले पण व्याख्या न केलेले शब्द व अभिव्यक्ती (expression) परंतु ज्यांची व्याख्या कंपनी कायदा, 2013 मध्ये दिलेली आहे त्यांची व्याख्या तीच असेल.

**6. धोरण लागू असणे -**

कंपनी कारभार मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचना क्रमांक जीएसआर 463(इ) दि.5 जून, 2015 नुसार, नामनिर्देशन आणि मोबदला धोरण हे फक्त खालील व्यक्तींना लागू असेल:

(अ) कार्यकारी / पूर्णवेळ संचालक (कंपनीचे कर्मचारी आहेत पण महाराष्ट्र सरकारने नामनिर्देशित केलेले नाहीत किंवा नेमलेले नाहीत)

(ब) महत्वाचे व्यवस्थापकीय कर्मचारी (कंपनीचे कर्मचारी असल्याने)

(क) वरिष्ठ व्यवस्थापकीय कर्मचारी

(ड) इतर कर्मचारी

कंपनीच्या संस्थापन नियमावलीनुसार कंपनीच्या संचालक मंडळावर महाराष्ट्र सरकार किंवा भारत सरकार यांनी नेमलेल्या संचालकांना या धोरणातील कोणतीही तरतूद लागू होत नाही.

**7. संचालक मंडळ / व्यवस्थापकीय संचालक / पूर्णवेळ संचालकांसाठी धोरणाची अंमलबजावणी -**

कंपनी कारभार मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचना क्रमांक जीएसआर 463(इ) दि.5 जून, 2015 नुसार, आणि कंपनीच्या संस्थापन नियमावलीच्या लेखांनुसार, कंपनी कायदा, 2013 चे कलम 178 (2), (3) आणि (4) कंपनीच्या संचालक मंडळाला जर ते कंपनीचे कर्मचारी नसतील तर लागू नाहीत.

सदर कंपनी सरकारी कंपनी असल्याने आणि कंपनीच्या संस्थापन नियमावलीनुसार कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक यांच्या नेमणुकीच्या अटी, शर्ती, मुदत व मोबदला हे भारत सरकार किंवा महाराष्ट्र शासन ठरवतात. त्यानुसार, या धोरणातील काहीही व्यवस्थापकीय संचालक / पूर्णवेळ संचालक यांच्या नियुक्ती आणि मानधनावर लागू होणार नाही, जिथे त्यांची नियुक्ती सरकारने केली आहे.

कंपनी कारभार मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचना क्रमांक जीएसआर 463(इ) दि.5 जून, 2015 नुसार, महत्वाच्या व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीतील कंपनी कायदा, 2013 चे कलम 203 चे उप-कलम (1), (2), (3) आणि (4) हे व्यवस्थापकीय संचालकांना किंवा पूर्णवेळ संचालकांना लागू होत नाहीत. त्यामुळे या धोरणातील महत्वाच्या व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीतील तरतूद व्यवस्थापकीय संचालक आणि पूर्णवेळ संचालकांना लागू होत नाही.

कंपनीच्या संस्थापन नियमावलीनुसार, भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांना कंपनीच्या संचालक मंडळावर संचालक नामनिर्देशित करण्याचा किंवा नेमण्याचा अधिकार आहे. या नेमणुका या धोरणाच्या कक्षेच्या बाहेर आहेत.

**8. समितीचे सदस्य -**

या समितीमध्ये किमान 3 संचालक असतील. समितीमधील बहुसंख्य म्हणजे 50% पेक्षा जास्त सभासद हे स्वतंत्र संचालक असतील. समितीचे अध्यक्ष स्वतंत्र संचालक असतील.

**9. समितीची गणपूर्ती**

समितीच्या बैठकीची गणपूर्ती किमान 2 संचालक आहेत.

**10. समितीच्या बैठका**

समिती योग्य वाटेल तेव्हा, वाटेल तितक्या वेळा व तिला योग्य वाटेल तितक्या अंतराने आपली बैठक घेईल. या बैठका समितीला योग्य वाटेल त्या ठिकाणी घेतली जाईल. कोणत्याही कारणाने व्हिडिओ-कॉन्फरन्सिंगने ज्या गोष्टी करता येत नाहीत त्या गोष्टी वगळून समितीचे कामकाज व्हिडिओ-कॉन्फरन्सिंगने करता येईल.

जर एखादे ठराव एखाद्या चक्रीय ठरावाद्वारे करायला बंदी नसेल तर समिती जे ठराव बैठकीद्वारे करु शकते ते ठराव समिती चक्रीय ठरावाद्वारे पारित करेल.

**11. महत्वाच्या व्यवस्थापकीय कर्मचारी आणि वरिष्ठ व्यवस्थापकीय कर्मचारी यांची नेमणूक आणि त्यांना काढून टाकणे –**

अ) महत्वाचे व्यवस्थापकीय कर्मचारी म्हणून वरिष्ठ व्यवस्थापकीय व्यक्ती नेमणुक करण्यासाठी ही समिती उमेदवारांची कौशल्य, अर्हता, अनुभव इत्यादी जाणून घेईल व त्याची / तिची नेमणूक करण्याची शिफारस कंपनीच्या धोरणानुसार करील.

ब) ज्या पदासाठी नेमणूक करण्याचा विचार केला जात आहे त्या पदासाठी आवश्यक असलेली अर्हता, अनुभव आणि कौशल्य त्या उमेदवाराकडे आहे का ते ठरवण्याचा अधिकार समितीला आहे.

क) ज्या व्यक्तीची वय सत्तर वर्षे झाले आहे त्या व्यक्तीला कंपनीच्या सभासदांनी विशेष ठरावाद्वारे संमती दिल्याशिवाय कंपनी पूर्णवेळ संचालक म्हणून नेमणार नाही किंवा तिची नेमणूक पुढे चालू ठेवणार नाही. परंतु, या पदावर असलेल्या व्यक्तीचा कार्यकाळ विशेष ठराव पारित करून भागधारकांच्या मान्यतेने वयाच्या 70 वर्षांच्या पुढे वाढविला जाऊ शकतो.

**12. मुदत**

**व्यवस्थापकीय संचालक / पूर्णवेळ संचालक -**

जोपर्यंत कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक / पूर्णवेळ संचालक महाराष्ट्र सरकार किंवा भारत सरकार यांच्याकडून नेमले जात आहेत, तोपर्यंत त्यांच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती सरकार ठरवील.

**स्वतंत्र संचालक -**

एखादा संचालक कंपनीच्या संचालक मंडळावर सलग पाच वर्षे काम करु शकतो व कंपनी विशेष ठराव पारित करुन अशा स्वतंत्र संचालकांची नेमणूक करु शकते. कोणताही स्वतंत्र संचालक प्रत्येकी 5 वर्षांपेक्षा जास्त वेळा आपल्या पदावर राहू शकत नाही. तथापि, असा स्वतंत्र संचालक त्याने स्वतंत्र संचालकांचे पद रिकामे करुन तीन वर्षांचा कालावधी लोटला की मग तो पुन्हा नेमणुकीस पात्र होतो. कंपनीच्या संचालक मंडळावर स्वतंत्र संचालक सलग पाच वर्षांपर्यंत पद धारण करील आणि कंपनीने विशेष ठराव पारित केल्यानंतर आणि संचालक मंडळाच्या अहवालात अशा नियुक्तीचा खुलासा केल्यावर पुन्हा नियुक्तीसाठी पात्र असेल.

मात्र सदर स्वतंत्र संचालकाने या तीन वर्षांच्या काळात कंपनीबरोबर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही तऱ्हेने संबंध ठेवता कामा नये.

**13. मूल्यमापन**

समिती महत्वाच्या व्यवस्थापकीय कर्मचारी आणि वरिष्ठ व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांच्या कामगिरीचे दरवर्षी किंवा आवश्यकता असेल तेव्हा मूल्यमापन करेल.

**14. काढून टाकणे**

समिती कंपनी कायदा, 2013 चे नियम यांची तरतूद व कंपनीचे धोरण यांच्या अधिन राहून कंपनीच्या महत्वाच्या व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांना व वरिष्ठ व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांना लेखी कारणे देऊन काढून टाकण्याची शिफारस करु शकते.

**15. निवृत्ती**

कंपनी कायद्याच्या लागू असलेल्या तरतुदी आणि कंपनीच्या प्रचलित धोरणानुसार महत्वाचे व्यवस्थापकीय कर्मचारी आणि वरिष्ठ व्यवस्थापकीय कर्मचारी कंपनीच्या चालू धोरणानुसार व कंपनी कायदा, 2013 च्या प्रावधानोनुसार सेवानिवृत्त होऊ शकतील. कंपनीचे संचालक मंडळ आपल्या इच्छेनुसार कंपनीच्या फायद्यासाठी निवृत्त झालेल्या अशा कर्मचाऱ्यांना त्यांचे निवृत्तीचे वय झाले असले तरी त्यांच्या पदावर त्यांना ठेवू शकतात.

**16. संचालक/ महत्वाचे व्यवस्थापकीय कर्मचारी / वरिष्ठ व्यवस्थापकीय कर्मचारी यांना मोबदला देण्याचे धोरण कार्यकारी नसलेले संचालक / स्वतंत्र संचालक यांना मोबदला -**

अ) कार्यकारी नसलेले संचालक / स्वतंत्र संचालक यांना कंपनी कायदा, 2013 च्या तरतुदींनुसार बैठकीला उपस्थित असल्याची फी (सिटींग फी) व अन्य मोबदला मिळेल. बैठक शुल्काची रक्कम नामनिर्देशन आणि पारिश्रमिक समितीने शिफारस केल्याप्रमाणे व संचालक मंडळाने मान्यता दिल्याप्रमाणे असेल.

ब) कार्यकारी नसलेले संचालक / स्वतंत्र संचालक यांना दिलेला मोबदला (कंपनी कायदा, 2013 चे कलम 197 (5) नुसार) (दिलेली सिटींग फी वगळून) कंपनी कायदा, 2013 च्या प्रावधानानुसार तसेच त्या कायद्यांतर्गत घालून दिलेले नियम तसेच अन्य कायद्याच्या तरतुदीनुसार आहे. सदर मोबदल्याची रक्कम नामनिर्देशन आणि पारिश्रमिक समितीने शिफारस केल्याप्रमाणे आणि तेथे केलेल्या नियमांनुसार प्रदान केलेल्या कमाल मर्यादा / मर्यादेच्या अधीन असेल..

क) स्वतंत्र संचालकांना स्टॉक ऑप्शन मिळत नाहीत व ते कंपनीच्या समभागांवर आधारित कोणत्याही योजनेत भाग घेऊ शकत नाहीत.

ड) कार्यकारी नसलेले संचालक / स्वतंत्र संचालक यांनी व्यावसायिक स्वरुपाच्या दिलेल्या सेवाबद्दल त्यांना दिलेला मोबदला हा खालील अटींची पूर्तता केल्यास मोबदल्याचा भाग समजला जाणार नाही. :

i) सदर संचालकांनी दिलेल्या सेवा या व्यावसायिक म्हणून दिलेल्या आहेत; आणि

ii) समितीच्या मते, त्या संचालकांकडे अशा सेवा देण्यासाठी आवश्यक अर्हता आहेत.

**महत्वाचे व्यवस्थापकीय कर्मचारी आणि वरिष्ठ व्यवस्थापकीय कर्मचारी यांना मोबदला -**

अ) महत्वाचे व्यवस्थापकीय कर्मचारी आणि वरिष्ठ व्यवस्थापकीय कर्मचारी यांचा मोबदला हा कंपनी कायदा, 2013 च्या तरतुदींनुसार व कंपनीच्या धोरणानुसार, कंपनीला योग्य वाटेल तसा ठराविक पगार आणि प्रोत्साहनात्मक पगार (इन्सेंटिव्ह पे) असा ठरलेला असतो.

ब) महत्वाचे व्यवस्थापकीय कर्मचारी आणि वरिष्ठ व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांचा मोबदला बाजारातील मानकांप्रमाणे भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांच्या अटी व शर्तींनुसार ठरवलेला असतो.

**17. अंमलबजावणी**

अ) मोबदल्या संबंधीचे हे धोरण भविष्यामध्ये कंपनीचे महत्वाचे व्यवस्थापकीय कर्मचारी आणि वरिष्ठ व्यवस्थापकीय कर्मचारी आणि संचालक मंडळ यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांबरोबर केल्या जाणाऱ्या नेमणुक करारांना लागू होईल. म्हणजेच या धोरणाला संचालक मंडळाने मान्यता दिल्यानंतर केल्या जाणाऱ्या सर्व नेमणूक करारांना लागू असेल. या धोरणाला मान्यता देण्यापूर्वी जे नेमणूक करार झाले असतील त्यावेळी अशा करारांमध्ये सुधारणा, दुसऱ्या किंवा बदल करताना ते बदल सदर धोरणानुसार असले पाहिजे.

ब) अन्य बाबतीत, मोबदला धोरण हे व्यवस्थापनाच्या मार्गदर्शनासाठी आहे. या धोरणाची कोणत्याही किंवा सर्व तरतुदी कंपनी कायदा, 2013 मधील बदल / सुधारणा मार्गदर्शक तत्त्वांच्या संबंधित नियम आणि नियमन, वेळोवेळी अधिसूचित केल्या जाणाऱ्या विषयावरील मार्गदर्शक तत्त्वे यांच्या अधीन असतील. कंपनी कायद्यात असा बदल झाल्यास सदर धोरणात आपोआप बदल होईल व असा बदल करण्यासाठी नामनिर्देशन व मोबदला समितीच्या / संचालक मंडळाच्या समितीची गरज भासणार नाही. तथापि, धोरणातील बदल धोरणाला जोडला जाईल. व सर्व संबंधित व्यक्तींना माहितीसाठी कंपनीच्या संकेतस्थळावर प्रदर्शित केला जाईल व नामनिर्देशन व मोबदला समितीच्या पुढील बैठकीत तसेच संचालक मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करील.

क) या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती मार्गदर्शक तत्वे, पद्धती, प्रारुपे ( फॉरमॅट) अहवाल करण्याची पद्धत, पुरवणी नियमावली (मॅन्युअल) समिती आपल्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे जारी करेल.

ड) समिती आपले कोणतेही अधिकार आपल्या कोणत्याही एक किंवा अधिक सदस्यांना सुपूर्द करील.

**18. सुधारणा / बदल**

संचालक मंडळ सदर धोरणात कोणतेही कारण न देता, केव्हाही या धोरणात कोणतेही बदल करू शकेल. सदर बदल या धोरणाला जोडले जातील व या बदलांची समितीच्या बैठकीत आणि संचालक मंडळाच्या बैठकीत नोंद घेतली जाईल.

## "परिशिष्ट - 2"

### वित्तीय वर्ष 2022-23 साठी कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी कार्याबाबत अहवाल

**1) कंपनीचा कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी धोरणाची रुपरेषा**

मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादितचे कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीचे धोरण महामंडळाची समाजाबाबतची काळजी दर्शविते. शिक्षण आणि कौशल्य विकास, आरोग्य व चांगले राहणे, पर्यावरणाचे संतुलन जीववैविध्य, उर्जा व पाणी यांची बचत यावर हे धोरण केंद्रीत करते. तसेच समाजाच्या वंचित घटकांना त्यांच्या आयुष्याचा दर्जा वाढवण्याची संधी देणे हे या धोरणात समाविष्ट आहे. या धोरणांतर्गत केलेले प्रकल्प हे कंपनी कायदा, 2013 च्या सूची 7 च्या सर्वसाधारण चौकीटमध्ये बसतात. सदर धोरणाची व त्या अंतर्गत हाती घेतलेल्या प्रकल्पांची सविस्तर माहिती कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**2) सीएसआर प्रकल्प आणि कार्यक्रमांचा आढावा कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी समितीची रचना**

| अ. क्र. | संचालकाचे नाव | हुद्दा / संचालकाचे स्वरुप | वर्षभरात आयोजित केलेल्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी समितीच्या बैठकींची संख्या | वर्षभरात हजर असलेल्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी समितीच्या बैठकींची संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. भूषण गगराणी | अध्यक्ष | 1 | 1 |
| 2 | श्रीमती अश्विनी भिडे * | सदस्य | 1 | 1 |
| 3 | श्री. अजयकुमार ए भट्ट | सदस्य | 1 | 1 |

*श्रीमती अश्विनी भिडे यांची दि.12 जुलै 2022 पासून व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

**3) जेथे सीएसआर समितीची रचना, सीएसआर धोरण आणि बोर्डाने मंजूर केलेले सीएसआर प्रकल्प कंपनीच्या वेबसाइटवर उघड केले जातात ते वेब लिंक द्या.**

सीएसआर समितीची रचना वर दिली आहे. ती कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत - www.mmrcl.com

कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी धोरण - www.mmrcl.com

कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी प्रकल्प – लागू नाही.

**4) कंपनी (कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी धोरण) नियम 2014 नुसार (लागू असल्यास) कंपनीने हाती घेतलेल्या कॉर्पोरेट सामाजिक प्रकल्पाच्या परिणामाच्या मोजमापाचा तपशील द्या.**
**लागू नाही.**

**5) कंपनी (कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी धोरण) नियम 2014 च्या नियम 7 उपनियम (3) नुसार सेट ऑफसाठी उपलब्ध असलेली रक्कम व वित्तीय वर्षात सेट ऑफसाठी आवश्यक असलेली रक्कम (असल्यास) याचा तपशील -**

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | आधीच्या वित्तीय वर्षातून उपलब्ध असलेली रक्कम | वित्तीय वर्षामध्ये सेट ऑफसाठी आवश्यक रक्कम |
|---|---|---|---|
| | | लागू नाही. | |

**6) कंपनी कायदा कलम 135(5) नुसार कंपनीचा सरासरी निव्वळ नफा :**

मागील तीन वित्तीय वर्षांसाठी सरासरी निव्वळ नफा -

रुपये लाखात

| वित्तीय वर्ष | करपूर्व नफा | तीन वर्षांची सरासरी |
|---|---|---|
| 2020-21 | (2068.02) | (2443.42) |
| 2021-22 | (2199.25) | |
| 2022-23 | (3062.98) | |
| एकूण | (7330.25) | |

**7) (अ) कलम 135 (5) नुसार कंपनीच्या सरासरी निव्वळ नफ्याच्या दोन टक्के - (48.868)**

**(ब) सीएसआर प्रकल्प किंवा मागील वित्तीय वर्षातील कार्यक्रम किंवा क्रियाकलापांमधून उद्भवणारे अधिशेष – निरंक**

**(क) वित्तीय वर्षासाठी आवश्यक असलेली रक्कम सेट ऑफ करणे, जर असेल तर – निरंक**

**(ड) वित्तीय वर्षासाठी एकूण सीएसआर बंधन (7 अ + 7 ब- 7 क) – निरंक**

**8) (अ) वित्तीय वर्षासाठी खर्च केलेली किंवा न खर्च केलेली सीएसआर रक्कम - लागू नाही**

**(ब) वित्तीय वर्षासाठी चालू असलेल्या प्रकल्पांवर खर्च केलेल्या सीएसआर रकमेचा तपशील - लागू नाही**

**(क) वित्तीय वर्षासाठी चालू असलेल्या प्रकल्पांव्यतिरिक्त खर्च केलेल्या सीएसआर रकमेचा तपशील - लागू नाही**

**(ड) प्रशासकीय ओव्हरहेड्समध्ये खर्च केलेली रक्कम - निरंक**

**(इ) प्रभावी मूल्यांकनावर खर्च केलेली रक्कम, लागू असल्यास - निरंक**

**(फ) वित्तीय वर्षासाठी खर्च केलेली एकूण रक्कम (8ब + 8क + 8ड + 8इ) – निरंक**

**(ग) सेट ऑफसाठी जादा रक्कम, असल्यास**

| अ. क्र. | तपशील | रुपये लाखात |
|---|---|---|
| अ) | कलम 135(5) नुसार कंपनीचा सरासरी निव्वळ नफ्याच्या 2% | रु. 48.868/- |
| ब) | वित्तीय वर्षासाठी खर्च केलेली एकूण रक्कम | निरंक |
| क) | वित्तीय वर्षासाठी खर्च केलेली जादा रक्कम [(ii)-(i)] | निरंक |
| ड) | सीएसआर प्रकल्प किंवा मागील वित्तीय वर्षातील कार्यक्रम किंवा उपक्रम, जर काही असेल तर त्यातून उद्भवणारे अधिशेष | निरंक |
| इ) | पुढील वित्तीय वर्षांमध्ये सेट ऑफसाठी उपलब्ध रक्कम [(iii)-(iv)] | निरंक |

**9) (अ) मागील तीन वित्तीय वर्षांसाठी खर्च न केलेल्या सीएसआर रकमेचा तपशील - निरंक**

**(ब) मागील वित्तीय वर्षांच्या चालू प्रकल्पांसाठी वित्तीय वर्षात खर्च केलेल्या सीएसआर रकमेचा तपशील - निरंक**

**10) भांडवली मालमत्तेची निर्मिती किंवा संपादन करताना, वित्तीय वर्षात खर्च केलेल्या सीएसआर द्वारे तयार केलेल्या किंवा संपादन केलेल्या मालमत्तेशी संबंधित तपशील द्या. – निरंक**

**11) कलम 135(5) नुसार कंपनी सरासरी निव्वळ नफ्याच्या दोन टक्के खर्च करण्यात अयशस्वी झाल्यास कारण निर्दिष्ट करा – लागू नाही**

संचालक मंडळाच्या वतीने व करिता
**मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित**

सही
**समितीचे अध्यक्ष**
**कंपनीची सामाजिक जबाबदारी**

## फॉर्म क्रमांक एमआर – 3

**सचिविक लेखापरीक्षण अहवाल**
**31 मार्च 2023 रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी**

[कंपनी अधिनियम 2013 च्या कलम 204 (1) आणि कंपनी (कर्मचाऱ्यांची नियुक्ती आणि मानधन) नियम, 2014 च्या नियम क्रमांक 9 नुसार]

**प्रति,**

सदस्य,
**मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित,**
ट्रांझिट ऑफिस ई ब्लॉक,
सिटी पार्कची उत्तर बाजू,
आयकर कार्यालयाच्या मागे,
ए-विंग वांद्रे (ई), वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स,
मुंबई- 400051

आम्ही **मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित (सिन – U60100MH2008SGC181770)** (यापुढे "कंपनी" म्हटले जाईल) यांना लागू असलेल्या वैधानिक तरतुदींचे आणि चांगल्या व्यावसायिक (कॉर्पोरेट) पद्धतींचे त्यांनी केलेल्या पालनांचे सचिविक लेखापरीक्षण केले आहे.सचिविक लेखापरिक्षण अशा रीतीने केले गेले की, ज्याने आम्हाला व्यावसायिक आचार/वैधानिक अनुपालनांचे मूल्यांकन करण्यासाठी आणि त्यावर आमचे मत व्यक्त करण्यासाठी वाजवी आधार प्रापत झाला.

सचिविक अभिलेख तयार करणे व त्याची परिविक्षा करणे तसेच कंपनीला लागू असलेल्या कायद्यांची व नियमांची अंमलबजावणी होते याची खात्री करण्यासाठी यंत्रणा / व्यवस्था निर्माण करणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. कंपनीने सचिविक प्रावधानांची, मानकांची व कार्यप्रणालीची कितपत पूर्तता करतात यावर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.

कंपनीच्या व्यवस्थापनाकडून आम्हाला प्राप्त झालेले लेखापरीक्षण पुरावे व माहिती आमचे मत बनवायला पुरेसा आधार आहे.

कंपनीची लेखा पुस्तके, कागदपत्रे, इतिवृत्त पुस्तके, फॉर्म आणि रिटर्न फाईल्स आणि कंपनीने ठेवलेल्या इतर नोंदी आणि कंपनीने पुरवलेली माहिती, कंपनीचे अधिकारी, प्रतिनिधी आणि अधिकृत प्रतिनिधी यांनी दिलेल्या माहितीच्या आधारावर सचिविक लेखापरीक्षण दरम्यान पडताळणी करण्यात आली.

त्यानुसार आमच्या मते आम्ही असा अहवाल देतो की कंपनीने **31 मार्च 2023** रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षण कालावधीत कंपनीने खाली दिलेल्या कायद्यांचे पालन केले आहे आणि त्यासाठी कंपनीकडे विस्तृत पद्धती व प्रक्रिया आहे.

**परिक्षण**

आम्ही कंपनीची लेखा पुस्तके, कागदपत्रे, इतिवृत्त पुस्तके, फॉर्म आणि रिटर्न फाईल्स आणि कंपनीने ठेवलेल्या इतर नोंदी आणि कंपनीने पुरवलेली माहिती, कंपनीचे अधिकारी, प्रतिनिधी आणि अधिकृत प्रतिनिधी यांनी दिलेल्या माहितीच्या आधारावर परीक्षण **31 मार्च 2023** रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाची पडताळणी करण्यात आली.

i. कंपनी कायदा, 2013 (अधिनियम) आणि त्याखाली बनवलेले नियम – **लागू आहे.**

ii. भारतीय प्रतिभूती करार (नियमन) कायदा, 1956 (SCRA) आणि त्या अंतर्गत केलेले नियम – **अहवालावधीन वर्षात लागू नाही.**

iii. डिपॉझिटरी कायदा, 1966 आणि त्या अंतर्गत केलेले नियम व उपनियम **अहवालावधीन वर्षात लागू नाही.**

iv. भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ (सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया) (अंतर्गत व्यापार प्रतिबंध) नियमन, 2015 – **अहवालावधीन वर्षात लागू नाही.**

v. भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ (सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया) कायदा, 1992 (सेबी कायदा) अंतर्गत विहित केलेले खालील नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे – **अहवालावधीन वर्षात लागू नाही.**

अ) भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ (सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया) (कर्जरोखे जारी करणे आणी त्यांची नोंद करणे) नियमन 2008 – **लागू नाही.**

ब) भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ (सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया) (भागांचे लक्षणीय संपादन आणि अधिग्रहण) नियमन, 2011 – **लागू नाही.**

क) भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ (सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया) (भांडवल जारी करणे आणि प्रकटन आवश्यकता) नियमन, 2018 – **लागू नाही.**

ड) भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ (सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया) (कर्मचारी समभाग पर्याय योजना आणि कर्मचारी समभागखरेदी योजना) मार्गदर्शक सूचना, नियमन 2021 – **लागू नाही.**

इ) भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ (सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया) (समभाग जारी करणे आणी समभाग हस्तांतरण करणे यासाठी प्रतिनिधी (एजंट) कंपनी कायदा आणि ग्राहकांशी व्यवहार करण्याबाबत नियमन, 1993 – **लागू नाही.**

फ) भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ (सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया) (समभाग सूचीतून निर्लेखित करणे) नियमन, 2021 – **लागू नाही.**

ग) भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ (सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया) (समभागांची पुनः खरेदी) नियमन, 2018 – **लागू नाही.**

ह) भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ – (जबाबदाऱ्या यांची नोंदणी व प्रकटीकरण यांची आवश्यकता) नियमन 2015 – **लागू नाही.**

आ) भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ (सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया) (अंतर्गत व्यापार प्रतिबंध) नियमन, 2015 – **लागू नाही.**

vi) विदेशी थेट गुंतवणूक, परकीय थेट गुंतवणूक आणि बाह्य व्यावसायिक कर्जाच्या व्याप्ती वाढवण्यासाठी लागू असलेल्या विदेशी विनिमय व्यवस्थापन कायदा, 1999 आणि त्या अंतर्गत बनवलेले नियम आणि नियमन – लागू नाही.

vii) करविषयक कायदे व त्याअंतर्गत केलेले नियम जसे –

अ) आयकर कायदा, 1961

ब) वस्तू व सेवाकर 2017

क) उद्गम कर कपात

viii बोनस प्रदान कायदा 1965

ix) उपदान प्रदान कायदा 1972

x) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि संकीर्ण कायदा 1952

xi) कारखाना कायदा 1948

xii) कंपनीला लागू असलेले विशिष्ट कायदे खालीलप्रमाणे

अ) मेट्रो रेल्वे (कामाचे बांधकाम) कायदा 1978

ब) मेट्रो रेल्वे (कार्यचालन व देखरेख) कायदा 2002

क) मेट्रो रेल्वे (सुधारणा) कायदा 2002

ड) मेट्रो रेल्वे कायदा, 1890

आम्ही कंपनी कायदा, 2013 अंतर्गत इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाने मान्य केलेल्या सचिविक मानकांच्या लागू असलेल्या तरतुदींच्या (पूर्ततेची व ) पालनाची तपासणी केली आहे. (मंडळाची सभा (एसएस-1) आणि साधारण सभा (एसएस-2))

आम्ही पुढे असा अहवाल देतो की, जेवढे आम्ही समजू शकलो त्यानुसार –

कंपनीच्या संचालक मंडळाची रचना योग्य तऱ्हेने झाली आहे व कार्यकारी संचालक, कार्यकारी नसलेले संचालक व महिला संचालक यांचे योग्य संतुलन झाले आहे. अहवाल वर्षामध्ये संचालक मंडळामध्ये जे बदल झाले त्यामध्ये कंपनी कायदा, 2013 च्या प्रावधानांची पूर्तता झाली आहे.

व्यवस्थापनाने आम्हाला असे कळविले आहे की, दि.1 एप्रिल, 2022 ते दि.31 मार्च, 2023 या काळात कंपनीला कोणत्याही विभागीय नियंत्रकांकडून जसे कंपनी निबंधकांचे कार्यालय, पश्चिम विभागाचे संचालक यांचे कार्यालय, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया किंवा अन्य अधिकारी यांच्याकडून कोणतीही नोटीस मिळाली नाही किंवा पत्र आले नाही.

आम्ही पुढे असा अहवाल देतो की, कंपनीचा आकार व व्यवसायानुसार कंपनीला लागू असलेल्या कायद्यांची, नियमांची व मार्गदर्शक तत्वांचे पालन व पूर्तता करण्यासाठी त्याची देखरेख करण्यासाठी कंपनीकडे पुरेशी यंत्रणा व कार्यपद्धती आहे.

आम्ही पुढे असा अहवाल देतो की, अहवालाधीन वर्षात कंपनीच्या व्यवस्थापनामध्ये खालील बदल झाले.

**वित्तीय वर्ष 2022-23 दरम्यान झालेल्या नेमणुका -**

1. श्रीमती अश्विनी सतीश भिडे (डीन - 02861008) यांची 12.07.2022 रोजी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नेमणूक झाली.

2. श्रीमती नमिता मेहरोत्रा (डीन - 07916304) यांची कंपनीचे महिला नामनिर्देशित संचालक म्हणून दि.27.04.2022 पासून नेमणूक झाली.

3. श्री. राकेश चौधरी (डीन - 09495362) यांची कंपनीचे नामनिर्देशित संचालक म्हणून दि.24.05.2022 पासून नेमणूक झाली.

**वित्तीय वर्ष 2022-23 मध्ये खालील संचालक संचालक राहिले नाहीत.**

1. श्री. अजयकुमार अमरनाथ भट (डीन- 07110097) हे दि.05.02.2023 रोजी कंपनीचे संचालक म्हणून निवृत्त झाले.

2. श्री. श्याम सुंदर दुबे (डीन- 06601151) हे दि.04.08.2022 पासून कंपनीचे संचालक राहिले नाहीत.

3. श्री. इकबाल सिंग चहल (डीन- 08727394) यांनी दि.25.09.2022 रोजी कपंनीचे संचालकाचे पद रिकामे केले.

**समभागांचे आबंटन**

1. कंपनीने दि.16 जून, 2022 रोजी प्रत्येकी रु.100/- चे 2,00,00,000 समभागांचे हक्क आबंटन केले.

2. कंपनीने दि.22 ऑगस्ट, 2022 रोजी प्रत्येकी रु.100/- चे 1,98,20,000 समभागांचे हक्क आबंटन केले.

आम्ही असे विधान करतो की, कंपनी कायदा, 2013 च्या व इतर कायद्यांच्या सर्व तरतुदींची पूर्तता करणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे.

आम्ही आमची कामगिरी पार पाडताना कंपनीने तिला लागू असलेल्या कायद्यांची पूर्तता करण्यासाठी कोणत्या यंत्रणा स्थापित केल्या आहेत त्याबाबत केलेले निवेदन, दिलेली माहिती यावर आम्ही अवलंबून आहोत. कंपनीने विविध कायद्यांच्या तरतुदींच्या पूर्ततेसाठी काय केले आहे याची आम्ही निवडक चाचणी पद्धतीने सचिविक लेखापरीक्षण केले आहे. आम्ही पुढे असे सादर करतो की, सदर पूर्तता म्हणजे कंपनी पुढेही फायदेशीररीत्या चालेल याची खात्री नाही तसेच व्यवस्थापनाने कंपनीचा कारभार परिणामकारकरीत्या किंवा कार्यक्षमरीत्या चालवला आहे अशी आम्ही खात्री देत नाही.

आम्ही पुढे असेही सादर करतो की, हे कंपनीच्या वित्तीय विवरणांचे / वित्तीय कामकाजाचे लेखापरीक्षण नाही किंवा यावर आम्ही कोणतेही मत व्यक्त केले नाही.

तसेच आम्ही वर उल्लेख केलेल्या कॉर्पोरेट कायदे व भारत सरकारचे अन्य कायदे या कायद्यांव्यतिरिक्त अन्य कायद्यांशी संबंधित कोणत्याही मुद्यांचा समावेश केला नाही, की जे कंपनीला लागू असतील.

**पेससेटर कॉर्पोरेटर सोल्यूशन्स एलएलपीकरिता**

सही
**(प्रशांत कुमार सरकार)**
नियुक्त भागीदार
सदस्य क्रमांक - 6996
सीओपी नं. - 6534
युडीआयएन - FO06996E000655281

**दिनांक** – 21.07.2023
**ठिकाण** – मुंबई

हा अहवाल आमच्या समदिनांकाच्या पत्रासोबत वाचावयाचा आहे जो **परिशिष्ट-अ** म्हणून जोडलेला आहे आणि या अहवालाचा अविभाज्य भाग आहे.

**टीप** – सदर अहवाल हा व्यवस्थापनाने दिलेल्या माहितीवर सत्य परिस्थितीवर व इनपुट्सवर आधारित आहे.

**फॉर्म क्रमांक एमआर – 3**

## परिशिष्ट – "अ"

**प्रति,**

सदस्य,
**मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित,**
ट्रांझिट ऑफिस ई ब्लॉक, सिटी पार्कची उत्तर बाजू,
आयकर कार्यालयाच्या मागे, ए-विंग वांद्रे (ई),
वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई- 400051

या पत्राबरोबर आमच्या याच दिवसाचा अहवाल वाचा –

दिनांक **31 मार्च, 2023** रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाचे सचिविक लेखापरीक्षण करण्याबाबत - सचिविक अभिलेख ठेवणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे व सदर सचिविक अभिलेखांचे लेखापरीक्षण करुन त्या आधारे मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.

सचिविक अभिलेख योग्य आहेत याची खात्री करण्यासाठी आम्ही लेखापरीक्षण पद्धती व प्रक्रिया यांचा अवलंब केला आहे. आम्ही निवडक चाचणी पद्धतीवर अभिलेखांची तपासणी अशासाठी केली की सत्य परिस्थिती अभिलेखांमध्ये परावर्तीत झाली आहे. आम्ही कंपनीच्या वित्तीय अभिलेखांचा व लेखापुस्तकांचा अचूकपणा तपासला नाही. जेव्हा आवश्यकता होती तेव्हा आम्ही कायद्यांच्या, नियमांच्या व नियमनांच्या पूर्ततेबाबत आणि घटनांबाबत व्यवस्थापनाकडून निवेदन घेतले.

कंपनी कायदा व लागू असलेले अन्य कायदे, नियम, नियमन, मानके यांची पूर्तता करणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. आमचे परीक्षण हे कंपनीला लागू असेपर्यंतच्या कार्यपद्धतीची निवडक चाचणी पद्धतीने कलेले परीक्षण आहे.

हा सचिविक लेखापरीक्षण अहवाल म्हणजे कंपनी पुढेही फायदेशीररीत्या चालेल याची खात्री नाही तसेच व्यवस्थापनाने कंपनीचा कारभार परिणामकारकरीत्या किंवा कार्यक्षमरीतया चालवला आहे अशी आम्ही खात्री देत नाही.

**पेससेटर कॉर्पोरेटर सोल्यूशन्स एलएलपीकरिता**

सही
**(प्रशांत कुमार सरकार)**
नियुक्त भागीदार
सदस्य क्रमांक - 6996
सीओपी नं. - 6534
युडीआयएन - FO06996E000655281

**दिनांक** – 21.07.2023
**ठिकाण** – मुंबई

फॉर्म नं. एओसी-2

## परिशिष्ट – 4 वित्तीय वर्ष 2022-23 साठी संचालकांचा अहवाल:

(कायद्याच्या कलम 134 च्या उपकलम (3) च्या उपविधान (एच) आणि कंपनी (लेखा) नियम 2014 च्या नियम 8(2) नुसार)

**कंपनी कायदा, 2013 च्या कलम 188(1) मध्ये उल्लेख केलेल्या संबंधित पक्षकारांबरोबर कंपनीने केलेल्या करारांचे / व्यवस्थेचे प्रकटन करणारा फॉर्म. यामध्ये सदर कलमाच्या तृतीय प्रावधानांतर्गत असलेले आर्म्स लेंग्थ व्यवहार समाविष्ट आहेत.**

| 1 | आर्म्स लेंग्थ आधारावर नसलेल्या व्यवस्थेचा किंवा व्यवहाराचा तपशील | |
|---|---|---|
| अ. | संबंधित पक्षाचे / पक्षांची नावे आणि संबंधाचे स्वरुप | **लागू नाही** |
| ब. | कंत्राट / व्यवस्था / व्यवहाराचे स्वरुप | |
| क. | कंत्राट / व्यवस्था / व्यवहाराचा कालावधी | |
| ड. | काही मूल्य असल्यास त्यासह कंत्राट किंवा व्यवस्था किंवा व्यवहारांची ठळक वैशिष्ट्ये | |
| ई. | अशा प्रकारचे कंत्राट किंवा व्यवस्था किंवा व्यवहार करण्यामागील समर्थन | |
| फ. | संचालक मंडळाच्या मान्यतेची तारीख | |
| ग. | दिली असल्यास एकूण अग्रिम रक्कम | |
| ह. | कलम 188 च्या प्रथम तरतुदीनुसार आवश्यकतेनुसार सर्वसाधारण सभेत पारित झाल्याची तारीख | |

| 2 | आर्म्स लेंग्थ आधारावर असलेल्या कंत्राटे, व्यवस्था किंवा व्यवहारांचा तपशील | |
|---|---|---|
| अ. | संबंधित पक्षाचे / पक्षांची नावे आणि संबंधाचे स्वरुप | **लागू नाही** |
| ब. | कंत्राट / व्यवस्था / व्यवहाराचे स्वरुप | |
| क. | कंत्राट / व्यवस्था / व्यवहाराचे स्वरुप | |
| ड. | काही मूल्य असल्यास त्यासह कंत्राट किंवा व्यवस्था किंवा व्यवहारांची ठळक वैशिष्ट्ये | |
| ई. | संचालक मंडळाच्या मान्यतेची तारीख | |
| फ. | दिली असल्यास एकूण अग्रिम रक्कम | |

संचालक मंडळाकरिता आणि त्यांच्यावतीने,
**मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित**

**संचालक**

**ठिकाण** – नवी दिल्ली
**दिनांक** – 29.09.2023

## फॉर्म क्रमांक एमआर – 3

### सचिविक लेखापरीक्षण अहवाल
### 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी

[कंपनी अधिनियम 2013 च्या कलम 204 (1) आणि कंपनी (कर्मचाऱ्यांची नियुक्ती आणि मानधन) नियम, 2014 च्या नियम क्रमांक 9 नुसार]

**प्रति,**

सदस्य,
**मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित,**
ट्रांझिट ऑफिस ई ब्लॉक,
सिटी पार्कची उत्तर बाजू,
आयकर कार्यालयाच्या मागे,
ए-विंग वांद्रे (ई), वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स,
मुंबई- 400051

आम्ही **मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित (सिन – U60100MH2008SGC181770)** (यापुढे "कंपनी" म्हटले जाईल) यांना लागू असलेल्या वैधानिक तरतुदींचे आणि चांगल्या व्यावसायिक (कॉर्पोरेट) पद्धतींचे त्यांनी केलेल्या पालनांचे सचिविक लेखापरीक्षण केले आहे.सचिविक लेखापरिक्षण अशा रीतीने केले गेले की, ज्याने आम्हाला व्यावसायिक आचार/वैधानिक अनुपालनांचे मूल्यांकन करण्यासाठी आणि त्यावर आमचे मत व्यक्त करण्यासाठी वाजवी आधार प्रापत झाला.

सचिविक अभिलेख तयार करणे व त्याची परिविक्षा करणे तसेच कंपनीला लागू असलेल्या कायद्यांची व नियमांची अंमलबजावणी होते याची खात्री करण्यासाठी यंत्रणा / व्यवस्था निर्माण करणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. कंपनीने सचिविक प्रावधानांची, मानकांची व कार्यप्रणालीची कितपत पूर्तता करतात यावर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.

कंपनीच्या व्यवस्थापनाकडून आम्हाला प्राप्त झालेले लेखापरीक्षण पुरावे व माहिती आमचे मत बनवायला पुरेसा आधार आहे.

कंपनीची लेखा पुस्तके, कागदपत्रे, इतिवृत्त पुस्तके, फॉर्म आणि रिटर्न फाईल्स आणि कंपनीने ठेवलेल्या इतर नोंदी आणि कंपनीने पुरवलेली माहिती, कंपनीचे अधिकारी, प्रतिनिधी आणि अधिकृत प्रतिनिधी यांनी दिलेल्या माहितीच्या आधारावर सचिविक लेखापरीक्षण दरम्यान पडताळणी करण्यात आली.

त्यानुसार आमच्या मते आम्ही असा अहवाल देतो की कंपनीने **31 मार्च 2023** रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षण कालावधीत  कंपनीने खाली दिलेल्या कायद्यांचे पालन केले आहे आणि त्यासाठी कंपनीकडे विस्तृत पद्धती व प्रक्रिया आहे.

**परीक्षण :**

आम्ही याद्वारे अहवाल देतो की आमच्या मते, कंपनीने, 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षाच्या लेखापरीक्षण कालावधीत येथे सूचीबद्ध केलेल्या वैधानिक तरतुदींचे पालन केले आहे आणि तसेच कंपनीकडे योग्य बोर्ड-प्रक्रिया आणि अनुपालन-

यापुढे केलेल्या अहवालाच्या मर्यादेपर्यंत, पद्धतीने आणि अधीन असलेली यंत्रणा:

आम्ही खालील तरतुदींनुसार ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षासाठी कंपनीने भरलेली पुस्तके, कागदपत्रे, मिनिट बुक्स, फॉर्म आणि रिटर्न आणि इतर नोंदी तपासल्या आहेत:

i. कंपनी कायदा, 2013 (अधिनियम) आणि त्याखाली बनवलेले नियम – **लागू आहे.**

ii. भारतीय प्रतिभूती करार (नियमन) कायदा, 1956 (SCRA) आणि त्या अंतर्गत केलेले नियम – **अहवालावधीन वर्षात लागू नाही.**

iii. डिपॉझिटरी कायदा, 1966 आणि त्या अंतर्गत केलेले नियम व उपनियम **अहवालावधीन वर्षात लागू नाही.**

iv. भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ (सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया) (अंतर्गत व्यापार प्रतिबंध) नियमन, 2015 – **अहवालावधीन वर्षात लागू नाही.**

v. भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ (सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया) कायदा, 1992 (सेबी कायदा) अंतर्गत विहित केलेले खालील नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे – **अहवालावधीन वर्षात लागू नाही.**

अ) भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ (सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया) (कर्जरोखे जारी करणे आणी त्यांची नोंद करणे) नियमन 2008 – **लागू नाही.**

ब) भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ (सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया) (भागांचे लक्षणीय संपादन आणि अधिग्रहण) नियमन, 2011 – **लागू नाही.**

ख) भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ (सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया) (भांडवल जारी करणे आणि प्रकटन आवश्यकता) नियमन, 2018 – **लागू नाही.**

ढ) भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ (सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया) (कर्मचारी समभाग पर्याय योजना आणि कर्मचारी समभागखरेदी योजना) मार्गदर्शक सूचना, नियमन 2021 – **लागू नाही.**

इ) भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ (सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया) (समभाग जारी करणे आणी समभाग हस्तांतरण करणे यासाठी प्रतिनिधी (एजंट) कंपनी कायदा आणि ग्राहकांशी व्यवहार करण्याबाबत नियमन, 1993 – **लागू नाही.**

फ) भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ (सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया) (समभाग सूचीतून निर्लेखित करणे) नियमन, 2021 – **लागू नाही.**

ग) भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ (सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया) (समभागांची पुनः खरेदी) नियमन, 2018 – **लागू नाही.**

ह) भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ – (जबाबदाऱ्या यांची नोंदणी व प्रकटीकरण यांची आवश्यकता) नियमन 2015 – **लागू नाही.**

आ) भारतीय प्रतीभूती आणी विनिमय मंडळ (सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया) (अंतर्गत व्यापार प्रतिबंध) नियमन, 2015 – **लागू नाही.**

Vi) विदेशी थेट गुंतवणूक, परकीय थेट गुंतवणूक आणि बाह्य व्यावसायिक कर्जाच्या व्याप्ती वाढवण्यासाठी लागू असलेल्या विदेशी विनिमय व्यवस्थापन कायदा, 1999 आणि त्या अंतर्गत बनवलेले नियम आणि नियमन – **लागू नाही.**

vii) करविषयक कायदे व त्याअंतर्गत केलेले नियम जसे –

अ) आयकर कायदा, 1961

ब) वस्तू व सेवाकर 2017

क) उद्गम कर कपात

viii) बोनस प्रदान कायदा 1965

x) उपदान प्रदान कायदा 1972

x) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि संकीर्ण कायदा 1952

xi) कारखाना कायदा 1948

xii) कंपनीला लागू असलेले विशिष्ट कायदे खालीलप्रमाणे

अ) मेट्रो रेल्वे (कामाचे बांधकाम) कायदा 1978

ब) मेट्रो रेल्वे (कार्यचालन व देखरेख) कायदा 2002

क) मेट्रो रेल्वे (सुधारणा) कायदा 2002

ड) मेट्रो रेल्वे कायदा, 1890

आम्ही कंपनी कायदा, 2013 अंतर्गत इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाने मान्य केलेल्या सचिविक मानकांच्या लागू असलेल्या तरतुदींच्या (पूर्ततेची व ) पालनाची तपासणी केली आहे. (मंडळाची सभा (एसएस-1) आणि साधारण सभा (एसएस-2))

आम्ही पुढे असा अहवाल देतो की, जेवढे आम्ही समजू शकलो त्यानुसार –

कंपनीच्या संचालक मंडळाची रचना योग्य तऱ्हेने झाली आहे व कार्यकारी संचालक, कार्यकारी नसलेले संचालक व महिला संचालक यांचे योग्य संतुलन झाले आहे. अहवाल वर्षामध्ये संचालक मंडळामध्ये जे बदल झाले त्यामध्ये कंपनी कायदा, 2013 च्या प्रावधानांची पूर्तता झाली आहे.

व्यवस्थापनाने आम्हाला असे कळविले आहे की, दि.1 एप्रिल, 2022 ते दि.31 मार्च, 2023 या काळात कंपनीला कोणत्याही विभागीय नियंत्रकांकडून जसे कंपनी निबंधकांचे कार्यालय, पश्चिम विभागाचे संचालक यांचे कार्यालय, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया किंवा अन्य अधिकारी यांच्याकडून कोणतीही नोटीस मिळाली नाही किंवा पत्र आले नाही.

आम्ही पुढे असा अहवाल देतो की, कंपनीचा आकार व व्यवसायानुसार कंपनीला लागू असलेल्या कायद्यांची, नियमांची व मार्गदर्शक तत्वांचे पालन व पूर्तता करण्यासाठी त्याची देखरेख करण्यासाठी कंपनीकडे पुरेशी यंत्रणा व कार्यपद्धती आहे.

आम्ही पुढे असा अहवाल देतो की, अहवालाधीन वर्षात कंपनीच्या व्यवस्थापनामध्ये खालील बदल झाले.

**वित्तीय वर्ष 2022-23 दरम्यान झालेल्या नेमणुका -**

vi. श्रीमती अश्विनी सतीश भिडे (डीन - 02861008) यांची 12.07.2022 रोजी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नेमणूक झाली.

vii. श्रीमती नमिता मेहरोत्रा (डीन - 07916304) यांची कंपनीचे महिला नामनिर्देशित संचालक म्हणून दि.27.04.2022 पासून नेमणूक झाली.

viii. श्री. राकेश चौधरी (डीन - 09495362) यांची कंपनीचे नामनिर्देशित संचालक म्हणून दि.24.05.2022 पासून नेमणूक झाली.

**वित्तीय वर्ष 2022-23 मध्ये खालील संचालक संचालक राहिले नाहीत.**

4. श्री. अजयकुमार अमरनाथ भट (डीन- 07110097) हे दि.05.02.2023 रोजी कंपनीचे संचालक म्हणून निवृत्त झाले.

5. श्री. श्याम सुंदर दुबे (डीन- 06601151) हे दि.04.08.2022 पासून कंपनीचे संचालक राहिले नाहीत.

6. श्री. इकबाल सिंग चहल (डीन- 08727394) यांनी दि.25.09.2022 रोजी कपंनीचे संचालकाचे पद रिकामे केले.

**समभागांचे आबंटन**

1. कंपनीने दि.16 जून, 2022 रोजी प्रत्येकी रु.100/- चे 2,00,00,000 समभागांचे हक्क आबंटन केले.

2. कंपनीने दि.22 ऑगस्ट, 2022 रोजी प्रत्येकी रु.100/- चे 1,98,20,000 समभागांचे हक्क आबंटन केले.

आम्ही असे विधान करतो की, कंपनी कायदा, 2013 च्या व इतर कायद्यांच्या सर्व तरतुदींची पूर्तता करणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे.

आम्ही आमची कामगिरी पार पाडताना कंपनीने तिला लागू असलेल्या कायद्यांची पूर्तता करण्यासाठी कोणत्या यंत्रणा स्थापित केल्या आहेत त्याबाबत केलेले निवेदन, दिलेली माहिती यावर आम्ही अवलंबून आहोत. कंपनीने विविध कायद्यांच्या तरतुदींच्या पूर्ततेसाठी काय केले आहे याची आम्ही निवडक चाचणी पद्धतीने सचिविक लेखापरीक्षण केले आहे. आम्ही पुढे असे सादर करतो की, सदर पूर्तता म्हणजे कंपनी पुढेही फायदेशीररीत्या चालेल याची खात्री नाही तसेच व्यवस्थापनाने कंपनीचा कारभार परिणामकारकरीत्या किंवा कार्यक्षमरीत्या चालवला आहे अशी आम्ही खात्री देत नाही.

आम्ही पुढे असेही सादर करतो की, हे कंपनीच्या वित्तीय विवरणांचे / वित्तीय कामकाजाचे लेखापरीक्षण नाही किंवा यावर आम्ही कोणतेही मत व्यक्त केले नाही.

तसेच आम्ही वर उल्लेख केलेल्या कॉर्पोरेट कायदे व भारत सरकारचे अन्य कायदे या कायद्यांव्यतिरिक्त अन्य कायद्यांशी संबंधित कोणत्याही मुद्यांचा समावेश केला नाही, की जे कंपनीला लागू असतील.

**पेससेटर कॉर्पोरेटर सोल्यूशन्स एलएलपीकरिता**

सही
**(प्रशांत कुमार सरकार)**
नियुक्त भागीदार
सदस्य क्रमांक - 6996
सीओपी नं. - 6534
युडीआयएन - FO06996E000655281

**दिनांक –** 21.07.2023
**ठिकाण –** मुंबई

हा अहवाल आमच्या समदिनांकाच्या पत्रासोबत वाचावयाचा आहे जो **परिशिष्ट-अ** म्हणून जोडलेला आहे आणि या अहवालाचा अविभाज्य भाग आहे.

**टीप –** सदर अहवाल हा व्यवस्थापनाने दिलेल्या माहितीवर सत्य परिस्थितीवर व इनपुट्सवर आधारित आहे.

**फॉर्म क्रमांक एमआर – 3**

**परिशिष्ट – "अ"**

**प्रति,**

सदस्य,
**मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित,**
ट्रांझिट ऑफिस ई ब्लॉक, सिटी पार्कची उत्तर बाजू,
आयकर कार्यालयाच्या मागे, ए-विंग वांद्रे (ई),
वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई- 400051

या पत्राबरोबर आमच्या याच दिवसाचा अहवाल वाचा –

दिनांक **31 मार्च, 2023** रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाचे सचिविक लेखापरीक्षण करण्याबाबत - सचिविक अभिलेख ठेवणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे व सदर सचिविक अभिलेखांचे लेखापरीक्षण करुन त्या आधारे मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.

सचिविक अभिलेख योग्य आहेत याची खात्री करण्यासाठी आम्ही लेखापरीक्षण पद्धती व प्रक्रिया यांचा अवलंब केला आहे. आम्ही निवडक चाचणी पद्धतीवर अभिलेखांची तपासणी अशासाठी केली की सत्य परिस्थिती अभिलेखांमध्ये परावर्तीत झाली आहे. आम्ही कंपनीच्या वित्तीय अभिलेखांचा व लेखापुस्तकांचा अचूकपणा तपासला नाही. जेव्हा आवश्यकता होती तेव्हा आम्ही कायद्यांच्या, नियमांच्या व नियमनांच्या पूर्ततेबाबत आणि घटनांबाबत व्यवस्थापनाकडून निवेदन घेतले.

कंपनी कायदा व लागू असलेले अन्य कायदे, नियम, नियमन, मानके यांची पूर्तता करणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. आमचे परीक्षण हे कंपनीला लागू असेपर्यंतच्या कार्यपद्धतीची निवडक चाचणी पद्धतीने कलेले परीक्षण आहे.

हा सचिविक लेखापरीक्षण अहवाल म्हणजे कंपनी पुढेही फायदेशीररीत्या चालेल याची खात्री नाही तसेच व्यवस्थापनाने कंपनीचा कारभार परिणामकारकरीत्या किंवा कार्यक्षमरीतया चालवला आहे अशी आम्ही खात्री देत नाही.

**पेससेटर कॉर्पोरेटर सोल्यूशन्स एलएलपीकरिता**

सही
**(प्रशांत कुमार सरकार)**
नियुक्त भागीदार
सदस्य क्रमांक - 6996
सीओपी नं. - 6534
युडीआयएन - FO06996E000655281

**दिनांक –** 21.07.2023
**ठिकाण –** मुंबई

## निगम शासनाचा अहवाल

कंपनीची प्रतिमा उजळणे, कार्यक्षमता व परिणामकारकता वाढवणे यासाठी अंमलात आणण्याच्या काही मानकांचा एक संच आहे. मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित ही एक सूचित नसलेली कंपनी आहे. तथापि, कॉर्पोरेट गव्हर्नन्सची मूलभूत तत्वे म्हणजे तत्वे, नीतीमत्ता आणि उत्तम कार्यपद्धतींचा वापर करण्याची कटिबद्धता आणि सर्वांच्या हितासाठी कंपनीचा कारभार चालवला जात आहे याची खात्री करणे. सदर खात्री करुन घेऊन तुमचे संचालक तुम्हाला पुढील कॉर्पोरेट गव्हर्नन्स अहवाल सादर करीत आहे.

मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाच्या कार्यात महामंडळाची संस्थापन नियमावली (AOA), कंपनी कायदा, 2013 ची प्रावधाने, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (C&AG) यांनी विहित केलेले नियम व नियमने यांचे मार्गदर्शन होते. त्याचबरोबर कंपनीच्या कार्यावर नियंत्रण ठेवणारे कायदे, जसे सुरक्षा, आरोग्य, महामंडळाचे कर्मचारी व कंत्राटदारांमार्फत काम करणारे कर्मचारी यांच्या कल्याण प्रकल्पाने बाधित झालेल्यांना योग्य मोबदला, त्यांचे पुनर्वसन व पुनर्स्थापना इत्यादींना निमंत्रित करणारे कायदे इत्यादींची योग्यरीत्या पूर्तता केली जाते.

### 1. संचालक मंडळ

कंपनीच्या संस्थापन नियमावलीनुसार संचालक मंडळात किमान 3 संचालक असले पाहिजेत. संचालकांची कमाल संख्या कंपनी कायदा, 2013 च्या कलम 149 नुसार आणि कंपनी शासकीय कंपनी असल्याने तिला जी सूट उपलब्ध असेल, त्यानुसार असेल. हे संचालक नामनिर्देशित संचालक असतील किंवा कार्यकारी सदस्य असतील.

### 2. संचालक मंडळाचे गठन व रचना

कंपनी कायदा, 2013 च्या कलम 2(45) च्या तरतुदीप्रमाणे मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित ही शासकीय कंपनी आहे. सध्या कंपनीचे भरणा केलेले 100% भागभांडवल हे भारत सरकार व महाराष्ट्र शासनाने 50:50 या गुणोत्तरात धारण केले आहे. दोन्ही सरकारांना कंपनीच्या संचालक मंडळावर संचालक नामनिर्देशित करण्याचा अधिकार असेल. मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादितच्या संचालक मंडळाचे 14 सदस्य आहेत. उपरोक्त नामनिर्देशित संचालकांना भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागातील, कार्याच्या क्षेत्रातील खूप अनुभव आहे जसे सर्वसाधारण व्यवस्थापन, बांधकाम, प्रकल्प व्यवस्थापन, डिझाईन, व्यावसायिक रणनीती, वित्त इत्यादी.

### 3. जबाबदाऱ्या –

शासनाने कंपनीला घालून दिलेले आदेश (mandate) पूर्णपणे पाळले गेले आहेत व त्याच वेळी भागधारकांचे मूल्य सुरक्षित असेल व वाढेल याची दक्षता घेणे. कंपनीस स्पष्ट ध्येये आहेत व ती प्राप्त करण्यासाठी कंपनीकडे योग्य व स्पष्ट धोरणे आहेत. संचालक मंडळ कंपनीच्या रणनीतीचे दिग्दर्शन करते, कंपनीच्या कामकाजाचे पुनरावलोकन करते, महत्वाच्या रणीनीतीच्या निर्णयावर देखरेख ठेवते, कायद्यांचे, नियमांचे योग्यरीत्या पालन होत आहे याची खात्री करुन घेते, समभागधारकांच्या स्वारस्याची जपणूक करते, सामाजिक बांधिलकीचे पालन करते. कंपनीचे व्यवस्थापन अशा रीतीने केले जाते की, त्यामुळे भागधारकांच्या महत्वाकांक्षा व सामाजिक अपेक्षा यांची पूर्तता होईल याची खात्री संचालक मंडळ करते, तसेच कंपनीचे संचालक म्हणून आपल्या जबाबदारीच्या आड आपल्या अन्य जबाबदाऱ्या येऊ नयेत याची संचालक खात्री करुन घेतात.

### 4. संचालक मंडळाच्या बैठका / समितीच्या बैठका आणि कार्यपद्धती –

#### (अ) संस्थात्मक निर्णय प्रक्रिया / मंडळाची प्रक्रिया

कॉर्पोरेट गव्हर्नन्सचे संस्थाकरण (institutalization) करण्यासाठी ज्या बाबींसाठी चर्चा करणे आवश्यक आहे त्यासाठी व ज्या बाबींसाठी संचालक मंडळाचा निर्णय आवश्यक आहे अशा बाबत सर्व गोष्टींसाठी यंत्रणा व पद्धतींचा वापर करणे कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठका / समितीच्या बैठका आयोजित करणे व त्यांचे संचालन करणे यासाठी कंपनीकडे योग्य व सुस्पष्ट पद्धती आहेत.

**(ब) संचालक मंडळाच्या बैठका / समितीच्या बैठका आयोजित करणे व त्यांचे विषय ठरवणे**

(1) अध्यक्षांची पूर्वअनुमती घेऊन सदर बैठकांचे आयोजन केले जाते. बैठकांसाठी योग्य ती आगाऊ सूचना दिली जाते. काही तातडीची बाब असल्यास कमी अवधीची सूचना देऊनही बैठका आयोजित केल्या जातात. संचालक मंडळ चक्रीय पद्धतीनेसुद्धा ठराव पारित करु शकते मात्र ज्या गोष्टी अत्यंत तातडीच्या आहेत व ज्या कंपनी कायदा, 2013 च्या प्रावधानांनुसार अशा पद्धतीने पारित करता येतात त्याच गोष्टी अशा तऱ्हेने पारित केल्या जातात.

(2) विषयाची कागदपत्रे (टिपण्या) विभाग प्रमुख बनवतात व संबंधित कार्यकारी संचालकांना मान्यतेसाठी सादर करतात व त्यांच्या मान्यतेनंतर ते व्यवस्थापकीय संचालकांना सादर करतात. अशा मान्यताप्राप्त विषय टिपण्या, व्यवस्थापकीय अहवाल व अन्य खुलासा करणारी कागदपत्रे व पार्श्वभूमी समजावणारी माहिती व्यवस्थापकीय संचालकांच्या आदेशानुसार कंपनी सचिव संचालकांना / सदस्यांना बैठकीच्या आधी योग्य दिवस पाठवून देतात की ज्याद्वारे विषयांबाबत व्यवस्थापनाला / संचालकांना माहिती मिळेल व बैठकीत त्या त्या विषयावर केंद्रीत होईल व निर्णय घेतले जातील.

(3) ज्यावेळी कागदपत्रे आधी जोडणे शक्य नसेल किंवा विषय संवेदनशील असेल तेव्हा सदर विषय व्यवस्थापकीय संचालकांच्या मान्यतेने आयत्या वेळी सादर केला जातो. अपवादात्मक व विशेष परिस्थितीमध्ये जास्तीचा किंवा पुरवणीविषय संचालक मंडळाच्या मान्यतेने चर्चेला घेतला जातो.

(4) ज्या-ज्या वेळी महत्वाच्या घटना होतात / काही महत्वाचे विषय असतात, मान्यता प्राप्त होते त्या-त्या वेळी सदर बाबींची माहिती संचालक मंडळाला दिली जाते. व्यवस्थापकीय संचालक हे संचालक मंडळाच्या बैठकीच्या वेळी कंपनीच्या कामगिरीबाबत माहिती पुरवतील.

(5) संचालक मंडळाच्या सदस्यांना कंपनीची सर्व माहिती उपलब्ध असेल.

(6) संचालक मंडळाची बैठक लागू असलेल्या सचिविक मानकांनुसार चालवली जाते.

**(क) व्यवस्थापकीय संचालक / संचालक यांनी माहिती देणे –**

संचालक मंडळाच्या प्रत्येक बैठकीच्या वेळी व्यवस्थापकीय संचालक / संचालक मंडळाच्या सदस्यांना प्रकल्पाची स्थिती, महत्वाच्या घडामोडी व कंपनीशी संबंधित सर्व क्षेत्रामधील अन्य उपलब्धी / विकल्प यांच्याशी संबंधित माहिती देतात, तसेच सादरीकरण करतात. वरिष्ठ व्यवस्थापकीय कर्मचारी, सल्लागार व तज्ञ व्यक्तींनाही अशा बैठकीला बोलावण्यात येते.

**(ड) संचालक मंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त**

संचालक मंडळाच्या प्रत्येक बैठकीचे इतिवृत्त नोंदले जाते व इतिवृत्त नोंदणीवहीत (मिनिट बुक) प्रविष्ट केले जाते. कंपनी कायदा, 2013 च्या तरतुदीनुसार तसेच सचिविक मानकांनुसार कंपनीच्या बैठकीचे इतिवृत्त अभिसारित केले जाते. व्यवस्थापकीय संचालकांनी बैठकीचे इतिवृत्त मंजूर केले की, ते पुढील बैठकीच्या वेळी संचालक मंडळाला सादर केले जाते व त्याची नोंदणी केली जाते. संचालक मंडळाच्या उपसमितीच्या बैठकांचे इतिवृत्त देखील संचालक मंडळाला माहितीसाठी सादर केले जाते.

**(इ) पूर्तता -**

विविध विभाग प्रमुख व कार्यकारी संचालक हे संचालक मंडळाच्या विषयाच्या टिपण्या तयार करताना लागू असलेले कायदे, नियम, मार्गदर्शक तत्वे यांच्या पूर्ततांची खात्री करुन घेतात. कंपनी कायदा, 2013 व अन्य वैधानिक कायद्यांची पूर्तता कंपनीने केलेली आहे याची खात्री कंपनी सचिव करुन घेतात.

संचालक मंडळाच्या बैठका – वित्तीय वर्ष 2022-23 मध्ये संचालक मंडळाच्या 5 बैठका घेतल्या गेल्या. 1) दि. 25 मे, 2022, 2) दि.9 ऑगस्ट, 2022, 3) दि. 29 सप्टेंबर, 2022, 4) दि. 14 नोव्हेंबर, 2022 आणि 5) दि.3 मार्च, 2023. संचालक मंडळाच्या दोन बैठकांत 120 दिवसांपेक्षा कमी अंतर असणे आवश्यक आहे.

संचालकांचे पदनाम, वर्गीकरण, किती बैठकांना उपस्थिती होते याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ. क्र. | संचालकांचे नाव | वर्गीकरण | डीन | संचालकांच्या संबंधित कार्यकाळात आयोजित मंडळाची बैठक | उपस्थित असलेल्या संचालक मंडळाच्या बैठकीची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती. अश्विनी भिडे | व्यवस्थापकीय संचालक | 02607016 | 4 | 4 |
| 2 | श्री. श्याम सुदर दुबे | नामनिर्देशित संचालक | 06601151 | 1 | 1 |
| 3 | श्री. जयदीप | नामनिर्देशित संचालक | 08558063 | 5 | 5 |
| 4 | श्री. इक्बाल सिंग चहल | नामनिर्देशित संचालक | 08727394 | 5 | 0 |
| 5 | श्री. भूषण अशोक गगराणी | नामनिर्देशित संचालक | 00204045 | 5 | 1 |
| 6 | श्री. मनोज सौनिक | नामनिर्देशित संचालक | 02954463 | 5 | 2 |
| 7 | श्री. सुबोध कुमार गुप्ता | पूर्ण वेळ संचालक | 07114292 | 5 | 5 |
| 8 | श्री. अजयकुमार अमरनाथ भट्ट | पूर्ण वेळ संचालक | 07110097 | 4 | 3 |
| 9 | श्री. अबोध खांडेलवाल | पूर्ण वेळ संचालक | 07807394 | 5 | 5 |
| 10 | श्री. एस.व्ही.आर. श्रीनिवास | नामनिर्देशित संचालक | 02860903 | 5 | 2 |
| 11 | श्री. मनोज जोशी | नामनिर्देशित संचालक | 02103601 | 5 | 5 |
| 12 | श्री राकेश चौधरी | नामनिर्देशित संचालक | 09495362 | 4 | 3 |
| 13 | श्रीमती. नमिता मेहरोत्रा | नामनिर्देशित संचालक | 07916304 | 4 | 4 |

**6. संचालक मंडळापुढे सादर केलेली माहिती खालीलप्रमाणे -**

संचालक मंडळाने कंपनीचा दैनंदिन कारभार योग्यरीतीने चालवावा यासाठी सर्व नेहमीचे अधिकार व्यवस्थापकीय संचालकांना सुपूर्द (delegate) केले आहेत. तसेच वित्तीय अधिकारही दिले आहेत. निर्णय वेगवान घेता यावेत, कंपनीचे सर्व कामकाज योग्यरीत्या व्हावे. तसेच वरिष्ठ व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांना जबाबदारी सुपूर्द (delegate) करावी यासाठी अधिकारांची सूची (शेड्यूल ऑफ पॉवर) तयार करण्यात आली आहे व तिला मान्यता दिली आहे. तशी ती अभिसारित केली आहे. अशा सुपूर्द (delegate) अधिकारांपलीकडील बाबी संचलाक मंडळापुढे सादर केल्या जातात व त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो.

- वार्षिक वित्तीय विवरणे व संचालक मंडळाचा अहवाल
- संचालक मंडळाच्या सर्व समित्यांच्या बैठकांची इतिवृत्ते

- ज्या प्रस्तावात तंत्रज्ञानाचा / तंत्रज्ञानाच्या कार्यक्षेत्र सीमेमधील (parameters) मधील बदलांचा समावेश होतो (विकास प्रकल्प अहवालात नमूद केलेले वगळून) असे सर्व प्रस्ताव
- ज्या प्रस्तावांमध्ये मार्गिकांमध्ये (कॉरिडॉर्स) बदल होतो, अधिक स्थानके निर्माण केली जातात असे प्रस्ताव
- प्रकल्पांचे प्रगती अहवाल
- महत्वाच्या मालमत्ता विकास बाबी
- कंपनी कायदा, 2013 च्या तरतुदींनुसार आवश्यक असलेली माहिती
- अन्य महत्वाची माहिती
- संचालक मंडळ वेळोवेळी ठरवेल त्या बाबी

**7. संचालक मंडळाची समिती**

1) कंपनीने पाच उपसमित्या गठित केल्या आहेत.

(1) लेखापरीक्षण समिती
(2) समभाग आबंटन समिती
(3) नामनिर्देशन व मोबदला समिती
(4) कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी समिती

या सर्व समित्या कंपनीच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी बैठका घेतात. त्यांचा तपशील असा.

**(1) लेखापरीक्षण समिती**

कंपनी कायदा, 2013 च्या कलम 177 नुसार आणि त्याखाली लागू असलेल्या नियमांनुसार आणि त्यातून शासकीय कंपन्यांना मिळालेल्या सवलतीनुसार ज्या कंपन्यांना स्वतंत्र संचालक नेमणे आवश्यक असते अशा कंपन्यांना लेखापरीक्षण समिती नेमणे आवश्यक असेल.

तुमच्या कंपनीने लेखापरीक्षण समिती नेमली आहे. तिची रचना, गणपूर्ती, कार्य व्याप्ती खाली दिली आहे.

**रचना**

वित्तीय वर्ष 2022-2023 मधील लेखापरीक्षण समितीची रचना व त्या सदस्यांची उपस्थिती खालीलप्रमाणे आहे–

| अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| 1 | श्री. श्याम सुंदर दुबे * | नामनिर्देशित संचालक / अध्यक्ष |
| 2 | श्री. अजयकुमार अ. भट्ट | संचालक प्रणाली / सदस्य |
| 3 | श्री. भूषण गगराणी | नामनिर्देशित संचालक |
| 4 | श्री.अबोध खांडेलवाल | संचालक वित्त आणि मुख्य वित्त अधिकारी / स्थायी आमंत्रित |
| 5 | सौ. अश्विनी भिडे | व्यवस्थापकीय संचालक |

* श्री. श्याम सुंदर दुबे दि.4 जुलै, 2022 पासून नामनिर्देशित संचालक राहिले नाहीत.
# लेखापरीक्षण समिती दि.3 मार्च, 2023 रोजी संपन्न झालेल्या 69 व्या बैठकीत पुनर्गठित केली गेली.

**लेखापरीक्षणाची कार्यव्याप्ती**

लेखापरीक्षण समिती वैधानिक लेखापरीक्षकांबरोबर पुढील बाबींबद्दल वेळोवेळी चर्चा करते – अंतर्गत लेखापरीक्षण व्यवस्था / यंत्रणा, अंतर्गत लेखापरीक्षकांच्या अहवालातील निरीक्षणे, अंतर्गत लेखापरीक्षण

अहवालाचा आढावा व वित्तीय विवरणे संचालक मंडळापुढे सादर करण्याआधी कंपनी कायद्याच्या अंतर्गत विहित केलेल्या कोणत्याही बाबींचे अन्वेषण करण्याचा अधिकार लेखापरीक्षण समिती करु शकते. तसेच संचालक मंडळाने लेखापरीक्षण समितीकडे संदर्भित केलेल्या बाबींमध्ये अन्वेषण करता येईल व त्यासाठी समिती कंपनीच्या कोणत्याही अभिलेख्यांमधील माहिती प्राप्त करु शकते, तसेच समितीबाहेरच्या तज्ञ व्यावसायिक व्यक्तीचा सल्ला घेऊ शकते.

**बैठक व उपस्थिती –**

वित्तीय वर्ष 2022-23 मध्ये लेखापरीक्षण समितीची बैठक दि. 22 जुलै रोजी घेण्यात आली. उपस्थितीचा तपशील पुढीलप्रमाणे –

| अ. क्र. | नाव | पद | वर्षभरात झालेल्या मंडळाच्या बैठकांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आयोजित | उपस्थित राहण्यास पात्र | उपस्थित राहिले |
| 1 | श्री. श्याम सुंदर दुबे | नामनिर्देशित संचालक आणि अध्यक्ष | 1 | 1 | 1 |
| 2 | श्री. अजयकुमार अ. भट्ट | संचालक प्रणाली / सदस्य | 1 | 1 | 1 |
| 3 | श्री. भूषण गगराणी | नामनिर्देशित संचालक / सदस्य | 1 | 1 | 1 |
| 4 | श्री.अबोध खांडेलवाल | संचालक वित्त आणि मुख्य वित्त अधिकारी / स्थायी आमंत्रित | 1 | 1 | 1 |
| 5 | सौ. अश्विनी भिडे | व्यवस्थापकीय संचालक | 1 | 1 | 1 |

**(2) समभाग आबंटन समिती**

कंपनी कायदा, 2013 च्या तरतुदीनुसार, संचालक मंडळाने संचालक मंडळाच्या समभाग वाटप समितीची स्थापना केली आहे, समिती ही संचालक मंडळाची अनिवार्य नसलेली समिती आहे.

दोन सदस्य प्रत्यक्ष उपस्थित असणे ही या समितीची गणपूर्ती आहे.

**रचना -**

वित्तीय वर्ष 2022-23 मधील लेखापरीक्षण समितीची रचना व त्या सदस्यांची उपस्थिती खालीलप्रमाणे आहे–

| अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| 1 | श्री. भूषण गगराणी | अध्यक्ष |
| 2 | श्री. श्याम सुंदर दुबे * | सदस्य |
| 3 | व्यवस्थापकीय संचालक ** | सदस्य |

*श्री. श्याम सुंदर दुबे दि.4 जुलै, 2022 पासून नामनिर्देशित संचालक राहिले नाहीत.
**कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक समितीमध्ये सदस्य म्हणून समाविष्ट आहेत.
# समभाग आबंटन समिती दि.3 मार्च, 2023 रोजी संपन्न झालेल्या 69 व्या बैठकीत पुनर्गठित केली गेली.

**बैठक व उपस्थिती –**

वित्तीय वर्ष 2022-23 मध्ये या समभाग आबंटन समितीने दि. 16 जून, 2022 व दि.22 ऑगस्ट, 2022 रोजी बैठका घेतल्या. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे –

| अ. क्र. | नाव | पद | वर्षभरात झालेल्या मंडळाच्या बैठकांची संख्या | |
|---|---|---|---|---|
| | | | उपस्थित राहण्यास पात्र | उपस्थित राहिले |
| 1 | श्री. भूषण गगराणी | अध्यक्ष | 2 | 2 |
| 2 | श्री. श्याम सुंदर दुबे | सदस्य | 2 | 2 |
| 3 | व्यवस्थापकीय संचालक* | सदस्य | 2 | 2 |

* कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक समितीमध्ये सदस्य म्हणून ओळखले जातील.

**(3) नामनिर्देशन आणि मोबदला समिती**

कंपनी कायदा, 2013 च्या तरतुदीनुसार नामनिर्देशन आणि मोबदला समिती गठित केली आहे. तथापि, या समितीची वित्तीय वर्ष 2022-23 मध्ये एकही बैठक झाली नाही.

**(4) कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी समिती –**

2022-23 या वित्तीय वर्षासह मागील 3 आर्थिक वर्षात महामंडळाचे नुकसान झाले आहे त्यामुळे कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीच्या तरतुदी महामंडळाला लागू होत नाहीत.

**8. संबंधित पक्षकार प्रकटन**

संबंधित पक्षकारांबरोबरील सर्व व्यवहार सर्वसाधारण व्यवसायामध्येच व आर्म्स लेंग्थ बेसीसवर झाले आहेत. कंपनीने संबंधित पक्षकार व्यवहार केले नाहीत. आपले प्रवर्तक, संचालक किंवा व्यवस्थापन, त्यांच्या अधिन कंपन्या किंवा नातेवाईक इत्यादींबरोबर कोणतेही संबंधित पक्षकार व्यवहार केले नाहीत. संबंधित पक्षकार व्यवहार (केले असल्यास) वार्षिक अहवालामधील वित्तीय विवरणांचा टिपण्यांमध्ये प्रकट केले आहेत.

**9. वार्षिक सर्वसाधारण सभा –**

कंपनी कायदा, 2013 च्या प्रावधानांनुसार कंपनी 2022-23 या वित्तीय वर्षात वार्षिक सर्वसाधारण सभा घेतली आहे, तिचा तपशील असा –

| वार्षिक सर्वसाधारण सभा | 14 वी वार्षिक सर्वसाधारण सभा | 14 वी तहकुबित वार्षिक सर्वसाधारण सभा |
|---|---|---|
| दिनांक आणि वेळ | 29 सप्टेंबर, 2022 दुपारी 3:05 मिनिटांनी | 14 नोव्हेंबर, 2022 दुपारी 2.45 मिनिटांनी |
| पद्धती | **दृक परिषदाद्वारे** | **दृक परिषदाद्वारे** |
| ठराव | 1. 31 मार्च, 2022 रोजी संपलेल्या वित्तीय वर्षासाठी सदर दिनांकास संपलेल्या आर्थिक वर्षातील कंपनीचे लेखापरीक्षण केलेले ताळेबंद, नफा आणि तोटा विवरणपत्रांसह, आर्थिक विवरणपत्रे, त्याच्या टिप्पण्या, सूची व त्यावरील वैधानिक लेखापरीक्षक यांचा अहवाल आणि भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (C&AG) यांनी केलेल्या टिपण्या, आणि संचालक मंडळाचा अहवाल प्राप्त करणे, विचारात घेणे आणि स्वीकारणे.<br>2. 2022-23 या वित्तीय वर्षासाठी कंपनी कायदा, 2013 कलम 139 (5) सहपठित कलम 142 च्या प्रावधानानुसार भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या कार्यालयाने नियुक्त केलेले वैधानिक लेखापरीक्षक यांचे मानधन निश्चित करण्यासाठी संचालक मंडळाला प्राधिकृत करणे.<br>3. कंपनीचे नामनिर्देशित संचालक म्हणून श्री. मनोज जोशी (डीआयएन - 02103601) यांची नेमणूक<br>4. कंपनीच्या नामनिर्देशित संचालिका म्हणून श्रीमती नमिता मेहरोत्रा (डीआयएन - 07916304) यांची नेमणूक<br>5. कंपनीचे नामनिर्देशित संचालक म्हणून श्री राकेश चौधरी (डीआयएन - 09495362) यांची नियुक्ती<br>6. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून श्रीमती अश्विनी भिडे, IAS (डीआयएन - 02861008) | 1. वित्तीय वर्ष 2021-22 साठी कंपनीचे लेखापरीक्षण केलेले ताळेबंद, नफा आणि तोटा विवरणपत्रांसह, आर्थिक विवरणपत्रे, त्याच्या टिप्पण्या, सूची व त्यावरील वैधानिक लेखापरीक्षक यांचा अहवाल आणि भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (C&AG) यांनी केलेल्या टिप्पण्या, आणि संचालक मंडळाचा अहवाल प्राप्त करणे, विचारात घेणे आणि स्वीकारणे. |

**10. कंपनीचे संकेतस्थळ**

कंपनीचे संकेतस्थळ https://mmrcl.com असे आहे. कंपनीची सर्व माहिती जसे कंपनीचे प्रकल्प, निविदा, कंत्राटदार, भरती प्रक्रिया, निकाल इत्यादी संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाचे कार्य, कृती व प्रगती आणि अन्य महत्वाच्या घडामोडीसुद्धा संकेतस्थळावर उपलब्ध आहे व त्यांची माहिती सतत अद्यतन केली जाते.

**नोंदणीकृत कार्यालय**
मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित,
सिन - U60100MH2008SGC181770
ट्रांझिट ऑफिस ई ब्लॉक, सिटी पार्कची उत्तर बाजू,
आयकर कार्यालयाच्या मागे,
ए-विंग वांद्रे (ई), वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स,
मुंबई शहर – एमएच 400051

**कंपनी सचिव**
**कु. ऋतू देब,**
मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित,
सिन - U60100MH2008SGC181770
ट्रांझिट ऑफिस ई ब्लॉक, सिटी पार्कची उत्तर बाजू,
आयकर कार्यालयाच्या मागे,
ए-विंग वांद्रे (ई), वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स,
मुंबई शहर – एमएच 400051

**कंपनी कायदा 2013 मधील कलम 143(6)(ब) नुसार भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांची मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांच्या दि.31 मार्च, 2023 रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरणावरील टिप्पणी**

कंपनी कायदा 2013 मध्ये वित्तीय अहवालाबाबत निर्देशित केलेल्या चौकटीनुसार दि.31 मार्च, 2023 रोजी संपणाऱ्या वर्षाचे मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित, मुंबईची वित्तीय पत्रके तयार करण्याची जबाबदारी कंपनी व्यवस्थापनाची आहे. कंपनी कायद्यातील कलम 139(5) नुसार भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी नियुक्त केलेल्या वैधानिक लेखापरीक्षक भारतीय सनदी लेखापालांच्या व्यावसायिक संस्थेने निर्देशित केलेल्या लेखापरीक्षण प्रमाणकानुसार तसेच कंपनी कायदा 2013 च्या कलम 143 नुसार स्वतंत्र लेखापरीक्षा आधारे कलम 143(10) नुसार किंवा कायद्याप्रमाणे या एकीकृत वित्तीय पत्रकावर त्यांचे वित्तीय मत देण्यास जबाबदार आहेत. हे त्यांच्या दि.28 जुलै २०२३ रोजीच्या लेखापरीक्षण अहवालामध्ये दर्शविण्यात आले आहे.

मी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्यावतीने कंपनी कायद्याच्या कलम 143(6) (अ) नुसार, मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्या दि.31 मार्च, 2023 च्या वित्तीय विवरणांचे पुरवणी लेखापरीक्षण केले आहे. हे पुरवणी लेखापरीक्षण स्वतंत्रपणे केले गेले असून वैधानिक लेखापरीक्षकांच्या कामकाजाच्या कागदपत्रांचा आधार न घेता केले आहे व ते प्रामुख्याने वैधानिक लेखापरीक्षक, कंपनीचे कर्मचारी आणि वित्तीय दस्तऐवजांचे परीक्षण यांच्या चौकशीपुरते मर्यादित आहे.

माझ्या पुरवणी लेखापरीक्षणाच्या आधारे कंपनी कायदा कलम 143(6)(ब) अंतर्गत निदर्शनाला आलेल्या काही महत्वपूर्ण बाबी ज्या माझ्या मते वित्तीय विवरणे व संबंधित लेखा अहवाल समजण्यासाठी आवश्यक आहेत, त्या मी निदर्शनाला आणतो.

**वित्तीय स्थितीवर टिप्पणी – अ**
**चालू मालमत्ता**
**वित्तीय मालमत्ता**

(iv) अन्य वित्तीय मालमत्ता (टिप्पणी क्र.6) रु.10,139.18 लाख

मेट्रो रेल्वे स्थानकांच्या बांधकामासाठी होणाऱ्या खर्चाच्या योगदानाची (कॉस्ट शेअरींग) रक्कम मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (एमआयएल) मर्यादित यांनी मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाला उशिरा योगदानामुळे देय असलेल्या रकमेवरील व्याजाची रक्कम उपरोक्त रकमेत समाविष्ट झालेली नाही.

मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाने छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई येथे भूमीगत मेट्रो रेल्वे स्थानके बांधण्याचे मान्य केले व त्यानुसार मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (एमआयएल) मर्यादितबरोबर एक सामंजस्य करारावर सप्टेंबर, 2015 मध्ये स्वाक्षऱ्या झाल्या. सदर कराराच्या कलम 2.12 नुसार जर मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (एमआयएल) मर्यादित यांनी करारानुसार योगदान दिले नाही तर योगदान देण्यात जितकी दिरंगाई झाली असेल तितक्या काळासाठी सदर रकमेवर मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (एमआयएल) मर्यादित हे 10% व्याज देईल. मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ यांनी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (एमआयएल) मर्यादित यांच्याबरोबर सदर योगदान देण्यात दिरंगाई झाल्यामुळे देय झालेल्या व्याजाबाबत बैठक घेतली. परंतु त्या व्याजाच्या रकमेसाठी देयक सादर केले नाही.

लेखापरीक्षणासाठी उपलब्ध केलेल्या अभिलेखांनुसार असे दिसून येते की, मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ यांनी फक्त दिनांक 21 नोव्हेंबर, 2021 पर्यंत व्याजाचा हिशेब रु.1,717 लाख इतका केला आहे. तथापि, दिनांक २२ नोव्हेंबर, २०२१ ते 31 मार्च, 2023 पर्यंतच्या व्याजाचा हिशेब त्यांनी लेखापरीक्षणासाठी सादर केला नाही. त्यानुसार उपरोक्त रकमेमध्ये मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (एमआयएल) मर्यादित यांच्याकडून मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ यांना प्राप्य व्याजाच्या रकमेपैकी किमान रु. 1,717 लाख इत्यादी रक्कम समाविष्ट नाही.

अशा व्याजाची लेखा न केल्यामुळे "अन्य वित्तीय मालमत्ता" किमान रु. 1,717 लाख इतक्या रकमेने कमी दाखवली आहे व "प्रगतीपथावरील भांडवली कार्य" ही त्याच रकमेने जास्त दाखवली आहे.

**प्रकटीकरणावर टिप्पणी – ब**
**टिप्पणी 23 – घटनासापेक्ष देयता व बद्धता**
**टिप्पणी 23.1 – घटनासापेक्ष देयता**

कंपनीच्या ताब्यात असलेल्या आठ भूखंडाच्या मालमत्ता कराराबाबत महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून कंपनीला रु.35.87 कोटी भरण्याची नोटीस प्राप्त झाली आहे. कंपनीने ऑगस्ट, 2016 पासून महानगर पालिकेच्या अधिकाऱ्यांना वारंवार अशी विनंती केली की हा प्रकल्प सार्वजनिक वाहतुकीसाठीचा पायाभूत प्रकल्प आहे, तो फायदेशीर व्यवसाय / साहस नाही. त्यामुळे कंपनीला मालमत्ता करातून सूट द्यावी. तथापि, महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी ही विनंती मान्य केलेली नाही.

महानगरपालिका अधिकाऱ्यांकडून आजपर्यंत महानगरपालिका कर भरण्यापासून कोणतीही सूट मिळालेली नाही हे लक्षात घेता, कंपनीने वित्तीय विवरणामध्ये यासाठी रु.35.87 कोटीची तरतूद करणे आवश्यक होते.

देय व्याजाचा हिशेब न ठेवल्यामुळे चालू देयता व प्रगतीपथावरील भांडवली कार्य हे रु.35.87 कोटीने कमी दाखवली आहे.

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्यावतीने,**

सही
**(गुलजारी लाल)**
**लेखापरीक्षण महासंचालक (शिपींग), मुंबई**

**स्थळ :** मुंबई
**दिनांक :** 06.10.2023

| भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांची निरीक्षणे | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|
| **अ) आर्थिक स्थितीवर टिप्पण्या**<br><br>**चालू मालमत्ता**<br>**वित्तीय मालमत्ता**<br>**(4) इतर वित्तीय मालमत्ता** (टीप क्र.6)- रु.10,139.18 लाख<br><br>मेट्रो स्थानकांच्या बांधकामासाठी खर्चाच्या सामायिकरण योगदानाच्या विलंबामुळे मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादितला मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ महामंडळाच्या (एमआयएएल) द्वारे देय असलेल्या रु. 1,717 लाखांच्या व्याजाचा उपरोक्तमध्ये समावेश नाही.<br><br>मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादितने छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ मुंबई येथे तीन भूमीगत मेट्रो स्टेशन बांधण्यास सहमती दर्शवली आणि मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ महामंडळासोबत सामंजस्य करार (सप्टेंबर 2015) करण्यात आला. सामंजस्य कराराच्या (एमओयूच्या) खंड 2.12 मध्ये असे नमूद केले आहे की जर मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ महामंडळ सामंजस्य करारांतर्गत मान्य केलेल्या अटींनुसार योगदान देण्यास अयशस्वी ठरले, तर मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ महामंडळ विलंबित कालावधीत 10% प्रतिवर्ष दराने व्याज देईल. अंशदानात विलंब झाल्यामुळे व्याज भरण्याबाबत मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाने मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मर्यादितसोबत (फेब्रुवारी-2023) एक बैठक आयोजित केली होती, त्याने मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ महामंडळाला त्याचे देयक दिलेले नाही.<br><br>मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाने दि.21 नोव्हेंबर 2021 पर्यंत प्राप्य करण्यायोग्य व्याज म्हणून रु. 1,717 लाखाच्या नोंदी लेखापरीक्षणाकरिता उपलब्ध करुन देण्यात आले असले तरी दि.22 नोव्हेंबर, 2021 ते दि. 31 मार्च 2023 या कालावधीसाठी अशा व्याजाची कोणतीही गणना लेखापरीक्षणाकरिता प्रदान केलेली नाही.<br><br>अशाप्रकारे, मेट्रो स्थानकांच्या बांधकामासाठी खर्च सामायिकरण योगदान देण्यास विलंब झाल्यामुळे मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मर्यादित (एमआयएएल) यांच्याकडून प्राप्य करण्यायोग्य किमान रु. 1,717 लाखांच्या व्याजाचा समावेश नाही. | कोविड महामारीच्या परिस्थितीनंतर आणि त्या कालावधीत विमान प्रवास पूर्ण बंद केल्यानंतर, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ महामंडळाने देयक पुनर्निर्धारित करण्याची विनंती केली आहे आणि त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाला देयक देण्यास असमर्थता दर्शविली आहे.<br><br>व्याज वसुलीच्या विषयावर त्यांच्याशी चर्चा केली परंतु मूळ रक्कम थकीत असल्याने समंजसपणा (prudence) व स्थितीवादीत्व (conservatism) संकल्पनेचा विचार करून व्याज वसुलीला लेखापुस्तकात मान्यता देण्यात आली नाही.<br><br>मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाच्या दि.22 नोव्हेंबर 2021 रोजीच्या पत्राद्वारे, सुधारित देयकाचे वेळापत्रक मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ महामंडळाला कळविण्यात आले. सुधारित देयकाच्या वेळापत्रकाच्या आधारे दि.21 नोव्हेंबर 2021 ते दि.31 मार्च 2023 या कालावधीसाठी कोणतेही व्याज प्राप्त होणार नाही.<br><br>तथापि, भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांनी सूचित केल्याप्रमाणे, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ महामंडळा कडून प्राप्त होणारे व्याज 2023-24 या आर्थिक वर्षाच्या आर्थिक विवरणात उघड केले जाईल / नोंद (लेखा) केली जाईल. |

| | |
|---|---|
| देय व्याजाचा हिशेब न दिल्याने "अन्य वित्तीय मालमत्ता" कमी करण्यात आली आहे आणि "प्रगतीपथावरील भांडवली कार्य" यामध्ये किमान रु.1,717 लाखांनी वाढ करण्यात आली आहे. | |
| **प्रकटीकरणावर टिप्पण्या**<br><br>**टीप 23 - आकस्मिक दायित्वे आणि वचनबद्धता**<br><br>**टीप 23.1 - आकस्मिक दायित्वे**<br><br>कंपनीला तिच्या ताब्यातील आठ जमिनीचे मालमत्ता कर रु.35.87 कोटीच्या वसुलीसाठी महानगरपालिका अधिकाऱ्यांकडून मागणीपत्र प्राप्त झाले. हा एक सार्वजनिक वाहतूक पायाभूत सुविधा प्रकल्प आहे आणि फायदेशीर उपक्रम नाही, असे नमूद करून महामंडळाने ऑगस्ट, 2016 पासून पालिका प्राधिकरणांकडून मालमत्ता कर भरण्यापासून सूट देण्याची वारंवार मागणी केली असली तरी महानगरपालिका प्राधिकरणाने मालमत्ता कर भरण्यापासून सूट देण्याची कंपनीची विनंती मान्य केली नाही.<br><br>महानगरपालिका अधिकाऱ्यांकडून आजपर्यंत महानगरपालिका कर भरण्यापासून कोणतीही सूट मिळालेली नाही, हे लक्षात घेऊन कंपनीने वित्तीय विवरणामध्ये रु.35.87 कोटीची तरतूद करणे आवश्यक होते.<br><br>यामुळे चालू देयता आणि प्रगतीपथावरील भांडवली कार्य रु.35.87 ने कमी केले आहे. | मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून जमिनी मिळाल्या आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाला भाडेतत्त्वावर दिलेल्या या जमिनी दाखवल्या आहेत आणि म्हणूनच, बृहन्मुंबई महानगर पालिकेने मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाकडे मालमत्ता कराची मागणी केली आहे.<br><br>कंपनी बृहन्मुंबई महानगर पालिकेकडे प्रकरणाच्या माफीसाठी पाठपुरावा करत आहे. मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाने मालमत्ता कराची मागणी माफ करण्यासाठी बृहन्मुंबई महानगर पालिकेला विनंती केल्यामुळे, वित्तीय वर्ष 2018-19 पासून सातत्याने तेच आकस्मिक दायित्व म्हणून उघड केले आहे.<br><br>चालू वित्तीय वर्षात, या प्रकरणाच्या निकालासाठी बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या उच्च अधिकाऱ्यांकडे या प्रकरणाचा पाठपुरावा केला जाईल. बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यास, मालमत्ता कराची तरतूद लेखा पुस्तकामध्ये केली जाईल. |

## स्वतंत्र लेखापरीक्षकांचा अहवाल

**प्रति,**

**सदस्य,**
**मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित**

**वित्तीय विवरणपत्रावरील अहवाल**

**मत**

1. आम्ही सोबत जोडलेले मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित (कंपनी) यांच्या वित्तीय विवरणपत्राचे लेखापरीक्षण केले आहे, ज्यामध्ये दि.31 मार्च, 2023 रोजीचा ताळेबंद, दि. 31 मार्च, 2023 रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिताचे नफा तोट्याचे (इतर सर्वसमावेशक उत्पन्नासह) विवरणपत्र आणि दि. 31 मार्च, 2023 रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिताचे रोख प्रवाह विवरणपत्र तसेच महत्वाच्या लेखा धोरणांचा सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती (यापुढे वित्तीय विवरणपत्र असे संदर्भित करण्यात येईल) या सर्वांचा समावेश आहे.

   आमच्या मते आमच्या सर्वोत्तम माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार उपरोक्त एकल वित्तीय विवरणपत्र कंपनी कायदा 2013 अन्वये आवश्यक ती माहिती योग्य रीतीने देत आहे आणि सर्वसाधारणपणे भारतात स्वीकृत असलेल्या वित्तीय तत्वांना अनुसरुन दि. 31 मार्च, 2023 रोजी संपलेल्या वर्षाकरिता कंपनीच्या स्थितीची, तसेच त्या दिवशी संपलेल्या वर्षाकरिता कंपनीचा नफा आणि त्या दिवशी संपलेल्या वर्षाच्या रोख प्रवाहाबाबत योग्य आणि संयुक्तिक स्थिती दाखवत आहे.

**मताचा आधार :**

2. आम्ही आमचे लेखापरीक्षण कंपनी कायदा कलम 143 (10) मध्ये दर्शविलेल्या लेखा प्रमाणकानुसार केले आहे. या मानकानुसार आमच्या जबाबदाऱ्या आमच्या लेखापरीक्षण अहवालाच्या लेखापरीक्षकांच्या जबाबदाऱ्या या सदरांतर्गत दिल्या आहेत. भारतीय सनदी लेखापाल संस्थेने घालून दिलेल्या नीतीमत्तेच्या नियमांनुसार व कंपनी कायदा 2013 व त्या अंतर्गत घालून दिलेल्या नियमांतर्गत आमच्या वित्तीय विवरणांशी संबंधित अशा नैतिक मानकांनुसार आम्ही कंपनीपासून स्वतंत्र आहोत नैतिकतेच्या संहितेनुसार आम्ही आमच्या जबाबदाऱ्या पूर्ण केल्या आहेत. आम्हाला वित्तीय विवरणांवर मत व्यक्त करण्यासाठी आवश्यक असलेला लेखापरीक्षण पुरावा प्राप्त झाला आहे असा आम्हाला विश्वास वाटतो.

**खालील बाबींवर भर देण्यात येत आहे.**

3. आम्ही आपले लक्ष टीप क्र.30 व 35 कडे वेधून घेऊ इच्छितो. यामध्ये परकीय चलनाच्या दरातील बदलांची लेखा करण्याबाबतच्या धोरणामध्ये बदल केला आहे. सदर बदल हा भारतीय लेखामानक 21 ची पूर्तता करण्यासाठी केला आहे. त्याबाबत आमचे मत बदललेले नाही.

**वित्तीय विवरणांखेरीज इतर माहिती व लेखापरीक्षकांचा त्यावर अहवाल**

4. इतर माहिती तयार करणे ही कंपनीच्या संचालक मंडळाची जबाबदारी आहे. त्यामध्ये व्यवस्थापनाची चर्चा व विश्लेषण याबाबतची माहिती, संचालक मंडळाचा अहवाल व परिशिष्टे यांचा समावेश असतो. परंतु वित्तीय विवरणे व आमचा लेखापरीक्षकाचा अहवाल याचा समावेश नसतो. इतर माहिती आम्हाला या अहवालाच्या दिवसानंतर दिली जाईल अशी अपेक्षा आहे.

   वित्तीय विवरणावरील आमच्या मतामध्ये इतर माहितीचा समावेश नाही व आम्ही याबाबतच्या निष्कर्षाची खात्री देत नाही.

वित्तीय विवरणाच्या आमच्या लेखापरीक्षणाबाबत इतर माहिती वाचणे व ती वित्तीय विवरणाशी मोठ्या प्रमाणात सुसंगत आहे काय की सदर माहिती ही वित्तीय विवरणाशी मोठ्या प्रमाणात विसंगत आहे काय किंवा आम्हाला लेखापरीक्षणातून मिळालेली माहिती किंवा अन्यथा मिळालेली माहिती मोठ्या प्रमाणात चुकीची दिली आहे हे पाहणे ही आमची जबाबदारी आहे.

जेव्हा आम्ही इतर माहिती वाचतो, तेव्हा जर आम्ही निष्कर्ष काढला  की त्यामध्ये एखादे मोठे चुकीचे विधान आहे, तर आम्हाला ही बाब ज्यांच्यावर प्रशासनाची जबाबदारी आहे त्यांच्याशी संवाद साधणे आवश्यक आहे. आणि इतर माहिति प्राप्त झालेल्यांशी संवाद साधण्यासाठी व्यवस्थापनाने उचललेल्या पावलांचे पुनरावलोकन करणे आवश्यक आहे, जर आधी जारी केले असेल तर त्यानंतर केलेली सुधारणा कळवणे आवश्यक आहे.

आम्ही केलेल्या लेखापरीक्षणाच्या आधारे  जर आम्ही असा निष्कर्ष काढला की, इतर माहितीत चुकीचे महत्वाचे विधान आहे तर, आम्हाला त्या वस्तुस्थितीचा अहवाल देणे आवश्यक आहे.  त्याबाबत आमच्याकडे अहवाल देण्यासारखे काहीही नाही.

**वित्तीय विवरणाबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी**

5. सदर वित्तीय विवरणाबाबत कंपनी कायदा 2013 च्या कलम 134(5) मधील प्रावधानानुसार ही विवरणे कंपनीची आर्थिक स्थिती, आर्थिक कामगिरी (अन्य सर्वसमावेशक माहितीसह), समभागात बदल व रोकड प्रवाह याबाबत कंपनी कायदा, 2013 च्या कलम 133 सहपठित नियम 7 कंपनी (लेखा) नियमामध्ये दिल्याप्रमाणे तसेच भारतात स्वीकृत झालेली लेखामानके (इंड एस) याप्रमाणे सत्य व उचित स्थिती प्रस्तुत करीत आहेत, याची खात्री करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे.

   या जबाबदारीमध्ये कंपनी कायद्याच्या तरतुदीनुसार कंपनीची मालमत्ता सुरक्षित ठेवणे व घोटाळे किंवा चुका होऊ नये यासाठी लेखा घेणे व अंदाज करणे, पुरेशी अंतर्गत वित्तीय नियंत्रण व्यवस्था तयार करणे, अंमलात आणणे व त्यांची देखरेख करणे की ज्यायोगे लेखा अभिलेख पुरेसे व अचूक असतील याची खात्री करणे, तसेच सदर वित्तीय विवरणे घोटाळा किंवा चुका यामुळे घडणाऱ्या महत्वपूर्ण चुकांपासून मुक्त असतील व सत्य व उचित स्थितीचे दर्शन घडवतील हे पाहणे या गोष्टीसुद्धा समाविष्ट आहेत.

   वित्तीय विवरण तयार करताना कंपनी चालू कंपनी तत्वानुसार आहे काय हे पाहणे ही व्यवस्थापन व संचालक मंडळ यांची जबाबदारी आहे.  जर कंपनी गुंडाळायची नसेल किंवा काम थांबणार नसेल तर त्यासाठीच्या बाबी प्रकट करणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे.

   कंपनीच्या वित्तीय अहवाल पद्धतीकडे लक्ष देणे ही संचालक मंडळाची जबाबदारी आहे.

**एकल वित्तीय विवरणाच्या लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षकांची जबाबदारी**

6. एकल वित्तीय विवरणे ही घोटाळे किंवा चुका यामुळे होणाऱ्या चुकीच्या विधानांपासून मुक्त आहेत काय याबाबत उचित विश्वास प्राप्त करणे व आमचे मत असलेला अहवाल सादर करणे ही आमची उद्दिष्टे आहेत.  उचित विश्वास हा उच्च दर्जाचा असला तरी लेखापरीक्षणाच्या मानकानुसार केलेले लेखापरीक्षण हे नेहमीच महत्वाचे चुकीचे विधान दर्शवेल असे नाही.  घोटाळे किंवा चुका यापासून चुकीची विधाने उद्भवतात व जर त्याचा या एकल वित्तीय विवरणांच्या आधारे आर्थिक निर्णय घेणाऱ्याच्या निर्णयावर परिणाम होत असेल तर ती (एकत्रित किंवा वैयक्तिक) चुकीची विधाने असतात.

7. लेखापरीक्षणाच्या मानकाच्या अनुषंगाने लेखापरीक्षणाचा भाग म्हणून आम्ही व्यावसायिक निर्णय घेतो आणि संपूर्ण लेखापरीक्षणामध्ये आम्ही व्यावसायिक संशयवादी देखील राहतो.   आम्ही पुढील गोष्टीसुद्धा करतो -

- घोटाळयामुळे किंवा चुकीमुळे एकल वित्तीय विवरणामध्ये चुकीची विधाने येण्याचा धोका किती आहे तो ओळखून काढतो त्याचे मूल्यमापन करतो. या धोक्यांना प्रतिसाद देणाऱ्या लेखापरीक्षण पद्धती तयार करतो व वापरतो हे आमच्या मतासाठी आवश्यक व पुरेसा असेल असा लेखापरीक्षण पुरावा गोळा करतो. चुकीमुळे होणाऱ्या चुकीच्या विधानाच्या धोक्यापेक्षा घोटाळयामुळे होणाऱ्या चुकीच्या विधानाचा धोका अधिक असतो. कारण घोटाळयामध्ये संगनमत, अफरातफर, अंतर्गत माहिती वगळणे, चुकीचे प्रतिनिधीत्व किंवा अंतर्गत नियंत्रणाच्या बाहेर जाणे याचा समावेश असतो.

- परिस्थितीशी सुसंगत लेखापरीक्षणासाठी आवश्यक अशा लेखापरीक्षण पद्धती तयार करण्याची अंतर्गत नियंत्रण पद्धती समजून घेणे, कंपनीमध्ये पुरेशी अंतर्गत नियंत्रण पद्धती आहेत काय व त्याची परिणामकारकता याबद्दल आमचे मत व्यक्त करणे ही कंपनी कायदा 2013 च्या कलम 143(3)(i) खाली आमची जबाबदारी आहे.

- कंपनीने वापरलेली लेखा धोरणे उचित आहेत काय व लेखा अनुमाने तसेच व्यवस्थापनाची इतर प्रकटने योग्य आहेत काय याचे मूल्यमापन करणे.

- लेखा पद्धतीसाठी व्यवस्थापन चालू कंपनी तत्व अवलंबत असेल तर ते योग्य आहे काय ते ठरवणे व ती चालू कंपनी राहण्यावर काही महत्वाची शंका निर्माण होण्यासारखी परिस्थिती आहे का याबाबतचा लेखापरीक्षण पुरावा प्राप्त करणे. जर अशी महत्वाची शंका असल्याचे दिसून आले तर एकल वित्तीय विवरणामधील सदर प्रकटनाकडे लक्ष वेधणे हे आमचे काम आहे व सदर प्रकटने अपुरी असतील तर आमचे मत बदलेल. आमच्या लेखापरीक्षण अहवालाच्या दिवसापर्यंत आम्हाला जो लेखापरीक्षण पुरावा प्राप्त होतो त्यावर आमचा निष्कर्ष अवलंबून असतो. तथापि, भविष्यातील घटना किंवा परिस्थितीमुळे कंपनी चालू कंपनी असणे थांबू शकते.

- वित्तीय विवरणांचे सादरीकरण, रचना व त्यातील बाबी यांचे मूल्यमापन करणे. त्यामध्ये प्रकटनाचा समावेश होतो व वित्तीय विवरणांमधील व्यवहार व घटना यांचे योग्य सादरीकरणे झाले आहे का ते पाहणे.

महत्वाची चूक ही वित्तीय विवरणातील चुकीच्या विधानाचा परिमाण आहे ती वैयक्तिकरित्या किंवा एकत्रितपणे, वित्तीय अहवालाचे वाजवी जाणकार वापरकर्त्यांच्या वित्तीय निर्णयावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण करते. पुढील बाबींमध्ये आम्ही परिमाणवाचक महत्वाच्या आणि गुणात्मक घटकांचा विचार करतो (i) आमच्या लेखापरीक्षण कार्याच्या व्याप्तीचे नियोजन करणे आणि आमच्या कामाच्या परिणामाचे मूल्यमापन करणे आणि (ii) वित्तीय विवरणांमध्ये ओळखल्या गेलेल्या चुकीच्या विधानांच्या परिणामाचे मूल्यांकन करणे.

आम्ही आमच्या लेखापरीक्षणादरम्यान ओळखल्या जाणाऱ्या अंतर्गत नियंत्रणामधील लेखापरीक्षणाचा आवाका, लेखापरीक्षणाची वेळ व महत्वाची लेखापरीक्षण निरीक्षणे व अंतर्गत वित्तीय नियंत्रणामधील महत्वाच्या कमतरता या बाबी आम्ही व्यवस्थापनासाठी जबाबदार असणाऱ्यांना कळवतो.

व्यवस्थापनासाठी जबाबदार लोकांना आम्ही असे विवरण देतो की, आम्ही स्वातंत्र्याबाबतच्या नैतिक आवश्यकतांची पूर्तता केली आहे व आमच्या स्वातंत्र्याशी संबंधित असलेल्या सर्व बाबी आम्ही त्यांना कळवतो. व्यवस्थापनासाठी जबाबदार लोकांना कळवलेल्या बाबीतून आम्ही चालू वर्षाच्या महत्वाच्या लेखापरीक्षण बाबी कोणत्या ते ठरवतो. जर अशा बाबींच्या प्रकटनावर कायदेशीर बंदी नसेल तर अशा बाबी आम्ही लेखापरीक्षण अहवालात कळवतो किंवा अगदी टोकाच्या बाबतीत आम्ही असे ठरवतो की, सदर माहिती प्रकट करण्याच्या फायद्यापेक्षा नुकसानच जास्त असेल तर सदर माहिती प्रकट करायची नाही.

**इतर कायदेशीर आणि नियामक आवश्यकतावरील अहवाल**

8. कायद्याच्या कलम 143 मधील उप कलम (11) नुसार केंद्र शासनाने दिलेल्या कंपनीच्या (लेखापरीक्षकाचा अहवाल) आदेशाच्या आवश्यकतेनुसार, 2016 ("आदेश"), कंपनीची लेखापुस्तके आणि अभिलेख यांच्या परीक्षणाच्या आधारे आणि आम्हाला देण्यात आलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार, आदेशातील 3 आणि 4 परिच्छेदामध्ये निर्दिष्टीत केलेल्या बाबतीत आम्ही "परिशिष्ट 1" देत आहोत.

9. कायद्यातील कलम 143(3) च्या आवश्यकतेनुसार, आम्ही अर्हतापात्र मताचा आधार हा परिच्छेदातील बाबींचा संभाव्य परिणामाव्यतिरिक्त अहवाल देतो की :

अ) आमच्या सर्वोत्तम ज्ञानाच्या आणि विश्वासाच्या आधारे लेखापरीक्षण करण्याच्या उद्देशाने आवश्यक असलेल्या सर्व माहिती आणि स्पष्टीकरणांची आम्ही मागणी केली आणि आम्ही ती प्राप्त केली;

ब) आमच्या मते, आमच्या लेखा पुस्तकांच्या परीक्षणातून असे दिसते की, कंपनीने कायद्यानुसार आवश्यक ती लेखापुस्तके योग्य रीतीने राखली आहेत;

क) या अहवालात हाताळण्यात आलेले ताळेबंद विवरणपत्र, नफा आणि तोट्याचे विवरणपत्र आणि रोख प्रवाह विवरणपत्र संबंधित लेखा पुस्तकांशी सुसंगत आहेत;

ड) आमच्या मते, उपरोक्त एकल वित्तीय विवरणपत्रे कायद्याच्या कलम 133 तसेच कंपनी (लेखा) नियम, 2014 च्या संबंधित नियमानुसार निर्देष्टीत लेखा मानकांना अनुसरुन आहे;

इ) दि.31 मार्च, 2023 पर्यंत संचालकांकडून प्राप्त झालेली निवेदने अभिलेखांवर घेतली आहेत. त्याच्या आधारे कंपनी कायदा 164(2) नुसार दि.31 मार्च, 2023 रोजी कोणतेही संचालक संचालक म्हणून नेमण्यास अपात्र नव्हते.

फ) कंपनीच्या वित्तीय विवरणांवर अंतर्गत वित्तीय नियंत्रण पुरेसे असणे व सदर नियंत्रणे परिणामकारकरीत्या काम करीत असल्याबद्दल परिशिष्ट II मधील आमचा अहवाल पहावा.

ग) ही कंपनी शासकीय कंपनी असल्याने, भारत सरकारने दि. 5 जून, 2015 रोजी जारी केलेल्या अधिसूचना क्रमांक जीएसआर 463 (इ), कंपनी कायदा, 2013 च्या कलम 197 अंतर्गतच्या तरतुदीं नुसार अनुसूचि V अनुपालन करणे या कंपनीस लागू नाही.

ह) कंपनी (लेखापरीक्षण आणि लेखापरीक्षक) नियम, 2014 च्या नियम क्रमांक 11 अनुसार लेखापरीक्षकाच्या अहवालात समाविष्ट करावयाच्या इतर बाबींबाबत, आमच्या मते आणि आमच्या सर्वोत्तम माहितीच्या आधारे तसेच आम्हाला देण्यात आलेल्या स्पष्टीकरणानुसार :

i) कंपनीने तिच्या वित्तीय स्थितीवर प्रलंबित खटल्यांचा प्रभाव तिच्या वित्तीय अहवालामध्ये उघड केला आहे - वित्तीय अहवालाची टीप क्र.23.1 पहा.

ii) या कंपनीचे अनुकर्षित करारासह इतर कोणतेही दीर्घकालीन करार नाहीत ज्यान्वये कोणत्याही स्वरुपाचा पूर्वानुमेय महत्वपूर्ण तोटा वित्तीय वर्ष संपत आलेल्या 31 मार्च, 2023 दिसून येत नाही.

iii) कंपनीने गुंतवणूक शिक्षण आणि संरक्षण निधी यामध्ये निधी हस्तांतरीत करणे आवश्यक नाही.

iv) (अ) व्यवस्थापनाने असे निवेदन केले आहे की, कंपनीच्या सर्वोत्तम ज्ञानानुसार व विश्वासानुसार कंपनीने उधार घेतलेल्या निधीतून किंवा समभाग अधिमूल्यानुसार किंवा अन्य कोणत्याही निधी स्त्रोतातून कंपनीने कोणत्याही व्यक्तीला किंवा एंटीटीला (ज्यात परदेशी एंटीटीचा समावेश आहे) कर्ज दिले नाही / अग्रिम दिला नाही / गुंतवणूक केली नाही की सदर मध्यस्थ परस्पर संमतीने (लेखी किंवा अन्य मार्गाने) की, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कंपनीतर्फे अन्य व्यक्तींना किंवा एंटीटींना कोणत्याही अन्य मार्गाने ओळखलेल्यांना ("अंतिम लाभार्थी") कर्ज देणार नाही किंवा गुंतवणूक करणार नाही ओळखल्या गेलेल्या इतर व्यक्ती किंवा संस्थांना कर्ज दिले नाही किंवा गुंतवणूक केली नाही, किंवा अंतिम लाभार्थींना कोणतीही हमी, सुरक्षा देणार नाही किंवा त्यांच्या वतीने कोणतीही हमी, सुरक्षा देणार नाही.

(ब) व्यवस्थापनाने असे निवेदन केले आहे की, कंपनीच्या सर्वोत्तम ज्ञानानुसार व विश्वासानुसार कंपनीला अशा कोणत्याही व्यक्तीकडून / एंटीटीकडून (ज्यात परदेशी एंटीटीचा समावेश आहे) निधी प्राप्त झाला नाही अशा परस्पर संमतीने की, कंपनी परस्पर संमतीने (लेखी किंवा अन्य मार्गाने) प्रत्यक्ष किंवा

अप्रत्यक्षरीत्या किंवा निधी देणाऱ्या पक्षकाराच्या वतीने अंतिम लाभार्थींना कर्ज देणार नाही किंवा गुंतवणूक करणार नाही, किंवा अंतिम लाभार्थींना कोणतीही हमी, सुरक्षा देणार नाही किंवा त्यांच्या वतीने कोणतीही हमी, सुरक्षा देणार नाही.

क) वाजवी आणि परिस्थितीमध्ये योग्य मानल्या गेलेल्या लेखापरीक्षण पद्धतीमध्ये उपकलम (अ) आणि (ब) अंतर्गत सादरीकरणांमध्ये कोणतेही महत्वाचे चुकीचे विधान आहे असा आम्हाला विश्वास वाटण्यास कारणीभूत असे काहीही आमच्या निदर्शनास आले नाही.

5. कंपनीने यावर्षी कोणताही लाभांश घोषित केला नाही किंवा प्रदान केला नाही.

6. कंपनी (लेखा) नियम 2014 च्या नियम 3 (1) कंपनीला दि. 01.04.2023 पासून लागू असल्यामुळे कंपनीला (लेखापरीक्षण व लेखापरीक्षक) नियम 2014 च्या नियम 11 (ग) अंतर्गत अहवाल करणे लागू नाही.

10) भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या कार्यालयाने कंपनी कायदा, 143 (5) अंतर्गत जारी केलेल्या आदेशानुसार आम्ही पुढील अहवाल सादर करतो.

1) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व खुलाशानुसार आणि आम्ही केलेल्या लेखापुस्तकांच्या पडताळणीवरुन आम्हाला असे आढळले की, कंपनी आपली मुख्य लेखा यंत्रणा म्हणून टॅली इआरपी (प्राईम एडिट लॉग) वापरते व एकच एकत्रिकृत माहिती तंत्रज्ञान साधन (ॲप्लीकेशन) कंपनीकडे नाही. व्यवहार शोधून काढणे, त्यांची नोंदणी करणे व मान्यता प्राप्त करण्यासाठी कंपनी विविध माहिती तंत्रज्ञान साधने वापरते. ही साधने व टॅली इआरपी यामध्ये मानवी संपर्क होतो.

विविध माहिती तंत्रज्ञान साधने (ॲप्लीकेशन) वापरुन लेखा व्यवहाराच्या प्रक्रिया करताना मानवी हस्तक्षेप केल्यामुळे एका ॲप्लीकेशनमधून दुसऱ्या ॲप्लीकेशनमध्ये माहितीचे अंतरण करताना चुका होऊ शकतात व त्यामुळे वित्तीय विवरणांमध्ये चुकीची विधाने होऊ शकतात. तथापि, हा धोका सौम्य करण्यासाठी पुरेशी मानवी प्रतिबंधात्मक नियंत्रणे उपलब्ध आहेत.

2) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व आम्ही कंपनीच्या अभिलेखांच्या केलेल्या लेखापरीक्षणानुसार चालू वर्षात कोणत्याही कर्जाची परतफेड करायची नाही व त्यामुळे कर्जाची पुनर्रचना करणे / ते माफ करणे याचा प्रश्न उद्भवत नाही. कोणत्याही कर्जदाराने कर्ज / व्याज निर्लेखित केले नाही.

3) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व आम्ही कंपनीच्या अभिलेखांच्या केलेल्या लेखापरीक्षणानुसार कंपनीकडे सध्या मुंबई मेट्रो लाईन – 3 (कुलाबा मेट्रो लाईन – 3) (कुलाबा – वांद्रे – सीप्झ) ही रेल्वे लाईन बांधण्याचा एकमेव प्रकल्प आहे. सर्व गुंतवणूकदार संस्था / कर्जदार संस्थांकडून प्राप्त झालेला निधी या प्रकल्पासाठीच वापरला गेला आहे व आम्हाला निधी अन्यत्र वळवल्याचे कोणतेही उदाहरण आढळले नाही.

**चंन्दाभॉय आणि जस्सूभॉयकरिता**
**सनदी लेखापाल**
**संस्था नोंदणी क्रमांक 101647W**
**सही**
**अंबेश अ. दवे**
**भागीदार**
**सदस्यत्व क्रमांक 049289**
**युडीआयएन - 23049289BGXCQH5870**

**स्थळ :** मुंबई
**दिनांक :** 28 जुलै, 2023

## स्वतंत्र लेखापरीक्षकांचा अहवाल – "परिशिष्ट '1'"

**मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाच्या** सदस्यांना महामंडळाच्या दि.31 मार्च, 2023 रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाच्या वित्तीय विवरणांवर सादर केलेल्या वित्तीय विवरणाच्या समदिनांकाच्या स्वतंत्र लेखापरीक्षकांच्या अहवालाच्या परिच्छेद 8 "अन्य कायदेशीर व नियामक आवश्यकतांवरील अहवाल" या संदर्भात

1) (अ)(अ) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व खुलाशांनुसार कंपनीने आपल्या मालमत्तेची, संयंत्रांची, साधने व उपकरणांची संख्यात्मक तपशील व ठिकाणे दर्शवणारा पूर्ण तपशील देणारे अभिलेख ठेवले आहेत.

(ब) कंपनीने आपल्या अदृश्य मालमत्तेचे संपूर्ण तपशील दर्शविणारे अभिलेख ठेवले आहेत.

ब) आम्हाला व्यवस्थापनाने दिलेल्या माहितीनुसार कंपनीच्या सर्व मालमत्तेची, संयंत्रांची, साधने व उपकरणांची प्रत्यक्ष पडताळणी तीन वर्षात टप्प्याटप्प्याने करण्याचा कार्यक्रम कंपनीकडे आहे आमच्या मते प्रत्यक्ष पडताळणीसाठी जी पद्धत अवलंबली आहे, ती कंपनीच्या आकार व कंपनीच्या व्यवसायाचा प्रकार ध्यानात घेतल्यावर ही पद्धत योग्य व पुरेशी आहेत. आम्हाला अशी माहिती दिली गेली की सदर कार्यक्रमानुसार व त्यानुसार चालू वर्षी कंपनीने काही मालमत्ता, संयंत्रे आणि साधने यांची प्रत्यक्ष पडताळणी केली आणि अशा पडताळणीत महत्वाच्या कोणत्याही त्रुटी आढळल्या नाहीत.

क) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व खुलाशांनुसार आणि आम्ही तपासलेल्या अभिलेखानुसार व आम्हाला दिलेल्या अभिहस्तांतरण पत्रांच्या (कन्व्हेअन्स डीड) परीक्षणानुसार आम्ही असा अहवाल देतो की, जमीन व इमारतींची जी अचल मालमत्ता कंपनीच्या पूर्ण मालकीची आहे त्यांची अभिहस्तांतरण पत्रे जी वित्तीय विवरणात दर्शविली आहेत ती परिशिष्ट 1 ला सोडून कंपनीच्या नावाने आहेत व ताळेबंदाच्या दिवशी कंपनीच्या नावाने धारण केली आहेत. .

ड) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व खुलाशांनुसार आणि आम्ही तपासलेल्या अभिलेखानुसार चालू वर्षात कंपनीने आपल्या मालमत्तेचे, संयंत्रांचे, साधने व उपकरणांचे अमूर्त मालमत्ता धरून पुनर्मूल्यांकन केले नाही.

इ) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व स्पष्टीकरणानुसार बेनामी मालमत्ता व्यवहार कायदा, 1988 (45 of 1988)आणि त्या अंतर्गत घालून दिलेल्या नियमांनुसार बेनामी मालमत्ता ठेवण्यासाठी कंपनीवर कोणतीही कारवाई केली नाही किंवा अशी कारवाई प्रलंबित नाही.

2 (अ) कंपनीकडे कोणताही मालसाठा नाही व त्यामुळे आदेशाच्या परिच्छेद 3 (ii) (अ) च्या तरतुदी लागू होत नाहीत.

(ब) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व खुलाशानुसार आम्ही तपासलेल्या अभिलेखानुसार चालू वित्तीय वर्षात कंपनीला एकूण रु.5.00 कोटीपेक्षा जास्त खेळत्या भांडवलाची मर्यादा बँकेकडून चालू मालमत्तेच्या तारणावर मंजूर झाल्या नाहीत.

3 अ) कंपनीने खालील अपवाद वगळून वर्षभरात सुरक्षित किंवा असुरक्षित कर्ज किंवा अग्रिम दिला नाही, कंपन्या, मर्यादित दायित्व भागीदारी संस्था किंवा इतर कोणत्याही पक्षांसाठी गुंतवणूक केलेली नाही, कोणतीही हमी किंवा सुरक्षा प्रदान केली नाही किंवा कर्जाच्या स्वरुपात कोणतेही कर्ज किंवा अग्रिम मंजूर केले नाही.

| | |
|---|---|
| वर्षामध्ये अन्य पक्षकारांना कर्ज / कर्जाच्या स्वरुपाचा अग्रिम म्हणून दिलेली रक्कम | रु.78.29 लाख |
| ताळेबंदाच्या दिवशी थकित रक्कम | रु.22.49 लाख |

ब) वरील परिच्छेद क्र. 3 (अ) मध्ये सांगितल्याप्रमाणे कर्ज आणि कर्जाच्या स्वरूपातील अग्रिम देण्याच्या अटी व शर्ती कंपनीच्या हितासाठी प्रतिकूल नाहीत.

क) वरील परिच्छेद क्र. 3 (अ) मध्ये सांगितल्याप्रमाणे कर्ज आणि कर्जाच्या स्वरूपातील अग्रिमांच्या संदर्भात, मुद्दलाची परतफेड आणि व्याज भरण्याचे वेळापत्रक निर्धारित केले आहे आणि परतफेड किंवा प्राप्ती नियमित आहेत.

ड) परिच्छेद क्र. 3 (क) मध्ये सांगितल्याप्रमाणे, कंपनी मुद्दल आणि व्याजाची रक्कम नियमितपणे वसूल करत आहे आणि कोणतीही रक्कम नव्वद दिवसांपेक्षा जास्त काळ थकीत नाही.

इ) चालू वर्षात कंपनीने दिलेल्या कर्जाची किंवा कर्जाच्या स्वरुपाच्या अग्रिमांची परतफेड थकित झाली नाही. तसेच कोणत्याही कर्जाचे नूतनीकरण केले नाही किंवा त्याच पक्षकाराला जुन्या कर्जाची परतफेड करण्यासाठी नवे कर्ज दिले नाही.

फ) कंपनीने मागणीनुसार परतफेड करण्यायोग्य किंवा कोणत्याही अटी किंवा परतफेडीचा कालावधी निर्दिष्ट न करता कोणतेही कर्ज किंवा कर्जाच्या स्वरुपातील अग्रिम मंजूर केलेले नाही.

4 आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार, आम्ही तपासलेल्या अभिलेखानुसार चालू वित्तीय वर्षात कंपनीने असे कोणतेही कर्ज दिले नाही किंवा कोणतीही हमी दिली नाही किंवा कोणतीही सुरक्षा दिली नाही किंवा कोणतीही गुंतवणूक केली नाही की ज्यासाठी कंपनी कायदा, 2013 च्या कलम 185 आणि 186 च्या तरतूदी लागू होतील. त्यानुसार, कंपनीला आदेशाचा परिच्छेद 3 (4) लागू होत नाही.

5 आम्हाला प्राप्त झालेली माहिती आणि देण्यात आलेल्या स्पष्टीकरणाच्या आधारे आमच्या मते, कंपनीने जनतेकडून कोणत्याही ठेवी स्वीकारल्या नाहीत आणि त्यामुळे याबाबतीत रिझर्व्ह बँकेने घालून दिलेले आदेश व कंपनी कायदा, 2013 च्या कलम 73 ते 76 व कंपनी (ठेवी स्वीकारणे) हे नियम लागू नाही.

6 आम्हाला प्राप्त झालेली माहिती आणि देण्यात आलेल्या स्पष्टीकरणाच्या आधारे केंद्र शासनाने परिव्यय अभिलेख ठेवण्याच्या नियमांच्या कलम 148 (1) च्या तरतुदींनुसार निर्देष्टीत लेखे आणि अभिलेख तयार करण्याचे आदेश कंपनीला दिले नाहीत.

7 वैधानिक देय रकमांबाबत :

अ) आम्हाला देण्यात आलेली माहिती आणि स्पष्टीकरणाच्या तसेच आम्ही केलेल्या लेखा आणि अभिलेख पुस्तकांच्या परीक्षणानुसार आम्हाला असे दिसून आले आहे की, कंपनीने भविष्यनिर्वाह निधी, कर्मचाऱ्यांचा राज्य विमा, आयकर, विक्रीकर / मूल्यवर्धित कर, सेवा कर, वस्तू आणि सेवा कर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क, सेस अशा निर्विवाद वैधानिक देय आणि स्त्रोतातून कापलेल्या आयकर, कंत्राटी कामकर, भविष्य निर्वाह निधी आणि राज्य कर्मचारी विमा ज्यामध्ये कर्ज कागदपत्रे व मुदत कर्ज समाविष्ट आहेत इत्यादी कंपनीस लागू असलेले यथायोग्य प्राधिकरणांना देय असलेले इतर वैधानिक देय नियमितपणे अदा केलेली आहेत. आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व आम्हाला दिलेल्या खुलाशानुसार दिनांक 31 मार्च, 2023 रोजी सहा महिन्यापेक्षा जास्त अशी विवादित नसलेली महत्वाची वैधानिक देणी नाहीत.

ब) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व खुलाशानुसार आणि कंपनीच्या आम्ही परीक्षण केलेल्या अभिलेख्यानुसार विवाद असल्यामुळे उपरोक्त उपकलम (अ) मध्ये दिल्याप्रमाणे भरणा न केलेल्या अशा आयकर, सेवाकर, वस्तू व सेवा कर, सीमाशुल्क, उत्पादन शुल्क व मूल्यवर्धित कर या पोटी खाली दिलेल्या रकमांचा अपवाद वगळता कोणत्याही रकमा नव्हत्या.

| कायदा | देय रकमांचे स्वरुप | रक्कम (लाखात) | कोणत्या काळाशी संबंधित (कर निर्धारण वर्ष) | विवाद कोठे प्रलंबित आहे तो मंच | शेरा (असल्यास) |
|---|---|---|---|---|---|
| मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 | मालमत्ता कर | 3587.42 | 2015 – 16 ते 2022 - 23 | सहाय्यक निर्धारक आणि जिल्हाधिकारी (संबंधित प्रभाग) | उपरोक्त मागणी रद्द करण्यासाठी किंवा माफ करण्यासाठी पत्र लिहिले. |

8 आम्हाला व्यवस्थापनाने दिलेल्या माहितीनुसार व खुलाशांनुसार व आम्ही तपासलेल्या अभिलेख्यांनुसार कंपनीने चालू वर्षामध्ये आयकर अधिनियम, 1961 (143 of 1961) अंतर्गत कंपनीने असे कोणतेही उत्पन्न समर्पण केले नाही किंवा प्रकट केले नाही की जे लेखापुस्तकात नोंदलेले नाही.

9 अ) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व खुलाशांनुसार आणि आम्हाला पुरवलेल्या अभिलेखांवरुन व कागदपत्रांवरुन आम्हाला असे दिसून आले आहे की, भारत सरकार व महाराष्ट्र सरकार यांच्याकडून घेतेलेले उप कर्ज (सब ऑर्डीनेट डेट) व जपान इंटरनॅशनल कॉर्पोरेशन एजन्सी (जेआयसीए) यांच्याकडून “पास थ्रू असिस्टंस” कर्ज, गृहनिर्माण व नागरी कारभार मंत्रालय आणि वित्तीय संस्था / बँका आणि अन्य धनको यांच्याकडून घेतलेले कर्ज हे देय झाले नाही व त्यामुळे कर्जफेड करण्यात कसूर होत नाही. महाराष्ट्र सरकार व भारत सरकार यांच्याकडून घेतलेली कर्जे बिनव्याजी आहेत. या खेरीज कंपनीने कोणाकडूनही अन्य कर्जे घेतली नाहीत.

ब) आम्हाला व्यवस्थापनाने दिलेल्या माहितीनुसार व खुलाशांनुसार व आम्ही तपासलेल्या अभिलेख्यांनुसार कंपनीला कोणत्याही बँकेने किंवा वित्तीय संस्थांनी किंवा अन्य कोणत्याही कर्ज देणाऱ्यांनी कंपनीला मुद्दामहून कर्जाची परतफेड न करणारे असे घोषित केले नाही.

क) आम्हाला व्यवस्थापनाने दिलेल्या माहितीनुसार व खुलाशांनुसार व आम्ही तपासलेल्या अभिलेख्यांनुसार कंपनीने चालू वर्षामध्ये ज्या कारणासाठी कंपनीने कर्ज घेतले आहे, त्याच कारणासाठी वापरले आहे.

ड) कंपनीच्या वित्तीय विवरणांची पूर्ण तपासणी केल्यावर आम्हाला असे आढळले आहे की, कंपनीने रु.3505.41 लाख टिपण्णी ११.५ नुसार अल्प काळासाठी उभारलेला निधी हा मुंबई मेट्रो लाईन 3 प्रकल्पासाठी वापरले आहे.

इ) आम्हाला व्यवस्थापनाने दिलेल्या माहितीनुसार व खुलाशांनुसार व आम्ही तपासलेल्या अभिलेख्यांनुसार आम्ही असा अहवाल देतो की, कंपनीने आपल्या अधिन कंपनी, सहयोगी कंपनी किंवा संयुक्त प्रकल्प यांच्या देयतांचे प्रदान करण्यासाठी कोणत्याही व्यक्ती, एंटीटीकडून निधी स्वीकारला नाही.

फ) आम्हाला व्यवस्थापनाने दिलेल्या माहितीनुसार व खुलाशांनुसार व आम्ही तपासलेल्या अभिलेख्यांनुसार कंपनीने आपल्या अधिन कंपनी, सहयोगी कंपनी किंवा संयुक्त साहस कंपनी यांचा प्रतिभूती गहाण ठेवून निधी उभारला नाही.

10 अ) कंपनीने प्रारंभिक सार्वजनिक प्रविदा किंवा नंतरची सार्वजनिक प्रविदा ज्यामध्ये कर्ज कागदपत्रे व मुदत कर्ज समाविष्ट आहेत याद्वारे निधी उभारणी केलेली नाही. त्यामुळे आदेशाची तरतूद क्र. 3 (X) (अ) ही कंपनीला लागू पडत नाही.

(ब) कंपनीने चालू वर्षात समभागाचे कोणतेही प्राधान्य आबंटन किंवा खाजगी आबंटन किंवा पूर्णपणे किंवा अंशत: परिवर्तननीय कर्जरोख्यांचे आबंटन केले नाही. त्यामुळे आदेशाच्या कलम 42 आणि 62 कंपनी कायदा, 2013 आणि 3 (10) (ब) अंतर्गत अहवाल करणे लागू नाही.

11 अ) भारतामध्ये सर्वसाधारणपणे स्वीकृत केलेल्या लेखापरीक्षण मानकांनुसार आम्ही करीत असलेल्या कंपनीच्या लेखापुस्तकांच्या परीक्षणादरम्यान आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणाच्या आधारे कंपनीने आणि तिच्या अधिकाऱ्यांनी किंवा कर्मचाऱ्यांनी वर्षभरात कोणत्याही प्रकारची फसवणूक केली असल्याचे निदर्शनास आले नाही.

ब) कोणतीही फसवणूक नोंदली न गेल्यामुळे कंपनी कायदा, 2013 च्या कलम 13 अंतर्गत ADT-4 अंतर्गत कोणताही फॉर्म भारत सरकारकडे भरण्याची आवश्यकता नाही. (कंपनी (लेखा व लेखापरीक्षक) नियम, 2014 (दुरुस्त केल्यानुसार) त्यामुळे आदेशाचे कलम 3(xi)(ब) अंतर्गत अहवाल सादर करणे आवश्यक नाही.

क) आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणाच्या आधारे आम्ही असा अहवाल सादर करतो की, कंपनीला कोणतीही व्हिसल ब्लोअर नोटीस प्राप्त झाली नाही.

12 आमच्या मते व आम्हाला दिलेल्या माहितीनुसार कंपनी निधी कंपनी नाही. त्यानुसार आदेशाचा परिच्छेद 3(xii) कंपनी कायदा, 2013 च्या कलम 406 अंतर्गत येथे लागू होत नाही.

13 आमच्या मते व आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व आम्ही तपासलेल्या अभिलेखांनुसार कंपनीचे इतर पक्षासोबतचे व्यवहार जेथे लागू असेल तेथे कंपनी कायदा, 2013 च्या कलम 177 आणि 188 अनुसार आहेत आणि अशा व्यवहाराचे तपशील वित्तीय विवरणपत्रामध्ये लेखांकन मानकांना अनुसरुन देण्यात आलेले आहेत.

14 अ) आमच्या मते आणि आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार व आम्ही तपासलेल्या अभिलेखांनुसार कंपनीकडे अंतर्गत लेखापरीक्षण पद्धती आहे व ती कंपनीच्या व्यवसायाच्या आकारानुसार व प्रकारानुसार योग्य आहे.

ब) कंपनीच्या वित्तीय विवरणांबाबत आमचे मत तयार करताना अंतर्गत लेखापरीक्षकांचे अहवाल विचारात घेतले आहेत.

15 आम्ही केलेल्या लेखांकन प्रक्रियांच्या आधारे आणि व्यवस्थापनाने आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार, कंपनीने संचालक किंवा संचालकांशी संबंधित व्यक्तीसोबत रोखीत नसलेले व्यवहार केलेले नाहीत, त्यामुळेच आदेशाचा परिच्छेद 3 (xv) कंपनी कायदा, 2013 च्या कलम 192 अंतर्गत येथे लागू नाही.

16 अ) आम्हाला देण्यात आलेली माहिती आणि स्पष्टीकरणानुसार तसेच आम्ही केलेल्या लेखा आणि अभिलेख पुस्तकांच्या परीक्षणानुसार भारतीय रिझर्व्ह बँक, कायदा 1934 चे कलम 45 आयए अनुसार कंपनीची नोंदणी करणे आवश्यक नाही.

ब) आम्हाला व्यवस्थापनाने दिलेल्या माहितीनुसार व खुलाशांनुसार व आम्ही तपासलेल्या अभिलेख्यांनुसार कंपनी कोणतीही बिगर बँकींग व्यवसाय, वित्तीय व गृहनिर्माणासाठी वित्त पुरवठ्याचे कार्य करीत नाही. त्यामुळे आदेशाचे कलम 3(xvi)(ब) अंतर्गत अहवाल सादर करणे आवश्यक नाही.

क) आम्हाला व्यवस्थापनाने दिलेल्या माहितीनुसार व खुलाशांनुसार व आम्ही तपासलेल्या अभिलेख्यांनुसार कंपनी रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या नियमांनुसार गाभा गुंतवणूक कंपनी (कोअर इन्व्हेस्टमेंट कंपनी) गटाची सदस्य नाही.

ड) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार कंपनीकडे समूहाचा भाग म्हणून कोणतेही CIC नाही

१७ आम्हाला व्यवस्थापनाने दिलेल्या माहितीनुसार व खुलाशांनुसार व आम्ही तपासलेल्या अभिलेख्यांनुसार कंपनीला चालू वित्तीय वर्षामध्ये रोख तोटा झाला आहे तसेच लगतच्या आधीच्या वर्षातही रोख तोटा झाला आहे. हा रोख तोटा वित्तीय वर्ष 2022-23 साठी रु. 2,092.74 लाख व वर्ष 2021-22 साठी रु.1178.52 लाख इतका आहे

१८ या वर्षात वैधानिक लेखापरीक्षकांनी राजीनामा दिला नाही.

१९ आम्हाला व्यवस्थापनाने दिलेल्या माहितीनुसार व खुलाशांनुसार वित्तीय गुणोत्तरे, वित्तीय मालमत्तेचे वय व त्या वित्तीय मालमत्ता परिपक्क होण्याच्या अपेक्षित तारखा तसेच वित्तीय देयता देण्याच्या अपेक्षित तारखा, वित्तीय विवरणाबरोबरील अन्य माहिती, संचालक मंडळाच्या योजनांबाबतची तसेच व्यवस्थापनाच्या योजनांबाबतची आमची माहिती आणि आमच्या गृहितकांना आधारभूत होण्याच्या माहितीच्या परीक्षणानंतर अशी कोणतीही महत्वाची अनिश्चितता लेखापरीक्षण अहवालाच्या दिवशी आमच्या नजरेला आली नाही की ताळेबंदाच्या दिवशी असलेल्या त्या देयता एक वर्षामध्ये ज्यावेळी ती देय होईल त्यावेळी ती प्रदान करण्यासाठी कंपनी सक्षम असणार नाही. तथापि, कंपनीच्या भविष्यातील वर्धन क्षमतेची खात्री नाही. तसेच आम्ही पुढे असा अहवाल देतो की, आमचा अहवाल अहवालाच्या दिनांकाच्या दिवशीच्या सत्य बाबींवर आधारित आहे व आम्ही अशी कोणतीही हमी देत नाही किंवा आश्वासन देत नाही की ताळेबंदाच्या दिवसापासून एक वर्षात देय होणाऱ्या वित्तीय देयता ज्या दिवशी देय होतील त्या दिवशी कंपनी त्यांचे प्रदान करील.

२० अ) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व खुलाशांनुसार आणि आम्हाला पुरवलेल्या अभिलेखांवरुन व कागदपत्रांवरुन आम्हाला असे दिसून आले आहे की, कंपनीच्या सध्या चालू असलेल्या प्रकल्पाखेरीज कोणताही अन्य प्रकल्प नाही आणि त्यामुळे कंपनी कायदा, 2013 च्या सूची सातमध्ये विहित केलेल्या अशा खर्च न झालेल्या कोणत्याही रकमा सदर कायद्याच्या कलम 135 (5) च्या पूर्ततेसाठी वित्तीय वर्षाच्या सहा महिन्याच्या आत हस्तांतरीत करण्याची आवश्यकता नाही.

ब) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व खुलाशांनुसार आणि आम्हाला पुरवलेल्या अभिलेखांवरुन व कागदपत्रांवरुन आम्हाला असे दिसून आले आहे की, कंपनी कायदा, 2013 च्या कलम 135 (5) अंतर्गत कंपनी खर्च न झालेली कोणतीही रक्कम धारण करीत नाही.

२१ आम्हाला व्यवस्थापनाने दिलेल्या माहितीनुसार व खुलाशांनुसार आणि आम्ही तपासलेल्या अभिलेखांवरुन व कागदपत्रांवरुन कंपनीने एकत्रिकृत वित्तीय विवरणे तयार करणे आवश्यक नाही. त्यामुळे आदेशाचे कलम 3 (xxi) कंपनीला लागू होत नाही, त्यामुळे या अहवालात या कलमा अंतर्गत कोणताही अहवाल नमूद केला नाही.

**चंन्दाभॉय आणि जस्सूभॉयकरिता**
**सनदी लेखापाल**
**संस्था नोंदणी क्रमांक 101647W**

सही
**अंबेश अ. दवे**
**भागीदार**
**सदस्यत्व क्रमांक 049289**
**युडीआयएन - 23049289BGXCQH5870**

**स्थळ :** मुंबई
**दिनांक :** 28 जुलै, 2023

## स्वतंत्र लेखापरीक्षण अहवाल – परिशिष्ट ‘2’

**मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाच्या** सदस्यांना महामंडळाच्या दि.31 मार्च, 2023 रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाच्या वित्तीय विवरणांवर सादर केलेल्या वित्तीय विवरणाच्या समदिनांकाच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणावरील अहवालाच्या कायदेशीर आणि नियामक आवश्यकता विभागाच्या परिच्छेद क्र. 9 (फ) चा संदर्भ केलेले.

**वित्तीय विवरणपत्रावरील लेखापरीक्षकांच्या अहवालाचे जोडपत्र :**

**कंपनी कायदा 2013 ("अधिनियम") च्या कलम 143 च्या उप कलम 3 च्या (i) विधानांतर्गत वित्तीय नियंत्रणबाबतचा अहवाल :**

आम्ही **मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाच्या** अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे दिनांक 31 मार्च, 2023 रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाच्या अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचेही लेखापरीक्षण केले आहे.

**अंतर्गत वित्तीय नियंत्रणाकरिता व्यवस्थापनाचे दायित्व :**

भारतीय सनदी लेखापाल संस्था (आयसीएआय) यांनी वित्तीय अहवालासंदर्भात अंतर्गत वित्तीय नियंत्रयणाबाबतच्या लेखापरीक्षणाबाबतच्या मार्गदर्शक टिप्पणीत नमूद केल्यानुसार, अंतर्गत नियंत्रणाचे आवश्यक घटक विचारात घेऊन अंतर्गत वित्तीय नियंत्रणावर आधारीत वित्तीय अहवाल तयार करण्याचे निकष स्थापित करणे आणि राखणे, याकरिता तसेच अंतर्गत वित्तीय नियंत्रणाकरिता कंपनीचे संचालक मंडळ जबाबदार असते. या दायित्वामध्ये संकल्पन, कंपनीचा व्यवसाय सुव्यवस्थित आणि प्रभावीपणे चालण्याची खातरजमा करण्याकरिता पुरेसे अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची अंमलबजावणी आणि देखभाल करणे, कंपनीच्या धोरणांच्या अनुपालनासह, तिची मत्ता सुरक्षित ठेवणे, फसवणूक आणि त्रुटी शोधणे तसेच त्यांना प्रतिबंध करणे, लेखा नोंदीची अचूकता आणि परिपूर्णता आणि कायदा अनुसार आवश्यक अशी विश्वसनीय वित्तीय माहिती वेळेत तयार करणे यांचा समावेश होतो.

**लेखापरीक्षकांचे दायित्व :**

आमच्या लेखापरीक्षणावर आधारुन वित्तीय अहवालावर गटाच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणाबाबत आमचे मत मांडणे हे आमचे दायित्व आहे. आम्ही भारतीय सनदी लेखापाल संस्था (आयसीएआय) यांनी जारी केलेल्या वित्तीय अहवालावरील वित्तीय नियंत्रणाच्या लेखापरीक्षणाकरिता लागू असलेल्या मार्गदर्शक टिप्पण्णीनुसार व लेखापरीक्षणा वरील मानके यावरील मार्गदर्शक टिप्पण्णीनुसार आमचे लेखापरीक्षण केले आहे. या दोन्ही टिप्पण्णी वित्तीय अहवालावरील वित्तीय नियंत्रणाच्या लेखापरीक्षणाकरिता लागू आहेत व दोन्ही टिप्पण्णी भारतीय सनदी लेखापाल संस्था (आयसीएआय) यांनी जारी केलेल्या आहेत. य़ा कंपनी कायदा, 2013 च्या कलम 143 (10) अंतर्गत लागू असतील त्या प्रमाणात विहित केल्या आहेत असे समजले जाते. आम्ही ती मानके आणि मार्गदर्शक टिप्पणी यांचे अनुपालन नैतिकतेने करणे आवश्यक आहे. तसेच वित्तीय अहवालावर पुरेसे अंतर्गत वित्तीय नियंत्रण स्थापित केले गेले आहे की नाही आणि त्यांची देखभाल करण्यात आली होती की नाही त्याचप्रमाणे अशी नियंत्रणे सर्व महत्वपूर्ण संदर्भात प्रभावीपणे कार्यरत होती की नाही याबाबतची खातरजमा करण्याकरिता आम्ही लेखापरीक्षणाची योजना आखतो आणि सादर करतो.

आमच्या लेखापरीक्षणामध्ये अंतर्गत नियंत्रण प्रणालीचे वित्तीय अहवालावरचे नियंत्रण आणि कार्यकारी प्रभावीशीलता पुरेशी आहे का, याबाबतचा लेखापरीक्षण पुरावा प्राप्त करण्याकरिता करावयाच्या प्रक्रिया करण्याचा अंतर्भाव असतो. आमच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या लेखापरीक्षणामध्ये अंतर्गत नियंत्रण प्रणालीचे वित्तीय अहवालावरचे नियंत्रण समजून घेणे, महत्वपूर्ण कमकुवतपणाची जोखीम असल्यास तिचे मूल्यांकन करणे आणि या जोखमींच्या मूल्यांकनाच्या आधारे अंतर्गत नियंत्रणाचे संकल्पन आणि कार्यकारी प्रभावीशीलतेची चाचणी आणि मूल्यमापन करणे यांचा समावेश असतो. लेखापरीक्षकांच्या निर्णयानुसार तसेच फसवणूक वा त्रुटीमुळे एकल वित्तीय विधानातील महत्वपूर्ण चुकीच्या विवरणपत्राच्या जोखमीच्या मूल्यांकनानुसार अवलंबून याकरिता प्रक्रिया निवडण्यात येतात.

आमचा असा विश्वास आहे की, आम्ही प्राप्त केलेला लेखापरीक्षण पुरावा पुरेसा असून वित्तीय अहवालावरील गटाचे अंतर्गत नियंत्रण प्रणालीवरील आमच्या लेखापरीक्षण मताला संयुक्तिक आधार देत आहे.

**वित्तीय अहवालावर अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचा अर्थ :**

वित्तीय अहवाल तयार करण्यावरचे गटाचे अंतर्गत वित्तीय नियंत्रण म्हणजे सर्वसाधारणपणे स्वीकृत लेखा तत्वांना अनुसरुन बाह्य उद्दिष्टांकरिता संकलित वित्तीय विवरणपत्र तयार करणे आणि वित्तीय अहवालाच्या वाजवी विश्वासार्हतेबद्दल किमान आश्वस्त करण्याकरिता संकल्पित केलेली प्रक्रिया होय. कंपनीच्या वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणामध्ये पुढील धोरणांचा आणि प्रक्रियांचा समावेश होतो :

1. नोंदीच्या देखरेखी संबंधात, कंपनीच्या मालमत्तेचे आणि व्यवहाराच्या स्वरुपाची तपशीलवार, अचूक आणि प्रामाणिक माहिती प्रतिबिंबीत करतात याची खात्री करणे,

2. सर्वसाधारणपणे स्वीकृत लेखा तत्वांना अनुसरुन वित्तीय विवरणपत्र तयार करता येण्याकरिता आवश्यकतेनुसार व्यवहारांची नोंद केली असण्याबाबत आश्वासन प्रदान करणे आणि केलेले खर्च आणि प्राप्ती व्यवस्थापन तसेच कंपनीचे संचालक मंडळ यांच्या अधिकृततेने केल्याचे वाजवीपणे आश्वासन प्रदान करणे आणि

3. कंपनीच्या मालमत्तेचा अनधिकृत ताबा घेणे, वापर करणे किंवा विल्हेवाट लावणे जेणेकरुन या बाबीचा कंपनीच्या एकल वित्तीय विधानावर महत्वपूर्ण परिणाम होण्याची शक्यता आहे, अशा बाबी प्रतिबंधित करणे किंवा वेळीच शोधून काढण्याबाबत वाजवीपणे आश्वासन प्रदान करणे.

**वित्तीय अहवालावरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या विहित मर्यादा :**

वित्तीय अहवाल तयार करण्याबाबत अंतर्गत वित्तीय नियंत्रणाला काही विहित मर्यादा असल्याने, यामध्ये व्यवस्थापन संगनमताने किंवा अयोग्य बाबींनी अंतर्गत नियंत्रणाची पायमल्ली करण्याची शक्यता असते, त्रुटी किंवा फसवणूक यामधून साहित्याबाबत चुकीचे विवरणपत्र आणि शोधता येणार नाही अशा त्रुटींचा समावेश असू शकतो. तसेच भविष्यात वित्तीय अहवाल तयार करण्याबाबतची अंतर्गत वित्तीय नियंत्रण परिस्थिती बदलल्याने किंवा धोरणे किंवा प्रक्रियासोबतचे अनुपालन न राहिल्याने अंतर्गत वित्तीय विवरण अधिक वाईट होण्याची किंवा अपुरे ठरु शकण्याची शक्यता आहे.

**मत :**

आमच्या मते आणि सर्वोत्तम माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार कंपनीच्या वित्तीय अहवाल यंत्रणेवर महत्वाच्या बाबतीत कंपनीचे अंतर्गत वित्तीय नियंत्रण आहे व असे वित्तीय अहवाल यंत्रणेवरील कंपनीचे अंतर्गत वित्तीय नियंत्रण दि.31 मार्च, 2023 रोजी परिणामकारकरीत्या काम करीत होते. भारतीय सनदी लेखापाल संस्थेने जारी केलेल्या वित्तीय अहवाल यंत्रणेवरील अंतर्गत वित्तीय नियंत्रणाच्या लेखापरीक्षणाबाबत जारी केलेल्या मार्गदर्शक टिप्पणीमध्ये घालून दिलेल्या महत्वाच्या निकषावर आधारुन कंपनीने सदर अंतर्गत वित्तीय नियंत्रणाचे निकष तयार केले आहेत.

**चन्दाभॉय आणि जस्सूभॉयकरिता**
**सनदी लेखापाल**
**संस्था नोंदणी क्रमांक 101647W**

सही
**अंबेश अ. दवे**
**भागीदार**
**सदस्यत्व क्रमांक 049289**
**युडीआयएन - 23049289BGXCQH5870**

**स्थळ :** मुंबई
**दिनांक :** 28 जुलै, 2023

MMRC

## “परिशिष्ट I”

मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादितच्या सभासदांना महामंडळाच्या वित्तीय वर्ष 2022-23 च्या वित्तीय विवरणाच्या लेखापरीक्षणाच्या सादर केलेल्या अहवालाच्या परिशिष्ट 1 (परिच्छेद 1 पहा)

| अ. क्र. | मालमत्तेचे वर्णन | पुढे नेण्याची ढोबळ किंमत (रुपयात) | कोणाच्या नावाने धारण केली आहे. | प्रवर्तक/संचालक किंवा त्यांचे नातेवाईक कर्मचारी | किती काळ धारण केली (केव्हापासून) | मालमत्ता कंपनीच्या नावे धारण करण्याचे कारण (काही विवाद असल्यास तो नमूद करावा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पूर्ण मालकीची जमीन | 24,78,900 | महाराष्ट्र शासन | होय, महाराष्ट्र शासन | 22 ऑगस्ट, 2014 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 2 | पूर्ण मालकीची जमीन | 854 | महाराष्ट्र शासन | होय, महाराष्ट्र शासन | 5 ऑक्टोबर, 2015 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 3 | पूर्ण मालकीची जमीन | 505 | महाराष्ट्र शासन | होय, महाराष्ट्र शासन | 10 डिसेंबर, 2015 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 4 | पूर्ण मालकीची जमीन | 64,77,714 | पोलीस आयुक्त, मुंबई, महाराष्ट्र शासन मार्फत एम.आय.डी.सी | होय, महाराष्ट्र शासन | 20 एप्रिल, 2016 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 5 | पूर्ण मालकीची जमीन | 196 | महाराष्ट्र शासन | होय, महाराष्ट्र शासन | 25 मे, 2016 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 6 | पूर्ण मालकीची जमीन | 370 | होमगार्ड आणि संचालक नागरी संरक्षण | होय, महाराष्ट्र शासन | 14 जुलै, 2016 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 7 | पूर्ण मालकीची जमीन | 195 | सीप्झ विशेष आर्थिक क्षेत्र प्राधिकरणामार्फत एम.आय.डी.सी | होय, महाराष्ट्र शासन | 28 जुलै, 2016 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 8 | पूर्ण मालकीची जमीन | 1,93,038 | बृहन्मुंबई महानगरपालिका | होय, महाराष्ट्र शासन | 2 सप्टेंबर, 2016 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 9 | पूर्ण मालकीची जमीन | 30,000 | महाराष्ट्र शासन | होय, महाराष्ट्र शासन | 3 सप्टेंबर, 2016 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 10 | पूर्ण मालकीची जमीन | 718 | बृहन्मुंबई महानगरपालिका | होय, महाराष्ट्र शासन | 23 सप्टेंबर, 2016 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |

| अ. क्र. | मालमत्तेचे वर्णन | पुढे नेण्याची ढोबळ किंमत (रुपयात) | कोणाच्या नावाने धारण केली आहे. | प्रवर्तक/संचालक किंवा त्यांचे नातेवाईक कर्मचारी | किती काळ धारण केली (केव्हापासून) | मालमत्ता कंपनीच्या नावे धारण करण्याचे कारण (काही विवाद असल्यास तो नमूद करावा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 11 | पूर्ण मालकीची जमीन | 5,030 | बृहन्मुंबई महानगरपालिका | होय, महाराष्ट्र शासन | 7 डिसेंबर, 2016 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 12 | पूर्ण मालकीची जमीन | 61 | बृहन्मुंबई महानगरपालिका | होय, महाराष्ट्र शासन | 8 डिसेंबर, 2016 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 13 | पूर्ण मालकीची जमीन | 430 | बृहन्मुंबई महानगरपालिका | होय, महाराष्ट्र शासन | 16 डिसेंबर, 2016 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 14 | पूर्ण मालकीची जमीन | 2,572 | बृहन्मुंबई महानगरपालिका | होय, महाराष्ट्र शासन | 24 डिसेंबर, 2016 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 15 | पूर्ण मालकीची जमीन | 2,302 | बृहन्मुंबई महानगरपालिका | होय, महाराष्ट्र शासन | 24 डिसेंबर, 2016 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 16 | पूर्ण मालकीची जमीन | 151 | बृहन्मुंबई महानगरपालिका | होय, महाराष्ट्र शासन | 2 जानेवारी, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 17 | पूर्ण मालकीची जमीन | 60 | बृहन्मुंबई महानगरपालिका | होय, महाराष्ट्र शासन | 2 जानेवारी, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 18 | पूर्ण मालकीची जमीन | 382 | बृहन्मुंबई महानगरपालिका | होय, महाराष्ट्र शासन | 2 जानेवारी, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 19 | पूर्ण मालकीची जमीन | 53 | बृहन्मुंबई महानगरपालिका | होय, महाराष्ट्र शासन | 2 जानेवारी, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 20 | पूर्ण मालकीची जमीन | 66,210 | बृहन्मुंबई महानगरपालिका | होय, महाराष्ट्र शासन | 18 जानेवारी, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 21 | पूर्ण मालकीची जमीन | 4,64,825 | महाराष्ट्र शासन | होय, महाराष्ट्र शासन | 18 जानेवारी, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 22 | पूर्ण मालकीची जमीन | 8,853 | बृहन्मुंबई महानगरपालिका | होय, महाराष्ट्र शासन | 17 फेब्रुवारी, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 23 | पूर्ण मालकीची जमीन | 246 | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ | होय, महाराष्ट्र शासन | 23 फेब्रुवारी, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 24 | पूर्ण मालकीची जमीन | 4,108 | महाराष्ट्र शासन | होय, महाराष्ट्र शासन | 4 मे, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 25 | पूर्ण मालकीची जमीन | 1,001 | कर्मचारी राज्य विमा महामंडळ | होय, महाराष्ट्र शासन | 16 मे, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |

| अ. क्र. | मालमत्तेचे वर्णन | पुढे नेण्याची ढोबळ किंमत (रुपयात) | कोणाच्या नावाने धारण केली आहे. | प्रवर्तक/संचालक किंवा त्यांचे नातेवाईक कर्मचारी | किती काळ धारण केली (केव्हापासून) | मालमत्ता कंपनीच्या नावे धारण करण्याचे कारण (काही विवाद असल्यास तो नमूद करावा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 26 | पूर्ण मालकीची जमीन | 214 | बृहन्मुंबई महानगरपालिका | होय, महाराष्ट्र शासन | 18 मे, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 27 | पूर्ण मालकीची जमीन | 27,375 | नायर हॉस्पिटल, बृ.म.न.पा. | होय, महाराष्ट्र शासन | 20 मे, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 28 | पूर्ण मालकीची जमीन | 214 | बृहन्मुंबई महानगरपालिका | होय, महाराष्ट्र शासन | 22 जून, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 29 | पूर्ण मालकीची जमीन | 161 | सार्वजनिक बांधकाम विभाग | होय, महाराष्ट्र शासन | 20 जुलै, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 30 | पूर्ण मालकीची जमीन | 969 | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | होय, महाराष्ट्र शासन | 28 ऑगस्ट, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 31 | पूर्ण मालकीची जमीन | 880 | बृहन्मुंबई महानगरपालिका | होय, महाराष्ट्र शासन | 4 सप्टेंबर, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 32 | पूर्ण मालकीची जमीन | 29,042 | बृहन्मुंबई महानगरपालिका | होय, महाराष्ट्र शासन | 19 सप्टेंबर, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 33 | पूर्ण मालकीची जमीन | 33,914 | बृहन्मुंबई महानगरपालिका | होय, महाराष्ट्र शासन | 19 सप्टेंबर, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 34 | पूर्ण मालकीची जमीन | 7,200 | महाराष्ट्र शासन | होय, महाराष्ट्र शासन | 22 सप्टेंबर, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 35 | पूर्ण मालकीची जमीन | 2,21,325 | मेसर्स सहार गार्डन हॉटेल प्रायव्हेट लिमिटेड | नाही | 3 नोव्हेंबर, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 36 | पूर्ण मालकीची जमीन | 2,305 | महाराष्ट्र शासन | होय, महाराष्ट्र शासन | 2 डिसेंबर, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 37 | पूर्ण मालकीची जमीन | 885 | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | होय, महाराष्ट्र शासन | 7 डिसेंबर, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 38 | पूर्ण मालकीची जमीन | 405 | सार्वजनिक बांधकाम विभाग | होय, महाराष्ट्र शासन | 13 डिसेंबर, 2017 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 39 | पूर्ण मालकीची जमीन | 626 | बृहन्मुंबई महानगरपालिका | होय, महाराष्ट्र शासन | 3 एप्रिल, 2018 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |

| अ. क्र. | मालमत्तेचे वर्णन | पुढे नेण्याची ढोबळ किंमत (रुपयात) | कोणाच्या नावाने धारण केली आहे. | प्रवर्तक/संचालक किंवा त्यांचे नातेवाईक कर्मचारी | किती काळ धारण केली (केव्हापासून) | मालमत्ता कंपनीच्या नावे धारण करण्याचे कारण (काही विवाद असल्यास तो नमूद करावा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 40 | पूर्ण मालकीची जमीन | 2,100 | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | होय, महाराष्ट्र शासन | 21 मे, 2018 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 41 | पूर्ण मालकीची जमीन | 809 | महाराष्ट्र शासन | होय, महाराष्ट्र शासन | 22 मे, 2018 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 42 | पूर्ण मालकीची जमीन | 373 | महाराष्ट्र शासन | होय, महाराष्ट्र शासन | 22 मे, 2018 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 43 | पूर्ण मालकीची जमीन | 1,636 | महाराष्ट्र शासन | होय, महाराष्ट्र शासन | 29 ऑगस्ट, 2018 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 44 | पूर्ण मालकीची जमीन | 183 | मुंबई गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण | होय, महाराष्ट्र शासन | 16 ऑक्टोबर, 2018 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 45 | पूर्ण मालकीची जमीन | 66 | भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक | होय, महाराष्ट्र शासन | 31 जानेवारी, 2019 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 46 | पूर्ण मालकीची जमीन | 11,54,17,641 | बृहन्मुंबई महानगरपालिका | होय, महाराष्ट्र शासन | 31 जुलै, 2019 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 47 | पूर्ण मालकीची जमीन | 12,79,352 | आयशाबाई ए. खान | नाही | 3 फेब्रुवारी, 2021 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 48 | पूर्ण मालकीची जमीन | 1,19,72,042 | परेरा आणि इतर (मरोळ) | नाही | 31 मार्च, 2021 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 49 | पूर्ण मालकीची जमीन | 72,22,500 | राष्ट्रीय विमा | नाही | 31 मार्च, 2021 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 50 | पूर्ण मालकीची जमीन | 57,78,000 | रविंद्र मॅन्शन | नाही | 2 ऑगस्ट, 2021 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| 51 | पूर्ण मालकीची जमीन | 29,22,480 | भारत पेट्रोलियम महामंडळ मर्या. | नाही | 11 जानेवारी, 2023 | हस्तांतरणाची प्रक्रिया चालू आहे. |
| | **योग** | 15,46,61,471 | | | | |

## दि.31 मार्च, 2023 रोजीचा ताळेबंद

((रुपये लाखात)

| तपशील | टीप | 31 मार्च, 2023 रोजीचे | 31 मार्च, 2022 रोजीचे (पुन्हा सादर केलेले) | 1 एप्रिल, 2021 रोजीचे (पुन्हा सादर केलेले) |
|---|---|---|---|---|
| **अ. मालमत्ता** | | | | |
| **चालू नसलेली मालमत्ता** | | | | |
| अ) मालमत्ता, संयंत्रे आणि यंत्रे | 2 (अ) | 46,912.70 | 47,420.76 | 47,440.51 |
| ब) प्रगतीपथावरील भांडवली कार्य | 3 (अ) | 22,93,669.54 | 19,63,725.15 | 16,02,595.78 |
| क) वापर करण्याचा हक्क असलेली मालमत्ता | 4 | 5,065.46 | 4,561.17 | 4,148.33 |
| ड) अमूर्त मालमत्ता | 2 (ब) | 88.77 | 73.36 | 147.83 |
| इ) विकास होत असलेली अमूर्त मालमत्ता | 3 (ब) | 934.57 | 667.42 | 357.23 |
| फ) वित्तीय मालमत्ता | | | | |
| (i) कर्ज | 5 | 4.58 | 8.34 | - |
| (ii) अन्य वित्तीय मालमत्ता | 6 | 410.61 | 285.02 | 1,134.59 |
| ग) स्थगित कर मालमत्ता (निव्वळ) | 21 (अ) | 632.14 | 374.55 | 279.76 |
| ह) चालू कर मालमत्ता (निव्वळ) | 21 (इ) | 530.59 | 1,226.51 | 1,553.28 |
| i) अन्य चालू नसलेली मालमत्ता | 7 | 61,433.84 | 76,713.22 | 1,03,518.95 |
| **एकूण चालू नसलेली मालमत्ता** | | 24,09,682.80 | 20,95,055.50 | 17,61,176.26 |
| **चालू मालमत्ता** | | | | |
| अ) वित्तीय मालमत्ता | | | | |
| (i) रोख आणि रोखसम | 8 (अ) | 4,301.49 | 33,205.33 | 28,065.50 |
| (ii) वरील (i) व्यतिरिक्त बँक शिल्लक | 8 (ब) | 324.32 | 2,801.09 | 3,131.99 |
| (iii) कर्जे | 5 | 3.75 | 4.11 | - |
| (iv) अन्य वित्तीय मालमत्ता | 6 | 10,139.18 | 15,921.27 | 22,832.69 |
| ब) अन्य चालू मालमत्ता | 7 | 33,624.37 | 32,207.19 | 31,474.29 |
| **एकूण चालू मालमत्ता** | | 48,393.11 | 84,138.99 | 85,504.47 |
| **एकूण मालमत्ता** | | 24,58,075.91 | 21,79,194.49 | 18,46,680.73 |
| **ब. समभाग आणि दायित्वे** | | | | |
| **समभाग** | | | | |
| अ) समभाग भांडवल | 9 | 4,80,540.00 | 4,40,720.00 | 3,81,520.00 |
| ब) अन्य समभाग | 10 | (12,631.62) | (9,794.52) | (8,098.42) |
| **एकूण समभाग** | | 4,67,908.38 | 4,30,925.48 | 3,73,421.58 |
| **दायित्वे** | | | | |
| **चालू नसलेली दायित्वे** | | | | |
| अ) वित्तीय दायित्वे | | | | |
| (i) कर्ज / उधार | 11 | 15,13,213.49 | 13,42,813.85 | 11,30,564.01 |
| (ii) भाडे दायित्व | 4 | 3,111.59 | 2,511.27 | 1,248.21 |
| (iii) अन्य वित्तीय | 12 | 381.69 | 348.69 | 35.84 |
| ब) अन्य चालू नसलेली वित्तीय दायित्वे | 13 | 3,04,009.54 | 2,75,122.02 | 2,13,439.52 |
| क) तरतुदी | 14 | 508.00 | 486.38 | 309.51 |
| **अन्य चालू नसलेली वित्तीय दायित्वे** | | 18,21,224.31 | 16,21,282.21 | 13,45,597.09 |
| **चालू दायित्वे** | | | | |
| अ) वित्तीय दायित्वे | | | | |
| (i) कर्ज / उधार | 11 | 24,888.06 | - | - |
| (ii) भाडे दायित्व | 4 | 1,325.42 | 1,463.79 | 2,549.87 |
| (iii) अन्य वित्तीय दायित्वे | 12 | 1,36,718.80 | 1,19,028.59 | 1,18,091.51 |
| ब) अन्य चालू वित्तीय दायित्वे | 13 | 5,510.06 | 6,076.71 | 6,688.26 |
| क) तरतुदी | 14 | 500.88 | 417.71 | 332.42 |
| **एकूण वित्तीय दायित्वे** | | 1,68,943.22 | 1,26,986.80 | 1,27,662.06 |
| **एकूण दायित्वे** | | 19,90,167.53 | 17,48,269.01 | 14,73,259.15 |
| **एकूण समभाग आणि दायित्वे** | | 24,58,075.91 | 21,79,194.49 | 18,46,680.73 |
| **महत्वाची लेखांकन धोरणे** | 1 | | | |

सोबतच्या टीप क्र. 1-38 वित्तीय विवरणाचा अविभाज्य भाग आहेत

आमच्या समदिनांकाच्या अहवालाप्रमाणे
**चंन्दाभॉय आणि जस्सूभॉयकरिता**
**सनदी लेखापाल**
**संस्था नोंदणी क्रमांक 101647W**

संचालक मंडळ आणि त्यांच्यावतीने
**मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित**
**सीआयएन - U60100MH2008SGC181770**

**अंबेश अ. दवे**
भागीदार
सदस्यत्व क्रमांक 049289

**ऋतू देब**
कंपनी सचिव
सदस्यत्व क्रमांक एफ 6754

**अबोध खांडेलवाल**
संचालक (वित्त)
आणि मुख्य वित्तीय अधिकारी
डीआयएन - 07807394

**अश्विनी भिडे**
व्यवस्थापकीय संचालक
अतिरिक्त कार्यभार
डीआयएन - 02861008

**स्थळ -** मुंबई
**दिनांक -** 28 जुलै, 2023

## दि.31 मार्च, 2023 रोजी संपलेल्या वर्षासाठी नफा व तोटा पत्रक

(रुपये लाखात)

| तपशील | टीप | 31 मार्च, 2023 रोजी संपलेल्या वर्षासाठी | 31 मार्च, 2022 रोजी संपलेल्या वर्षासाठी (पुन्हा सादर केलेले) |
|---|---|---|---|
| **उत्पन्न** | | | |
| कार्यामधून महसूल | | - | - |
| अन्य उत्पन्न | 15 | 385.60 | 1,149.37 |
| **एकूण उत्पन्न** | | 385.60 | 1,149.37 |
| **खर्च** | | | |
| कर्मचारी लाभ खर्च | 16 | 1,144.37 | 1,249.27 |
| वित्तीय खर्च | 17 | 26.38 | 32.75 |
| घसारा आणि परिशोधन खर्च | 2 व 4 (इ) | 970.24 | 1,020.73 |
| अन्य खर्च | 18 | 1,307.59 | 1,045.87 |
| **एकूण खर्च** | | 3,448.58 | ,348.62 |
| **करपूर्व तोटा** | | (3,062.98) | (2,199.25) |
| **कर खर्च** | | | |
| चालू कर | 21 (ब) | - | - |
| पूर्वीचे वर्ष | 21 (ब) | - | (431.79) |
| स्थगित कर | 21 (अ) | (249.35) | (88.70) |
| **एकूण कर खर्च** | | (249.35) | (520.49) |
| **(तोटा) वर्षाकरिता** | | (2,813.63) | (1,678.76) |
| **इतर सर्वसमावेशक उत्पन्न** | | | |
| नफा आणि तोट्यात पुनर्वर्गीकृत केलेल्या बाबी | | | |
| परिभाषित लाभ योजनांचे मोजमाप | | (31.71) | (23.43) |
| वरील आयकर संबंधित | 21 (क) | 8.24 | 6.09 |
| **इतर सर्वसमावेशक उत्पन्न / (तोटा)** | | (23.47) | (17.34) |
| **वर्षाकरिता एकूण सर्वसमावेशक (तोटा)** | | (2,837.10) | (1,696.10) |
| प्रति भाग मिळकत - दर्शनी मूल्य रु. 100 प्रति भाग | 20 | | |
| मूळ (रुपयात) | | (0.60) | (0.42) |
| विरलीकृत (रुपयात) | | (0.60) | (0.42) |
| **महत्वाची लेखांकन धोरणे** | **1** | | |

सोबतच्या टीप क्र. 1-38 वित्तीय विवरणाचा अविभाज्य भाग आहेत

आमच्या समदिनांकाच्या अहवालाप्रमाणे
**चंन्दाभॉय आणि जस्सूभॉयकरिता**
**सनदी लेखापाल**
**संस्था नोंदणी क्रमांक 101647W**

संचालक मंडळ आणि त्यांच्यावतीने
**मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित**
**सीआयएन - U60100MH2008SGC181770**

**अंबेश अ. दवे**
भागीदार
सदस्यत्व क्रमांक 049289

**ऋतू देब**
कंपनी सचिव
सदस्य क्रमांक – एफ 6754

**अबोध खांडेलवाल**
संचालक (वित्त)
आणि मुख्य वित्तीय अधिकारी
डीआयएन - 07807394

**अश्विनी भिडे**
व्यवस्थापकीय संचालक
अतिरिक्त कार्यभार
डीआयएन - 02861008

**स्थळ** - मुंबई
**दिनांक** - 28 जुलै, 2023

## दि.31 मार्च, 2023 रोजी संपलेल्या वर्षासाठी रोख प्रवाह विवरण पत्रक

(रुपये लाखात)

| तपशील | 31 मार्च, 2023 रोजी संपलेल्या वर्षासाठी | 31 मार्च, 2022 रोजी संपलेल्या वर्षासाठी |
|---|---|---|
| **अ. कार्यरत उपक्रमांमधून रोख प्रवाह** | | |
| **(तोटा) करापूर्वीचा** | (3,062.98) | (2,199.25) |
| **समायोजन -** | | |
| घसारा आणि परिशोधन खर्च | 970.24 | 1,020.73 |
| वित्तीय ख़र्च | 26.38 | 32.75 |
| मालमत्ता, संयंत्रे आणि उपकरणे यांच्या विक्रीवरील तोटा / (नफा) | 1.01 | 0.59 |
| व्याज उत्पन्न | (329.01) | (558.86) |
| परकीय चलन (नफा) / तोटा | 229.56 | (270.56) |
| परिभाषित लाभ योजनेचे पुनर्मापन | (31.71) | (23.43) |
| **खेळते भांडवल बदलण्यापूर्वी कार्यरत नफा/(तोटा)** | (2,196.51) | (1,998.03) |
| **समायोजन -** | | |
| अन्य वित्तीय मालमत्तेमध्ये घट / (वाढ) | 297.84 | (254.03) |
| चालू नसलेल्या वित्तीय मालमत्तेमध्ये घट / (वाढ) | (1,271.10) | 10.93 |
| अन्य वित्तीय दायित्वामध्ये वाढ / (घट) | 235.99 | (808.38) |
| चालू नसलेल्या वित्तीय दायित्वामध्ये वाढ / (घट) | (565.73) | (639.98) |
| तरतुदींमध्ये वाढ / (घट) | 42.25 | 77.54 |
| **कार्यामधून उत्पन्न केलेली / (त्यात वापरलेली) रोख** | (3,457.26) | (3,611.95) |
| **आयकर (अदा केलेले) / परतावा** | 695.92 | 758.56 |
| **कार्यरत उपक्रमांमधून निव्वळ रोख (बाह्य प्रवाह)) (अ)** | (2,761.34) | (2,853.39) |
| **ब. गुंतवणूक केलेल्या उपक्रमांमधून रोख प्रवाह** | | |
| मालमत्ता, संयंत्रे आणि उपकरणे यांची खरेदी आणि प्रगतीपथावरील भांडवली कार्य | (3,00,748.47) | (3,31,901.73) |
| मालमत्ता, संयंत्रे आणि उपकरणे यांच्या विक्रीतून मिळणारे उत्पन्न | 1.26 | 1.83 |
| अन्य अमूर्त मालमत्तेची खरेदी / समायोजन / विक्री आणि विकासाधीन अमूर्त मालमत्ता | (322.69) | (228.91) |
| मुदत ठेवींची / (गुंतवणूक) परिपक्वता (निव्वळ) | 2,466.77 | 1,066.15 |
| कर्जामध्ये घट / (वाढ) | 4.12 | (12.45) |
| प्राप्त केलेले व्याज | 649.68 | 1,663.36 |
| पोटभाड्याच्या गुंतवणुकीतून मिळणारे उत्पन्न (व्याजासह) | - | 270.15 |
| **गुंतवणूक उपक्रमांमधून निव्वळ रोख (बाह्य प्रवाह) (बी)** | (2,97,949.33) | (3,29,141.60) |
| **क. वित्तीय उपक्रमांमधून रोख प्रवाह** | | |
| समभाग भांडवल जारी करण्यापासून मिळणारे उत्पन्न | 39,820.00 | 59,200.00 |
| कर्जातून मिळणारे उत्पन्न | 2,17,535.81 | 2,71,609.00 |
| मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मर्यादित (MIAL) कडून योगदान | 12,739.00 | 8,737.50 |
| भाडे दायित्वाची अदायगी (व्याजासह) | (1,793.39) | (2,411.68) |
| **वित्तपुरवठा उपक्रमांमधून निव्वळ रोख प्रवाह / (बाह्य प्रवाह) (क)** | 2,68,301.42 | 3,37,134.82 |
| **रोख आणि रोख समतुल्य मध्ये निव्वळ वाढ (अ+ब+क)** | (32,409.25) | 5,139.83 |
| **वित्तीय वर्षाच्या सुरुवातीला रोख आणि रोख समतुल्य** | 33,205.33 | 28,065.50 |
| **वित्तीय वर्षाच्या शेवटी रोख आणि रोख समतुल्य (खालील टीप- (ब) पहा)** | 796.08 | 33,205.33 |

## दि.31 मार्च, 2023 रोजी संपलेल्या वर्षासाठी रोख प्रवाह विवरण पत्रक

**टीप –**

(अ) वरील रोख प्रवाह विवरणपत्र हे कंपन्यांच्या अंतर्गत अधिसूचित केल्याप्रमाणे रोख प्रवाहाच्या विवरणपत्रावर भारतीय लेखामानक - 7 मध्ये नमूद केल्यानुसार 'अप्रत्यक्ष पद्धती' अंतर्गत तयार केले गेले आहे.

**(ब) रोख आणि रोख समतुल्य यांचा समावेश असलेले -**

**(रुपये लाखात)**

| **तपशील** | **31 मार्च, 2023 रोजी** | **31 मार्च, 2022 रोजी** |
|---|---|---|
| बँकांमध्ये असलेली शिल्लक | 211.49 | 55.33 |
| बँकांमधील मुदत ठेवी, ज्यांची मूळ मुदत तीन महिने किंवा त्यापेक्षा कमी आहे | 4,090.00 | 33,150.00 |
| बँक ओव्हरड्राफ्ट | (3,505.41) | - |
| **वर्षाच्या शेवटी रोख आणि रोख समतुल्य** | 796.08 | 33,205.33 |

**(क) भारतीय लेखामानक - 7 नुसार कर्ज घेण्याची हालचाल**

| **तपशील** | **1 एप्रिल, 2022 रोजी** | **रोख प्रवाह** | **रोख नसलेले बदल** | **31 मार्च, 2023 रोजी** |
|---|---|---|---|---|
| कर्जे / उधारी | 13,42,813.85 | 2,21,200.47 | (25,912.77) | 15,38,101.55 |
| **एकूण कर्जे / उधारी** | 13,42,813.85 | 2,21,200.47 | (25,912.77) | 15,38,101.55 |

| **तपशील** | **1 एप्रिल, 2021 रोजी** | **रोख प्रवाह** | **रोख नसलेले बदल** | **31 मार्च, 2022 रोजी** |
|---|---|---|---|---|
| कर्जे / उधारी | 11,30,564.01 | 2,71,609.00 | (59,359.16) | 13,42,813.85 |
| **एकूण कर्जे / उधारी** | 11,30,564.01 | 2,71,609.00 | (59,359.16) | 13,42,813.85 |

| **तपशील** | **1 एप्रिल, 2020 रोजी** | **रोख प्रवाह** | **रोख नसलेले बदल** | **31 मार्च, 2021 रोजी** |
|---|---|---|---|---|
| कर्जे / उधारी | 9,92,890.88 | 2,07,500.00 | (69,826.87) | 11,30,564.01 |
| **एकूण कर्जे / उधारी** | 9,92,890.88 | 2,07,500.00 | (69,826.87) | 11,30,564.01 |

(ड) मागील वर्षाचे आकडे जेथे लागू असतील तेथे पुनर्गठित / पुनर्वर्गीकृत केले गेले आहेत.

सोबतच्या टीप क्र. 1-38 आणि इतर प्रकटीकरण वित्तीय विवरण पत्राचा अविभाज्य भाग आहेत"

आमच्या समदिनांकाच्या अहवालाप्रमाणे
**चंदाभॉय आणि जस्सूभॉयकरिता**
**सनदी लेखापाल**
**संस्था नोंदणी क्रमांक 101647W**

संचालक मंडळ आणि त्यांच्यावतीने
**मुंबई मेट्रो रेल महामंडळ मर्यादित**
**सीआयएन - U60100MH2008SGC181770**

**अंबेश अ. दवे**
भागीदार
सदस्यत्व क्रमांक 049289

**ऋतू देब**
कंपनी सचिव
सदस्य क्रमांक – एफ 6754

**अबोध खांडेलवाल**
संचालक (वित्त)
आणि मुख्य वित्तीय अधिकारी
डीआयएन - 07807394

**अश्विनी भिडे**
व्यवस्थापकीय संचालक
अतिरिक्त कार्यभार
डीआयएन - 02861008

**स्थळ -** मुंबई
**दिनांक -** 28 जुलै, 2023

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील समभागामधील बदलांचे विवरणपत्र

### अ. समभाग भांडवल

(रुपये लाखात)

| तपशील | रक्कम |
|---|---|
| **दिनांक 31 मार्च, 2021 रोजीची शिल्लक** | 3,81,520.00 |
| वर्षभरात समभाग भांडवलात बदल | 59,200.00 |
| **दिनांक 31 मार्च, 2022 रोजी शिल्लक** | 4,40,720.00 |
| वर्षभरात समभाग भांडवलात बदल | 39,820.00 |
| **दिनांक 31 मार्च, 2023 रोजी शिल्लक** | 4,80,540.00 |

### ब. अन्य भाग

(रुपये लाखात)

| तपशील | राखीव आणि अधिशेष - राखून ठेवलेली मिळकत (एकूण भाग) |
|---|---|
| **1 एप्रिल, 2021 रोजीची शिल्लक (पुन्हा सादर केलेली)** | (8,098.42) |
| वर्षाकरिता नफा / (तोटा) | (1,678.76) |
| अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (कराचे निव्वळ) | (17.34) |
| **वर्षाकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न** | (1,696.10) |
| **31 मार्च, 2022 रोजीची शिल्लक (पुन्हा सादर केलेली)** | (9,794.52) |
| वर्षाकरिता नफा / (तोटा) | (2,813.63) |
| अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (कराचे निव्वळ) | (23.47) |
| **वर्षाकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न** | (2,837.10) |
| **31 मार्च, 2023 रोजीची शिल्लक** | (12,631.62) |

टीप - राखून ठेवलेल्या मिळकतीतील शिल्लक वेळोवेळी जमा झालेला नफा / (तोटा) दर्शवते.

सोबतच्या टीप क्र. 1-38 आणि इतर प्रकटीकरण वित्तीय विवरण पत्राचा अविभाज्य भाग आहेत"

आमच्या समदिनांकाच्या अहवालाप्रमाणे
**चंन्दाभॉय आणि जस्सूभॉयकरिता**
**सनदी लेखापाल**
**संस्था नोंदणी क्रमांक 101647W**

संचालक मंडळ आणि त्यांच्यावतीने
**मुंबई मेट्रो रेल महामंडळ मर्यादित**
**सीआयएन - U60100MH2008SGC181770**

**अंबेश अ. दवे**
भागीदार
सदस्यत्व क्रमांक 049289

**ऋतू देब**
कंपनी सचिव
सदस्य क्रमांक – एफ 6754

**अबोध खांडेलवाल**
संचालक (वित्त)
आणि मुख्य वित्तीय अधिकारी
डीआयएन - 07807394

**अश्विनी भिडे**
व्यवस्थापकीय संचालक
अतिरिक्त कार्यभार
डीआयएन - 02861008

**स्थळ -** मुंबई
**दिनांक -** 28 जुलै, 2023

## वित्तीय विवरणाचा भाग असलेल्या टिपण्यां

### महामंडळाची माहिती

मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित (किंवा मु.मे.रे.म.म.) (सिन क्रमांक U60100MH2008SGC181770) ही कंपनी भारतात लागू असलेल्या कंपनी कायद्यांतर्गत गठित झाली आहे. सदर कंपनी ही भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांचे 50:50 टक्के संयुक्त साहस आहे. कंपनीचे मुख्य उद्दिष्ट असे आहे - सध्या मुंबई उपनगरीय रेल्वे यंत्रणेने जोडल्या न गेलेल्या लोकांसाठी रेल्वेवर आधारित मोठ्या प्रमाणावर त्वरीत प्रवास करण्याची सुविधा निर्माण करणे. सदर मेट्रो व्यवस्था लोकांच्या स्थानापासून 500 मीटर्स ते 1 किलोमीटर इतक्या अंतरावर आणणे.

कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय मुंबई येथे आहे.

महामंडळाच्या दि.31 मार्च, 2023 रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाच्या वित्तीय विवरणाला संचालक मंडळाने दि.28 जुलै, 2023 रोजी मान्यता दिली आहे.

**1. महत्वाची लेखांकन धोरणे**

**1.1 वित्तीय विवरणों के निर्माण का आधार**

सदर वित्तीय विवरणे भारत सरकारच्या कंपनी कारभार मंत्रालयाने कंपनी कायदा, 2013 च्या कलम 133 नुसार सहपठित कंपनी (भारतीय लेखा मानके नियम 2015 (सुधारित) नुसार तसेच कंपनी कायदा, 2013 च्या अन्य लागू असलेल्या तरतुदीनुसार व भारतात सर्वसाधारणपणे मान्य केलेल्या लेखा धोरणांनुसार जारी केलेल्या भारतीय लेखा मानके (इंड एस) नुसार तयार केलेली आहे. तसेच भारतीय सनदी लेखापाल संस्थेने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांचा / घोषणांचा जेथे लागू असेल तेथे विचार केला आहे व त्याचा सातत्याने अवलंब केला आहे. कंपनीने उपरोक्त कालखंडात या लेखा धोरणांचा सातत्याने अवलंब केला आहे.

**1.2 मोजण्याचा पाया**

सदर वित्तीय विवरणे लेख्या पद्धतीचे संचित तत्व व चालू कंपनी तत्व व ऐतिहासिक परिव्यय तत्वावर तयार केली आहेत. मात्र काही वित्तीय साधनांचे व मालमत्तांचे मूल्यमापन भारतीय लेखा प्रमाणांनुसार उचित मूल्यानुसार (फेअर व्हॅल्यू) तयार केली आहेत, हा अपवाद आहे.

**1.3 अंदाजाचा उपयोग**

सामान्यत: स्वीकृत लेखांकन तत्वे (जीएएपी) यांच्याशी सुसंगत वित्तीय विवरण तयार करताना व्यवस्थापनाने वित्तीय विवरण करण्याच्या रोजी लेखांकन धोरणांच्या अंमलबजावणीवर परिणाम करणाऱ्या आणि नोंदविलेल्या मालमत्ता, दायित्वे, उत्पन्न आणि खर्च तसेच घटनासापेक्ष दायित्वांचे प्रकटन आणि खर्च तसेच वर्षादरम्यान प्रचलनाचे निकाल याबाबत निर्णय घेणे, अंदाज करणे व गृहितके धरणे आवश्यक असते. व्यवस्थापनाचा असा विश्वास आहे की, वित्तीय विवरणे तयार करताना केलेले अंदाज हे सुजाण व वाजवी आहे. तरीसुद्धा अंदाजाबाबतच्या अनिश्चिततेमुळे असे निकाल लागतात की, मालमत्ता किंवा देयता यांच्या पुढे नेण्याच्या किंमतीमध्ये महत्वाचे समायोजन करावे लागेल.

प्रत्येक अहवालाच्या दिवशी अंदाज व त्याबाबत गृहितके यांचा आढावा घेतला जातो. लेखा अंदाजे व गृहितके हे भावी प्रभावाने ओळखले जातात म्हणून ज्या काळात अंदाज सुधारला जातो व ज्या काळात तो प्रभावी होतो तो काळ.

### 1.4 चालू असलेले व चालू नसलेले वर्गीकरण

भारतीय लेखा मानक 1 च्या आवश्यकतेनुसार वित्तीय विवरणामध्ये ताळेबंदात मालमत्ता व देयता या चालू असलेल्या मालमत्ता व चालू नसलेल्या मालमत्ता या पायावर केल्या आहेत.

स्थगित कर मालमत्ता व देयता या चालू नसलेल्या देयता व मालमत्ता म्हणून वर्गीकृत केल्या आहेत.

कंपनीच्या सार्वजनिक पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या बांधकामाशी संबंधित असलेले कंपनीचे सर्वसाधारण कार्यचक्र प्रकल्पाचा आकार, विकासाचा प्रकार, प्रकल्पाचा किचकटपणा व संबंधित मान्यता (ॲप्रूव्हल्स) यावर अवलंबून असेल. परंतु ते सर्वसाधारणपणे 12 महिन्यांचे असेल. पूर्ण झालेले सर्व प्रकल्प व चालू व्यवसाय यांचे कार्यचक्र 12 महिन्यांचे असेल. मालमत्ता व देयता यांचे वर्गीकरण त्यांच्या कालचक्राच्या आधारे चालू किंवा चालू नसलेल्या असे केले आहे.

### 1.5 कार्यकारी व प्रस्तुतीची चलने

ही वित्तीय विवरणे भारतीय रुपयात प्रस्तुत केली जातात. हे देशाचे कार्यकारी चलन आहे. अन्यथा नमूद केले नसल्यास सर्व राशी जवळच्या लक्ष रुपयात सादर केल्या आहेत.

### 1.6 मालमत्ता, संयंत्रे व साधने

**ओळखणे व सुरुवातीची मोजणी**

- मालमत्ता, संयंत्रे व साधने ही प्राप्त करणे / त्यांचे बांधकाम करणे यांचा परिव्यय उणे संचित घसारा / परिशोधन, मूल्यहानी (असल्यास) यानुसार ओळखली जातात. परिव्ययात खरेदीचा खर्च अधिक सदर मालमत्ता सध्याच्या ठिकाणी आणण्याचा खर्च व ज्या कारणासाठी ती वापरावयाची आहे त्यासाठी ती योग्य स्थितीत आणण्यासाठीचा खर्च यांचा समावेश होतो, तसेच परिव्यय व अप्रत्यक्ष परिव्यय यांचा समावेश प्रत्यक्ष होतो. मालमत्तेच्या चाचणीमध्ये जर काही उत्पन्न प्राप्त झाले तर ते मालमत्तेच्या परिव्ययातून वजा केले जाते. परिव्ययात संयंत्राचा व साधनांचा / उपकरणांचा भाग बदलण्याच्या परिव्ययाचा समावेश होतो. कर्जाच्या परिव्ययामध्ये मालमत्ता, संयंत्रे, उपकरणे इत्यादी प्राप्त करणे / त्यांचे बांधकाम करणे / विकास करणे की ज्यामध्ये ती मालमत्ता संयंत्र अपेक्षित वापरासाठी तयार व्हायला खूप वेळ लागतो त्यावेळेपर्यंतच्या त्यांच्या परिव्ययाचा समावेश होतो.

- मालमत्ता, संयंत्रे व उपकरणे ताळेबंदाच्या दिवशी जर अपेक्षित वापरासाठी तयार नसतील तर त्या प्रगतीपथावरील भांडवल म्हणून ताळेबंदात दाखवल्या जातात.

- काम करणाऱ्या संस्थांकडून काम पूर्ण झाल्यावर प्राप्त झालेल्या देयकांच्या आधारे डिपॉझिट वर्क / कंत्राटे यांचे भांडवलीकरण केले जाते आणि जर देयके प्राप्त झाली नसतील तर त्या कामांच्या तांत्रिक मूल्यमापनाच्या आधारे या खर्चाचे भांडवलीकरण करण्यात येते. एखाद्या मालमत्तेबरोबर कर्जाचा व व्याजाचा जो भाग ओळखता येईल तो भाग त्या मालमत्तेच्या परिव्ययात जोडला जाईल. सदर मालमत्ता त्या मालमत्तेच्या अपेक्षित वापरासाठी तयार होईपर्यंतच्या व्याजात काही सूट मिळाली तर ती परिव्ययातून वजा केली जाईल त्याचबरोबर मालमत्तेसंबंधीचे इतर खर्च आणि मालमत्ता सुटी करणे, मालमत्ता जेथे आहे तेथून जेथे ती वापरावयाची आहे तेथे नेणे व परत जुळवणे याचा खर्च त्या मालमत्तेच्या परिव्ययात जोडला जातो.

- जर एखादी मालमत्ता अपेक्षित वापरासाठी तयार असेल पण त्या मालमत्तेसंबंधीची देयके प्रदान करणे प्रलंबित असेल तर भांडवलीकरणातील समायोजनेच्या तात्पुरत्या तत्वावर केले जाईल व हे भांडवलीकरण अंतिम भांडवलीकरणाच्या अधिन असेल.

**त्यानंतरची मोजणी (घसारा व उपयुक्त आयुष्य)**

- मालमत्तेचा परिव्यय आबंटित करण्यासाठी त्यांच्या उर्वरित उपयुक्त आयुष्यावर कंपनी कायदा, 2013 च्या सूची 2 चा भाग क मध्ये नमूद केल्याप्रमाणे सरळ रेषा पद्धतीने घसारा आकारला जातो. मात्र याला खालील अपवाद आहेत. याबाबत मालमत्तेचे उपयुक्त आयुष्य तांत्रिक आणि / किंवा व्यवस्थापकीय मूल्यमापनावर आधारित उर्वरित उपयुक्त आयुष्याचा विचार केला जातो.

| मालमत्तेचे नाव | विचारात घेतलेले उपयुक्त आयुष्य | खालील बाबींचा / मालमत्तेचा विचार केला आहे. |
|---|---|---|
| **इमारत** | 5 वर्ष | संक्रमण कार्यालय इमारत व सौरउर्जा संयंत्र |
| **संगणक आणि उपकरणे** | 3 वर्ष | सर्व्हर्स व नेटवर्क यंत्रे |
| **फर्निचर आणि फिक्स्चर** | 5 वर्ष | काम करण्याची जागा व सोफा |
| **कार्यालयातील उपकरणे** | 3 वर्ष | युपीएस, मोबाईल कॅमेरा इ. |

- प्रत्येक मालमत्तेचे, संयंत्राचे व उपकरणे, साधने यांचे उपयुक्त आयुष्य आणि घसारा आकारण्याची पद्धत यांचा प्रत्येक वित्तीय वर्षाच्या शेवटी आढावा घेतला जातो व आवश्यकता असल्यास यात पुढील वर्षात समायोजन केले जाते.

- भाडेपट्टीने घेतलेल्या जमिनीवर केलेल्या विकासाचे परिशोधन ती जमीन किती काळ वापरायची व वापरायच्या अन्य अटी व शर्तींवर ठरवली जाते.

- ज्या मालमत्तेचा परिव्यय रु.5,000/- किंवा त्यापेक्षा कमी आहे ती मालमत्ता ज्या वर्षात खरेदी केली त्या वर्षात परिशोधन करुन त्यावर घसारा आकारला जातो.

- ज्या दिवशी मालमत्ता वापरायला तयार होते त्या दिवसापासून प्रमाणामध्ये घसारा आकारला जातो.

- वेगवेगळे उपयुक्त आयुष्य असलेल्या विविध भागांची लेखा वेगवेगळी केली जाते व त्यावर वेगवेगळा घसारा आकारला जातो.

**ओळख नाहीशी करणे**

- मालमत्ता, संयंत्रे व उपकरणे हे निवृत्त झाल्यावर किंवा तिची विल्हेवाट लावल्यावर त्यापासून मिळालेले फायदे किंवा तोटे हे नफा-तोटा खात्यात ओळखले जातात.

**जमीन**

विविध शासकीय संस्थांसह व शासकीय विभागांसह जमीन मालकांनी कंपनीला जे भूखंड दिलेले आहे आणि ज्यांचा ताबा कंपनीकडे आहे त्यांची ओळख ताबा घेताना किंवा त्यांचे पैसे देताना यापैकी जे आधी असेल त्यावेळी केली जाते.

वाढलेल्या मोबदल्याची लेखा सदर मोबदला देय असेल त्यावेळी केली जाते.

पुर्नवसनाचा व पुनर्स्थापनेचा परिव्यय जमिनीच्या परिव्ययात जोडला जातो.

ताब्यात असलेल्या जमिनीसाठी (भाडेपट्ट्याच्या जमिनीसह) तात्पुरते केलेले प्रदान किंवा त्याबद्दल लेख्यांमध्ये तरतूद, बांधकाम प्राप्त करण्यासाठी आलेला परिव्यय उणे अशी बांधकामे पाडून मिळालेले पैसे ही रक्कम त्या जमिनीचा परिव्यय (भाडेपट्टीच्या जमिनीसह) समजला जातो.

**शासकीय जमीन**

राज्य शासनाच्या विविध संस्था / विभाग यांच्याकडून मोफत मिळालेल्या जमिनी यांची मालकी / ताबा / नियंत्रण कंपनीकडे असते, त्या नाममात्र किंमतीला ओळखल्या जातात.

**खाजगी पक्षकारांकडून प्राप्त झालेल्या जमिनी व अन्य जमिनी**

प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यामध्ये आवश्यक असलेल्या संरचनेमध्ये ओळखल्या व इतर संस्था व खाजगी पक्षकार यांच्याकडून प्राप्त झालेल्या जमिनी त्यांच्या अधिग्रहणाच्या किंमतीला ओळखल्या जातात.

### 1.7 अदृश्य मालमत्ता

**ओळख आणि प्रारंभीचे मोजमाप**

- वेगळया प्राप्त केलेल्या अदृश्य मालमत्ता सुरुवातीला परिव्ययाला ओळखल्या जातात. त्यानंतर अदृश्य मालमत्ता परिव्यय उणे संचित परिशोधन व संचित मूल्य हानी तोटा (असल्यास) या रकमेला ओळखल्या जातात.

- परिव्ययामध्ये सदर मालमत्ता प्राप्त करण्याची किंमत, विकासाचा परिव्यय व आणखी ती मालमत्ता अपेक्षित वापरात आणण्यासाठी केला जाणारा कोणताही ओळखता / आबंटन करता येण्यासारखा परिव्यय यांचा समावेश आहे.

- एखादी जमीन तात्पुरती मोफत वापरण्यासाठी परवानगी शासनाकडून / अन्य संस्थांकडून मिळाल्यास तिला अदृश्य मालमत्ता समजले जाईल. ही परवानगी – हक्क नाममात्र मूल्याला ओळखले जातील.

- त्यानंतर केलेल्या खर्चाशी संबंधित आर्थिक फायदे कंपनीला मिळणार असतील तरच सदर खर्चाचे भांडवलीकरण केले जाईल.

- विकसित केल्या जात असलेल्या मालमत्तांवर केलेला खर्च विकसित केली जाणारी अदृश्य मालमत्ता म्हणून दाखवली जाते व ती मालमत्ता वापरासाठी पूर्णपणे तयार होत नाही तोवर तिच्यावर घसारा आकारला जात नाही.

**परिशोधन**

निश्चित उपयुक्त आयुष्य असलेल्या सर्व अदृश्य मालमत्ता त्यांच्या उपयुक्त आयुष्यावर सरळ रेषा पद्धतीने परिशोधन केल्या जातात. सॉफ्टवेअरसह अदृश्य मालमत्ता ज्या संबंधित हार्डवेअरचा एकत्रित भाग नाहीत ते कायदेशीररीत्या वापरण्याचा काळ किंवा 5 वर्षे यामध्ये जे कमी असेल या काळात सरळ रेषा पद्धतीने परिशोधन केल्या जातात.

अदृश्य मालमत्तेचे उर्वरित मूल्य, उपयुक्त आयुष्य व परिशोधनाच्या पद्धती यांचे प्रत्येक वित्तीय वर्षाच्या शेवटी पुनरावलोकन केले जाते व योग्य असल्यास पुढे भावी प्रभावाने आवश्यक ते समायोजन केले जाते.

### 1.8 प्रगतीपथावरील भांडवली कार्य

प्रगतीपथावरील भांडवली खर्च हा परिव्यय उणे मूल्य हानी (असल्यास) या राशीला दाखवला जातो. परिव्ययामध्ये सर्व प्रत्यक्ष व ओळखण्यासारखे अप्रत्यक्ष खर्च समाविष्ट आहेत (त्यामधून बांधकामासाठी किंवा मालमत्ता प्राप्त करण्यासाठी कर्ज काढून उभारलेल्या निधीचा वित्तीय परिव्यय समाविष्ट आहे) असा खर्च प्रगतीपथावरील भांडवली खर्च म्हणून प्रकल्प पूर्ण होईपर्यंत ओळखला जातो. त्यानंतर तो खर्च ओळखता येईल अशा मालमत्तेला, संयंत्राला, उपकरणे व साधने यांना आबंटित केला जातो. भांडवलीकरण करण्याआधी अशा भांडवली प्रकल्पाने काही उत्पन्न मिळवले तर ते प्रगतीपथावरील भांडवली खर्चाबरोबर समायाजित केले जाते. पैश्याच्या रुपातील नुकसान भरपाईची अंतिम बिलाचे प्रदान करण्याच्या वेळी लेखा केली जाईल. किंमतीमधील बदलासह दाव्यांच्या लेखी स्वीकृतीच्या पायावर केली जाते. जे प्रशासकीय व सर्वसाधारण ओव्हरहेड्स प्रकल्पाच्या तांत्रिक भागाबरोबर ओळखता येतात त्यांचे भांडवलीकरण केले जाते.

प्रकल्पाशी संबंधित जे.आय.सी.ए. यांच्याकडून व्याज असलेल्या कर्जासमोर मिळालेल्या तात्पुरत्या (पासथ्रू असिस्टंस) सहाय्यावर मिळालेले व्याज व कंत्राटदारांना व्याजावर दिलेल्या अग्रिमावरील व्याज इत्यादींचे प्रगतीपथावरील भांडवली कार्य या अंतर्गत बांधकाम चालू असताना मिळालेले व्याज असे समायोजन केले जाते. बांधकाम चालू असताना व्याजाचे आबंटन वर्षामध्ये चालू केलेल्या प्रकल्पाच्या बांधकाम काळामधील व्याज हे चालू केलेल्या प्रकल्पाचे मूल्य आणि एकूण प्रगतीपथावरील भांडवल यांच्या गुणोत्तरात केले जाते.

**बांधकामादरम्यान व्याज वाटप**

बांधकाम चालू असताना व्याजाचे आबंटन वर्षामध्ये चालू केलेल्या प्रकल्पाच्या बांधकाम काळामधील व्याज हे चालू केलेल्या प्रकल्पाचे मूल्य आणि एकूण प्रगतीपथावरील भांडवल यांच्या गुणोत्तरात केले जाते.

### 1.9 मालसाठा आणि सुटे भाग

ज्या सुट्या भागांचे उपयुक्त आयुष्य एक वर्षापेक्षा जास्त आहे व किंमत रु.10.00 लाखापेक्षा जास्त आहे अशा सुट्या भागांचे त्या-त्या शीर्षाखाली भांडवलीकरण केले जाते.

सुटी उपकरणे, हत्यारे यांचे मूल्यांकन परिव्यय किंवा किंमत यातील जे कमी असेल त्याने केले जाते. ते भारित सरासरी पायावर आणि निव्वळ प्राप्य होण्यायोग्य किंमत या आधारे ठरवले जाते.

### 1.10 बिगर वित्तीय मालमत्तेचे नुकसान

अंतर्गत बाह्य घटकांमुळे मालमत्तेच्या किंमतीमध्ये काही हानी झाली आहे काय हे ओळखण्यासाठी मालमत्तेच्या पुढे आणलेल्या रकमेचे प्रत्येक ताळेबंदाच्या दिनांकाला पुनरावलोकन केले जाते. ज्यावेळी मालमत्तेची पुढे आणण्याची रक्कम किंवा त्या मालमत्तेच्या रोकड निर्माण करणाऱ्या युनिटची पुढे आणण्याची रक्कम तिच्या वसूल होणाऱ्या किंमतीपेक्षा जास्त असते. मालमत्तेची वसूल होणारी रक्कम म्हणजे ती विकल्यास जी रक्कम येईल, ती किंवा वापरातील किंमत यात जे अधिक असेल ती मालमत्तेची वापरात असलेली किंमत ओळखताना भविष्यातील अंदाजे रोकड अंतर्प्रवाह भांडवलाची सरासरी किंमत (भारित) ही पद्धत वापरुन डिस्काऊंट केले जातात व वर्तमान काळातील किंमत ओळखली जाते. अशा रीतीने झालेली मालमत्तेची हानी उत्पन्न व खर्च विवरणामध्ये ओळखली जाते. असे आढळल्यास मालमत्तेची वसूल होऊ शकेल अशा किंमतीचा अंदाज केला जातो.

जर हानी झालेल्या मालमत्तेच्या वसूल करता येणाऱ्या किंमतीच्या अंदाजामध्ये बदल झाला तर हानी झालेल्या मालमत्तेच्या तोट्याची लेखा उलटली जाते. जर मालमत्तेची हानी झाली नसती तर त्या मालमत्तेची पुढे नेण्याची रक्कम (घसारा किंवा परिशोधन यांचा आकार केल्यानंतरची निव्वळ रक्कम) ही मालमत्तेच्या पुढे रकमेपेक्षा ज्या रकमेने जास्त नसते इतक्या रकमेने फक्त सदर लेखा ओळखली जाते. सदिच्छेमध्ये झालेली हानी ओळखली जात नाही.

## 1.11 परकीय चलन व्यवहार

परकीय चलनातील व्यवहार असा व्यवहार ज्या दिवशी करण्यात आला त्या दिवशीच्या कार्यकारी चलन व परकीय चलन यांच्या विनिमय दरानुसार नोंदविण्यात येतो.

ताळेबंदात नमूद परकीय चलनातील मौद्रिक मालमत्ता आणि दायित्वे, ताळेबंदाच्या तारखेच्या दिवशीच्या विनिमय दरानुसार परावर्तीत केल्या जातात.

पैशाव्यतिरिक्त बाबी ज्या मुळ परीव्यायात गणल्या जातात त्या व्यवहार तारखेच्या दिवशीच्या विनिम य दरानुसार परावर्तीत केल्या जातात. तसेच पैशाव्यतिरिक्त बाबी त्या रास्त मुल्ल्यात पुर्ती केल्या जातात किवा त्या सारख्या मुल्यामापानात ताळेबंदाच्या तारखेच्या दिवशीच्या विनिमय दरानुसार परावर्तीत केल्या जातात.

परकीय चलनातील फरक - परकीय चलनाच्या विनिमय दरातील तफावतीमुळे परकीय चलनातील मौद्रिक मालमत्ता आणि दायित्वे यांची पूर्तता / परावर्तन करताना होणारा लाभ व हानी, नफा व तोटा लेखांकनामध्ये नोंदविण्यात येतो (ओळखला जातो).

## 1.12 उत्पन्न ओळखणे

**उत्पन्न**

कंपनी अद्यापही बांधकाम टप्पा / विकास टप्पा यामध्ये आहे. तिचे कार्यचालन अद्याप सुरु झाले नाही. त्यामुळे कार्यापासून उत्पन्न याबाबतची कंपनीची धोरणे अद्याप ठरलेली नाहीत. ग्राहकांबरोबरच्या कंत्राटापासून उत्पन्ने ही भारतीय लेखा मानक 115 (ग्राहकांबरोबरच्या कंत्राटातून प्राप्त होणारे उत्पन्न) नुसार ओळखली जातात. ही रक्कम म्हणजे वचन दिलेला माल किंवा सेवा ग्राहकाला हस्तांतरीत केल्यावर ज्या मालाच्या / सेवेच्या अदलाबदलीबद्दल कंपनी जी रक्कम प्राप्त होण्याची अपेक्षा करते ती रक्कम. एखादी कामगिरी करण्याची जबाबदारी पार पाडल्यावर प्राप्त होणारे उत्पन्न ज्या जबाबदारीला आबंटन केलेली ही व्यवहार किंमत (बदलत्या मोबदल्याच्या निव्वळ) विकलेला माल व दिलेल्या सेवेची व्यवहार किंमत ही विविध सूट व कंपनीने कराराचा भाग म्हणून देऊ केलेल्या योजनांच्या निव्वळ असते. बदलणारा मोबदला हा बाह्य प्रवाहाच्या अपेक्षित किंमतीवर / मूल्यावर आधारित असतो. जेव्हा उत्पन्न ओळखण्याच्या बाबतीतील अनिश्चितता संपेल तेव्हा ती उत्पन्नांच्या रकमात मोठा बदल करण्याच्या अधिन असणार नाही अशी जेव्हा शक्यता असते तेव्हा त्याच रकमेपर्यंत उत्पन्न ओळखले जाते.

स्थिर / निश्चित किंमत कराराच्या अंतर्गत उत्पन्न हे एकूण परिव्यय अधिक योग्य मार्जिन (फायदा) ही पूर्णतेची टक्केवारी ही पद्धत वापरुन ठरवली जाते. पूर्णतेची टक्केवरी ही आजपर्यंत झालेला परिव्यय व कराराचा एकूण अंदाजे परिव्यय यांच्या गुणोत्तरावर ठरवली जाते. सेवांचे नियंत्रण ग्राहकांच्या ताब्यात दिल्यावर जी रक्कम मोबदला म्हणून त्या सेवांबाबत प्राप्त होईल अशी आपल्याला अपेक्षा असते ते उत्पन्न असते. मात्र जेथे मैलाचे दगड ठरवलेले असतात तेथे हे लागू होत नाही.

**अन्य बिगर कार्यचालन उत्पन्न**

बांधकाम कामगारांसंबंधात कंत्राटदारांकडून प्राप्त झालेले भाड्याचे उत्पन्न हे संचित तत्वावर ओळखले जाते व प्रगतीपथावरील भांडवली कार्याबरोबर समायोजित केले जाते.

अन्य बिगर कार्यचालन उत्पन्न जरी संचित झाले व देय नसले तर ते संचित तत्वावर ओळखले जातात.

**व्याजाचे उत्पन्न**

कंपनीच्या सभासदांना प्राप्त झालेल्या योगदानातून केलेल्या मुदत ठेवींच्या व्याजाचे उत्पन्न नफा तोटा पत्रकात ओळखले जाते.

कंत्राटदारांकडून प्राप्य व्याज हे जर ते प्राप्त होण्याबाबत अनिश्चितता नसेल तर संचित तत्वावर नफा तोटा पत्रकात ओळखले जाते.

**1.13 कर्ज काढण्याचा परिव्यय**

काही पात्र मालमत्ता ज्या काळात पूर्णपणे तयार होऊन अपेक्षित वापरासाठी तयार होतो किंवा वापरासाठी तयार होती त्या काळात ती मालमत्ता प्राप्त करणे, त्याचे बांधकाम करणे किंवा त्याचे उत्पादन करण्यासाठी जो परिव्यय केलेला सदर मालमत्तेबरोबर ओळखता येतो तो कर्ज काढण्याचा परिव्यय असतो. पात्र मालमत्ता म्हणजे जी मालमत्ता त्यांच्या अपेक्षित वापरासाठी किंवा विक्रीसाठी तयार होण्यासाठी खूप वेळ घेते ती मालमत्ता. पात्र मालमत्ता वरील खर्चासाठी काढलेल्या विशिष्ट कर्जाची, तो खर्च होईपर्यंत केलेल्या गुंतवणुकीपासून मिळालेले उत्पन्न हे भांडवलीकरणासाठी पात्र अशा कर्जाच्या परिव्ययातून वजा केले जातात. कर्ज काढण्याचा अन्य खर्च / परिव्यय हा ज्या काळात खर्च हातो त्या काळात ओळखला जातो.

**1.14 कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर मिळणारे लाभ**

**निश्चित योगदान योजना**

कर्मचारी निर्वाह निधी व सेवानिवृत्ती वेतन योजना अशा स्वरुपाचे निवृत्तीनंतरचे लाभ हे नफा तोटा पत्रक / प्रगतीपथावरील भांडवली कार्य येथे खर्ची टाकले जाते.

**निश्चित लाभ योजना**

उपदान ही निश्चित लाभ योजना आहे.

उपदानासाठीची तरतूद ही अहवालाच्या दिवशीच्या ॲक्च्युरियअल मूल्यमापनाच्या आधारावर काढली जाते व ती नफा तोटा पत्रक / प्रगतीपथावरील भांडवली कार्य यामध्ये खर्ची टाकली जाते. सदर ॲक्च्युरियअल मूल्यमापन प्रोजेक्टेड युनिट क्रेडीट पद्धतीने केले जाते. कंपनीने भारतीय जीवन विमा महामंडळाबरोबर उपदान विश्वस्त निधी स्थापन केली आहे.

ॲक्च्युरियअल लाभ व तोटा यांचा समावेश असलेली पुनर्मोजणी (री-मेजरमेंट्स), मालमत्तेवरील सर्वोच्च मर्यादा (निव्वळ निश्चित देयतेवरील निव्वळ व्याज वगळून आणि योजना मालमत्तेवरील परतावा वगळून) ही ताळेबंदामध्ये ओळखली जाते व ज्या कालखंडात हे होते त्या कालखंडामध्ये त्याला सुसंगत / संबंधित (corresponding) अशा अन्य सर्वसमावेशक उत्पन्नामधून ठेवलेल्या उत्पन्नाला डेबीट किंवा क्रेडीट केले जाते. पुनर्मोजणी ही नंतरच्या काळात नफा तोटा खात्यामध्ये पुनर्वर्गीकृत केली जात नाही.

**अन्य फायदे – अर्जित रजा**

रजेचे रोखीकरण हे नफा तोटा खात्यावर ज्यावेळी तो केला जातो त्यावेळी खर्च म्हणून ओळखला जातो. कंपनी हा खर्च प्रोजेक्ट युनिट पद्धत वापरुन ताळेबंदाच्या दिवशी ॲक्च्युरियअल मूल्यमापन केले जाते व या खर्चाचे दायित्व ठरवते.

**प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतनानंतरचे फायदे देणे -**

भारत सरकार / महराष्ट्र शासन / अन्य शासकीय विभाग / सार्वजनिक उपक्रम यांचे कर्मचारी प्रतिनियुक्तीवर महामंडळात काम करीत असल्यास त्यांच्या भविष्य निर्वाह निधीचे योगदान, परदेशी सेवा योगदान आणि अन्य वैधानिक देयता या त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिल्या जाणाऱ्या वर्ष अखेर असे लाभ किती देय होतील त्याचा अंदाज केला जातो व त्यासाठी तरतूद केली जाते व ती वित्तीय विवरणामध्ये दर्शविली जाते.

## 1.15 आयकर

**चालू आयकर**

अहवालाच्या दिवशी अंमलात असलेले करविषयक कायदे, कराचे दर यांचा विचार करुन करापोटी किती रक्कम द्यावी लागेल याचा विचार केला जातो.

ज्या लेखा बाबी नफा तोट्याच्या बाहेर ओळखल्या जातात त्यांच्यावरील चालू आयकर एकतर अन्य सर्वसमावेशक उत्पन्नात किंवा समभागात ओळखला जातो. चालू आयकर हा संबंधित मूलभूत व्यवहाराबाबत एकतर अन्य सर्वसमावेशक उत्पन्न किंवा थेट समभागात ओळखला जातो.

कंपनी अशा ठिकाणी चालू कर मालमत्ता व चालू दायित्व ऑफसेट करते जिथे कपंनीला ओळखलेल्या रकमा ऑफसेट करण्याचा कायदेशीर हक्क आहे आणि जेथे कंपनीला त्या देयतांची पूर्तता निव्वळ तत्वावर करण्याची इच्छा असेल तेव्हा ती निव्वळ तत्वावर ही देयता ऑफसेट करते किंवा एकाच वेळी ती मालमत्ता विकते व देयतांची पूर्तता करते.

**स्थगित कर**

कर मालमत्तेचा कर पाया व कर देयताचा पाया आणि अहवाल दिले त्यांच्या पुढे नेण्याच्या रकमा यांमधील तात्पुरत्या फरकावर देयता पद्धती वापरुन स्थगित कराचे प्रावधान केले जाते.

जोपर्यंत करपात्र नफा उपलब्ध असेल अशी शक्यता असेल ज्याच्यासमोर वजावट करण्यायोग्य तात्पुरते फरक व न वापरले गेलेले टॅक्स क्रेडीट आणि न वापरलेले कर तोटे वापरले जाऊ शकतात त्या प्रमाणात स्थगित कर ओळखले जातात.

स्थगित करांची पुढे नेण्याच्या रकमेचा प्रत्येक अहवाल दिवशी आढावा घेतला जातो आणि स्थगित कर मालमत्ता पूर्णपणे किंवा अंशत: वापरण्यासाठी उपलब्ध असणे जोपर्यंत शक्य होणार नाही त्या प्रमाणात सदर पुढे नेण्याची रक्कम कमी केली जाते.

जेव्हा स्थगित कर मालमत्ता व देयता एकाच कर प्राधिकरणाने लावल्या असतील आणि सदर प्राधिकरण स्थगित कर मालमत्ता व स्थगित कर देयता यांची निव्वळ तत्वावर पूर्तता करु इच्छिते तेव्हाच त्या ऑफसेट केल्या जातात.

नफा तोटा खात्याच्या बाहेर ओळखलेल्या बाबींसंबंधित स्थगित कर हा नफा तोटा विवरणांबरोबर ओळखला जातो.

ज्यावर्षी तात्पुरते फरक प्राप्त होतील किंवा त्यांची पूर्तता केली जाईल अशी अपेक्षा आहेत असा वर्षात कर दर वापरुन स्थगित कर मालमत्ता व देयतांचे मोजमाप केले जाते.

## 1.16 भाडेपट्टा

**भाडेकरुन (लेजी) म्हणून कंपनी –**

कंपनीने दि.01.04.2019 पासून भारतीय लेखा मानक 116 – लेसी याचा स्वीकार केला आहे व त्यासाठी बदललेला पूर्वलक्षी प्रभाव या पद्धतीचा वापर केला आहे. त्यानुसार पूर्वीच्या काळाची माहिती पुन्हा प्रस्तुत केली आहे. या पद्धतीच्या वापराचा सुरुवातीच्या दिवशीच्या माहितीवरील संचित परिणाम प्रगतीपथावरील भांडवली कार्य यामध्ये ओळखला जातो. कंपनीची भाडेपट्ट्यावरील मालमत्ता यात मुख्यत: भाड्याने घेतलेली

जमीन व इमारती यांचा समावेश असतो. संयुक्त भाडेपट्टा करारामध्ये जमीन व इमारत यांचे मूल्य निर्धारण वेगवेगळे केले जाते. ज्यावर्षी तात्पुरते फरक प्राप्त होतील किंवा त्यांची पूर्तता केली जाईल अशी अपेक्षा आहे त्याबाबत ज्या काळात कराचे दर बदलले जातात त्या काळातल्या दरांचा परिणाम वापरुन त्यावेळचे कर दर वापरुन स्थगित कर मालमत्ता व देयतांचे मोजमाप केले जाते.

“वापराचा हक्क असलेली मालमत्ता” यांच्यावर सुरुवातीच्या दिवसापासून भाडेपट्टा कराराची मुदत किंवा मालमत्तेचे उपयुक्त आयुष्य यापैकी जे कमी असेल त्या काळासाठी सरळ रेषा पद्धतीने घसारा आकारला जातो.

भाड्यामध्ये कोणताही बदल किंवा सुधारलेले इन सबस्टन्स निश्चित भाडे प्रदान याबाबतच्या समायोजनासाठी “वापराचा हक्क असलेली मालमत्ता” आणि भाड्याची देयता यांचे समायोजन केले जाते.

I) भाड्याची देयता ही सुरुवातीला भावी भाड्याच्या रकमांची सध्याची (प्रेझेंट) किंमत असते. भाड्याच्या रकमा भाडे करारामध्ये दिलेल्या व्याजाच्या दरात सूट दिली जाते किंवा जर हे सहज ठरवता येत नसेल तर परिणामकारक व्याज दर वापरला जातो. त्यानंतर भाडे देयता पुढीलप्रमाणे पुन्हा मोजली जाते. देयतेवरील व्याजाचा परिणाम दाखवण्यासाठी पुढे नेण्याची (कॅरिइंग अमाऊंट) रक्कम वाढवली जाते आणि दिलेल्या भाड्याचा परिणाम  दाखवण्यासाठी पुढे नेण्याची किंमत (कॅरिइंग अमाऊंट) कमी केली जाते.

II) काही घटना घडल्यानंतर भाड्याची देयता पुन्हा मोजली जाते. जसे भाडे कराराची मुदत बदलणे किंवा भाड्याची रक्कम ठरवण्यासाठी इंडेक्स दर बदलणे. पुन्हा मोजणी केल्यास भाड्याने घेतलेल्या मालमत्तेमध्येही समोयाजन केले जाते.

III) पूर्ण मोबदला देऊन प्राप्त केलेल्या मालमत्तेबाबत हा मोबदला हीच व्यवहार किंमत असते अशी मालमत्ता “ वापरण्याची हक्क मालमत्ता” या शीर्षाखाली व्यवहार किमतीला दाखवली जाते व तेथे अनुषंगिक देयता निरंक असते.

आम्ही याद्वारे अहवाल देतो की आमच्या मते, कंपनीने, 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षाच्या लेखापरीक्षण कालावधीत येथे सूचीबद्ध केलेल्या वैधानिक तरतुदींचे पालन केले आहे आणि तसेच कंपनीकडे योग्य बोर्ड-प्रक्रिया आणि अनुपालन-यंत्रणा आहे. यापुढे केलेल्या अहवालाच्या मर्यादेपर्यंत, रीतीने आणि अधीन राहून:

आम्ही खालील तरतुदींनुसार ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या वर्षासाठी कंपनीने भरलेली पुस्तके, कागदपत्रे, मिनिट बुक्स, फॉर्म आणि रिटर्न आणि इतर नोंदी तपासल्या आहेत:

लीज सुरू होण्याच्या तारखेला, कंपनी वापरण्याचा हक्क असलेली मालमत्ता (“ROU”) आणि संबंधित भाडेपट्टीची जबाबदारी ओळखते ज्यामध्ये ती भाडेपट्टेदार आहे, बारा महिन्यांच्या मुदतीच्या लीजशिवाय किंवा कमी (अल्पकालीन भाडेपट्टे) आणि कमी मूल्याच्या मालमत्तेचे भाडेपट्टे, जेथे भाडेपट्टीच्या एकूण मुदतीवरील भाडेपट्टीचे मूल्य रु. पर्यंत आहे. 1 कोटी.

अल्पमुदतीसाठी आणि कमी मूल्याच्या अंतर्निहित मालमत्तेच्या लीजसाठी, कंपनी लीज पेमेंटला लीजच्या मुदतीवरील सरळ रेषेच्या आधारावर ऑपरेटिंग खर्च म्हणून ओळखते. प्रत्येक लीज करारावर देय भाडेपट्टा भाड्याचे मूल्य 1 कोटी रुपयांपेक्षा जास्त भाडेपट्टी कालावधीच्या एकूण कालावधीसाठी साहित्य मानले जाते आणि त्यानुसार मानकांची आवश्यकता लागू केली जाते.

आरओयू मालमत्तेचे सुरुवातीच्या तारखेपासून लीज मुदतीच्या कमी आणि अंतर्निहित मालमत्तेच्या उपयुक्त आयुष्यापेक्षा सरळ रेषेच्या आधारावर घसारा होतो.

कोणत्याही लीज फेरफार किंवा सुधारित इन-सबस्टन्स फिक्स्ड लीज पेमेंट्स प्रतिबिंबित करण्यासाठी वापरण्याचा हक्क आणि लीज दायित्व देखील समायोजित केले जाते.

**कपंनीने मालमत्ता भाड्याने देणे –**

ज्या भाडे करारामध्ये कंपनी मालमत्तेचे जवळजवळ सर्व धोके व मालकीचे फायदे हस्तांतरीत करीत नाही त्याला कार्यचलित भाडे करार (ऑपरेटींग लीज) म्हणतात. अशा प्रकारच्या भाडे करारातून काही भाड्याचे उत्पन्न (बांधकामाच्या हेतूसाठी वगळून) हा संबंधित भाडे कराराच्या मुदतीसाठी सरळ रेषा पद्धतीने ओळखला जातो. मात्र जेथे वाढवलेले भाडे हे चलन फुगवटा दाखवते तेव्हा भाड्याच्या खर्चाची लेखा त्या काळच्या प्रत्यक्ष भाड्याने केली जाते.

ज्या भाडे करारांतर्गत कंपनी मालमत्तेचे जवळजवळ सर्व हक्क व सर्व जोखीम भाडेकरुंना हस्तांतरीत केले जाते त्या कराराला वित्तीय भाडे करार (फायनान्शियल लीज) असे म्हटले जाते. या प्रकारच्या भाडे करारामध्ये भाडेकरुंकडून प्राप्य असलेल्या राशी भाडे करारांतर्गत कंपनीच्या निव्वळ गुंतवणुकीमध्ये प्राप्य रकमा म्हणून दाखवल्या जातात. भाड्याच्या संदर्भात निव्वळ उर्वरित गुंतवणुकीवरील त्या त्या काळातील परताव्याचा सातत्यपूर्ण दर दिसून येण्यासाठी वित्तीय भाडे करारापासून प्राप्त झालेले उत्पन्न लेखा कालखंडाला आबंटित केले जाते.

## 1.17 प्रति भाग मिळकत

प्रतिभाग मिळकत गणना करण्यासाठी, कंपनी समभागधारकांशी जोडता येईल इतका निव्वळ नफा ग्राह्य धरते. मूलभूत प्रतिभाग मिळकत गणण्यासाठी, भागांची संख्या म्हणजे त्या कालावधीत शिल्लक असलेल्या समभागांची भारीत सरासरी संख्या होय.

सौम्यीकृत प्रतिभाग मिळकत गणण्यासाठी कंपनी समभागधारकांशी जोडता येईल इतका निव्वळ नफा व त्या कालावधीत शिल्लक असलेल्या समभागांची सरासरी संख्या यांचे सर्व सौम्यीकरण होऊ शकणाऱ्या समभागांच्या परिणामांसाठी समायोजन केले जाते.

## 1.18 रोख आणि रोखसमः-

रोख आणि रोखसम यामध्ये रोख रक्कम, हातातील धनादेश, बँकेतील शिल्लक रकमा, बँकेतील डिमांड डिपॉझिट (मागणी केल्यावर प्राप्त होणाऱ्या ठेवी) व माहिती असलेल्या रकमेला रोखीत रुपांतर होऊ शकेल अशा रोख रकमा ज्यांच्या किंमतीमधील बदलाची जोखीम अत्यंत कमी आहे अशा तीन महिने किंवा त्यापेक्षा कमी पक्वता कालावधी असलेल्या अल्प मुदतीची तरलता असलेली वित्तीय साधने / उपकरणे यांचा समावेश असतो.

Ind AS 7 मधील सुधारणांसाठी संस्थांनी रोख प्रवाह आणि नॉन-कॅश बदल (जसे की परकीय चलन नफा किंवा तोटा) या दोन्ही बदलांसह वित्तपुरवठा क्रियाकलापांमुळे उद्भवलेल्या त्यांच्या दायित्वांमधील बदलांचे प्रकटीकरण प्रदान करणे आवश्यक आहे. कंपनीने कॅश फ्लो स्टेटमेंटमध्ये वर्तमान आणि तुलनात्मक कालावधीसाठी माहिती प्रदान केली आहे.

## 1.19 तरतुदी, घटनासापेक्ष दायित्व व घटनासापेक्ष मालमत्ता –

खालील परिस्थितीमध्ये तरतुदी ओळखल्या जातात.

अ) भूतकाळातील घटनांमुळे कंपनीला वर्तमान काळात दायित्व आले आहे.

ब) सदर दायित्वाची पूर्तता करण्यासाठी कंपनीला रोख प्रदान करावे लागण्याची शक्यता उद्भवली आहे.

क) सदर दायित्वाचा विश्वासार्ह अंदाज करता येतो प्रत्येक ताळेबंदाच्या तारखेला तरतुदींचे पुनरावलोकन केले जाते.

खालील बाबतीत घटनासापेक्ष दायित्व प्रकट केले जाते.

1. भूतकाळातील घटनेमुळे वर्तमान काळात उद्भवणारे दायित्व जेव्हा स्त्रातोचे बर्हिंगमन त्या दायित्वाचे समाधान करण्यासाठी आवश्यक असेल हे शक्य नाही.

2. वर्तमानकाळातील दायित्वाचा विश्वासार्ह अंदाज करता येत नाही किंवा

3. जर स्त्रातोचे बर्हिंगमन होण्याची शक्यता अगदीच कमी नसेल तर वर्तमानकाळातील दायित्व जेव्हा कंपनीला आर्थिक लाभ होण्याची शक्यता असते तेव्हा घटनासापेक्ष मालमत्ता गणली जाते.

   घटनासापेक्ष देयतांसमोर आवश्यक असलेली घटनासापेक्ष देयता आणि तरतूद आणि घटनासापेक्ष मालमत्ता यांचे प्रत्येक अहवाल दिनांकाला पुनरावलोकन केले जाते.

   घटनासापेक्ष देयतांच्या समाधानासाठी शक्य होणारे स्त्रोतांचे बर्हिंगमन यांचा विचार करुन अंदाजित तरतुदींची निव्वळ रक्कम ही घटनासापेक्ष दायित्व असते.

### 1.20 सहाय्यक अनुदान

भांडवली मालमत्तेची निर्मिती करण्यासाठी शासकीय प्राधिकरणांकडून जे अनुदान दिले जाते, ते सुरुवातीला स्थगित उत्पन्न म्हणून दाखवले जाते. त्यानंतर ते उत्पन्न संबंधित मालमत्तेच्या आयुष्यामधील घसाऱ्याच्या प्रमाणात त्या त्या वर्षी दाखवले जाते.

जेव्हा कंपनीला शासकीय प्राधिकरणांकडून पैशाखेरीज अन्य स्वरुपात अनुदान मिळते तेव्हा सदर मालमत्ता व अनुदान हे नाममात्र किंमतीत नोंदले जाते व त्यानंतर ते मालमत्तेच्या अपेक्षित उपयुक्त आयुष्यावर आणि सदर मालमत्तेच्या वापराच्या फायद्यावर नफ तोटा पत्रकात दाखवले जाते.

शासकीय प्राधिकरणांकडून बाजारातील व्याजाच्या दरापेक्षा कमी दराने बिनव्याजी कर्ज मिळते (उप-कर्ज) तेव्हा ते शासकीय अनुदान म्हणून मोजले जाते. ही राशी म्हणजे कर्जाच्या वसुलीची रक्कम व चालू व्याज दरावर आधारीत कर्जाचे उचित मूल्य यामधील फरक अशी असते.

### 1.21 खंड अहवाल

कंपनीकडे अहवाल देण्यायोग्य केवळ एकच खंड आहे तो म्हणजे मुंबईमध्ये मेट्रो यंत्रणा विकसित करणे. त्यानुसार वित्तीय विवरणात येणाऱ्या राशी या कंपनीच्या एकच व्यवसाय खंडाशी संबंधित आहेत.

### 1.22 वित्तीय साधने / उपकरणे

वित्तीय साधने / उपकरणे म्हणजे असा कोणताही करार की जो एका संस्थेची (entity) वित्तीय मालमत्ता निर्माण करतो व दुसऱ्या संस्थेचे (entity) दायित्वे निर्माण करतो.

परिणामकारक व्याज दर म्हणजे जो व्याज दर भविष्यातील अंदाजित रोकड प्राप्त किंवा प्रदाने यांना वित्तीय साधने / उपकरणे यांच्या अपेक्षित आयुष्यावर किंवा कमी काळावर जे योग्य असेल त्यावर त्या वित्तीय मालमत्तेला किंवा दायित्वाला निव्वळ पुढे नेण्याच्या किंमतीला डिस्काऊंट करतो.

## 1.23 वित्तीय मालमत्ता

### सुरुवातीची मोजणी

जेव्हा कंपनी वित्तीय उपकरणे / साधने यांच्या कराराचे पक्षकार होते तेव्हा वित्तीय मालमत्ता ओळखली जाते. वित्तीय मालमत्ता सुरुवातीला उचित मूल्यावर मोजली जाते. वित्तीय मालमत्ता प्राप्त करण्यासाठी किंवा जारी करण्यासाठी (नफा तोटा खात्यातून योग्य किंमतीतील वित्तीय मालमत्तेखेरीज) आलेला खर्च त्या त्या वित्तीय मालमत्तेच्या सुरुवातीच्या ओळखलेल्या किंमतीमध्ये जोडला जातो किंवा वजा केला जातो.

### नंतरची मोजणी

नंतर वित्तीय मालमत्तेची पुढीलप्रमाणे मोजणी व वर्गवारी केली जाते.

- परिणामकारक व्याज दर पद्धत वापरुन परिशोधन केलेला परिव्यय
- अन्य सर्वसमावेशक उत्पन्न यातून योग्य किंमत
- नफा तोटा पत्रक यातून योग्य किंमत

### I) परिशोधन केलेल्या परिव्ययाद्वारे वित्तीय मालमत्ता

प्राथमिक मोजणीनंतर अशी वित्तीय मालमत्ता परिणामकारक व्याजदर पद्धत वापरुन परिशोधन परिव्ययाला मोजली जाते. असे परिणामकारक व्याज दरांचे अमोर्टायझेश्न नफा तोटा पत्रकाचे अन्य उत्पन्न यात समाविष्ट केले जाते. मूल्य हानीमुळे उद्भवलेले तोटे नफा तोटा पत्रकात ओळखले जातात.

### II) अन्य सर्वसमावेशक उत्पन्न यातून योग्य किंमतीला वित्तीय मालमत्ता

अन्य सर्वसमावेशक उत्पन्नामध्ये योग्य किंमतीच्या हालचाली ओळखल्या जातात. कर्ज दस्तऐवजांची ओळख नाकारल्यानंतर पूर्वी अन्य सर्वसमावेशक उत्पन्नात ओळखला गेलेला संचित लाभ किंवा तोटा यांचे समभागातून नफा तोट्यामध्ये पुनवर्गीकरण केले जाते.

### III) नफा तोटा पत्रकातून योग्य किंमतीला वित्तीय मालमत्ता

जी वित्तीय मालमत्ता वर्गीकरणासाठी परिशोधन परिव्यय म्हणून वर्गीकरणासाठी पात्र नाही किंवा अन्य सर्वसमावेशक उत्पन्न यातून योग्य किंमतीला वित्तीय मालमत्ता याच्या निकषात बसत नाही ती. ती नफा तोटा पत्रकातून योग्य किंमतीला वित्तीय मालमत्ता असे वर्गीकरण केले जाते ती लाभ किंवा तोटा हा नफा तोटा पत्रकात ओळखला जातो.

### अनोळखी करणे

जेव्हा करारानुसार वित्तीय मालमत्तेपासून रोख प्राप्त करण्याचे हक्क समाप्त होतात किंवा करारानुसार वित्तीय मालमत्ता हस्तांतरीत होते आणि असे हस्तांतरण अनोळखीकरणाला पात्र होते. तेव्हा वित्तीय मालमत्ता अनोळखी केली जाते.

जेव्हा करारानुसार वित्तीय मालमत्तेपासूनचे रोख प्रवाह मिळण्याचे हक्क समाप्त होतात किंवा वित्तीय मालमत्ता व महत्वाच्या जोखीम व मोबदला हे हस्तांतरीत होतात. तेव्हा ती वित्तीय मालमत्ता अनोळखी केली जाते.

## 1.24 वित्तीय देयता

**सुरुवातीची ओळख**

वित्तीय देयता सुरुवातीला योग्य किंमतीला ओळखली जाते आणि कर्ज व देय रकमांच्या बाबतीत ती थेट आबंटन करण्यायोग्य व्यवहाराच्या निव्वळ सदर देयता असते.

**नंतरची मोजणी**

ज्या वित्तीय देयता व्यापारासाठी धारण केल्या जातात किंवा एफटीव्हीपीएल (नफा तोट्यामधून योग्य किंमतीच्या देयता) येथे डेसिग्नेट केल्या जातात, त्या वगळून वित्तीय देयता परिणामकारक व्याज पद्धती वापरुन अमोटाईझ परिव्ययाला मोजल्या जातात. त्यानंतर योग्य किंमतीला पुढे नेल्या जातात व नफा तोटा पत्रकात ओळखल्या जातात. सर्व साधित वित्तीय साधने / उपकरणांची एफटीव्हीपीएलमध्ये लेखा केली जाते.

व्याज द्यावे लागणारी कर्जे आणि उधार यांची मोजणीनंतर परिणामकारक व्याज पद्धती वापरुन अमोटाईझ परिव्ययाला होते. फायदे व तोटे हे नफा तोटा पत्रकात ओळखले जातात तर देयतांची ओळख परिणामकारक व्याज पद्धतीने अमोटाईझेशन प्रक्रियेने नाहीशी केली जाते. (डिरेकग्नाईझ)

परिशोधन परिव्ययाचा हिशेब करताना परिणामकारक व्याज दराचा भाग असलेले शुल्क परिव्यय प्राप्ती करतानाचे कोणतेही अधिमूल्य किंवा सूट ध्यानात घेतली जाते.

परिणामकारक व्याज दराचे अमोटाईझेशन हे नफा तोटा विवरणात वित्तीय परिव्यय म्हणून नफा तोटा खात्यात ओळखले जाते.

**ओळख नाहीशी करणे**

जेव्हा एखाद्या देयतेनंतरची जबाबदारी संपते (रद्द केली जाते, डिस्चार्ज होते) तेव्हा कंपनीच्या ताळेबंदामध्ये वित्तीय देयतेची ओळख नाहीशी होते. किंवा

जेव्हा एखाद्या देयतेऐवजी त्याच कर्जदाराने दिलेल्या दुसऱ्या कंपनीची देयता उत्पन्न होते किंवा त्याच देयतेच्या अटी व शर्ती बऱ्याच अंशी बदलल्या तर असा बदल किंवा अदलाबदल हा जुन्या देयतेची ओळख नाकारणे समजली जाते व नव्या देयतेची ओळख समजली जाते. दोन्ही देयतांच्या पुढे नेण्याच्या किंमतीला फरक हे नफा तोटा पत्रकात ओळखले जातात.

**वित्तीय उपकरणे / साधने ऑफसेट (परस्परांना रद्द करणे) करणे**

जर एखाद्या ओळखलेल्या रकमा ऑफसेट करण्याचा अंमलबजावणी करण्यायोग्य कायदेशीर हक्क असेल व निव्वळ तत्वावर मालमत्ता विकण्याची व देयतांचे प्रदान करण्याची इच्छा असेल तर वित्तीय मालमत्ता व वित्तीय देयता ऑफसेट केल्या जातात (परस्परांना रद्द करतात) व त्यामधील फरक हा ताळेबंदात ओळखला जातो.

## 1.25 योग्य किंमतीचे मोजमाप

मापन दिनांकाला बाजारातील भागीदारांना एखादी मालमत्ता विकल्यावर प्राप्त होणारी किंमत किंवा एखादी देयता हस्तांतरीत करण्यासाठी दिलेली किंमत म्हणजे योग्य किंमत. सदर किंमत ठरवण्याची गणना खालील गृहितके आहेत. मालमत्ता विकण्याचा किंवा देयता अंतरित करण्याचा व्यवहार हा

- मालमत्ता किंवा देयतेच्या मुख्य बाजारात झाला आहे किंवा

- मुख्य बाजार नसल्यास मालमत्ता किंवा देयतेच्या जास्तीत जास्त लाभदायक बाजारात होतो.

- बाजारात भाग घेणारे आपल्या जास्तीत जास्त आर्थिक लाभांसाठी काम करीत आहेत असे समजून ते सदर मालमत्ता किंवा देयतेची किंमत करताना जी गृहितके वापरत असतात तीच गृहितके वापरुन एखाद्या मालमत्तेची वा देयतेची योग्य किंमत ठरवली जाते.

बिगर वित्तीय मालमत्तेच्या योग्य किंमतीचे मोजमाप करताना सदर मालमत्तेपासून सर्वोत्तम वित्तीय लाभ घेण्यासाठी तो सर्वोत्तम पद्धतीने वापरण्याची किंवा जो अन्य बाजार सदस्य ही मालमत्ता सर्वोत्तम पद्धतीने वापरु शकेल त्याला विकण्याची क्षमता विचारात घेतली जाते.

जी मूल्यांकन तंत्रे परिस्थितीमध्ये योग्य आहेत व ज्या तंत्राकरिता योग्य किंमत मोजण्यासाठी पुरेशी माहिती उपलब्ध आहे ती तंत्रे कंपनी योग्य किंमतीचे मूल्यमापन करण्यासाठी वापरते व त्याद्वारे निरीक्षण करण्यायोग्य निविष्ठांचा जास्तीत जास्त वापर करते.

- पातळी एक – अगदी तशाच मालमत्तांसाठी या देयतांसाठी सक्रिय बाजारात दर्शविलेली (समायोजित न केलेली) किंमत

- पातळी दोन – ज्या मूल्यमापन तंत्रामध्ये योग्य किंमत काढण्यासाठी किमान पातळीवरील निविष्ठा प्रत्यक्षरीत्या किंवा अप्रत्यक्षरीत्या निरीक्षणयोग्य आहेत.

- पातळी तीन – ज्या मूल्यमापन तंत्रामधील योग्य किंमत काढण्यासाठी किमान पातळीवरील निविष्ठा निरीक्षणयोग्य नाहीत. जे मूल्यांकन मॉडेल अशा गृहितकांवर आधारीत आहे की ज्या त्याच वित्तीय साधन उपकरणांमधील निरीक्षण योग्य चालू बाजार व्यवहारातील किंमतीपासून आधार नाही किंवा जी उपलब्ध बाजारातील माहितीवर आधारीत नाही अशा मॉडेलद्वारे योग्य किंमती पूर्णत: किंवा अंशत: ठरवल्या जातात.

ज्या मालमत्ता किंवा देयता वित्तीय विवरणात वारंवार ओळखल्या जातात त्यांच्याबाबत कंपनी ठरवते की, सदर हस्तांतरणे वर्गीकरणाचे पुनरावलोकन (योग्य किंमत व मोजमापामध्ये महत्वाच्या सर्वात कमी स्तराच्या निविष्ठेवर आधारीत) प्रत्येक अहवालाच्या दिवशी करुन सदर हस्तांतरणे अधिकारांच्या उतरंडीच्या पातळयावर झाले आहे काय?

योग्य किंमतीच्या प्रकटनासाठी कंपनीने मालमत्ता व देयतांचे प्रकार बनवले आहेत. हे प्रकार त्या मालमत्तेच्या स्वरुपावर, वैशिष्ट्यांवर व जोखमीवर आणि वर ओळखल्याप्रमाणे अधिकारांच्या उतरंडीमध्ये योग्य किंमतीची पातळी यावर ठरवले जाते.

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

### टीप 2 : मालमत्ता, संयंत्रे आणि उपकरणे आणि अमूर्त मालमत्ता -

**(अ) मालमत्ता, संयंत्रे आणि उपकरणे -**

(रुपये लाखात)

| तपशील | स्वमालकीची जमीन | इमारत | संगणक आणि उपकरणे | फर्निचर आणि फिक्स्चर | वाहने | कार्यालयीन उपकरणे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण गट** | | | | | | | |
| **1 एप्रिल, 2020 रोजीची शिल्लक** | 45898.31 | 2303.24 | 295.51 | 234.53 | 60.25 | 254.63 | 49046.47 |
| वाढ | 87.68 | - | 24.06 | 0.60 | - | 8.99 | 121.33 |
| समायोजन | (29.65) | - | - | - | - | - | (29.65) |
| घट / वलि्हेवाट | - | - | 6.68 | 28.17 | - | 7.69 | 42.54 |
| **31 मार्च, 2021 रोजीची शिल्लक** | **45,956.34** | **2,303.24** | **312.89** | **206.96** | **60.25** | **255.93** | **49,095.61** |
| वाढ | 389.70 | - | 93.36 | 1.68 | - | 45.53 | 530.27 |
| घट / विल्हेवाट | - | - | 12.09 | - | - | 2.90 | 14.99 |
| **31 मार्च, 2022 रोजीची शिल्लक** | **46,346.04** | **2,303.24** | **394.16** | **208.64** | **60.25** | **298.56** | **49,610.89** |
| वाढ | 29.22 | - | 18.54 | - | - | 6.95 | 54.71 |
| पुनर्वर्गीकरण | | 1.11 | (0.15) | - | - | (0.96) | - |
| घट / विल्हेवाट | - | - | 17.15 | 0.53 | - | 5.16 | 22.84 |
| **31 मार्च, 2023 रोजीची शिल्लक** | **46,375.26** | **2,304.35** | **395.40** | **208.11** | **60.25** | **299.39** | **49,642.76** |
| **संचित घसारा** | | | | | | | |
| **1 एप्रिल, 2020 रोजीची शिल्लक** | **-** | **692.99** | **249.63** | **51.23** | **39.00** | **110.29** | **1,143.14** |
| **वर्षासाठी घसारा** | - | 437.62 | 23.06 | 23.58 | 5.24 | 46.35 | 535.85 |
| घट / विल्हेवाट | - | - | 5.66 | 10.93 | - | 7.30 | 23.89 |
| **31 मार्च, 2021 रोजीची शिल्लक** | **-** | **1,130.61** | **267.03** | **63.88** | **44.24** | **149.34** | **1,655.10** |
| **वर्षासाठी घसारा** | - | 436.20 | 34.12 | 23.59 | 5.22 | 48.48 | 547.61 |
| घट / विल्हेवाट | - | - | 10.28 | - | - | 2.30 | 12.58 |
| **31 मार्च, 2022 रोजीची शिल्लक** | **-** | **1,566.81** | **290.87** | **87.47** | **49.46** | **195.52** | **2,190.13** |
| **वर्षासाठी घसारा** | **-** | **438.67** | **41.28** | **23.79** | **5.11** | **51.65** | 560.50 |
| पुनर्वर्गीकरण | | **0.75** | **(0.07)** | **-** | **-** | **(0.68)** | - |
| घट / विल्हेवाट | **-** | **-** | **15.60** | **0.29** | **-** | **4.68** | 20.57 |
| **31 मार्च, 2023 रोजीची शिल्लक** | **-** | **2,006.23** | **316.48** | **110.97** | **54.57** | **241.81** | **2,730.06** |
| **31.03.2021 रोजी निव्वळ गट** | **45,956.34** | **1,172.63** | **45.86** | **143.08** | **16.01** | **106.59** | **47,440.51** |
| **31.03.2022 रोजी निव्वळ गट** | **46,346.04** | **736.43** | **103.29** | **121.17** | **10.79** | **103.04** | **47,420.76** |
| **31.03.2023 रोजी निव्वळ गट** | **46,375.26** | **298.12** | **78.92** | **97.14** | **5.68** | **57.58** | **46,912.70** |

टीप - 1. कंपनीने बेनामी व्यवहार (प्रतिबंध) कायदा, 1988 (1988 चा 45) अंतर्गत कोणतीही बेनामी मालमत्ता धारण केलेली नाही.

टीप - 2. कंपनीने वर्षभरात मालमत्तेचे कोणतेही पुनर्मूल्यांकन केलेले नाही.

टीप - 3. मुक्त मालकीच्या जमिनीमध्ये गिरगाव आणि काळबादेवी, मुंबई येथील जमिनीसाठी रु.36,859.38 लाख (पुस्तकीय मूल्य) समाविष्ट आहे. महामंडळाने सदर जमीन आणि त्यावरील प्रस्तावित विक्रीयोग्य क्षेत्रावर प्रथम शुल्कासह हमीवर / तारणावर बँक ऑफ इंडियाकडून कर्ज घेतले आहे.

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

### टीप -4. खालील गोष्टी वगळून कंपनीच्या मालकीच्या स्थावर मालमत्तेचे अभिहस्तांतरण पत्र कंपनीच्या नावावर आहेत –

| मालमत्ता, संयंत्रे आणि उपकरणे व अमूर्त मालमत्ता | 80.06 | 67.40 | - | 147.46 |
| कर्मचारी लाभ | 194.88 | (32.42) | 4.44 | 166.90 |
| भाडे दायित्व | 15.38 | (106.44) | - | (91.06) |
| न वापरलेले कर क्रेडिट | 56.46 | - | - | 56.46 |
| **स्थगित कर मालमत्ता** | 346.78 | (71.46) | 4.44 | 279.76 |

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

**पुढील बाबींवर स्थगित कर परिगणित केला गेला नाही -**

(रुपये लाखात)

| तपशील | रक्कम | कालबाह्य कालावधी |
|---|---|---|
| 2012-13- व्यवसाय तोटा | 10.74 | 31 मार्च 21 |
| 2013-14- व्यवसाय तोटा | 42.15 | 31 मार्च 22 |
| 2014-15- व्यवसाय तोटा | 414.78 | 31 मार्च 23 |
| 2017-18- व्यवसाय तोटा | 16.42 | 31 मार्च 26 |
| 2018-19- व्यवसाय तोटा | 579.23 | 31 मार्च 27 |
| 2019-20- व्यवसाय तोटा | 1,821.52 | 31 मार्च 28 |
| अवशोषित घसारा | 883.14 | - |

**ब) आयकर खर्च**

(रुपये लाखात)

| तपशील | 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षासाठी | 31 मार्च 2022 रोजी संपलेल्या वर्षासाठी |
|---|---|---|
| **चालू कर** | | |
| चालू वर्षाच्या संदर्भात | - | - |
| मागील वर्षाच्या संदर्भात | - | (431.79) |
| | - | (431.79) |
| **स्थगित कर** | | |
| तात्पुरत्या फरकांवरील कराची उत्पत्ती आणि परावर्तन करणे | (249.35) | (88.70) |
| | (249.35) | (88.70) |
| **वर्षासाठी कर खर्च** | (249.35) | (520.49) |

**क) नफा आणि तोटा पत्रकात ओळखला गेलेला कर खर्च**

(रुपये लाखात)

| तपशील | 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षासाठी | 31 मार्च 2022 रोजी संपलेल्या वर्षासाठी |
|---|---|---|
| **नफा आणि तोट्यात पुनर्वर्गीकृत केलेल्या बाबी** | | |
| परिभाषित लाभ योजनांचे मोजमाप | 8.24 | 6.09 |
| **वर्षासाठी कर खर्च** | 8.24 | 6.09 |

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

**ड) प्रभावी कर दरांचा ताळमेळ**

(रुपये लाखात)

| तपशील | 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षासाठी | 31 मार्च 2022 रोजी पलेल्या वर्षासाठी (पुन्हा सादर केलेले) |
|---|---|---|
| **करपूर्व नफा** | (3062.98) | (2199.25) |
| **मूळ आयकर दर** | 25.00% | 25.00% |
| **अधिभार** | 0.00% | 0.00% |
| **उपकर** | 1.00% | 1.00% |
| वैधानिक आयकर दर | 26.00% | 26.00% |
| **अपेक्षित आयकर खर्च** | | |
| **कर प्रभाव -** | | |
| मालमत्ता, संयंत्रे आणि उपकरणे व अमूर्त मालमत्ता | 2.67% | 4.00% |
| कर्मचारी लाभ | 0.62% | 2.82% |
| भाडे दायित्व | 4.85% | -2.79% |
| आधीच्या कालावधीतील कर समायोजन | 0.00% | 19.63% |
| **एकूण आयकर खर्च** | 8.14% | 23.66% |

**ई) चालू कर मालमत्ता (निव्वळ)**

(रुपये लाखात)

| तपशील | 31 मार्च 2023 रोजी | 31 मार्च 2022 रोजी | 1 एप्रिल, 2021 रोजी |
|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | 1,226.51 | 1,553.28 | 2285.28 |
| अधिक : आगाऊ भरलेला कर, टीडीएस (वर्षभरातील तरतुदीच्या निव्वळ) | (695.92) | (326.77) | (732.00) |
| **अंतिम शिल्लक** | 530.59 | 1,226.51 | 1,553.28 |

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

### टीप 22 - संबंधित पक्षकार प्रकटीकरण

**अ) संबंधित पक्षकाराचे नाव आणि नातेसंबंधाचे स्वरूप**

| संबंधित पक्षकाराचे नाव | नातेसंबंधाची माहिती |
|---|---|
| **प्रमुख व्यवस्थापन कर्मचारी** | |
| श्री. मनोज जोशी (दि. 30.12.2021 पासून) | अध्यक्ष / नामनिर्देशित संचालक |
| श्री. एस.एस.दुबे (दि. 30.07.2022 पासून) | नामनिर्देशित संचालक |
| श्री. जयदीप | नामनिर्देशित संचालक |
| श्री.मनोज सौनिक | नामनिर्देशित संचालक |
| श्री.आय.एस.चहल | नामनिर्देशित संचालक |
| श्री.भूषण गगराणी | नामनिर्देशित संचालक |
| श्रीमती अश्विनी भिडे (दि. 12.07.2022 पासून) | व्यवस्थापकीय संचालक अतिरिक्त भार / नामनिर्देशित संचालक |
| श्री. एस.व्ही.आर. श्रीनिवास (दि. 03.06.2021 पासून) | नामनिर्देशित संचालक |
| श्री. एस.व्ही.आर. श्रीनिवास (दि. 16.03.2022 ते दि. 11.07.2022 पर्यंत) | व्यवस्थापकीय संचालक / नामनिर्देशित संचालक |
| श्री. सुबोध कुमार गुप्ता | संचालक (प्रकल्प) |
| श्री. अजयकुमार भट्ट (दि. 05.02.2023 पर्यंत) | संचालक (प्रणाली) |
| श्री.अबोध खंडेलवाल | संचालक (वित्त) आणि मुख्य वित्तीय अधिकारी |
| कु. ऋतू देब | कंपनी सचिव |
| **संस्था ज्या संस्थांवर प्रमुख व्यवस्थापन कर्मचारी किंवा त्यांच्या जवळच्या कुटुंबातील सदस्यांचा महत्त्वपूर्ण प्रभाव आहे.** | |
| मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) | महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित, कर्मचारी कल्याण निधी समिती (अध्यक्ष) | श्री अबोध खंडेलवाल (वित्त संचालक, मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित) |
| मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित, कामगार कल्याण निधी विश्वस्त (ट्रस्ट) (अध्यक्ष) | श्री रवि रंजन कुमार (मुख्य प्रकल्प व्यवस्थापक 2), मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित |
| मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित, कर्मचारी गट उपदान योजना विश्वस्त (ट्रस्ट) (अध्यक्ष) | श्री. रविंद्र पाठक (महाव्यवस्थापक - वित्त), मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित |

**ब) मुख्य व्यवस्थापन कर्मचारी यांचा मोबदला**

(रुपये लाखात)

| तपशील | 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षासाठी | 31 मार्च 2022 रोजी संपलेल्या वर्षासाठी |
|---|---|---|
| मानधन * | 229.67 | 238.92 |

* सेवानिवृत्तीचे लाभ प्रदानाच्या आधारावर विचारात घेतले आहेत.

**क) प्रमुख व्यवस्थापकीय व्यक्ती किंवा त्यांच्या जवळच्या कुटुंबातील सदस्यांचा लक्षणीय प्रभाव असलेल्या संस्थांसोबतचे व्यवहार**

(रुपये लाखात)

| तपशील | 31 मार्च, 2023 रोजी संपलेल्या वर्षासाठी | 31 मार्च, 2022 रोजी संपलेल्या वर्षासाठी |
|---|---|---|
| **खरेदी आणि खर्च** | | |
| प्रतिपूर्ती (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण) | 82.35 | 311.47 |
| कामगार कल्याण निधी न्यास (मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लि.) मध्ये कॉर्पस योगदान | - | 55.68 |
| कर्मचारी गट उपदान योजना न्यास (मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लि.) मध्ये कॉर्पस योगदान | 70.20 | 103.96 |
| कर्मचारी कल्याण निधी (मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लि.) मध्ये सामान्य योगदान | 19.86 | 15.73 |
| कर्मचारी गट उपदान योजना न्यास (मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लि.) मध्ये सामान्य योगदान | - | 0.12 |

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

**ड) वर्षअखेरीस थकबाकी**

(रुपये लाखात)

| तपशील | 31 मार्च, 2023 रोजी | 31 मार्च, 2022 रोजी | 1 एप्रिल, 2021 रोजी |
|---|---|---|---|
| **प्रमुख व्यवस्थापन कर्मचाऱ्यांसह** | | | |
| प्राप्ती | - | - | - |
| देय | - | - | - |
| **प्रमुख व्यवस्थापन कर्मचाऱ्यांचे नोकरीनंतरचे फायदे** | | | |
| नोकरीनंतरचे फायदे | 136.90 | 111.65 | 75.65 |
| **प्रमुख व्यवस्थापन कर्मचाऱ्यांचा किंवा त्यांच्या जवळच्या कुटुंबातील सदस्यांचा लक्षणीय प्रभाव असलेल्या संस्था** | | | |
| मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लि. कर्मचारी कल्याण निधी | 2.21 | 16.07 | 8.52 |
| मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कामगार कल्याण निधी न्यास (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण) | 141.87 | 141.87 | 86.19 |
| एमएमआरसीएल कर्मचारी गट उपदान योजना न्यास (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण) | 385.54 | 287.06 | 230.27 |
| देय (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण) | 2,166.12 | 2,196.01 | 1,884.52 |

## टीप 23 : घटनासापेक्ष दायित्वे आणि वचनबद्धता

### टीप 23.1 : घटनासापेक्ष दायित्वे

**उत्तरदायित्वाचे स्वरूप / दाव्याचे स्वरूप - रकमेसह स्पष्टीकरण (उपलब्ध मर्यादेपर्यंत)**

कंत्राटदारांनी उद्धृत केलेली कराराची किंमत सर्व करांसहित होती. नंतर जीएसटी लागू करून इतर सर्व अप्रत्यक्ष कर जसे की अबकारी शुल्क, जकात, सेवा कर, व्हॅट इत्यादींचा समावेश सदर करात करण्यात आला. त्यामुळे कर कायद्यातील बदलांमुळे कराराच्या किमतीवर होणाऱ्या परिणामाचे मूल्यांकन करण्यासाठी कंपनीने कंत्राटदारांना विनंती केली आहे की कंपनीने देय किंवा वसूल करण्यायोग्य कर रक्कम निश्चित करण्यासाठी कराराच्या किमतीवर जीएसटीपूर्व आणि नंतरच्या प्रभावाचे विभाजन करावे. याबाबतची प्रक्रिया चालू आहे. दि.31 मार्च 2023 पर्यंत कंपनीने रु. 26,700.11 लाख (दि. 31.03.2022 रु. 26,700.11 लाख; दि. 01.04.2021 रु. 26700.11 लाख) इतकी रक्कम प्रदान केली. ही रक्कम तदर्थ आधारावर प्रदान केली आहे. तंट्याचा निकाल कंपनीच्या बाजूने लागला तर ही रक्कम व्याजासह वसूल केली जाईल. एका कंत्राटदाराने जीएसटी प्रकरणावर वाद निर्माण केला आहे आणि हे प्रकरण तंटा निवारण मंडळाकडे पाठवले आहे. तंटा निवारण मंडळाच्या निकालाची प्रतीक्षा आहे.

कंत्राटदारांनी उद्धृत केलेली कराराची किंमत सर्व करांसह (स्वामीत्व धनासह) होती. नंतर देय असलेल्या स्वामीत्व धनाच्या रकमेत सुधारणा करण्यात आली आणि त्यामुळे कायद्यातील बदलामुळे काही कंत्राटदारांनी त्यांनी भरलेल्या वाढीव रकमेच्या प्रतिपूर्तीचा दावा केला आहे. तथापि, एका कंत्राटदाराने महापालिका प्राधिकरण करीत असलेल्या स्वामीत्व धनाच्या आकारणीला आव्हान देणारी रिट याचिका दाखल केली आहे. ती अद्याप न्यायालयाच्या विचाराधीन आहे. दि.31 मार्च 2023 पर्यंत, स्वामीत्व धनाची रक्कम रु. 4,639.70 लाख विवादाधीन आहे.

कंत्राटदारांसोबत केलेल्या कराराच्या सामान्य अटींनुसार (जीसीसी) काही कंत्राटदारांनी तंटा निवारण मंडळ (DAB) येथे काही विवादांचा संदर्भ दिला आहे. त्याचा परिणाम या टप्प्यावर निश्चित करता येत नाही.

कंपनीला एका सिस्टीम निविदाकारांकडून नुकसानीचा दावा, निष्क्रियतेबाबतचा दावा आणि प्रतिपूर्तीसाठी रु. 302.62 लाखाचा दावा प्राप्त झाला आहे. कंत्राटदाराच्या दाव्याचे मूल्यमापन महामंडळाकडून केले जात आहे.

ज्ञानेश्वर नगर, BKC येथे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) द्वारे वाटप केलेल्या जमिनीच्या संदर्भात. महापालिका प्राधिकरणाने मालमत्ता कर रु.3,587.42 लाखाची (दि.31.03.2022 रु. 3,155.51 लाख; दि.01.04.2021 रु. 1,855.60 लाख) या रकमेची मागणी करणारी नोटीस जारी केलेली आहे. कंपनीला सरकारी जमीन आणि खाजगी जमिनीसाठी मालमत्ता कराच्या संदर्भात महापालिका प्राधिकरणाकडून (वरील प्रकरण वगळता) कोणतीही नोटीस मिळाली नाही. त्यामुळे त्यासाठी कंपनीने कोणतीही तरतूद केलेली नाही. कंपनीने सहाय्यक निर्धारक आणि जिल्हाधिकारी (एचई वॉर्ड) यांना एक पत्र लिहिले आहे की सदर जमीन केवळ सार्वजनिक फायद्याच्या प्रकल्पासाठी वापरली जाते. या पत्राच्या उत्तराची प्रतीक्षा केली जात आहे या कारणास्तव अशी मागणी केली आहे की, सदर मागणी रद्द करावी.

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

सदर रक्कम माफ केल्याची खात्री न झाल्यास सावधगिरीचा उपाय म्हणून ही रक्कम घटनासापेक्ष दायित्व म्हणून दाखविली आहे. तथापि, ही रक्कम देय नाही अशी व्यवस्थापनाला खात्री आहे.

दि.31 मार्च 2023 पर्यंत जमा झालेले जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेच्या कर्जावरील व्याज आणि अग्रअंत फी रु. 69,197.43 लाख आहे. गृहनिर्माण आणि नागरी कारभार मंत्रालयाने त्यांच्या दिनांक 9 जून 2023 च्या पत्राद्वारे पीओए सचिवालय सीएएस नागपूर, भारतीय रिझर्व्ह बँकेला मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाद्वारे देय असलेले व्याज आणि वित्तीय वर्ष 2023-24 करिता महाराष्ट्र सरकारला दिलेल्या अंदाजपत्रकामधून जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेला देय असलेले रु.74,395 लाख वसूल करण्यासाठी आवश्यक सल्ला देण्याचे निर्देश दिले. मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादितनुसार व्याज आणि अग्रअंत फीमधील फरक म्हणजे रु. 69,197.43 लाख आणि गृहनिर्माण आणि नागरी कारभार मंत्रालय (MOUHA) म्हणजेच रु. 73,057 लाख (म्हणजे, एकूण रकमेपैकी 31 मार्च 2023 पर्यंत रु. 74395 लाख), सीएएए (वित्त मंत्रालयाचे परराष्ट्र विभाग) च्या गणनेनुसार जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेने सीएएए ला दिलेल्या कर्जाच्या रकमेमध्ये आणि गृहनिर्माण आणि नागरी कारभार मंत्रालयाद्वारे मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाला वितरित केलेल्या रकमेतील फरकामुळे हा फरक निर्माण झाला आहे. मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाने गृहनिर्माण आणि नागरी कारभार मंत्रालयाकडून निधी प्राप्त झाल्याच्या तारखेपासून व्याज दायित्वाचा हिशोब दिला आहे, गृहनिर्माण आणि नागरी कारभार मंत्रालय आणि सीएएए सोबत ताळमेळाच्या वेळी फरक स्वीकारला जाईल.

मुंबई बंदर आणि मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादितच्या विश्वस्त मंडळाशी केलेल्या करारानुसार, मालमत्ता कर, व्याज शुल्क आणि इतर संकीर्ण शुल्क असल्यास त्याचा खर्च उचलण्याची जबाबदारी मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादितची आहे. तथापि, वरील संदर्भात, उत्तरदायित्व निश्चित केलेले नाहीत, आणि ते निश्चित केले जात आहे.

महामंडळाच्या वतीने बँकेने जारी केलेली बँक हमी रु.83.50 लाख आहे (दि.31.03.2022 रु. 73.50 लाख; दि. 01.04.2021 रु. 72.50 लाख).

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने प्रकल्पग्रस्तांसाठी (पीएपी) 1937 सदनिकांचे पुनर्वसनासाठी वाटप केले होते, त्यापैकी 65 सदनिकांची संख्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला परत देण्यात आली आहे. त्यामुळे उर्वरित सदनिकांची संख्या 1872 आहे, यासंबंधात कंपनीने देय असलेली रक्कम निश्चित करता येत नाही तसेच याबाबत कोणतीही मागणी प्राप्त झालेली नाही. त्यामुळे वित्तीय विवरणपत्रात याबाबतची रक्कम दिलेली नाही.

कंपनीने पुनर्वसनासाठी काही प्रकल्पग्रस्त व्यक्तींसह (पीएपी) सामंजस्य करार / तात्पुरता करार केला आहे, तथापि सध्या त्यांच्या पुनर्वसनाचा खर्च निश्चित केलेला नाही.

कंपनीविरुद्ध 54 कायदेशीर खटले आहेत (जमीन आणि पुनर्वसन संदर्भात 28 प्रकरणे, विविध दिवाणी प्रकरणांसंदर्भात 12 प्रकरणे, पर्यावरण समस्यांसंदर्भात 9 प्रकरणे, 4 संकीर्ण प्रकरणे आणि 1 प्रकरण वस्तू हरवल्यामुळे झालेल्या नुकसानासंदर्भात) याबाबतचे दायित्व मोजता येत नाही"

### टीप 23.2 - भांडवली वचनबद्धता

**अहवाल कालावधीच्या समाप्तीसाठी करार केलेला भांडवली खर्च, परंतु दायित्व म्हणून जो ओळखला जात नाही तो खालीलप्रमाणे आहे -**

**(रुपये लाखात)**

| तपशील | 31 मार्च, 2023 रोजी | 31 मार्च, 2022 रोजी | 1 एप्रिल, 2021 रोजी |
|---|---|---|---|
| **अंमलात आणण्यासाठी शिल्लक असलेल्या करारांची अंदाजे रक्कम जी प्रदान केलेली नाही:** | 8,26,000.31 | 9,42,621.45 | 11,62,526.06 |

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

### टीप 24 - कर्मचारी लाभ दायित्वे

**उपदान -**

उपदानाची अदायगी कायदा, 1972 किंवा कंपनी योजना यापैकी जे कर्मचाऱ्याला अधिक फायदेशीर असेल त्यानुसार प्रत्येक कर्मचाऱ्याला सेवेच्या प्रत्येक पूर्ण वर्षासाठी शेवटच्या पंधरा दिवसांच्या पगाराच्या समतुल्य लाभाचा हक्क आहे. कंपनीपासून वेगळे होण्याच्या वेळी किंवा सेवानिवृत्तीच्या वेळी यापैकी जे आधी असेल त्यावेळी ही रक्कम देय आहे.

**(रुपये लाखात)**

| तपशील | दायित्वाचे वर्तमान मूल्य | योजना मालमत्तेचे वाजवी मूल्य | निव्वळ रक्कम |
|---|---|---|---|
| **31 मार्च 2020 रोजी** | 230.17 | - | 230.17 |
| चालू सेवा खर्च | 72.82 | - | 72.82 |
| व्याज खर्च (उत्पन्न) | 15.34 | 7.63 | 7.71 |
| **नफा आणि तोटा विवरणामध्ये ओळखलेली एकूण रक्कम** | 88.16 | 7.63 | 80.53 |
| **मोजमाप** | | | |
| (लाभ) / वित्तीय अनुमानांमधील बदलामुळे होणारे नुकसान | 14.66 | - | 14.66 |
| अनुभव (नफा) / तोटा | (3.20) | - | (3.20) |
| व्याज वगळून नियोजित मालमत्तेवर परतावा | - | (5.63) | 5.63 |
| **इतर सर्वसमावेशक उत्पन्नामध्ये ओळखली जाणारी एकूण रक्कम** | 11.46 | (5.63) | 17.09 |
| नियोक्त्याचे योगदान | - | 230.27 | (230.27) |
| लाभ देयके | - | - | - |
| **31 मार्च 2021 रोजी** | 329.79 | 232.27 | 97.52 |
| **चालू सेवा खर्च** | 86.71 | - | 86.71 |
| व्याज खर्च (उत्पन्न) | 20.84 | 14.30 | 6.54 |
| **नफा आणि तोटा मध्ये ओळखलेली एकूण रक्कम** | 107.55 | 14.30 | 93.25 |
| **मोजमाप** | | | |
| (लाभ) / वित्तीय अनुमानांमधील बदलामुळे होणारे नुकसान | 2.06 | - | 2.06 |
| (लाभ) / लोकसंख्याशास्त्रीय अनुमानांमधील बदलामुळे होणारे नुकसान | (0.11) | | (0.11) |
| अनुभव (नफा) / तोटा | 24.78 | - | 24.78 |
| व्याज वगळून नियोजित मालमत्तेवर परतावा | - | 3.30 | (3.30) |
| **इतर सर्वसमावेशक उत्पन्नामध्ये ओळखली जाणारी एकूण रक्कम** | 26.73 | 3.30 | 23.43 |
| नियोक्त्याचे योगदान | - | 91.80 | (91.80) |
| लाभ देयके | 34.89 | 34.89 | - |
| **31 मार्च 2022 रोजी** | 429.18 | 306.78 | 122.40 |
| चालू सेवा खर्च | 80.34 | - | 80.34 |
| व्याज खर्च (उत्पन्न) | 30.69 | 21.70 | 8.99 |
| **नफा आणि तोटा विवरणामध्ये ओळखलेली एकूण रक्कम** | 111.03 | 21.70 | 89.33 |
| **मोजमाप** | | | |
| (लाभ) / वित्तीय अनुमानांमधील बदलामुळे होणारे नुकसान | 42.47 | - | 42.47 |
| (लाभ) / लोकसंख्याशास्त्रीय अनुमानांमधील बदलामुळे होणारे नुकसान | (13.22) | - | (13.22) |
| अनुभव (नफा) / तोटा | 3.28 | - | 3.28 |
| व्याज वगळून नियोजित मालमत्तेवर परतावा | - | 0.82 | (0.82) |
| **इतर सर्वसमावेशक उत्पन्नामध्ये ओळखली जाणारी एकूण रक्कम** | 32.53 | 0.82 | 31.71 |
| नियोक्त्याचे योगदान | - | 70.20 | (70.20) |
| लाभ देयके | 14.78 | 14.78 | - |
| **31 मार्च 2023 रोजी** | 557.96 | 384.72 | 173.24 |

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

**वर प्रकट केलेले निव्वळ दायित्व प्राप्त निधीशी संबंधित आहे आणि निधी नसलेल्या योजना खालीलप्रमाणे आहेत**

(रुपये लाखात)

| तपशील | 31 मार्च, 2023 रोजी | 31 मार्च, 2022 रोजी | 1 एप्रिल, 2021 रोजी |
|---|---|---|---|
| दायित्वांचे वर्तमान मूल्य | 557.96 | 429.18 | 329.79 |
| योजना मालमत्तेचे वाजवी मूल्य | 384.72 | 306.78 | 232.27 |
| **उपदान योजनेची तूट** | **173.24** | **122.40** | **97.52** |

**वास्तविक (नफा)/ दायित्वावरील तोटा**

(रुपये लाखात)

| तपशील | 31 मार्च, 2023 रोजी संपलेल्या वर्षासाठी | 31 मार्च, 2022 रोजी संपलेल्या वर्षासाठी |
|---|---|---|
| लोकसंख्याशास्त्रीय अनुमानामुळे | (13.22) | (0.11) |
| वित्तीय अनुमानामुळे | 42.47 | 2.06 |
| अनुभवामुळे | 3.28 | 24.78 |
| व्याज वगळून नियोजित मालमत्तेवर परतावा | (0.82) | (3.30) |
| **एकूण वास्तविक (नफा) / तोटा** | **31.71** | **23.43** |

**महत्त्वपूर्ण अंदाज - वास्तविक अनुमान आणि संवेदनशीलता**

**महत्त्वाचे वास्तविक अनुमान खालीलप्रमाणे होते -**

(रुपये लाखात)

| तपशील | 31 मार्च, 2023 रोजी | 31 मार्च, 2022 रोजी | 1 एप्रिल, 2021 रोजी |
|---|---|---|---|
| सवलत दर | 7.35% | 7.15% | 6.32% |
| **कर्मचारी सोडण्याचे प्रमाण** | | | |
| 30 वर्षांपर्यंत | 13.00% | 6.00% | 6.00% |
| 31 ते 44 वर्षे | 13.00% | 6.00% | 5.00% |
| 44 वर्षांपेक्षा जास्त | 13.00% | 6.00% | 8.00% |
| योजनेच्या मालमत्तेवर परतावा दर | 7.35% | 7.15% | 6.50% |
| वेतन वाढीचा दर | 10.00% | 8.00% | 7.00% |
| मृत्युदर | आयएएलएम 2012-14) नागरी | आयएएलएम 2012-14) नागरी | आयएएलएम (2012-14) नागरी |

**संवेदनशीलता विश्लेषण**

भारित मुख्य अनुमानांमधील बदलांसाठी परिभाषित लाभ दायित्वाची संवेदनशीलता पुढीलप्रमाणे आहे -

(रुपये लाखात)

| तपशील | 31 मार्च, 2023 रोजी | 31 मार्च, 2022 रोजी | 1 एप्रिल, 2021 रोजी |
|---|---|---|---|
| कालावधीच्या शेवटी दायित्वाचे वर्तमान मूल्य | 557.96 | 429.18 | 329.79 |
| सवलत दरातील बदलामुळे 0.50% वाढ झाल्याने परिणाम | (14.46) | (18.81) | -15.25 |
| सवलत दरातील बदलामुळे 0.50% कमी झाल्याने परिणाम | 15.34 | 20.44 | 16.62 |
| वेतन वाढीतील बदलाच्या परिणामावर 0.50% वाढ झाल्यामुळे होणारा परिणाम | 12.03 | 16.77 | 15.87 |
| वेतन वाढीतील बदलाच्या परिणामावर 0.50% घट झाल्यामुळे होणारा परिणाम | (12.02) | (16.37) | -14.74 |

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

वरील संवेदनशीलता विश्लेषण इतर सर्व अनुमान स्थिर ठेवताना अनुमानात झालेल्या बदलावर आधारित आहेत. व्यवहारात, हे घडण्याची शक्यता नाही आणि काही अनुमानांमधील बदल परस्परसंबंधित असू शकतात. महत्त्वाच्या वास्तविक अनुमानांसाठी परिभाषित लाभ दायित्वाच्या संवेदनशीलतेची गणना करताना समान पद्धत (अहवाल कालावधीच्या शेवटी प्रक्षेपित घटक क्रेडिट पद्धतीसह गणना केलेल्या परिभाषित लाभ दायित्वाचे वर्तमान मूल्य) ताळेबंदात ओळखल्या गेलेल्या परिभाषित लाभ दायित्वाची गणना करताना लागू केली गेली आहे.

संवेदनशीलता विश्लेषण तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धती आणि अनुमानांचे प्रकार मागील वर्षाच्या तुलनेत बदलले नाहीत.

**परिभाषित लाभ दायित्वाची परिपक्वता प्रोफाइल**
**उपदानाचे अपेक्षित परिपक्वता विश्लेषण खालीलप्रमाणे आहे -**

**(रुपये लाखात)**

| अहवालाच्या तारखेपासून भविष्यातील वर्षांमध्ये देय अपेक्षित लाभ | 31 मार्च, 2023 रोजी | 31 मार्च, 2022 रोजी | 1 एप्रिल, 2021 रोजी |
|---|---|---|---|
| पहिले पुढील वर्ष | 110.67 | 41.52 | 28.95 |
| दुसरे पुढील वर्ष | 52.90 | 27.18 | 24.29 |
| तिसरे पुढील वर्ष | 62.63 | 43.31 | 24.36 |
| चौथे पुढील वर्ष | 56.57 | 32.92 | 16.22 |
| पाचवे पुढील वर्ष | 53.29 | 29.92 | 23.54 |
| 6 ते 10 वर्षांची बेरीज | 217.79 | 137.85 | 103.52 |

**टीप -** कर्मचाऱ्यांना शासकीय राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा लाभ घेता यावा यासाठी - राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (म्हणजे, निवृत्तीवेतनाचा निवृत्ती निधी तयार करणे), मूळ वेतन आणि महागाई भत्त्याच्या कमाल 10% योगदानाची अनेक भत्त्यांमधून पुनर्रचना केली गेली आहे, ज्या कर्मचाऱ्यांनी ही योजना निवडली असेल त्यांच्या बाबतीत कर्मचाऱ्यांना काही विशिष्ट भत्ते देय आहेत. त्याचा महामंडळावर कोणताही वित्तीय परिणाम होत नाही.

### टीप 25 : सूक्ष्म आणि लघु उद्योग प्रकटीकरणाची देयके -

**हिशेबाच्या पुस्तकांवर आधारित एमएसएमईडी कायद्यानुसार प्रकटीकरण खालीलप्रमाणे आहेत -**

**(रुपये लाखात)**

| तपशील | 31 मार्च, 2023 रोजी | 31 मार्च, 2022 रोजी | 1 एप्रिल, 2021 रोजी |
|---|---|---|---|
| (अ) अदा न केलेली मूळ रक्कम | 23.88 | 94.57 | 93.57 |
| (ब) त्यावरील अदा केलेले व्याज | निरंक | निरंक | निरंक |
| (क) एमएसएमईडी कायद्याच्या कलम 16 नुसार पुरवठादारास नियुक्त केलेल्या तारखेच्या पुढे दिलेल्या देयकाच्या रकमेसह दिलेले व्याज | निरंक | निरंक | निरंक |
| (ड) वर्षभरात परंतु एमएसएमईडी कायद्यांतर्गत देय निर्दिष्ट व्याज न जोडता नियोजित दिवसाच्या पलीकडे पेमेंट करण्यात विलंब झाल्यास देय व्याज | निरंक | निरंक | निरंक |
| (इ) जमा झालेले व्याज आणि अदा न केलेले बाकी | निरंक | निरंक | निरंक |
| (फ) पुढील बाकी असलेले व्याज आणि त्यानंतरच्या वर्षात देखील देय असलेले, जेव्हा वरील व्याजाची देय रक्कम लघु उद्योगाला प्रत्यक्षात दिली जाईल अशा तारखेपर्यंत | निरंक | निरंक | निरंक |
| **एकूण** | **23.88** | **94.57** | **93.57** |

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

### टीप 26 - विभागीय अहवाल

कंपनीकडे अहवाल करण्यायोग्य फक्त एक कार्यखंड आहे. ती मुंबईत मेट्रो रेल्वे प्रणाली विकसित करत आहे, चालवत आहे आणि त्याची देखरेख करत आहे. त्यानुसार वित्तीय विवरणांमध्ये दिसणारी रक्कम कंपनीच्या एक कार्यखंडाशी संबंधित आहे.

### टीप 27 - मोजमाप केलेले वाजवी मूल्य

**(रुपये लाखात)**

| तपशील | 31 मार्च, 2023 रोजी | | | 31 मार्च, 2022 रोजी | | | 1 एप्रिल, 2021 रोजी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एफव्ही पीएल | एफव्ही ओसीआय | परिशोधन खर्च | एफव्ही पीएल | एफव्ही ओसीआय | परिशोधन खर्च | एफव्ही पीएल | एफव्ही ओसीआय | परिशोधन खर्च |
| **वित्तीय मालमत्ता** | | | | | | | | | |
| **कार्यरत नसलेले** | | | | | | | | | |
| कर्ज | - | - | 4.58 | - | - | 8.34 | - | - | |
| इतरांची वित्तीय मालमत्ता | - | - | 410.61 | - | - | 285.02 | - | - | 1,134.59 |
| **चालू** | | | | | | | | | |
| रोख आणि रोखसम | - | - | 4,301.49 | - | - | 33,205.33 | - | - | 28,065.50 |
| वरील व्यतिरिक्त समाविष्ट केलेल्या इतर बँक शिलका | - | - | 324.32 | - | - | 2,801.09 | - | - | 3,131.99 |
| कर्ज | | | 3.75 | | | 4.11 | - | - | |
| इतरांची वित्तीय मालमत्ता | - | - | 10,139.18 | - | - | 15,921.27 | - | - | 22,832.69 |
| **एकूण वित्तीय मालमत्ता** | **-** | **-** | **15,183.93** | **-** | **-** | **52,225.16** | **-** | **-** | **55,164.77** |
| **वित्तीय दायित्वे** | | | | | | | | | |
| **चालू नसलेले** | | | | | | | | | |
| कर्जे | - | - | 15,13,213.49 | - | - | 13,42,813.85 | - | - | 11,30,564.01 |
| भाडे दायित्व | - | - | 3,111.59 | - | - | 2,511.27 | - | - | 1,248.21 |
| इतर वित्तीय दायित्वे | - | - | 381.69 | - | - | 348.69 | - | - | |
| **चालू नसलेले** | | | | | | | | | |
| कर्जे | | | 24,888.06 | | | - | - | - | |
| भाडे दायित्व | - | - | 1,325.42 | - | - | 1,463.79 | - | - | 2,549.87 |
| इतर वित्तीय दायित्वे | - | - | 1,36,718.80 | - | - | 1,19,028.59 | - | - | 1,18,091.51 |
| **एकूण वित्तीय दायित्वे** | **-** | **-** | **16,79,639.05** | **-** | **-** | **14,66,166.19** | **-** | **-** | **12,52,489.44** |

**अ) वाजवी मूल्य श्रेणीक्रम**

हा विभाग वित्तीय साधनांची वाजवी मूल्ये ठरवताना घेतलेले निर्णय आणि अंदाज स्पष्ट करतात अशी वित्तीय साधने (अ) ओळखली जातात आणि वाजवी मूल्याने मोजली जातात आणि (ब) परिशोध किंमतीवर मोजली जातात आणि त्यासाठी वित्तीय विवरणांमध्ये वाजवी मूल्ये प्रकट केली जातात. वाजवी मूल्य निर्धारित करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या निविष्ठेच्या विश्वासार्हतेबद्दल एक संकेत देण्यासाठी, कंपनीने लेखा मानकांनुसार विहित केलेल्या तीन स्तरांमध्ये वित्तीय साधनांचे वर्गीकरण केले आहे.

**ब) अशी कोणतीही वित्तीय मालमत्ता आणि वित्तीय दायित्वे नाहीत जी वाजवी मूल्यावर मोजली गेली आहेत आणि ज्यासाठी वाजवी मूल्य श्रेणीनुसार प्रकटीकरण आवश्यक आहे**

**वर्षभरात कोणत्याही स्तरादरम्यान कोणतेही हस्तांतरण झाले नाही.**

स्तर 1 - स्तर 1 पदानुक्रमात उद्धृत किंमती वापरून मोजली जाणारी वित्तीय साधने समाविष्ट आहेत. यामध्ये सूचीबद्ध समभाग साधने आणि म्युच्युअल फंड (सामन्य लोकांकडून बचत रूपाने घेतलेले पैसे व्यापारात लावून येणारा नफा सामान्य लोकांत वाटणे) यांचा समावेश आहे व ज्यांची किंमत उद्धृत आहे. स्टॉक एक्स्चेंजमध्ये व्यवहार केलेल्या सर्व समभाग साधनांच्या वाजवी मूल्याचे मूल्य अहवाल कालावधीनुसार अंतिम किंमत वापरून केले जाते. अंतिम निव्वळ मालमत्ता मूल्य (एनएव्ही) वापरून म्युच्युअल फंडांचे मूल्यांकन केले जाते.

स्तर 2 - सक्रिय बाजारपेठेत व्यवहार न केलेल्या वित्तीय साधनांचे वाजवी मूल्य (उदाहरणार्थ ओव्हर-द-काउंटर डेरिव्हेटिव्ह) मूल्यांकन तंत्रांचा वापर करून निर्धारित केले जाते जे निरीक्षण करण्यायोग्य बाजारातील माहितीचा जास्तीत जास्त वापर करतात आणि संस्थेच्या विशिष्ट अंदाजांवर शक्य तितक्या कमी अवलंबून असतात. एखाद्या साधनाला वाजवी मूल्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व महत्त्वपूर्ण निविष्ठा निरीक्षण करण्यायोग्य असल्यास, साधनाचा समावेश स्तर 2 मध्ये केला जातो.

स्तर 3 - जर एक किंवा अधिक महत्त्वपूर्ण निविष्ठा निरीक्षण करण्यायोग्य बाजारातील माहितीवर आधारित नसतील, तर साधनाचा समावेश स्तर 3 मध्ये केला जातो.

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

### टीप 28 - भांडवल व्यवस्थापन

**जोखीम व्यवस्थापन**

कंपनीच्या भांडवली व्यवस्थापनाचे प्राथमिक उद्दिष्ट समभागधारकांचे मूल्य वाढवणे हे आहे. कंपनी निव्वळ कर्ज-समभाग गुणोत्तर वापरून भांडवली संरचनेचे परीक्षण करते.

ताळेबंदात दाखवल्याप्रमाणे एकूण समभागामध्ये राखून ठेवलेली मिळकत, समभाग भांडवल, समभाग अर्ज रकमेचे प्रलंबित वाटप समाविष्ट आहेत. एकूण कर्जामध्ये चालू कर्ज आणि चालू नसलेल्या कर्जाचा समावेश होतो.

**(रुपये लाखात)**

| तपशील | 31 मार्च, 2023 रोजी | 31 मार्च, 2022 रोजी (पुन्हा सादर केलेले) | 1 एप्रिल, 2021 रोजी (पुन्हा सादर केलेले) |
|---|---|---|---|
| एकूण कर्ज | 15,38,101.55 | 13,42,813.85 | 11,30,564.01 |
| एकूण समभाग | 4,67,908.38 | 4,30,925.48 | 3,73,421.58 |
| **कर्ज / समभाग गुणोत्तर** | **3.29** | **3.12** | **3.03** |

### टीप 29 : आर्थिक जोखीम व्यवस्थापन

**आर्थिक जोखीम घटक**

वित्तीय साधनांच्या संबंधात कंपनीला विविध जोखमींचा सामना करावा लागतो. कंपनीची वित्तीय मालमत्ता आणि वर्गवारीनुसार दायित्वे खाली सारांशित केली आहेत. बाजारातील जोखीम, व्याजदर जोखीम, पत जोखीम आणि तरलता जोखीम हे मुख्य प्रकारचे धोके आहेत. कंपनीचे जोखीम व्यवस्थापन अस्थिर वित्तीय बाजारातील प्रदर्शन कमी करून कंपनीच्या अल्प ते मध्यम मुदतीच्या रोख प्रवाहाला सक्रियपणे सुरक्षित करण्यावर लक्ष केंद्रित करते. कंपनीला ज्या आर्थिक जोखमींचा सामना करावा लागतो त्यांचे वर्णन खाली केले आहे.

**(अ) बाजारातील जोखीम**

कंपनीला बाजार जोखीम म्हणून परकीय चलन जोखीम आहे. सामान्य सल्लागार आणि कंत्राटदारांना परकीय चलनाच्या अदायगीमुळे विनिमय चढउताराचा धोका असतो. परकीय चलन जोखीम कव्हर करण्यासाठी कंपनीकडे कोणतेही वारण घालण्याचे (hedging) साधन नाही.

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

खालील तक्ते आर्थिक साधनांपासून परकीय चलनाच्या जोखमीचे विश्लेषण करतात -

| तपशील | अमेरिकन डॉलर | यूरो |
|---|---|---|
| **31 मार्च, 2023 रोजी** | | |
| **वित्तीय मालमत्ता** | | |
| इतर वित्तीय मालमत्ता | - | - |
| **एकूण** | - | - |
| **वित्तीय दायित्वे** | | |
| इतर वित्तीय दायित्वे | 1,19,96,020.00 | 31,45,033.60 |
| **एकूण** | 1,19,96,020.00 | 31,45,033.60 |
| **परकीय चलनाच्या जोखमीसाठी निव्वळ प्रदर्शन** | **(1,19,96,020.00)** | **(31,45,033.60)** |
| **31 मार्च, 2022 रोजी** | | |
| **वित्तीय मालमत्ता** | | |
| इतर वित्तीय मालमत्ता | - | - |
| **एकूण** | - | - |
| **वित्तीय दायित्वे** | | |
| इतर वित्तीय दायित्वे | 79,92,880.00 | 47,17,372.00 |
| **एकूण** | 79,92,880.00 | 47,17,372.00 |
| **परकीय चलनाच्या जोखमीसाठी निव्वळ प्रदर्शन** | **(79,92,880.00)** | **(47,17,372.00)** |
| **1 एप्रिल, 2021 रोजी** | | |
| **वित्तीय मालमत्ता** | | |
| इतर वित्तीय मालमत्ता | - | - |
| **एकूण** | - | - |
| **वित्तीय दायित्वे** | | |
| इतर वित्तीय दायित्वे | 1,22,29,831.92 | 16,76,351.00 |
| **एकूण** | 1,22,29,831.92 | 16,76,351.00 |
| **परकीय चलनाच्या जोखमीसाठी निव्वळ प्रदर्शन** | **(1,22,29,831.92)** | **(16,76,351.00)** |

### खालील महत्त्वपूर्ण विनिमय दर लागू केले आहेत.

| चलन | 31 मार्च, 2023 रोजी | 31 मार्च, 2022 रोजी | 1 एप्रिल, 2021 रोजी |
|---|---|---|---|
| अमेरिकन डॉलर | 82.22 | 75.81 | 73.50 |
| युरो | 89.61 | 84.66 | 86.10 |

### संवेदनशीलता विश्लेषण

दि.31 मार्च 2023 रोजी वरील चलनांच्या तुलनेत रुपयाचे वाजवी बळकटीकरण (कमकुवत होणे) परकीय चलनातील वित्तीय साधनांच्या मोजमापावर आणि खाली दर्शविलेल्या रकमेद्वारे नफा किंवा तोटा प्रभावित करेल. हे विश्लेषण असे गृहीत धरते की इतर सर्व चल, विशेषत: व्याजदर, स्थिर राहतात.

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

(रुपये लाखात)

| तपशील | करपूर्वी नफा किंवा तोटा | |
|---|---|---|
| | आयएनआर मजबूत करणे | आयएनआरची कमजोरी |
| **31 मार्च, 2023** | | |
| अमेरिकन डॉलर (10% विचलन) | 986.28 | (986.28) |
| युरो (10% विचलन) | 281.82 | (281.82) |
| **31 मार्च, 2022** | | |
| अमेरिकन डॉलर (10% विचलन) | 605.94 | (605.94) |
| युरो (10% विचलन) | 399.37 | (399.37) |
| **1 एप्रिल, 2021** | | |
| अमेरिकन डॉलर (10% विचलन) | 898.89 | (898.89) |
| युरो (10% विचलन) | 144.33 | (144.33) |

**(ब) व्याज दर जोखीम**

महामंडळाला व्याजदराचा धोका मुख्यत्वे त्यांच्या कर्जावरील चल विनिमय दरामुळे असतो. अहवालाच्या तारखेला व्याज दरात 100 आधार बिंदूच्या संभाव्य बदलामुळे खाली दर्शविल्याप्रमाणे, रोख प्रवाहावर परिणाम झाला असेल. गती दिशात्मक आहे आणि व्याजदराच्या विचलनावर (movement) व्यवस्थापन अंदाज प्रतिबिंबित करत नाही.

**संवेदनशीलता विश्लेषण**

(रुपये लाखात)

| तपशील | रोख प्रवाहावर परिणाम | |
|---|---|---|
| | 100 बीपीएस वाढ | 100 बीपीएस घट |
| 31 मार्च, 2023 | 1,664.82 | (1,664.82) |
| 31 मार्च, 2022 | - | - |
| 1 एप्रिल, 2021 | - | - |

**(क) पत जोखीम**

पत जोखीम म्हणजे प्रतिपक्षाद्वारे त्याच्या दायित्व अदा करण्याच्या कर्तव्यात चूक होण्याच्या जोखमीचा परिणाम होतो, ज्यामुळे आर्थिक नुकसान होते. कंपनीला विविध वित्तीय साधनांसाठी या जोखमीचा सामना करावा लागतो, उदा. कर्मचाऱ्यांना अग्रिम मंजूर करुन बँकांकडून मिळण्यायोग्य, सुरक्षा ठेवी इ.

महामंडळाचे वाणिज्यिक कार्यचालन अद्याप सुरू झालेले नाही, कंपनी वैयक्तिकरित्या किंवा कंपनीद्वारे ओळखल्या जाणाऱ्या इतर प्रतिपक्षांच्या चुकांचे सतत निरीक्षण करते आणि ही माहिती तिच्या पत जोखीम नियंत्रणांमध्ये समाविष्ट करते. वाजवी दरात उपलब्ध झाल्यास, बाह्य पत मानांकन आणि / किंवा इतर प्रतिपक्षांवरील अहवाल प्राप्त केले जातात आणि वापरले जातात.

**पत जोखीम व्यवस्थापन**

रोख आणि रोखसम

रोख आणि रोख समतुल्यांशी संबंधित पत जोखीम शेड्यूल व्यावसायिक बँकांमध्ये निधी ठेवून व्यवस्थापित केली जाते. त्या बँका भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियामक निरीक्षणाच्या अधीन आहेत आणि या बँकिंग संबंधांचे सतत पुनरावलोकन केले जाते.

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

इतर वित्तीय मालमत्ता

इतर वित्तीय मालमत्तांमध्ये कर्मचाऱ्यांना कर्जे आणि अग्रिमाचा समावेश होतो आणि इतरांना परिशोधन खर्चाने मोजले जाते.

**(क) तरलता जोखीम**

मासिक आणि वार्षिक अंदाजांच्या आधारे महामंडळाच्या तरलतेच्या गरजांचे परीक्षण केले जाते. रोख आणि रोख समतुल्य, कार्यचालनाखेरीज अन्य मार्गाने मिळालेले महसूल, दीर्घकालीन कर्ज, व्याजमुक्त दुय्यम कर्ज, भाग भांडवल आणि अनुदान हे कंपनीचे तरलतेचे प्रमुख स्त्रोत आहेत.

रोखीच्या प्रवाहाचे सतत निरीक्षण करून आणि पुरेशी रोख आणि रोख समतुल्य महामंडळाकडे राखून तरलतेच्या गरजांचे व्यवस्थापन केले जाते. कोणतीही तूट निश्चित करण्यासाठी निव्वळ रोख आवश्यकतांची तुलना उपलब्ध रोख रकमेशी केली जाते.

अल्पकालीन तरलता आवश्यकतांमध्ये प्रामुख्याने विविध कर्जदार, देय खर्च, कर्मचाऱ्यांची देयके, अल्प मुदतीची कर्जे आणि प्रत्येक अहवाल तारखेनुसार व्यवसायाच्या सामान्य व्यवहारादरम्यान उद्भवणारी धारणा रक्कम आणि ठेवी यांचा समावेश होतो. अल्पकालीन तरलता आवश्यकता पूर्ण करण्यासाठी रोख आणि रोख समतुल्य मध्ये पुरेशी शिल्लक राखली जाते.

दीर्घकालीन तरलता आवश्यकतांचे मूल्यमापन नियतकालिक आधारावर केले जाते आणि ते भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकारकडून प्राप्त झालेल्या तसेच अंतर्गत जमा यांच्याद्वारे व्यवस्थापित केले जाते. महामंडळाच्या चालू नसलेल्या दायित्वांमध्ये जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेचे कर्ज, व्याजमुक्त दुय्यम कर्ज, धारणा आणि ठेवी आणि कर्मचारी फायद्यासाठी दायित्वे यांचा समावेश आहे.

खालील तक्त्यामध्ये नॉन-डेरिव्हेटिव्ह आर्थिक उत्तरदायित्वांच्या कराराच्या परिपक्वतासंबंधी तपशील दिलेला आहे. कंपनीला ज्या दिवशी रक्कम भरावी लागेल त्या लवकरात लवकर येणाऱ्या तारखेच्या आधारे वित्तीय दायित्वांच्या रोख प्रवाहावर आधारित तक्ता तयार केला गेला आहे. तक्त्यामध्ये मुद्दल आणि व्याज यांच्या रोख प्रवाह दोन्ही समाविष्ट आहेत.

(रुपये लाखात)

| तपशील | 1 वर्षापर्यंत | 1 ते 3 वर्षे | 3 ते 5 वर्षे | 5 वर्षांपेक्षा जास्त | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| **31 मार्च, 2023 रोजी** | | | | | |
| कर्ज घेणे (टीप 11 पहा) | 24,888.06 | 1,42,750.64 | 1,05,756.36 | 12,64,706.49 | **15,38,101.55** |
| भाडे दायित्व | 1,325.42 | 2,274.75 | 778.98 | 57.86 | **4,437.01** |
| इतर वित्तीय दायित्वे (टीप 12 पहा) | 1,36,718.80 | 43.34 | 310.55 | 27.80 | **1,37,100.49** |
| **एकूण** | **1,62,932.28** | **1,45,068.73** | **1,06,845.89** | **12,64,792.15** | **16,79,639.05** |
| **31 मार्च, 2022 रोजी** | | | | | |
| कर्ज घेणे (टीप 11 पहा) | - | 43,062.69 | 43,062.54 | 12,56,688.62 | **13,42,813.85** |
| भाडे दायित्व | 1,463.79 | 1,320.62 | 1,131.55 | 59.10 | **3,975.06** |
| इतर वित्तीय दायित्वे (टीप 12 पहा) | 1,19,028.59 | - | 39.22 | 309.47 | **1,19,377.28** |
| **एकूण** | **1,20,492.38** | **44,383.31** | **44,233.31** | **12,57,057.19** | **14,66,166.19** |
| **1 एप्रिल, 2021 रोजी** | | | | | |
| कर्ज घेणे (टीप 11 पहा) | - | 22,960.39 | 45,920.46 | 10,61,683.16 | **11,30,564.01** |
| भाडे दायित्व | 2,549.87 | 941.09 | 246.88 | 60.24 | **3,798.08** |
| इतर वित्तीय दायित्वे (टीप 12 पहा) | 1,18,091.51 | - | 35.84 | - | **1,18,127.35** |
| **एकूण** | **1,20,641.38** | **23,901.48** | **46,203.18** | **10,61,743.40** | **12,52,489.44** |

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

### टीप 30 - चुका सुधारणे

चलनविषयक बाबींच्या समझोत्यावर किंवा चलनविषयक बाबींचे अनुवाद करताना उद्भवलेल्या विनिमय फरकांचा त्या कालावधीत प्रारंभिक मान्यता किंवा मागील वित्तीय अहवालामध्ये अनुवादित केलेल्या दरांपेक्षा भिन्न दरांवर भारतीय लेखामानक 21 नुसार अहवाल देणे आवश्यक आहे.

तथापि, सुरुवातीपासूनच, परकीय चलन नफा / तोटा त्याच्या लेखा धोरणानुसार प्रगतीपथावरील भांडवली कार्य (सीडब्ल्यूआयपी) मध्ये ओळखला गेला. वर्षभरात, कंपनीने भारतीय लेखामानक 21 च्या तरतुदींचे पालन करण्यास सक्षम करण्यासाठी उपरोक्त लेखा धोरणात सुधारणा केली आहे. लेखा धोरणातील नमूद केलेल्या बदलांसाठी पूर्वीच्या कालावधीतील त्रुटीच्या संदर्भात भारतीय लेखामानक 8 चे आवश्यक प्रकटीकरण खाली दिलेले आहे -

(रुपये लाखात)

| तपशील | 31 मार्च, 2022 रोजी | | 31 मार्च, 2021 रोजी | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | पुन्हा सादर केलेले | नोंदवलेले | पुन्हा सादर केलेले | नोंदवलेले | |
| **चालू नसलेली मालमत्ता** | | | | | |
| प्रगतीपथावरील भांडवली कार्य | 19,63,725.15 | 19,64,170.37 | 16,02,595.78 | 16,03,311.56 | परकीय चलनाच्या चढ उताराच्या पद्धतीत बदल झाल्यामुळे भांडवली कामापासून नफा आणि तोटा खात्यापर्यंत होणारे परिणाम |
| | | | | | |
| **समभाग आणि दायित्वे** | | | | | |
| **समभाग** | | | | | |
| अन्य समभाग | (9,794.52) | (9,349.30) | (8,098.42) | (7,382.64) | परकीय चलनाच्या चढ उताराच्या पद्धतीत बदल झाल्यामुळे भांडवली कामापासून नफा आणि तोटा खात्यापर्यंत होणारे परिणाम |

(रुपये लाखात)

| तपशील | 31 मार्च, 2022 रोजी संपलेल्या वर्षासाठी | | फरक | शेरा |
|---|---|---|---|---|
| | पुन्हा सादर केलेले | नोंदवलेले | | |
| **परकीय चलन चढउतार - लाभ** | 270.56 | - | 270.56 | परकीय चलनाच्या चढउताराच्या पद्धतीत बदल झाल्यामुळे होणारे परिणाम भांडवली कामापासून नफा आणि तोटा खात्यापर्यंत |
| **उत्पन्नात निव्वळ वाढ** | **270.56** | **-** | **270.56** | |
| **(तोटा) कराच्या आधी** | (2,199.25) | (2,469.81) | 270.56 | परकीय चलनाच्या नफ्यामुळे निव्वळ परिणाम |
| **(तोटा) करानंतर** | (1,678.76) | (1,949.32) | 270.56 | परकीय चलनाच्या नफ्यामुळे निव्वळ परिणाम |
| **प्रती समभाग मिळकत (रुपया)** | | | | |
| **मूलभूत** | (0.42) | (0.49) | 0.07 | त्रुटी सुधारल्यामुळे कर्मचारी निवृत्तीवेतन योजने वर परिणाम |
| **विरलीकृत** | (0.42) | (0.49) | 0.07 | त्रुटी सुधारल्यामुळे कर्मचारी निवृत्तीवेतन योजने वर परिणाम |

### टीप 31 - कंपनी कायदा, 2013 च्या अनुसूची 3 नुसार आवश्यक असलेली अतिरिक्त नियामक माहिती-

**आवश्यकता (i) -** कंपनीच्या नावावर नसलेल्या स्थावर मालमत्तेचे अभिहस्तांतरण पत्र
**प्रतिसाद -** माहिती टीप क्रमांक 2 मध्ये वित्तीय विवरणामध्ये प्रकट केली आहे.

**आवश्यकता (ii) -** गुंतवणुकीच्या मालमत्तेचे वाजवी मूल्य (वित्तीय विवरणांमध्ये प्रकटीकरणाच्या उद्देशाने मोजले गेलेले) हे कंपनी (नोंदणीकृत मूल्यांकनकार आणि मूल्यांकन) नियम 2017 च्या नियम 2 अंतर्गत परिभाषित केल्यानुसार नोंदणीकृत मूल्यांकनकाराने केलेल्या मूल्यांकनावर आधारित आहे की नाही हे कंपनी प्रकट करेल.
**प्रतिसाद -** कंपनीकडे कोणतीही गुंतवणूक मालमत्ता नाही. त्यामुळे हा परिच्छेद कंपनीला लागू होत नाही.

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

**आवश्यकता (iii) -** जिथे कंपनीने तिची मालमत्ता, संयंत्रे आणि उपकरणे (वापरण्याच्या हक्काच्या मालमत्तेसह) पुनर्मूल्यांकन केले आहे, हे कंपनी (नोंदणीकृत मूल्यांकनकार आणि मूल्यांकन) नियम 2017 च्या नियम 2 अंतर्गत परिभाषित केल्यानुसार नोंदणीकृत मूल्यांकनकाराने केलेल्या मूल्यांकनावर आधारित आहे की नाही हे कंपनी प्रकट करेल.
**प्रतिसाद -** कंपनी त्यानंतरच्या मोजमापासाठी खर्चाच्या प्रारुपाचे अनुसरण करते. त्यामुळे हा परिच्छेद कंपनीला लागू होत नाही.

**आवश्यकता (iv) –** जेथे कंपनीने तिच्या अमूर्त मालमत्तेचे पुनर्मूल्यांकन केले आहे, तेथे कंपनी (नोंदणीकृत मूल्यांकनकार आणि मूल्यांकन) नियम 2017 च्या नियम 2 अंतर्गत परिभाषित केल्यानुसार नोंदणीकृत मूल्यांकनकाराने केलेल्या मूल्यांकनावर आधारित आहे की नाही हे कंपनी प्रकट करेल.
**प्रतिसाद -** कंपनी त्यानंतरच्या मोजमापासाठी खर्चाच्या प्रारुपाचे अनुसरण करते. त्यामुळे हा परिच्छेद कंपनीला लागू होत नाही.

**आवश्यकता (v) –** प्रवर्तक, संचालक, प्रमुख व्यवस्थापकीय व्यक्ती आणि संबंधित पक्षकारांना (कंपनी कायदा, 2013 अंतर्गत परिभाषित केल्याप्रमाणे) कर्जाच्या स्वरूपातील कर्जे किंवा अग्रिमे दिली जातात तेव्हा एकतर स्वतंत्रपणे किंवा इतर कोणत्याही व्यक्तीसह संयुक्तपणे विहित # खुलासे केले जातील, ते खालीलप्रमाणे आहेत -
(अ) मागणीनुसार परतफेड करण्यायोग्य किंवा
(ब) कोणत्याही अटी किंवा परतफेडीचा कालावधी निर्दिष्ट न करता
**प्रतिसाद -** कंपनीने प्रवर्तक, संचालक, प्रमुख व्यवस्थापकीय व्यक्ती आणि संबंधित पक्षकारांना मागणीनुसार परतफेड करण्यायोग्य असे कर्ज किंवा कर्जाच्या स्वरूपातील कर्ज किंवा अग्रिम दिलेले नाहीत, किंवा कोणत्याही अटी किंवा परतफेडीचा कालावधी निर्दिष्ट केल्याशिवाय आहेत. त्यामुळे हा परिच्छेद कंपनीला लागू होत नाही.

**आवश्यकता (vi) व (vii) -**
(अ) प्रगतीपथवरील भांडवली कार्ये (सीडब्ल्यूआयपी) / विकासाधीन अमूर्त मालमत्ता (आयटीएयूडी) साठी वृद्धीचे वेळापत्रक
**प्रतिसाद -** टीप क्रमांक 3(अ) आणि 3(ब) मध्ये वित्तीय विवरणामध्ये माहिती प्रकट केली आहे.
(ब) प्रगतीपथवरील भांडवली कार्ये (सीडब्ल्यूआयपी) / विकासाधीन अमूर्त मालमत्ता (आयटीएयूडी), ज्या पूर्ण होणे बाकी आहे किंवा त्याच्या मूळ योजनेच्या तुलनेत त्याची किंमत ओलांडली आहे, विहित # खुलासा दिला जाईल.
**प्रतिसाद -** टीप क्रमांक 3(अ) आणि 3(ब) मध्ये वित्तीय विवरणामध्ये माहिती प्रकट केली आहे.

**आवश्यकता (viii) -** बेनामी व्यवहार (प्रतिबंध) कायदा, 1988 (1988 चा 45) आणि त्याखालील नियमांनुसार कोणतीही बेनामी मालमत्ता बाळगण्यासाठी कंपनीविरुद्ध कोणतीही कार्यवाही सुरू किंवा प्रलंबित असल्यास, विहित # खुलासा दिला जाईल.

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

**प्रतिसाद -** कंपनीकडे कोणतीही बेनामी मालमत्ता नाही. तसेच, बेनामी व्यवहार (प्रतिबंध) कायदा, 1988 (1988 चा 45) आणि त्याखाली बनवलेल्या नियमांनुसार कोणतीही बेनामी मालमत्ता ठेवल्याबद्दल कंपनीविरुद्ध कोणतीही कार्यवाही सुरू केलेली नाही किंवा प्रलंबित नाही. त्यामुळे या परिच्छेदाची आवश्यकता कंपनीला लागू होत नाही.

**आवश्यकता (ix) -** चालू मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या आधारावर कंपनीने बँक किंवा वित्तीय संस्थांकडून कर्ज घेतले आहे का?

**प्रतिसाद -** चालू मालमत्तेच्या सुरक्षिततेसाठी कंपनीने बँक किंवा वित्तीय संस्थांकडून कोणतेही कर्ज घेतलेले नाही.

**आवश्यकता (x) -** हेतुपुरस्सर पैसे वेळेवर न भरणारा (डिफॉल्टर)

जेव्हा एखादी कंपनी कोणत्याही बँक किंवा वित्तीय संस्था किंवा इतर सावकाराने घोषित केले गेलेले डिफॉल्टर असेल, तेव्हा खालील तपशील दिले जातील -

(अ) हेतुपुरस्सर पैसे वेळेवर न भरणारा (डिफॉल्टर) म्हणून घोषित करण्याची तारीख,

(ब) डीफॉल्टचे तपशील (डिफॉल्टची रक्कम आणि स्वरूप)

**प्रतिसाद -** कंपनी हेतुपुरस्सर पैसे वेळेवर न भरणारा (डिफॉल्टर) घोषित केलेली नाही, त्यामुळे या परिच्छेदाची आवश्यकता कंपनीला लागू होत नाही.

**आवश्यकता (xi) -** बंद पडलेल्या कंपन्यांशी संबंध

कंपनी कायदा, 2013 च्या कलम 248 किंवा कंपनी कायदा, 1956 च्या कलम 560 अंतर्गत बंद पडलेल्या कंपन्यांसोबत कंपनीचे कोणतेही व्यवहार असल्यास, विहित # खुलासा दिला जाईल.

**प्रतिसाद -** कंपनीचा अडकलेल्या कंपन्याशी कोणताही सबंध आणि व्यवहार नाही.

**आवश्यकता (xii) -** बोजाची नोंदणी किंवा कंपनी निबंधकांकडे बोजा उतरवल्याची नोंद

वैधानिक कालावधीच्या पलीकडे कंपनी निबंधकांकडे अद्याप कोणत्याही बोजाची किंवा भरपाईची नोंदणी करावायची असल्यास, त्याचे तपशील आणि कारणे उघड केली जातील.

**प्रतिसाद -** कंपनीने वैधानिक कालावधीत बोजांची नोंदणी केली आहे.

**आवश्यकता (xiii) -** कंपन्यांच्या स्तरांच्या संख्येचे पालन

जर कंपनीने कंपनीचे (स्तरांच्या संख्येवर निर्बंध) नियम, 2017 च्या कायद्याच्या कलम 2 च्या खंड (87) अंतर्गत विहित केलेल्या स्तरांच्या संख्येचे पालन केले नसेल तर, निर्दिष्ट स्तरांपलीकडे कंपन्यांचे नाव आणि सीआयएन आणि अशा डाउनस्ट्रीम कंपन्यांमधील कंपनीचा संबंध किंवा व्याप्ती प्रकट केली जाईल.

**प्रतिसाद -** कंपनीकडे कोणतीही थेट किंवा खालच्या स्तरावर उपकंपनी किंवा उपकंपन्या नाहीत. त्यामुळे हा परिच्छेद कंपनीला लागू होत नाही.

**आवश्यकता (xiv) -** गुणोत्तर विश्लेषण -

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

### अ) चालू गुणोत्तर = चालू मालमत्ता भागिले चालू दायित्वे

(रुपये लाखात)

| | 31 मार्च, 2023 रोजी | 31 मार्च, 2022 रोजी | 1 एप्रिल, 2021 रोजी |
|---|---|---|---|
| चालू मालमत्ता | 48,393.11 | 84,138.99 | 85,504.47 |
| चालू दायित्वे | 1,68,943.22 | 1,26,986.80 | 1,27,662.06 |
| गुणोत्तर | 0.29 | 0.66 | 0.67 |
| मागील वर्षाच्या तुलनेत % बदल | -56.77% | -1.07% | |

25% पेक्षा जास्त बदलाचे कारण: हा बदल प्रामुख्याने चालू मालमत्तेमध्ये रु.84138.99 लाखांवरून रु.48393.11 लाखांपर्यंत कमी झाल्यामुळे आहे. मागील वर्षाच्या तुलनेत रोख आणि रोख समतुल्य रक्कम कमी झाल्यामुळे सध्याची मालमत्ता कमी झाली आहे.

### ब) कर्ज समभाग गुणोत्तर = एकूण कर्ज भागिले एकूण समभाग जेथे एकूण कर्ज म्हणजे चालू आणि चालू नसलेल्या कर्जाची बेरीज

(रुपये लाखात)

| | 31 मार्च, 2023 रोजी | 31 मार्च, 2022 रोजी | 1 एप्रिल, 2021 रोजी |
|---|---|---|---|
| एकूण कर्ज | 15,38,101.55 | 13,42,813.85 | 11,30,564.01 |
| एकूण समभागधारकांचे समभाग | 4,67,908.38 | 4,30,925.48 | 3,73,421.58 |
| गुणोत्तर | 3.29 | 3.12 | 3.03 |
| मागील वर्षाच्या तुलनेत % बदल | 5.49% | 2.92% | |
| **25% पेक्षा जास्त बदलाचे कारण - लागू नाही** | | | |

### क) कर्ज सेवा व्याप्ती गुणोत्तर = एकूण व्याज आणि मुद्दल परतफेडीने भागून कर्ज सेवांसाठी उपलब्ध मिळकत.

महामंडळाने अद्याप कामकाज सुरू केलेले नाही आणि महामंडळाचे परिचालन उत्पन्न अद्याप सुरू झालेले नाही. त्यामुळे गुणोत्तर निश्चित करता येत नाही.

### ड) समभाग गुणोत्तरावर परतावा = करानंतरचा नफा / (तोटा) भागिले समभागधारकांचे सरासरी समभाग

(रुपये लाखात)

| | 31 मार्च, 2023 रोजी | 31 मार्च, 2022 रोजी |
|---|---|---|
| करानंतर निव्वळ नफा / (तोटा) | (2,813.63) | (1,678.76) |
| समभागधारकांचे सरासरी समभाग | 4,49,416.93 | 4,02,173.53 |
| गुणोत्तर | -0.63% | -0.42% |
| मागील वर्षाच्या तुलनेत % बदल | **49.98%** | - |

**25% पेक्षा जास्त बदलाचे कारण** – मागील वर्षाच्या तुलनेत निव्वळ तोटा वाढल्यामुळे हा बदल प्रामुख्याने रु. 229.56 लाखाच्या परकीय चलनाच्या तोट्यामुळे झाला आहे. मागील वर्षातील रु. 270.56 लाख विदेशी चलन नफ्याच्या तुलनेत चालू वर्षाच्या तुलनेत.

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

**इ) नियोजित भांडवलावर परतावा = व्याज आणि करांपूर्वीची मिळकत (इबीआयटी) भागिले भांडवली रोजगार**

| | 31 मार्च, 2023 रोजी | 31 मार्च, 2022 रोजी |
|---|---|---|
| करानंतर निव्वळ नफा (अ) | (2,813.63) | (1,678.76) |
| वित्तीय खर्च (ब) | 26.38 | 32.75 |
| एकूण कर खर्च (क) | (249.35) | (520.49) |
| ईबीआयटी (ड) = (अ) + (ब) + (क) | (3,036.60) | (2,166.50) |
| एकूण समभाग (इ) | 4,67,908.38 | 4,30,925.48 |
| एकूण कर्ज (फ) | 15,38,101.55 | 13,42,813.85 |
| कार्यरत भांडवल (ग) = (इ ) + (फ) | 20,06,009.93 | 17,73,739.33 |
| गुणोत्तर (ड) / (ग) | -0.15% | -0.12% |
| मागील वर्षाच्या तुलनेत % बदल | **23.93%** | - |
| **25% पेक्षा जास्त बदलाचे कारण – लागू नाही.** | | |

फ) महामंडळाने अद्याप वाणिज्यिक कार्यचालन सुरू केलेले नाही. म्हणून, खालील गुणोत्तर निश्चित करता येत नाहीत

- मालसाठा उलाढाल गुणोत्तर = विकलेल्या मालाचा परिव्यय भागिले सरासरी मालसाठा
- व्यापारी येणी उलाढाल गुणोत्तर = उधारीवर केलेली निव्वळ विक्री भागिले सरासरी व्यापारी प्राप्य
- व्यापारी देय उलाढाल गुणोत्तर = उधारीवर केलेली निव्वळ खरेदी भागिले सरासरी व्यापारी देय
- निव्वळ भांडवल उलाढाल गुणोत्तर = निव्वळ वार्षिक विक्री भागिले खेळते भांडवल जेथे खेळते भांडवल = चालू मालमत्ता – चालू देयता
- निव्वळ नफ्याचे गुणोत्तर = निव्वळ नफा / (तोटा) करानंतर भागिले निव्वळ विक्री
- गुंतवणुकीवर परतावा = गुंतवणुकीतून मिळणारे उत्पन्न भागिले गुंतवणुकीची अंतिम शिल्लक

वरील सादर केलेले गैर-जीएएपी उपाय (गैर सर्वसाधारणपणे स्वीकृत लेखापद्धती) इतर कंपन्यांनी नोंदवलेले समान शीर्षक असलेल्या उपायांशी तुलना करता येणार नाहीत. तसेच, हे लक्षात घेतले पाहिजे की हे सामान्यतः स्वीकृत लेखा तत्त्वांद्वारे परिभाषित केलेल्या कार्यरत कामगिरीचे किंवा तरलतेचे मोजमाप नाहीत आणि इतर कंपन्यांनी सादर केलेल्या समान शीर्षक असलेल्या उपायांशी तुलना करता येणार नाही.

**आवश्यकता (xv) -** व्यवस्थेच्या मंजूर योजनेचे पालन

कंपनी कायदा, 2013 च्या कलम 230 ते 237 नुसार सक्षम प्राधिकाऱ्याने व्यवस्थेची योजना मंजूर केली असेल तेव्हा, कंपनी खुलासा करेल की अशा व्यवस्थेच्या योजनेचा परिणाम कंपनीच्या लेखापुस्तकात नोंदवला गेला आहे. योजनेनुसार' आणि लेखा मानकांनुसार' आणि या संदर्भात कोणतेही विचलन स्पष्ट केले जाईल.

**प्रतिसाद -** कंपनीने व्यवस्था योजनेमध्ये कोणतीही अर्ज केलेला नाही. त्यामुळे हा परिच्छेद कंपनीला लागू होत नाही.

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

**आवश्यकता (xvi) -** उधार घेतलेल्या निधीचा आणि समभाग अधिमूल्याचा वापर:

(अ) जिथे कंपनीने परदेशी संस्थांसह (मध्यस्थ) इतर कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थांना (एकतर उधार घेतलेला निधी किंवा समभाग अधिमूल्य किंवा इतर कोणतेही स्रोत किंवा प्रकारचा निधी) अग्रिम किंवा कर्ज दिले किंवा गुंतवणूक केली असेल, मध्यस्थ हे करील या समजुतीने (लेखीत किंवा अन्यथा नोंदवलेले असो),

(i) कंपनी (अंतिम लाभार्थी) किंवा त्यांच्या वतीने कोणत्याही प्रकारे ओळखल्या गेलेल्या इतर व्यक्ती किंवा संस्थांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कर्ज देईल किंवा गुंतवणूक करेल.

(ii) अंतिम लाभार्थींना किंवा त्यांच्या वतीने कोणतीही हमी, सुरक्षा किंवा यासारखे प्रदान करणे; कंपनी खालील गोष्टी प्रकट करेल.

(I) प्रत्येक मध्यस्थांच्या संपूर्ण तपशीलासह अग्रिम किंवा कर्ज घेतलेल्या किंवा मध्यस्थांमध्ये गुंतवलेल्या निधीची तारीख आणि रक्कम.

(II) अंतिम लाभार्थ्यांच्या संपूर्ण तपशिलांसह अशा मध्यस्थांनी इतर मध्यस्थांना किंवा अंतिम लाभार्थ्यांना पुढे अग्रिम किंवा कर्ज दिलेली किंवा गुंतवलेल्या निधीची तारीख आणि रक्कम.

(III) अंतिम लाभार्थ्यांना किंवा त्यांच्या वतीने प्रदान केलेली हमी, सुरक्षा किंवा यासारखे याची तारीख आणि रक्कम

(IV) अशा व्यवहारांसाठी परकीय चलन व्यवस्थापन कायदा, 1999 (1999 चा 42) आणि कंपनी कायद्यातील संबंधित तरतुदींचे पालन केले गेले आहे आणि हे व्यवहार अवैध आर्थिक व्यवहार प्रतिबंधक कायदा, 2002 (2003 चा 15) चे उल्लंघन करत नाहीत अशी घोषणा

**प्रतिसाद -** (अ) वर नमूद केलेल्या उद्देशासाठी कंपनीने इतर कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला अग्रिम किंवा कर्ज दिलेले नाही किंवा गुंतवणूक केलेली नाही (एकतर उधार घेतलेला निधी किंवा समभाग अधिमूल्य किंवा इतर कोणतेही स्रोत किंवा प्रकारचा निधी). त्यामुळे या परिच्छेदाची आवश्यकता लागू होत नाही.

**(ब) जेथे एखाद्या कंपनीला परदेशी संस्थांसह (फंडिंग पार्टी) कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थांकडून कोणताही निधी प्राप्त झाला असेल (जरी लिखित स्वरूपात किंवा अन्यथा) हे समजून घेऊन**

(i) निधी संस्था (अंतिम लाभार्थी) द्वारे किंवा त्यांच्या वतीने कोणत्याही प्रकारे ओळखल्या गेलेल्या इतर व्यक्ती किंवा संस्थांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कर्ज देणे किंवा गुंतवणूक करणे

(ii) अंतिम लाभार्थ्यांच्या वतीने कोणतीही हमी, सुरक्षा किंवा तत्सम प्रदान केल्यास, कंपनी खालील गोष्टी प्रकट करेल:-

(I) निधी देणाऱ्या महसूल पक्षकारांकडून प्राप्त झालेल्या निधीची तारीख आणि रक्कम प्रत्येक निधी मध्यस्थ पक्षकारांच्या संपूर्ण तपशीलासह.

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

(II) इतर मध्यस्थांच्या किंवा अंतिम लाभार्थ्यांच्या संपूर्ण तपशीलांसह पुढील अग्रिम किंवा कर्ज घेतलेल्या किंवा गुंतवणूक केलेल्या निधीची तारीख आणि रक्कम.

(III) अंतिम लाभार्थींना किंवा त्यांच्या वतीने प्रदान केलेली हमी, सुरक्षा किंवा यासारखे याची तारीख आणि रक्कम

(IV) अशा व्यवहारांसाठी परकीय चलन व्यवस्थापन कायदा, 1999 (1999 चा 42) आणि कंपनी कायद्यातील संबंधित तरतुदींचे पालन केले गेले आहे आणि हे व्यवहार अवैध आर्थिक व्यवहार प्रतिबंधक कायदा, 2002 (2003 चा 15) चे उल्लंघन करत नाहीत अशी घोषणा ;

**प्रतिसाद - (ब)** कंपनीला कोणत्याही व्यक्ती(व्यक्ती) किंवा संस्था (आय) कडून कोणताही निधी प्राप्त झालेला नाही, ज्यामध्ये परदेशी संस्था (फंडिंग पार्टी) यांचा समावेश आहे (मग ते लिखित स्वरूपात किंवा अन्यथा नोंदवलेले असले तरी), त्यामुळे या परिच्छेदामधील प्रकटीकरण आवश्यकता कंपनीला लागू होत नाहीत.

# "L अतिरिक्त नियामक माहिती" या शीर्षकात विहित केल्याप्रमाणे कंपनी कायदा 2013 च्या अनुसूची III ते विभाग II ची अतिरिक्त नियामक माहिती.

**टीप 32 -** इतर चालू नसलेली मालमत्ता, कर्जे, इतर वित्तीय मालमत्ता, इतर वित्तीय दायित्वे इत्यादींची काही शिल्लक पुष्टी, सामंजस्य आणि समायोजनाच्या अधीन आहे, जर असेल तर.

**टीप 33 - रशिया-युक्रेन युद्धाचा परिणाम -**

रशिया आणि युक्रेनमधील युद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम झाल्याचे दिसते. या युद्धाच्या मोठ्या प्रभावामुळे वस्तूंच्या (जसे की सिमेंट, पोलाद, इंधन इ.) किमतींमध्ये चढउतार आहेत.

**टीप 34 - कोविड 19 महामारीमुळे होणारा परिणाम -**

महामारीमुळे सर्व कामे सुमारे 1 महिना थांबली होती आणि त्यानंतरही मजूरांची मर्यादित उपलब्धता आणि पुरवठा साखळीतील अंतर यासह विविध कारणांमुळे प्रगती काही काळ मंदावली होती. मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादितने आत्तापर्यंत केवळ 6 महिन्यांचा कालावधी विचारात घेतला आहे कारण या कालावधीत किंमतीत तफावत असलेले कोविडचे परिणाम भोगावे लागतील. कोविडच्या एकूण प्रभावाचे विश्लेषण केले जाईल, जेव्हा पुढील ईओटी (EOT) चा विचार केला जाईल. कोविड साथीचा आजार थांबला असल्याने सध्या या खात्यावरील कामावर कोणताही विपरीत परिणाम झालेला नाही.

**टीप 35 -** कंपनी परकीय चलनाच्या चढउताराचे भांडवलीकरण करण्याची खालील लेखापद्धती अवलंबत होती. सदर खर्च प्रगतीपथावरील भांडवली कार्याला खर्ची टाकणे. वित्तीय वर्ष 2021-22 च्या पुरवणी लेखापरीक्षणादरम्यान, भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांनी परकीय चलन चढउताराच्या उक्त उपचारासंदर्भात भारतीय लेखामानक 21 चे पालन न केल्याबद्दल टिप्पणी केली होती. वर्षभरात, कंपनीने भारतीय लेखामानक 21 च्या

## 31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षातील वित्तीय विवरणाच्या टिपा

आवश्यकतेचे पालन करण्यासाठी नफा आणि तोटा पत्रकामधील वित्तीय बाबींच्या संदर्भात परकीय चलनातील चढउतार ओळखण्याच्या संदर्भात लेखा उपचारासाठी आपले लेखा धोरण बदलले आहे. त्यानुसार चालू वर्षातील तोट्यात रु. 229.56 लाखांनी वाढ झाली आहे आणि प्रगतीपथावरील भांडवली कार्यामध्ये त्याच रकमेची घट झाली आहे. भारतीय लेखामानक 8 च्या आवश्यकतेनुसार, लेखा धोरणामधील म्हटल्या गेलेल्या बदलाच्या संदर्भात आधीच्या कालावधीतील त्रुटींचे प्रकटीकरण टीप क्रमांक 30 मध्ये दिलेले आहे.

**टीप 36 -** कंपनीला जिल्हाधिकारी मुद्रांक अंमलबजावणी-1 कार्यालयाकडून दंडाची नोटीस मिळाली होती. दंडाची रक्कम कंत्राटदारांकडून भरून वसूल करण्यात आली असून त्याचा महापालिकेवर कोणताही आर्थिक परिणाम झालेला नाही.

**टीप 37 -** मेट्रो बांधकाम करारांना लागू होणारा जीएसटी दर दि. 18 जुलै 2022 पासून 12% वरून 18% वर सुधारित करण्यात आला आहे. या खात्यावर होणारा परिणाम निश्चित केला जात आहे.

**टीप 38 -** चालू वर्षाच्या वर्गीकरणाशी सुसंगत राहण्यासाठी मागील वर्षाचे आकडे पुनर्गठित/पुनर्स्थापित केले गेले आहेत.

संचालक मंडळ आणि त्यांच्यावतीने
**मुंबई मेट्रो रेल महामंडळ मर्यादित**
सीआयएन - U60100MH2008SGC181770

| | | |
|---|---|---|
| **ऋतू देब** | **अबोध खांडेलवाल** | **अश्विनी भिडे** |
| कंपनी सचिव | संचालक (वित्त) | व्यवस्थापकीय संचालक |
| सदस्य क्र. – एफ 6754 | आणि मुख्य वित्तीय अधिकारी | अतिरिक्त कार्यभार |
| | डीआयएन - 07807394 | डीआयएन - 02861008 |

**स्थळ -** मुंबई
**दिनांक -** 28 जुलै, 2023